
दिगंबर आळशी
मंथनरत्ने

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# मंथनरत्ने

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# मंथनरत्ने

लेखक

## दिगंबर महादेव आळशी

# मंथनरत्ने

लेखक... दिगंबर महादेव आळशी

पत्ता:२/३, गोदावरी, ३६ एम.आय.जी. विदर्भ हाऊसिंग बोर्ड कौलनी,
काचिपुरा, रामदासपेठ , नागपुर ४४००१०
फ़ोन नं. ०७१२-२५५२०७२/९३७३१०७२२३
Email: dmalsi@rediffmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
Whatsapp: 7710980841
**प्रकाशन : २० मार्च २०२१**

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी -साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

**संक्षिप्त परिचय**

## दिगंबर महादेव आळशी



कौन्सेलर, सायकोथेरापिस्ट, सायकॉलॉजिष्ट; नेचरोपॅथिष्ट अँड मॅनेजमेंट कन्सलटंट

जन्म ता.११-०८-१९४१

शिक्षण बी.ई.(इले); बी.जे.(जर्नालिझम); बी.जी.एल ; एल.एल.बी.; डी.बी.एम ; डीप्लोमा इन नेचरोपॅथी ; डीप्लोमा इन सायकोथेरपी ; डीप्लोमा इन इंटरनॅशनल बिझिनेस ऑपरेशन ; एम कॉम ;एल.एल.एम. (प्री) एम..बी.ए.; एम.सी.जे.(कॉम्युनिकेशन); एम.एस.(सायकोथेरापी अँड कौन्सेलिंग); एम.ए (लोक-प्रशासन; अर्थशास्त्र: राज्यशास्त्र: समाजशास्त्र;.तत्वज्ञान; इतिहास; इंग्रजी; मराठी; हिंदी; भाषाशास्त्र; मानसशास्त्र ; प्राचिन भारतीय इतिहास, संस्कृती व पुराणवस्तु शास्त्र ; मानव विज्ञान (Anthropology))

प्रशिक्षण लंडन येथे १९८७ साली एक महिना व्यवस्थापन कौशल्य , प्रशिक्षण

व्यवसाय सेवानिवृत्त जनरल मॅनेजर (पश्चिम विभाग)

जी.ई.सी. अल्स्थाम इंडिया लिमिटेड, मुंबई.

समाज कार्य

1) माजी अध्यक्ष- अ.भा.अंधश्रध्दा निर्मूलन समिती, नागपुर

2) माजी अध्यक्ष युवक बिरादरी, विदर्भ

3) माजी प्राध्यापक- इंस्टिट्यूट ऑफ़ मॅनेजमेंट अँड रिसर्च सेन्टर्स, नागपुर

4) माजी संचालक , सह्कारी सुतगिरणी जळगांव (जामोद) ,जिल्हा – बुलढाणा

5) संचालक - शेतकी शाळा , माटरगांव बुद्रुक , जिल्हा – बुलढाणा

6) सभासद- भारतीय इंजिनियरिंग संस्था , कलकत्ता

पुरस्कार  फ्रेन्डशीप सोसायटी ऑफ़ इंडियाच्या उत्तम व्यवस्थापक म्हणून विजयरत्न पुरस्काराने माजी पंतप्रधान मा. चंद्रशेखरजीच्या हस्ते संन्मानित



परदेश प्रवास- बॅंग्कॉक, मनिला, सिंगापुर, टोकियो, युरोप, अमेरिका.

ज्ञानार्जनाकरिता चर्चा सत्र , कार्यशाळा

विषय -- १) नैसर्गिक विवेकी जीवन

-- स्वत:ची ओळख

-- आयुष्याची जानिव

-- भ्रमरहित आनंदी जीवन

२) व्यक्तीमत्व विकास

३) आयुष्याचे व्यवस्थापन

४) चिंताविरहित जीवन

प्रकाशित मराठी साहित्य

काव्य संग्रह ,

(१) जीवनाशय-- जीवनानंद , जीवनार्थ , जीवनोद्देश

(२) वस्त्रहरण -- व्यंगानंद

(३) काव्यानंद -- काव्यानुभुती / काव्याभिव्यक्ति

काव्यज्योती / काव्यप्रयोजन

लेख संग्रह

(४) मंथन -- जीवन विश्लेषण

भाषण - प्रवचन विषय

(१) श्रद्धा - अंधश्रद्धा समज-गैरसमज

(२) जीवनाविषयीच्या भ्रामक कल्पना आणि जीवनातील सत्यता

(३) स्वत:ची - मनाची ओळख

(४) संकल्पना - जीव , शरीर व मन

(५) संवादातील चुकीचा युक्तिवाद

(६) फ़सविणारे गैरसमज , अज्ञानी ज्ञान

समुपदेशन

नैराश्य,वैफ़ल्य, अपयश, दुर्दैव यावर मात अणि वैवाहिक, कौटुंबिक,शैक्षणिक, नोकरीविषयक, व्यवसायिक समस्यांचे विश्लेषण आणि त्यावर मार्गदर्शन , निरसन करिता , संपर्क ९३७३१०७२२३ शुल्क तुमच्या समाधानावर. जेष्ठ नागरीकांना निशुल्क, माझा आनंद.

# लेखकाचे मनोगत

मी १९६४ साली व्हीआरसीई नागपुर येथून बी. ई. (ईलेक्ट्रीकल) झाल्यानंतर दिड वर्ष उप-अभियंता म्हणून महाराष्ट्र सरकारच्या जलसिंचन व विद्युत शक्ती या विभागात नोकरी केली. त्यानंतर जनरल इलेक्ट्रिक कंपनी ऑफ़ इंडिया येथे अडीच वर्षे व्यवस्थापकीय प्रशिक्षण घेतले आणि त्याच कंपनीत १९ वर्षे नागपुरला विदर्भ शाखा व्यवस्थापक म्हणून आणि नंतर ९ वर्षे मुंबईला, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजराथ व गोवा या राज्यांचा विभागीय व्यवस्थापक म्हणून नोकरी केली. नोकरी करित असतांनाच मी निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करित राहिलो आणि तसेच वृत्तपत्रांमधून, मासिकांमधून तुरळक कविता व लेख प्रकासित करित राहिलो. सेवानिवृत्तीनंतर १९९८ व १९९९ या दोन वर्षात देशोन्नती या मराठी वृत्तपत्रांमधून तुरळक लेख लिहिलेत. नंतर माझे मित्र श्री. प्रकाशभाऊ पोहरे, मुख्य संपादक देशोन्नती यांच्या प्रोत्साहनाने ११-७-२००० पासून मंथन या सदरातून दर मंगळवारला लेख लिहिलेत. ११-७-२००० ते २-१-२००१ या कालावधित २६ लेख व १५-५-२००१ ते २९-१०-२००२ या काळात ७० लेख असे एकूण ९६ लेख प्रकाशित केलेत. ३-१-

२००१ ते १४-५-२००१ या काळात काही कारणास्तव लेख लिहू शकलो नाही.

सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, आद्यात्मिक आदी विषयांवर हे लेख लिहिलेले आहेत. यामधिल तात्कालिक परिस्थितीवर, घटनांवर आधारित लेख वगळता इतर ४० लेखांचा हा संग्रह मंथन या नावाखालीच प्रकाशित करित आहे. मला विद्यालय, महाविद्यालयात शिकत असल्यापासूनच मुळात, खोलात, नागडे, नागवे विचार करण्याची सवय जडलेली आहे. मी कोणतिही गोष्ट करतांना मुळात, खोलात विचार करितो. भलेही मग कृती करतांना त्याला व्यवहाराची जोड द्यावयाची झाल्यास देतो. असच मुळात खोलात विचार करित न्याहाळल की, लक्षात येत की, आपण, बहुतांशी विचार न करताच किंवा चुकीच्या पायांवर आधारित तर्क वापरून कितीतरी गोष्टी करित असतो. यात शिक्षित-अशिक्षित दोघांचाही समावेश आहे. म्हणूनच अस म्हणाव लागत की आपण शिकून शिक्षित होतो काय? की आपण शिक्षित अशिक्षित होतो! या अनुषंगानेच विचार तुम्हाला माझ्या लेखातून मांडलेले आढळतील. माझ्या लेखातून मी आपले संस्कार, आपल्या समाजधारणा आपणाला कशा कमकुवत करणाऱ्या आहेत, शिक्षण हे जीवन कस जगाव हे कस शिकवित नाही, आपली धार्मिकता, आध्यात्मिकता कशी अतार्किक आहे,

समाज व्यवस्था, समाज रचना कशी भ्रष्ट झालेली आहे, ज्योतिष्य, यातुविद्या यासारखी खोटी शास्त्रे आपणाला कसे फ़सवितात, आणि आपण कसे फ़सतो, फ़सवून घेतो, श्रध्दा-अंधश्रध्दा याविषयी कसे गैरसमज आहेत, घातक श्रध्दा आपण कशा जोपासतो आणि त्यामुळे स्वतःचे कसे नुकसान करून घेतो, कर्मकांडे, धार्मिक विधी किती विचार शुन्यतेने पाळतो, धर्माच्या नावाखाली कसे अधर्म जोपासतो, धर्माचा खरा अर्थ काय आहे? प्रामाणिकपणा व्यवहारातून कसा लुप्त झालेला आहे, राजकारण किती गढूळ झालेल आहे, असमानता, पसरविणार, जोपासणार झालेल आहे, याविषयी सखोल उहापोह केलेला आहे. आपण निसर्गापासून दूर जाऊन कस भ्रामक जीवन जगतो, नुसत्या भौतिक, भ्रामक आनंदामागे धावून कसे ताण तणाव ओढून घेतो, याविषयी पण विचार आढळतील.

हे माझे विचार आहेत अस मी म्हणतो. परंतू खरोखरच आपण ज्याला आपले विचार म्हणतो ते आपले असतात काय? आपण आपणाला जरी आपले म्हणत असलो, आपलेपणाचा अभिमान वा गर्व बाळगत असलो तरी आपण खरोखरच आपले असतो काय? वस्तुतः आपण नावापुरतेच, म्हणायला फ़क्त आपले असतो. वास्तवात आपण समाजाने, परिस्थितीने घडविलेले असतो. आपले विचार सुध्दा आपण वयाने मोठे होत जातांना,

असतांना सामाजिकरणाच्या, संस्कृतीकरणाच्या म्हणजे संस्काराच्या प्रक्रियेतूनच बनवित असतो ना!आपण समाजाचीच घडण असतो ना!

दोन माणसांचे विचार शत-प्रतिशत सारखे असूच शकत नाहीत. इतरांचे विचार आपणाला पटलेच पाहिजेत असेही नाही. बळजबरीने, जबरदस्तीने विचार रूजविता येत नाहीत. अर्थात वक्तृत्व कलेने, लेखणशैलीने, विचार मांडणाऱ्यांच्या व्यक्तीमत्वाची छाप आपणावर अगोदरच पडलेली असल्यामुळे, अशांचे चुकीचे विचार सुध्दा आपण सहज रूजवून घेतो ही गोष्ट वेगळी. कोणाचेही विचार शांतपणे ऐकून घ्यावेत, नंतर सर्व पूर्वग्रह बाजूला ठेवून त्या विचारांवर, विचार सांगणाऱ्यांचे व्यक्तीमत्व, शिक्षण, त्याचा समाजातील दर्जा, मोठेपण आदि बाजूला ठेवून, विवेकपूर्ण, शुध्दतर्क वापरून विचार करावा आणि नंतरच ते विचार पटलेत तरच ते ग्राह्य धरावेत. असे विचार पटले नाहीत, तर त्यातील असंबधता दाखवायला हरकत नसावी. परंतु अशी टिका ही त्या विचारांवरच असा्वी, वैयक्तीक चुकूनही असू नये. विचार पटवून देण्या-घेण्याची प्रक्रिया व्हायला पाहिजे. आणि त्यानंतरही विचार पटले नाहीत तर समंजसपणाने विचार पटत नाहीत असे जाणून घेवून तो विषय बाजूला ठेवायला पाहिजे, विचार पटले नाहीत, पटत नाहीत म्हणून वैयक्तीक द्वेष निर्माण व्हायला नको.

परस्पर संबंधांवर बाधा यायला नको माझ्या लेखांमध्ये मांडलेल्या विचारांविषयीही पण मी हेच म्हणेल. माझ्या लेखांमध्ये मांडलेल्या विचारांवर मी कोणाशीही, केंव्हाही चर्चा करायला तयार आहे. किंबहुना मला ते आवडेल. म्हणून ज्यांना अशी चर्चा कराविशी वाटेल ते माझ्याशी संपर्क साधू शकतात. भ्रामक, तणावपूर्ण जीवन न जगता निखळ, निव्वळ, नितळ आनंदमय जीवन जगाव हेच ह्या लेखांमधून सांगण्याचा प्रयत्न.

# प्रा.पंडितांचे पांडित्यपूर्ण विचारमंथन

माझे प्रेमळ मित्र पंडित आळशी यांचा लेखसंग्रह हाती पडला आणि वाटून गेलं प्रा. पंडित ’आळशी’ कसे? मंथनच्या प्रत्येक पानावरचा मजकूर  पंडिताचे पांडित्य आणि त्यांची उद्‌घोगशिलता सांगून जाते.त्यांची ज्ञानार्जनाची धडपड विलक्षण! त्यांनी संपादन केलेल्या विज्ञान आणि कला विषयातील खंडीभर पदव्या आहेत. अध्यापही त्यांचे अध्ययन अविरत सुरूच आहे . तरीही त्यांचे नाव आळशी. हे असे ’आळशीपण ’ विद्‌घार्जन करणाऱ्या विद्‌घार्थ्यांच्या वाट्याला आलं तर काय मजा येईल!

त्यांचा लेखसंग्रह मंथन म्हणजे मानवी जीवनाचे वैचारिक मंथनच. जीवनाचे विविधांगी बारकावे त्यात समाविष्ट आहेत. " "जीवनाचा अर्थ आणि उद्देश ” हा पुस्तकाचा मुख्य प्रतिपाद्‌घ विषय असला तरी जगण्याचे विविध सुंदर धागे पंडितांच्या निवेदनाला समृध्द करणारे जाणवतात.

आपण जगतांना अनेक वेळा अंतर्मुख होत असतो. मी कशासाठी जगतो ? माझ्या जगण्याचा अर्थ काय ? अशा अचस्थेत माणूस मग अद्‌घात्म्याच्या शोधात भटकतो. आपल्या जीवनाचे प्रयोजनच न कळलेला माणूस मग त्याला कळलेलं अद्‌घात्म ईश्र्वराशी जोडतो. मग मोक्षाच्या कल्पनेने तो अधिकच गोंधळून

जातो. या संदर्भात प्रा. अळशी ' अध्यात्म्याची अवैज्ञानिकता सांगतांना लिहितात

" अध्यात्मिक ज्ञान हे शब्दप्रमाण आणि अलौकिक साक्षात्कार यांच्यावर आधारित आहे. शब्दप्रमाण म्हणजे वेदातील शब्द तसेच अवतार, प्रेषित, धर्मगुरू यांचे शब्द म्हणून प्रमाण मानलेच पाहिजेत. अलौकिक साक्षात्कार हा अतिन्द्रिय ज्ञान करून देणारा इंद्रियातीत , अनुमानातीत असतो. याला अनुभूती असेही म्हणतात. ही अनुभूती म्हणजेच आत्मज्ञान. धर्मग्रंथ, वेद, आणि धर्मगुरू यांची वचने पडताळून न पाहताचे खरे मानायचे, यावरून अध्यात्मिक ज्ञान किती ठिसूळ पायावर उभे आहे , याची कल्पना येते."

असा हा सगळा गोंधळ. गोंधळलेल्या या मानसिक अवस्थेला प्रा. आळशींचे शब्द खूप काही सांगून जातात. आत्मा, परमात्मा,मोक्ष अशा संकल्पनात आजचा स्वत:ल सुशिक्षित म्हणविणारा अद्ययावत (?) माणूस एकदा गुरफ़टून गेला की मग तो प्रवाहपतीत जीवनप्रवाहात बुडत जातो. मंगळावर यान पठविणारा माणूस पत्रिकेत मंगळ शोधतो ,ही केवढी शोकांतिका !

ईश्वर, धर्म आणि अध्यात्म या विषयांसोबतच प्रा. आळशीसर सामाजिक.शैक्षणिक, राजकीय आणि कौतुंबिक अशा

अनेक विषयांवर इथे चर्चा करतात. या चर्चेतून वचक नक्कीच विचार करायला लागतो.

"संस्कारांची गुलामगिरी " विशद करतांना प्रा. आळशी लिहीतात - ’मनुष्य आज साचेबंद झालेला आहे.तो विचारशुन्य झालेला आहे. कितीतरी गोष्टी कर्मकांड, विधी, व्यवहार आपण का करतो याचा यत्किंचितही विचार तो न करेसा झालेला आहे. त्याच्या विचारात नुसतीच न्युनता नाही तर उणेपणा पण आलेला आहे. त्याचे विचार विवेकी असण्यापेक्षा विकारीच आहेत. चुकीच्या प्रवाहाच्या दिशेने तो वाहत आहे . अशा प्रवाहाच्या विरुध्द पोहण्याचे सामर्थ्य तर सोडाच, परंतु त्याची तशी विचार करण्याची प्रवृत्तीच नाही. अशा संस्कारांचा जबरदस्त पगडा मानवांवर आहे. तो अशा संस्कारांचा गुलाम झालेला आहे. समाज आज जो भरकटलेला आढळतो , त्याचे हेच प्रमुख कारण आह.’

प्रा. आळशीचे चिंतन अगदी साध्या सरळ भाषेत लिहिलेले आहे. म्हणूनच ते सर्वसामान्य वाचकांच्या मनाचाही ठाव घेणारे आहे. त्यांच्या लिखाणात भाषेचा कुठे बडेजाव नाही. शब्दांचे काठिण्य नाही. अगदी सहज बोलावे असे ते वाचकांशी बोलतात. त्यांची कविताही तशीच आहे. सुंदर जीवन सांगतांना प्रा. आळशी त्यांच्या एका कवितेत लिहितात -

" जीवनी जडावा एकच छंद
प्रेम जोपासण्यात असावे धुंद
प्रेमच बहरवी मनी स्वानंद
प्रेमच पसरवी चहुकडे आनंदी आनंद

त्यांचे हे विचार-मंथनच आनंदी डोहीचे आनंद देणारे अहे. आनंदी जीवनाचा तो आविष्कार आहे. आनंदाचा आरसा आहे. तो आरसा कसा बघावा याचे मार्गदर्शनही या त्यांच्या पुस्तकात आहे.

माणूस शेवटी कशासाठी जगत असतो? आनंदप्राप्तीसाठी ना! मग तो दु:खी का? कारण त्याला जगण्याचं प्रयोजन गवसलं नसत म्हणून! जे अतित्वातच नाही त्या तत्वांच्या मागे माणूस लागतो आणि शेवटी दु:खच त्याच्या पदरात पडतं. म्हणून जगण्याच्या प्रयोजनाला वैज्ञानिक तत्वाचे अधिष्ठान आवश्यक असते. प्रा. आळशीच्या या विचारमंथनातून मला इतकेच कळले. धन्यवाद.!

**प्रा. जगन वंजारी**
भ्रमणभाष ; ८३०८७९९६९६
सेवानिवृत्त मुख्य संपादक मराठी दैनिक, लोकमत,
नागपुर

# मंथनरत्ने

अनुक्रमणिका

(१) जीवनाचा अर्थ आणि उद्देश

(२) आनंदी जीवन

(३) आकुंचित प्रेम संस्कार

(४) विद्वत्ता आणि विवेकता

(५) मन दुखणे, मन दुखविणे आणि मन सांभाळणे

(६) निस्वार्थीपणा, सेवा, त्याग

(७) विचार, मत आणि मन

(८) अभिमान, अहंकार, गर्व

(९) जीवनातील सुख-समाधान

(१०) व्यक्तिमत्व विकास आणि स्वविकास

(११) चांगला आणि मोठा

(१२)आयुष्याचे व्यवस्थापन

(१३)संस्कारांची गुलामगिरी

(१४) गुलामगिरीचे संस्कार

(१५) समाज सेवेचा धंदा

(१६) आपल्या समाज व्यवस्थेतील दोष आणि उणिवा

(१७) महान-मोठे; कितीखरे--कितीखोटे

(१८) समाजाला घातक राजकारण

(१९) स्त्री-पुरुष समानता

(२०) भ्रस्टाचार एक शिस्टाचार

(२१) मरावे परि किर्ती रुपे उरावे

(२२) आराम आहे हराम

(२३) श्रद्धा-अंधश्रद्धा, समज-गैरसमज

(२४) जीव, शरीर व मन- वैज्ञानिक दृस्टीतून

(२५) भारतात उदयास आलेल्या धर्मांची ओळख

(२६) परदेशात उदयास आलेल्या धर्मांची ओळख

(२७) अध्यात्म्याची अवैज्ञानिकता

(२८) ईश्वराचे अस्तित्त्व

(२९) इश्वराचे स्वरुप

(३०) धर्माचे प्रयोजन

(३१) खरा धर्म

(३२) धर्माचे खरे मर्म

(३३) धर्म निरपेक्षता

(३४)धार्मिकपतन

(३५) मरणोत्तर जीवन

(३६) श्राध्द-विधी चिकित्सा

(३७) कर्मकांड-प्रथा, रुढी, विधी आदि

(३८) यातूविद्या- मंत्र, तंत्र, जादूटोणा आदी

(३९) नशीब

(४०) भविष्य--ठरलेले की घडविता येणारे

# प्रस्तावना

ज्येष्ठ परिवर्तनवादी लेखक आदरणीय प्रा. दिगंबरराव आळशी यांचा 'मंथनरत्ने' लेखसंग्रह प्रकाशित करतांना मला मनस्वी आनंद होत आहे. मानवी मनाचे विविधांगी कंगोरे, जीवनादर्श प्रमेय आणि सचेतन दृष्टी या वैचारिक बंधाचा सेतू म्हणजे खऱ्या अर्थाने वैचारिक मंथन होय. याच पार्श्वभूमितून अत्यंत विलक्षण मांडणे प्रा. आळशी यांनी उत्तम प्रकारे केली आहे.

अंतर्मुख आयुष्याचे समीकरणही "अध्यात्म्याची अवैज्ञानिकता" या प्रकरणात अतिशय समर्पक व मार्मिक पध्दतिने लेखकाने दर्शविलेली आहे. प्रा. आळशी यांची चिंतन प्रक्रियाही निरंतर असते. या प्रक्रियेतूनच ते खऱ्या अर्थाने समाजाला लेखनाच्या माध्यमातून शिकवन देत असतात.सर्वसामान्य माणूस हा प्रा. आळशीच्या लेखनप्रक्रियेत केंद्रस्थानी आहे. जीवनाच्या नव्या दिशा, नवे मार्ग, विज्ञानवाद तसेच मानवीमूल्य या प्रमेयाला प्रा. आळशी अत्यंत जबाबदारीने विचारमंथन करतात. साध्या, सोप्या परंतु कुठेही शब्दांचा अवडंबर न करता सामान्यांना समजेल अशा शब्दात लेखक सर्वसामान्यांच्या मनाचा ठाव घेतात. सर्वसामान्यांचा हुंकार त्यांच्या काव्यातून तथा लेखनातून अत्यंत कौशल्याने समाजमनाला दिसून येते. बुध्दीप्रामाण्यवादी लेखक

म्हणून प्रा. आळशी साहित्यक्षेत्रात लौकीकता प्राप्त करतात. काव्य,वैचारिक लेख या साहित्याच्या प्रांतातील प्रा. आळशीची वाङ्मयीन निष्ठा अभिनंदनीय आहे. खऱ्या अर्थाने ते मानवीमूल्य जपणारे व जागृत करणारे परिवर्तनवादी लेखक आहेत.

जीवनादर्शचा उत्तम रसायन मांडणारी आणि परिवर्तनवादी विचारांची कास धरणारी मार्मिकता प्रा. आळशीच्या लेखन प्रवृत्तीचे गुणधर्म आहे. नवसमाज निर्मितीचे स्वप्न पाहणारे आणि खऱ्या अर्थाने बदल घडविणारे लेखक म्हणूनही त्यांची ख्याती आहे. भविष्यातील वाङ्ग्मयीन निर्मितीकरिता मन:पूर्वक शुभेच्छया !

प्रा. बळवंत भोयर
संस्थापक-संचालक
रसिकराज प्रकाशन, नागपूर.

# (१)

# जीवनाचा अर्थ आणि उद्देश्य

जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला, आयुष्यात केंव्हा ना केंव्हातरी आपण कोठून आलोत, का आलोत, हे प्रश्न घेराव करित असतात. या प्रश्नांनी तो बराच काळ व्यथित पण राहत असतो. या प्रश्नांची उत्तरे मग तो, त्याला तोपर्यंत झालेल्या, असलेल्या माहितीच्या आधारांवर शोधत असतो. जसे की, संस्कारातून त्याला जीवनाविषयीच तत्वज्ञान शिकविल्या जात आणि त्यानुसार माणसाचा जन्मच मूळी, माणसाचा जन्म कसा व कशाकरिता झाला हे शोधण्याकरिता, याच ज्ञान करून घेण्याकरिताच आहे अस सांगितल्या जात, अस त्याचे मनावर रुजविल्या जात आणि आतापर्यंत प्रत्येक जन हेच गृहित धरून चाललेला आहे व त्या दिशेने मार्गक्रमण करित आलेला आहे. परंतू अजूनपर्यंत तरी कोणालाही याचा शोध लागलेला नाही, ज्ञान झालेल नाही आणि यापुढेही ते कोणाला होणार नाही. तरीपण आपल्या संस्कारांमूळे आपण याच तत्वाला बांधील राहणार. कारण संस्कारांची पकडच तितकी घट्ट आहे, असते.

आपल्या तत्ववेत्यांनी आपल्या जीवनाच तत्वज्ञान फ़ारच किचकट करून ठेवलेल आहे. याच कारण तत्ववेत्ते हे एकतर स्वतःला विद्वान समजणारे होते किंवा आपण त्यांची गणना विद्वानात करित असतो. मी मात्र उपहासाने, सरळ, साधी, सोपी गोष्ट कठिणात कठिण आणि क्लीष्ट करणे, करून सांगणे म्हणजे विद्वत्ता असे म्हणतो. आणि सहज समजणारी गोष्ट न समजणारी करणारा, तो विद्वान असे समीकरण मांडतो. आपल्या जीवनाविषयीच तत्वज्ञानही असच उगीचच अनाकलनीय करून ठेवलेल आहे. जीवनाचा अर्थ काय आहे? जीवनाचा उद्देश्य काय! जीवनात हमखास काय करायच असत? जीवन कशासाठी? या प्रश्नांची उत्तरे कोणालाच माहित नाहीत आणि माहित होतील किंवा नाहीत, होतीलच तर केंव्हा? तेही सांगता येत नाही. अर्थात या प्रश्नांची उत्तरे माहित नसणे, त्याविषयीचे ज्ञान नसणे हा गुन्हा नाही. परंतू असे कबूल करणे म्हणजे कमीपणा माणून घेणे असे विद्वानांना, तत्ववेत्त्यांना वाटले आणि त्याकरिता ते अजिबात तयार नव्हते. म्हणून जीवनाचा उद्देश म्हणजे मोक्षप्राप्ती, मुक्ती अशी बिरूदे त्यांनी चिकटविलीत. परंतू मोक्षप्राप्ती म्हणजे काय? मुक्ती म्हणजे काय? याचा समजण्यासारखा खुलासा अजूनपर्यंत कोणीच करू शकलेला नाही. मागील कितीतरी शेकडो वर्षाचा इतिहास आपल्याला चांगलाच ज्ञात आहे. या शेकडो वर्षात कोणाला

मोक्षप्राप्ती झाली. मुक्ती मिळाली हे कोणीतरी सांगू शकेल काय? कितीतरी पराक्रमी, बहुगूणी, पंत, महंत, संत, अर्हंत, लोकप्रिय नेते आदी होवून गेलीत, त्यांना तरी मुक्ती लाभलेली आहे काय? याविषयी कोणीतरी पटेल अस सांगू शकेल काय? जन्माजन्मा पासून सुटका म्हणजे मुक्ती अस सांगण्यात येते. मग याला किती साधा उपाय आहे. असा एक फ़तवाच काढावा की, यापुढे कोणत्याही स्त्रीने मुल जन्माला आणू नये. गरोदरपणा शस्त्रक्रिया करून टाळावा किंवा गरोदर राहिलेल्या स्त्रीने शस्त्रक्रिया करून गर्भ काढून टाकावा. जन्मापासून सुटकाच करायची आहे तर मग हा साधा उपाय नाही काय! जन्माला येवून, मरेपर्यंत जगून, मग जन्मापासून सुटका करून घ्यायची,

इतका उपदव्याप कशाला?

दुसरे म्हणजे मोक्ष किंवा मुक्ती म्हणजे काय? मोक्ष मिळाल्यानंतर काय होणार, होते? याची पुसटशीही कल्पना नसतांना, अशा गोष्टींचा ध्यास जीवनात धरणे कितपत योग्य आहे. आजच जीवन चांगल, सफ़ल असणे महत्वाचे की, पुढील कपोलकल्पित जीवनासाठी मोक्ष किंवा पुढील जीवनापासून सुटका म्हणून मुक्ती, याकरिता आज हालापेष्टात, दुःखात जीवन कंठणे योग्य; याचा विचार करायला नको काय?

आणखी म्हणजे मानव मृत्युनंतर पुनर्जन्म घेतो कि पाप-पुण्य कर्मानुसार नरकात वा स्वर्गात जातो याविषयी पण स्पष्टता नाही. मानव एकतर पुनर्जन्म घेईल किंवा स्वर्ग-नरकात जाईल. दोन्ही होणे तर शक्य नाही. मग कोणते खरे, कोणते खोटे, सांगू शकेल कोणी. याव्यतिरिक्त अतृप्त इच्छा पूर्ण करण्याकरिता तो भूत बनतो काय? काय खर, काय खोट याचा आपणच विचार करावा

वास्तवात जीवनाच सत्य हे आहे की, ते सत्य कोणालाच ठाऊक नाही, माहीत नाही. माहीत करून घेण्याचा प्रयत्न भलेही करित राहा. जीवनात एकच सत्य अबाधित आहे. आणि ते म्हणजे मरण. बाकी सर्व नुसत्या कल्पना. जीवन म्हणजे जन्मापासून मरणापर्यंत जगणे. कस जगल म्हणजे जीवन सार्थकी लागेल, सफ़ल होईल, याविषयी प्रत्येकाच्या निरनिराळया कल्पना आहेत. कोणाला इंजिनिअर, कोणाला वकिल, कोणाला डॉक्टर, कोणाला कारखानदार, कोणाला यशस्वी व्यवसायी, कोणाला ज्ञानसम्राट, विद्याविभूषित, कोणाला संशोधक, कोणाला आमदार, खासदार, मंत्री, समाजसेवक; कोणाला पंत, श्रीमंत, अर्हंत, संत, महंत; कोणाला मान-सन्मान मिळवून देणारे लोकप्रिय नेते होण्याने जीवन सार्थक झाल्याच वाटत असत. स्त्रीला आई होण्याने जीवन सार्थक झाल्याच वाटत. कोणाला दान केल्याने, दुसऱ्यावर कुरघोडी केल्याने जीवन सफ़ल झाले असे वाटते. सामाजिकीकरणाच्या,

संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेतून, शिक्षणातून, मिळालेल्या संस्काराच्या आधारावर, प्रत्येकजन जीवन कशाने सार्थक होईल याविषयी आराखडे मांडित असतो. परंतू विचार करा, डॉक्टर, इंजिनिअर होणे; मी एका मोठ्या कंपनीचा जनरल मॅनेजर होतो, तसे होणे; हा जीवनाचा उद्देश असू शकतो काय? आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, पंतप्रधान, व्यवसायी, ज्ञानसम्राट आदि होण्याने जीवनाचा हेतू पुर्ण होवू शकतो काय? अस असेल तर मग, जेंव्हा शिक्षण नव्हते, वकिल, डॉक्टर, इंजिनिअर नव्हते, मंत्री आदि नव्हते, तेंव्हा जे लोक जगलेत त्यांचे आयुष्य पुर्णपणे निरर्थक होते, बेमतलब होते असेच म्हणावे लागेल! हे आपणाला पटत काय? हे आपणाला मान्य आहे काय? म्हणूनच मी इंग्रजित म्हणत असतो, In life we waste (spend) time in doing, so called creative, constructive things. प्रत्येकजन जे ठरवितो. तेच सार्थक (creative) मानतो. शेवटी जीवनाविषयी

जीवनाचा काय असे अर्थ?
जीवनाला आहे काय काही अर्थ?
कितीतरी पिढ्या संपल्या याच्या शोधार्थ

ऋषी-मुनींनी तपश्चर्येतूनि काढले, जीवनाचे कितीतरी मतितार्थ

वेद-वांङ्गमयातूनि कितीतरी निघाले, जीवनाचे भावार्थ

यातूनिच उदयास आलेत धर्म, करण्या जीवन सार्थ

धर्माच्या नावाखाली जीवनाला चिकटविलेत, आपण कितीतरी अर्थ

परंतु कोणासही न समजला, धर्माचा खरा गाभार्थ

अंतिम सत्य एक, साक्षात्कार निरनिराळे अनेक, काय याचा गुढार्थ

अंतिम सत्य न ठावे कुणाला, हेच सत्यार्थ

शोधण्या मात्र ते, जीवन आपण गमावितो व्यर्थ

सत्य कळण्या, शोधू जातो आपण आत्मा-परमात्मा सुक्ष्मार्थ

यातचि परि विसरतो, आपण जीवनाचा खरा पदार्थ

जीवन आपण खंगवितो भूतकाळाच्या पश्चातापार्थ

विचार सदैव आपले, भविष्यातील भल्या जीवनार्थ

जीवन परंतू आपण, क्वचितची जगतो, वर्तमानार्थ

का जीवन आपण हरक्षणी, मरत असतो, जगण्यार्थ
का जीवन आपण हरघडी, जगत असतो मरणार्थ
विचार करा, केंव्हा जीवन जगतो आपण जगण्यार्थ

चुकीचे असती जीवनाचे असे हे सर्व अर्थ
यामुळे उगीच आपण ओढवूनि घेतो कितीतरी अनर्थ
जीवनाचा असेना, जीवनाला नसेना, का काहीही अर्थ
जीवन जगावे हरघडी, हरस्थळी, हरप्रसंगी फ़क्त आनंदार्थ
विना आनंद; मान, पान, ज्ञान; आन, बान, शान; सर्व व्यर्थ

सर्वांनी जाणूनि घ्यावा, जीवनाचा हाच इष्टार्थ
सरळ, साधा, सोपा, सहज, सुलभ आणि समग्र अर्थ
अर्थपूर्ण जीवन, फ़क्त खेळीमेळीच्या आनंदार्थ
यासाठी परि हवी जबर इच्छाशक्ती आणि मन मात्र समर्थ

जीवनात आनंद मिळविणे, आनंदात जीवन जगणे, हाच जीननाचा योग्य उद्देश ठरू शकतो. परंतु याकरिता आपल्या आनंदाविषयीच्या कल्पना स्थीर असावयास पाहिजेत. आजचा आनंद उद्या दुःख देणारा असेल तर असा आनंदही कामाचा नसतो. चिरंतन, चिरस्थायी आनंद हवा.

हरघडी, हरस्थीती, हरप्रसंगी आनंदी राहणे; हे प्रथम, आद्य कर्तव्य आणि इतर कर्तव्ये आनंद वृध्दींगत करण्याकरिता हवेत, असावेत. आनंदात आनंदाने सहज इतरांनाही आनंद देण्याचे कर्म करून आपला आनंद वाढविण्याकरिता कर्मे हवित. आपले स्वतःचे घर, कुटुंब दुःखी करून इतरांची सेवा करून मान-सन्मान मिळविण्याची, मोठे होण्याची वृत्ती मला तरी पटत नाही. सोंगी-ढोंगी वृत्ती तर मुळीच नाही. अशी वृत्ती सात्विक, प्रांजळ आनंद देवूच शकत नाही. पहा, हे तुम्हाला पटते काय?

# (२)

# आनंदी जीवन

आनंदी जीवन जगणे हाच जीवनाचा खरा उद्देश आहे, असावा. परतु असा आनंद हा क्षणिक नसावा. तो चिरस्थायी असावा. असा चिरस्थायी आनंदच मूळी आपल जीवन तणाव रहित राहण्यास, घालविण्यास उपयोगी पडतो. क्षणिक आनंद मिळविण्याच्या मागे लागल्याने मात्र तणावच वाढत असतात. आपण आनंदाचे भौतिक आनंद आणि मानसिक आनंद असेही प्रकार करतो. दोन्ही आनंदाचा संयोग (blend) आयुष्यात घडून यायला पाहिजे. स्वास्थ निरोगी नसेल, तर मन स्थीर राहणार नाही आणि मन चंचल असेल तर स्वास्थ बिघडविल. वास्तवात तस पाहिल तर, मन हे आपल्या शरीरातील बुध्दीशी, मेंदूशी संबधित मज्जातंतू व्यवस्थेचा (Nervous System), त्यातील क्रियांचाच मानलेला, संकल्पलेला एक भाग आहे. आपल्या निसर्गाविषयी व निसर्गाने मानवावर केलेल्या प्रक्रियेवषयी माहिती आपणाला ज्ञानेंद्रियातून होते, जसे की, आपण आपले डोळे, कान, नाक, जीभ, त्वचा आदि आपल्या घेयकेंन्द्राद्वारे (Receptors) आपल्या वातावरणातील तसेच दुसऱ्यांकडून येणाऱ्या संवेदना (Stimuli)

स्वीकारतो. घेयकेंन्द्राला जोडलेल्या संवाहिण्या द्वारा (Carriers) ह्या संवेदना आपण मेंदूकडे पोहोचवितो. अशा संवाहिण्यांचे, मज्जातंतूचे जाळेच मूळी आपल्या शरीरभर पसरलेले आहे. शरीराच्या आत निर्माण होणाऱ्या संवेदना जसे की, पोटदुखी, डोकेदुखी, आदि अशाच संवाहिण्याद्वारा मेंदूकडे पोहचत्या होतात. या संवेदना आपल्या स्मरणशक्ती भांडारात (Memory) माहितीच्या रूपात जमा होतात, साठविल्या जातात. अशा कितीतरी संवेदना दर क्षणाला मेंदूकडे जातात, स्मृती (मेमरी) मध्ये जमा होतात. या संवेदनांवर मेंदूचाच एक भाग असलेल्या, मध्यवर्ती प्रक्रिया केंन्द्रात (Central Processing Unit) प्रतिक्रिया होतात. आणि अशा प्रतिक्रियातूनच, कृती (Actions, Responses) घडतात. अशी सर्व साधारणपणे संवेदना झाल्यापासून कृती पर्यंतची (Stimuli-Response) प्रक्रिया असते. मेंदूतील मध्यवर्ती प्रक्रिया केंन्द्रातील प्रक्रियेचाच भाग म्हणजे विचार. आपण संवेदनांवर, मिळालेल्या माहितीवर विचार करूनच कृती करित असतो. आणि असा विचार म्हणजे अपणाजवळ अगोदरच जमा झालेल्या, असलेल्या माहितीशी नवीन माहितीची सांगड घालणे. नवीन माहिति जुन्या माहितीशी तादात्म्य साधते किंवा नाही, जुळते किंवा नाही, हे ठरविणे. (Association & dissociation). अशा विचार प्रक्रियेचे मी दोन भाग करित असतो. विवेक आणि विकार.

विवेक हा तर्काधिष्ठित असतो, तो सर्वांकरिता लागू असतो. विवेकपूर्ण शुध्द तर्कावर आधारित विचार सर्वांचेच सारखेच असावयास पाहिजेत. परंतु आजकाल अनाकलनीय, अशुध्द तर्क, अतर्कट विचार (Logical Fallacies) पण वापरण्यात येतात आणि हेच सामाजिक दुफ़ळीच कारण ठरत. विकार हा वैयक्तीक असतो. तो तुमच्या भावनांशी, वासनांशी निगडीत असतो. भावनांचा संबंध आपण जास्त करून आपल्या मनाशी जोडत असतो. आपल्या नैसर्गिक, तसेच सामाजिक गरजातून. इतरांशी असलेल्या संबंधातून, संस्कारातून आपण विकार बाळगत असतो. सर्व विकार वाईट असतात अस सरळसोट विधान चुकीचे ठरेल. भावना खोट्या, फ़सव्या असतात, व म्हणून घातक असतात, त्या माणसाला कमकुवत बनवितात, असे संबोधिणे पण बरोबर नाही. इतकच की विकारांना शुध्द तर्कावर तोलता येत नाही. म्हणून त्यांना तर्कच नसतो असे नव्हे. आई-वडिलांवर, गुरूवर, मोठ्यांवर विश्वास ठेवणे ही भावना चांगलीच. परंतु अशा भावनांचा विश्वासघात होत आहे, हे तर्काने पडताळून पाहण्याची संधी उपलब्ध असतांना, ती न घेणे,

भावनांमुळे विश्वासघात होवू देत राहणे, हे चुकीच ठरत. एका व्यक्तीविषयीच्या भावना जोपासण्याकरिता, दुसऱ्या व्यक्तीचा तिरस्कार करणे, हे क्षणिक आनंद भलेही देवू शकेल, पण

चिरस्थायी आनंदास ते मारकच ठरणार. म्हणून आपण आपल्यावर असे संस्कार घडविले पाहिजेत की, जेणेकरून आपण आपल्या विचारात शुध्द विवेक आणि व्यापक भावना यांचा मेळ घालू शकू. लहान मुलांवर असे संस्कार घडविण्याची जबाबदारी, आई-वडिल, बहीण-भाऊ, म्हणजे मोठ्यांवर असते. समाजात दुःखे आपण चुकीच्या संस्कारातून जोपासत आलेलो आहोत, अजूनही जोपासत आहोत. म्हणूनच समाजात आज जास्त तणावच आढळतात. माणसा-माणसात, जाती-जातीत, धर्मा-धर्मात वितुष्ट, असंतोषच आहे. दुःख हे विषेशकरून आपल्या अशुध्द तर्काधिष्ठित विचारात, घातक विकारात आहे आणि हे संस्कारातून बदलायला पाहिजे, त्यातूनच ते बदलू शकेल, शकत.

आपल्या संस्कारातून म्हणजे आपल्या आजूबाजूकडून, आजूबाजूंच्याकडून मिळालेल्या संवेदनातून, माहितीतून आपल्याला जी विचारदिशा मिळते, मिळालेली आहे त्यानुसार आनंदाच्या चुकीच्या कल्पना आपल्या मेंदूत तयार झालेल्या आहेत, होत आहेत. आणि म्हणूनच यानुसार उमटलेल्या प्रतिक्रिया, कृती ही निव्वळ, निखळ आनंद देणारी राहात नसून, जास्त दुःख देणारी, तणाव निर्माण करणारीच असते.

जीवनात काय करायला पाहिजे? जीवनात जास्त महत्व कशाला द्यायला पाहिजे? याचा सखोल विचार आज कोणीच करतांना दिसत नाही. आपण जन्माला यायच्या अगोदर जन्मलेले लोक, किंवा आपणाला जीवनात लहानाचे मोठे करणारे लोक, जसे जीवन जगतात व ते जसे जगण्यास सांगतात. तसेच जीवन आपण जगत असतो, स्वीकारित असतो. ते सांगतात याच्यावर प्रेम करा, त्याचा द्वेष करा तसेच आपण करित असतो. धर्मा-धर्मातील लोक एकमेकांविषयी अनादर, द्वेष याच तऱ्हेने करितात. जातीजातीत तेढ यामुळेच निर्माण झालेली आहे, होत आहे. शिक्षित-अशिक्षित, गरीब-श्रीमंत, खेडूत-शहरी, मालक-नोकर यांच्यात दरी निर्माण होण्यासही अशीच कारणे आहेत. खूप पैसा, खूप मोठेपणा मिळविण्याचा प्रयत्न करणे, ऐषोरामात, तोरा मिरवित जीवन जगण्याची अभिलाषा आणि याकरिताच शिक्षण घेणे, व्यवसाय, उद्योग, व्यापार करणे, समाजकारण, राजकारण करणे आदि घडत. आपले शिक्षण हे तत्वाधिष्टित असण्यापेक्षा एखाद्या विशिष्ट क्षेत्रात यशाधिष्टित होण्याकडेच त्याचा जास्त कल आहे. परंतू असे यश क्षणिक आनंदाचे असते हे कोणीच जाणत नाही. शिक्षणाचा उद्देश हाच मुळी माणसान, जीवन कस जगाव हे सांगण्याचा, त्यासाठी मार्ग दाखविण्याचा, तसा माणूस घडविण्याचा असतो, असावा, पण आपण आपल्या शिक्षणाचा धंदा केलेला आहे, शिक्षणाचा

व्यापार, बाजार मांडलेला आहे आणि त्यामुळे मुख्य उद्देशांपासून शिक्षणाने केंव्हाच फ़ारकत घेतलेली आहे. आज शिक्षणात मुख्य आणि जास्त भर, माणसाला पैसा कमाविण्याचे यंत्र बनविण्याकडे आहे. याकरिता मग शिक्षणातून प्रामाणिकपणाला तिलांजली दिल्या जाते, अशुध्द, अनाकलनीय, भ्रष्ट, स्वार्थाला अनुकूल असे तर्क वापरण्याचे शिकविल्या जाते, तसे मार्ग दाखविल्या जातात. बरे, खूपच पैसा मिळविलेले, श्रीमंत, धनवान झालेले, असलेले लोक, खूपच मानाच्या पदव्यावर गेलेले लोक, काही विशिष्ट क्षेत्रात यशाच्या अत्युच्च शिखरावर पोहोचलेले लोक आनंदीच असतात, आहेत असेही नाही. जर अशा गोष्टींनी जीवनाचा उद्देश सफ़ल होत असेल, अशा करिताच जीवन जगणे असेल, तर मग ह्या गोष्टी प्राप्त झालेले, असलेले सर्वच लोक आनंदात का नसतात? सन्मानाच्या, पैशाच्या, यशाच्या मागे लागलेले, ह्या गोष्टी मिळालेले कितीतरी लोक फ़ारच तणावयुक्त जीवन जगत असल्याचे आपणास दिसेल. अशांना अशाचाच ध्यास लागलेला असतो. त्यापलिकडे त्यांना काही दिसतच नसत. यामुळेच घराकडे, बायको, पोर याकडे दुर्लक्ष होत. घरात सर्व दुःखी, असमाधानी असतात. मग सांगा अशांना तुम्ही आनंदी म्हणाल काय? त्यांनी जीवनाचा उद्देश साधला असे मानाल काय?

आयुष्यात आपणाला तीन सामूहिक भूमिका (Role-Sets) करायच्या असतात. त्या म्हणजे कौटूंबिक, अर्थार्जनार्थ, आणि सामाजिक. आपण यातील अर्थार्जनार्थ हीच भूमिका प्रामुख्याने निभावत असतो. बाकीच्या दोन्ही भूमिकांकडे दूर्लक्ष करतो, त्यांना दुय्यम माणतो. आपण जर कौटूंबिक आणि सामाजिक भूमिका पार पाडू शकलो नाही, तर मग कितीही पैसा मिळविला तरी त्याला काहीच अर्थ उरत नसतो, हे आपण लक्षातच घेत नाही. अर्थात कौटूंबिक, सामाजिक भूमिका पार पाडयला किमान पैसाही लागतोच, हेही तितकेच खरे. म्हणून जीवनात स्थायी आनंद मिळविण्यासाठी या तिन्ही भूमिकंचा योग्य संयोग घडविता, साधता आला पाहिजे. (Blend of these three Role-Sets). खूप पैसा, मान-सन्मान, यश मिळवा अथवा न मिळवा, परंतु प्रेम मात्र जरूर मिळवा. जीवनत माणसाला प्रेमच आनंद देऊ शकते. परंतु याकरिता प्रेमाच खर स्वरूप माहित असावयास हव, करून घ्यावयास हव. स्वार्थी प्रेमाचा आनंद हा फ़ारच सीमित असेल. निस्वार्थी, निर्व्याज्य, निरपेक्ष, निरंतर, निव्वळ, प्रेमच जीवनात चिरस्थायी आनंद देऊ शकते, जीवन सार्थक आणि सफ़ल करू शकते. परंतु खेदाने म्हणावे लागते की, आपणाला मिळालेले, आपण जोपासत असलेले प्रेमाचे संस्कार हे फ़ारच आकुंचित

आहेत आणि म्हणूनच खऱ्या प्रेमापासून, आनंदी जीवनापासून आपण दूर असतो, वंचित राहतो.

आनदी जीवन जगणे, हाच जीवनाचा खरा उद्देश. मी तर म्हणेल तोच एकमेव उद्देश आहे, असावा. परंतु असा आनंद हा क्षणैक नसावा. ज्या गोष्टींमुळे किंवा गोष्टींपासून आपण आनंद उपभोगतो, त्या गोष्टींच्या भविष्यातील दुष्परिणामाविषयी यतकिंचितही शंका, खंत आपल्या मनात नसावी. आनंद हा क्षणैक नसावा, तो चिरस्थायी असावा.

आपणाला आपल्या संस्कारातून आपल्या आचार-विचार या विषयी, जी दिशा मिळते, तीनुसार आपल्या आनंदी जीवनाविषयीच्या संकल्पना बनत असतात. मला खेदाने म्हणावे लागते की, आपले संस्कार आपल्या मनात आनंदी जीवनाविषयीच्या भ्रामक कल्पनाच रुजवितात आणि यानुसार कर्तव्ये करून, आपण जीवनात आनंदाशिवाय जास्त तणावच ओढून घेत असतो.

मी एम. ए. एंग्रजी या विषयाचा अभ्यास करतांना जीवनाविषयी एक वाक्य माझ्या वाचण्यात आल. ते मला फ़ार संयुक्तीक वाटत. ते म्हणजे, मराठीत; " जीवनात सदा आनंदी राहाण, हेच प्रत्येकाच प्रमुख कर्तव्य आहे, असाव. " आपण मात्र

जीवनात आनंद मिळण्या-मिळविण्याकरिता, नाही ती कर्तव्ये करितो, पण हरघडी, हरस्थीती, हरप्रसंगी आनंदी राहाणे, हेच कर्तव्य करित नाही. जीवनात आनंदी राहण्याकरिता काही हव असेल तर ते म्हणजे जबर इच्छाशक्ती आणि समर्थ मन आणि हेच घडविण्याचे कर्तव्य आपण करित नाही.

इतर सर्व कर्तव्ये; जसे की शिक्षण घेवून ज्ञान मिळविणे; नोकरी, व्यवसाय, धंदा करून धन मिळविणे; नेता, अभिनेता, महंत होवून मान-सन्मान मिळविणे; हे सर्व आपण करित असतो. ही कृत्ये जर आनंदात, प्रामाणिकपणे केलीत तर आपला आनंद वृद्धिंगत होण्यासच मदत होईल. परंतु आपण ही कर्तव्ये, सदा आनंदी राहण्याचे प्रथम कर्तव्य करून, आनंदात करित नाही. अप्रामाणिकपणे, निरिच्छेने, तणावात अशी कृत्ये करून खरा आनंद कधीच मिळत नाही. अशा तऱ्हेने यशस्वी झालेली, दिसत असलेली माणसे, बाह्यांगी आनंदी दिसत असलीत, तरी अंतरंगी ती ग्रासलेलीच असतात. विना आनंद; मान, पान, ज्ञान, आन, बान, शान, सर्व व्यर्थ असते.

आपल्या भ्रांत सुखाच्या, भ्रामक आनंदाच्या संकल्पनांमुळे; आपण निखळ, निव्वळ, प्रेमळ आनंदापासून दूरच राहतो आणि तणाव युक्त आयुष्यच जगतो.

म्हणतात जीवन जगावे आनंदाने
आणि आनंद मिळतो मानल्याने
मग का आपण, आहे त्यात मानीत नाही आनंद
लावून घेत नाही, विनामूल्य उपलब्ध आनंदी छंद
होवूनि स्वछंदी, लुटत नाही निसर्गानंद
थांबवित नाही, आनंदाविषयीचे मनोद्वंद

जगातील सर्व धर्म सांगतात की मानवाच्या जीवनात दुःखच-दुःख आहे. परंतु मी धाडसपूर्वक अस विधान करितो की, आपल्या आयुष्यात अजिबात दुःख नाही. दुःख आपण आपल्या डोक्यात, विचारात, मनात चुकीच्या संस्कारांनी, संस्कारलेले आहे. शारिरीक त्रास हा नैसर्गिक असतो किंवा आपल्या वा इतरांच्या दुर्लक्षतेमुळे उदभवतो. अपघात झाला, जखम झाली, आजार झाला, त्याचा कमी-जास्त प्रमाणात त्रास भोगावा लागणारच. तुम्ही अशा त्रासाचे दुःख वा दुर्दैव न मानता, जितक्या समर्थ वा खंबीर मनाने याला सामोरे जाल, तितका हा त्रास कमी जाणवेल. परंतु अशा गोष्टी घडल्या की, आपण अगोदरच भयभीत होतो आणि यामुळे आपला त्रास आणखीच जाणवतो, वाढतो.

मानवाच्या जीवनात, मुळीच नसे दुःख
चुकीच्या संस्कारलेल्या मनाने होत असतो, तो दुर्मुख

जवळच असलेल्या आनंदापासून, फ़िरवित असतो मुख
मृगजळाच्या मागे धावत, शोधित असतो सुख
यातूनि निराशा, हेच त्याच्या ताण-तणावाचे कारण प्रमुख

भिती ही माणसाच्या सर्व त्रासास, त्रास वाढविण्यास कारणीभूत असते. खोलात, मुळात, नागवे, नागडे विचार करण्याची सवय जडवून, भिती मनातून काढून टाकल्यास आणि तर्कशुध्द विवेकी विचार मनात रुजविल्यास आपणास मानसिक दुःखच होणार नाही आणि शारिरीक त्रास आपण सहज झेलू शकाल, नव्हे अशा त्रासात सुध्दा आपण आनंद उपभोगू शकाल.

हरघडी, हरस्थीती, हरप्रसंगी सदा आनंदी राहणे हे प्रथम आणि प्रमुख कर्तव्य मानाल आणि ते पार पाडाल तर मग दुःखाला, त्रासाला जीवनात वावच राहणार नाही. शेवटी

इच्छा, आशा, आकांक्षा हेच असते, असावे सर्वांचे ध्येय
परि मिळालेल्यात समाधान मानणे यातची मनाचे श्रेय

आणि

आनंदा गुंतवू नका, कोणत्याही बंधना
आनंदासाठी नसावी, दुसऱ्यावरी विसंबना

आनंद आपल्याच हाती असते, हे जाणा
उगीच जास्त महत्व न देता, यशापयशांना
कार्यातची रममाण होण्याची, करावी साधना
आनंदात सदा राहणे, हेच प्रथम कर्तव्य माना
हेच रुजवा आपल्या, संपूर्ण आचरणा
संस्काराने बनवूनि, सबळ, समर्थ मना.

आता शेवटी जीवनानंदाविषयीची माझी बाराखडी

लक्षण आनंदाचे

आनंद नसावा क्षणैक

आनंद नसावा उत्तेजक

आनंद नसावा दुसऱ्या मारक

आनंद नसावा उगीच भाऊक

आनंद नसावा ढोंगी नाहक

आनंद नसावा थरारक

आनंदाची नसावी धमक

आनंदाची न दाखवावी चमक

आनंदाची न पाहावी झलक

आनंदात नसावे अतिशयोक्तीचे यमक

आनंद नसावा भ्रामक

आनंद असावा फ़क्त शांत, स्थीर,

# (३)

# आकुंचित प्रेम संस्कार

जीवनात काय करावे? काय केले पाहिजे? जीवन कसे जगले पाहिजे? जीवन कसे घालविले पाहिजे? जीवनात कोणते ध्येय ठेवले पाहिजे? याविषयी विचार करणे अगत्याचे ठरावे. या जगात आपण कोठून आलो, कसे आलो, कशाकरिता आलो, जीवन नेमके काय आहे, याविषयी प्रत्येकजनच आयुष्यात कधी ना कधी ग्रासित होत असतो. हजारो वर्षापासून बरेचजन, जसे की, धर्म मार्तंड्य, तत्ववेत्ते, तत्वज्ञानी, धर्मगुरू आदी याची उत्तरे शोधित आहेत. अजून तरी कुणालाच याच उत्तर सापडलेल नाही आणि सापडणार पण नाही. परंतु उत्तर सापडत नाही, सापडणार नाही हे सांगणे म्हणजे पराभव पत्करणे. आणि असा पराभव पत्करणे मंजूर नसल्यामुळे काहीतरी किचकट, क्लिष्ट, भ्रामक अशी उत्तरे देण्यात आलेली आहेत. आणि चुकीच्या संस्कारातून, मानवाच्या भावना उत्तेजित करून आणि त्याचा फ़ायदा घेऊन अशी उत्तरे मानवाच्या मनावर पक्की रूजविलेली आहेत. जसे की, मोक्ष, मुक्ती, पूर्वजन्म, पूनर्जन्म, स्वर्ग, पाताळ, आत्मा, परमात्मा, भूत-पिशाच्च आदी कल्पना. निरनिराळ्या धर्मात, तसेच एकाच धर्मातील निरनिराळ्या

ग्रंथात, या सर्व कल्पनांविषयी इतका विरोधाभास आहे की, जर आपण हे ग्रंथ खुल्या दिलाने वाचलेत तर त्यातील फ़ोलपणा लक्षात आल्यावाचून राहणार नाही. परंतू धर्मग्रंथाचा अभ्यास न करताही धर्मांच्या कल्पनांचा आपल्या मनावर इतका पगडा कसा बसतो, हे न समजण्यासारख कोड आहे. ती आपल्या संस्कार पध्दतीची किमयाच समजायला पाहिजे. चुकीच्या संस्कारांचा हा जादूटोण्याचाच प्रकार आहे. जीवनाविषयी मी इतकच म्हणेल,

कोठूनि आलो, कोठे जायचे कळेना
विचार करू जाता, अंधार तो सरेना.
प्रश्न हा तसा, असेची फ़ार खोल
अधिकचि बिकट होई, करू जाता हल!!१!!
जीवन, असे नि नसे काय
शोध घेऊ जाता, उपयोग नाय
जीवन, नसे दुजा परि प्रेम
संपादावे ते, जीवनी तेच काम!!२!!
म्हणूनि, जीवनी जडावा एकच छंद
प्रेम जोपासण्यात असावे सदा धुंद
प्रेमच बहरवी, मनी स्वानंद

## प्रेमच पसरवी, चहूकडे आनंदी आनंद!!३!!

जीवनाचे गुढ हे रहस्यच राहणार. त्याची उकल होईल काय? हे सांगता येणे कठीण. म्हणून जीवनाच्या तत्वज्ञानाविषयी मी (Agnostic View) माहीत नाही, माहीत होणार नाही असे अज्ञेयवादी (Not-knowing) व्यक्त करणेच योग्य माणतो. याविषयी जास्त विचार न करता, जीवनाला नाहक नाही ते अर्थ न चिकटविता, जीवन सदैव आनंदात जगण, हाच जीवनाचा उद्देश मानावा, हेच जीवनाचे साध्य असावे असेच मी म्हणेल.

माणूस हा सामाजिक प्राणी आहे. तो एकटा राहू शकत नाही. त्याला समुदाय करूनच राहाव लागत. यातूनच समाज व्यवस्था उदयास आल्यात, विकसित झाल्यात. म्हणून जीवनात आनंद मिळण्याकरिता, जीवन आनंदी जगण्याकरिता, माणसाच्या शारीरिक व मानसिक गरजांबरोबरच त्याच्या सामाजिक गरजांची पूर्ती होणेसुध्दा आवश्यक आहे. जेंव्हा विज्ञान अप्रगत होते, तेंव्हा माणसांच्या शारीरिक गरजांनाच जास्त महत्व होते. सामाजिक गरजा दुय्यम होत्या. परंतु विज्ञान प्रगत झाले, सामाजिक व्यवस्था व्यापक विस्तारित झाली, निसर्गावर विज्ञानाने पुष्कळ बाबतीत प्रक्रिया केल्यात, यामुळे आपल्या जीवनाच क्षेत्र फ़र वाढल.

जीवनाच्या गरजा आमुलाग्र बदलल्यात. शारीरिक गरजा फ़क्त शरीर संवर्धनाकरिता न राहता, त्यात ऐषोरामासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींना अति महत्व प्राप्त झाल. फ़ॅशन म्हणून वा दुसऱ्यांबरोबर तुलना म्हणूनही याकडे मानव आकर्षित झाला. त्यातच फ़सव्या जाहिरातीद्वारे, चुकीच्या संस्कारांद्वारे तिकडे आकर्षित केल्या गेला. धन संपादन, उच्च शिक्षण. मान-सन्मान. मोठेपणा आदि गोष्टींना अवास्तव महत्व आल. आपल्या प्रगत-अप्रगत सामाजिक व्यवस्थेतील चुकीच्या संस्कारातून अस महत्व देण्यात आल. जीवनात ह्या गोष्टींची जरूर आवश्यकता आहे, परंतु त्यापासून आपणाला चिरस्थायी आनंद, व्यापक प्रेम मिळत असेल तर. किंबहूना असा आनंद, जे जीवनाच खर साध्य आहे, ते मिळविण्याकरिता ही खरी साधन असावयास हवीत, परंतु आपण ह्या साधनांनाच आपल्या जीवनाच साध्य बनविलेल आहे. जीवनाचे खरे साध्य आपण पूर्णपणे विसरलो, त्यापासून आपण केंव्हाच फ़ारकत घेतली, आणि असे साध्य मिळविण्याकरिता जी साधने आवश्यक आहेत, त्या साधनांना राक्षसी स्वरूप देऊन, आपण जीवनाचे साध्य बनविलेले आहे. आणि यातच आपण जीवन हरवून बसलेलो आहोत. उच्च शिक्षण घेवून, खोट्या मार्गाने धन संपादन करणे आणि नाही त्या मार्गाने मान-सन्मान मिळविण्याच्या, सत्ता मिळविण्याच्या मागे लागणे हेच जीवनाचे

भ्रमण, कालक्रमण झालेले आहे. मग याकरिता आनंदास गहान ठेवावे लागले, प्रेमाचे जागी वैरत्व, शत्रुत्व, आकस जोपासावे लागलेत, तरी हरकत नाही, अशी प्रवृत्ती वाढलेली आहे, वाढत आहे.

परंतु अशा भ्रष्ट धनाने आणि खोट्या मानाने, यश किर्ती मिळविण्याने; माणसाच जीवन सार्थक होवूच शकत नाही. मान-सन्मान, मोठेपणा यापेक्षा समानता रुजविणारे, माणूसकी शिकविणारे शिक्षण, प्रामाणिकरित्या केलेले धन संपादन हेच माणसाच्या जीवनात व्यापक प्रेम निर्माण करू शकत, चिरस्थायी आनंद देऊ शकत.

संस्कारातून आपण शिक्षण घेतो आणि शिक्षणामुळे संस्कार घडतात. संस्कृती, शिक्षण, संस्कार हे ऐकमेकांना पुरक आहेत. सदोष, चुकीच्या सामाजिकीकरणाच्या, संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेमुळे (Socialization and Culturalization) जी आपली सभ्यता (Civilization) वृध्दींगत झालेली आहे, त्यात आपले प्रेमाचे संस्कार फ़ारच आकुंचित झालेले आहेत. आणि म्हणूनच जीवनात आपण खऱ्या आनंदापासून दूर गेलेलो आहोत, जात आहोत. हे बदलण्याकरिता, सुधारण्याकरिता मनातील तणाव, समाजातील अशांती दूर करण्याकरिता; काय करावयास हवे आणि

आपले प्रेमाचे संस्कार कसे आकुंचित आहेत; याविषयी मी इतकेच म्हणेल,

*संस्कार पहा, कसे असती प्रेमाचे*
*लहानपणी, अत्युच्च प्रेम आईबाबांचे*
*आनंदास उधान, जोड मिळता, प्रेम बहिणभावाचे*
*त्यागाची जाण देतसे, प्रेम हे सर्व कुटुंबाचे*
*परि तारुण्यात, स्वार्थ होते, वास्तव जीवनाचे*
*लग्न होताच, गोडवे, बायकोच्या प्रेमाचे*
*बायकोसाठी, विषयसुखासाठी, आईबापा विसरायचे*
*गगनात मावेनासे प्रेम, संतती प्राप्तीचे*
*यातही भेदभाव, प्रेम जास्त मुलीवरचे की मुलावरचे*
*धन्य जगती माईबाप, श्रेष्ठत्व गाती पुत्रप्रेमाचे*
*पुत्रासाठी, स्वार्थासाठी बहिणभावापासूनी दूर जायचे*
*लागतात डोहाळे मग पुत्रविवाहाचे, सुनेपासूनच्या सुखाचे*
*काळाची पुनरावृत्ती,*
*आता ऐकावे गोडवे पुत्राच्या बायकोचे*
*आणि विषयसुखासाठी,*
*आपल्याच पुत्राने आपणास विसरायचे*
*आठवा कृतीप्रताप, आपणचि केलेले अगोदरचे*
*रहाट गाडगे असेच चालत असते, ह्या संसाराचे*
*चित्र हे असेच अस्थीर, मतलबी, स्वार्थी प्रेमाचे*
*खापर कुणावरी फ़ोडणार, दोष यात कुणाचे*

दुष्फ़ळे आपणासच की मिळणार, लावलेल्या विषवेलीचे
स्वर्गाची अपेक्षा, जीवन आपल्या पदरी नरकाचे
आपणचि आपले जीवन, आकुंचित, स्वार्थी करायचे
दोष असती मात्र, सर्व नियतीचे, नशीबाचे
परि जाणा, फ़लित हे खरे तर, चुकीच्या संस्काराचे
प्राधान्य ज्यात असते, प्रेम जे जवळजवळच्या रक्ताचे
जे भेदभाव करण्यास शिकविते, जवळचे आणि दूरचे
नसेल आपणास, आपले जीवन नासवायचे
असेल विशुध्द प्रेमाचे स्वप्न, जीवनी साकारावयाचे
व्रत घ्यावे लागेल मग, संस्कार मुळातचि बदलण्याचे
प्रेम न जवळच्यात नि रक्तातच, सिमित ठेवायचे
स्वार्थ सोडूनि, प्रेमास व्यापक, अमर्याद करायचे
संस्कार रूजवा जीवनी; निकोप, निष्कपट प्रेमाचे
यामुळेच होईल, सार्थक आपल्या जीवनाचे
यास्तव पाऊल मात्र उचलावे लागेल धाडसाचे
चुकीचे, आकुंचित प्रेमसंस्कार बदलण्याचे

# (४)

# विद्वत्ता आणि विवेकता

शिकायला पाहिजे, शिक्षण घ्यायला पाहिजे, शिक्षण न घेतल्यामुळे समाज मागासलेला राहतो, आपल्या दुःखाच मूळ कारण अज्ञान असते, आहे आणि हे अज्ञान शिक्षण घेऊनच दूर होऊ शकते आणि अज्ञान दूर झाले म्हणजे जीवनातील अंधार दूर होतो. शिक्षणातून मिळणाऱ्या ज्ञानाच्या प्रकाशात सर्व जन सुखमय होतात, असच सर्वांना वाटते; अशाच सर्वांच्या कल्पना आहेत. आपल्या संतांनी सुध्दा असेच म्हटलेले आहे. शिक्षणातून ज्ञान मिळवून अज्ञान व दुःख दूर करण्याचाच प्रसार बहुतेक सर्व संतांनी केलेला आहे. परंतु आता थोडा वेळ थांबून, या कल्पना कितपत बरोबर आहेत याचा विचार करण्याची गरज उत्पन्न झालेली आहे. संतांना अभिप्रेत असलेले दुःख दूर करणारे, माणसाच्या जीवनातील अंधार दूर करून ते प्रकाशित करणारे, ज्ञान शिक्षणातून मिळते काय? शिक्षणातून आपणाला खरोखरच ज्ञान मिळते काय? याचा उहापोह करायला हवा. याकरिता सर्व प्रथम ज्ञान म्हणजे काय? हे समजून घेणे आवश्यक आहे.

प्रचलित मतांप्रमाणे ज्ञान म्हणजे एखाद्या विषयाची अचूक माहिती. त्या विषयाची माहिती नसणे हे त्या विषयीचे अज्ञान. एखाद्या विषयाची चुकीची माहिती असणे म्हणजे सुध्दा त्या विषयीचे अज्ञान. एखाद्या विषयाची विशेष, विश्लेषित, विकसित माहिती म्हणजे विज्ञान. , आणि असलेल्या बिनचूक, खऱ्या माहितीवरून तर्काने आणखी माहिती काढणे, करून घेणे म्हणजे तर्कज्ञान. आपले तत्वज्ञान हे बहुतांशी तर्कज्ञानच आहे. परंतु ते बिनचूक पायांवर आधारलेले नाही, निव्वळ कल्पनाधारित आहे.

कोणत्याही गोष्टीची माहिती आपणाला शिक्षणाद्वारे मिळते. मग ते शिक्षण, कौलेजातील शिक्षण असो, की सामाजिकीकरणाच्या व संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेतून म्हणजे संस्कारातून (शाळा कौलेजात न जाता) मिळालेले शिक्षण असो, अशा शिक्षणातून बिनचूक, खरी माहिती म्हणजे ज्ञान मिळायला पाहिजे, तसे ते मिळते अशीच आपली सर्वांची धारणा असते, आहे. परतु दुर्दैवाने अशा शिक्षणातून मिळालेली माहिती पुष्कळ अंशी चुकीची असते, अज्ञान असते. शिक्षणातून मिळालेल्या माहितीची सत्यासत्यता आपण पूर्णपणे पडताळून पाहत नाही आणि यामुळेच चुकीच्या संस्कारातून, चुकीच्या शिक्षणातून, अंधश्रध्दांमधून मिळालेली पुष्कळशी चुकीची माहिती, जे अज्ञान असते, त्याला सुध्दा आपण ज्ञान माणतो, ते ग्राह्य धरतो. तदवतच

चुकीच्या पायांवर आधारीत तर्कातून काढलेल्या माहितीला, जे सुध्दा अज्ञानच असते त्याला सुध्दा आपण शुध्द तर्कज्ञान, ज्ञान समजतो आणि तसे ते अंगीकारतो. आपण कितीतरी प्रमाणात अशा अज्ञानालाच ज्ञान समजून आलेलो आहोत. अशा अज्ञानाला अजूनही ज्ञान समजून आपण वावरत आहोत.

शिक्षनातून आपणाला भौतिक शास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे शिकविल्या जातात. भौतिक शास्त्रे ही आपणाला निसर्गाविषयी सत्य माहिती पुरवितात. ह्या शास्त्रांद्वारे निसर्गाच्या नियमांची, नियंत्रणाची उकल करण्यात येते आणि हे नियम प्रयोग शाळेतून वारंवार सिध्द करता येतात. आणि अशी सिध्दता कोणीही अनुभवू शकतो. म्हणून हे ज्ञान खरेच असते. निसर्गाचे नियम सहसा बदलत नाहीत आणि प्रयोग शाळेतील चुकीच्या प्रयोगांमुळे खोटे नियम बाहेर आलेतच तर ते फ़ार दिवस टिकाव धरू शकत नाहीत. परंतु आपल्या सामाजिक शात्रांच्या बाबतीत तसे नाही. सामाजिक शास्त्रे आपल्या समाजाविषयीची माहिती आपणाला पुरवितात. तदवतच सामाजिक शास्त्रे ही मानव निर्मित आहेत. मानवाला समाजात एकत्र राहण्याकरिता लागणारे नियम, रूढी, प्रथा, चालीरीती, व्यवस्था जसे की राज्य-व्यवस्था, प्रशासकीय-व्यवस्था, कायदे-व्यवस्था, शिक्षण-व्यवस्था, अर्थ-व्यवस्था आदी निर्माण होतात, केल्या जातात आणि अशाची माहिती, ज्ञान

आपणाला निरनिराळ्या सामाजिक शास्त्रांद्वारे शाळा, कौलेजांमधून शिकविल्या जाते. काळानुरूप समाजातील माणसांचे राहणे, वागणे, बोलणे-चालणे बदलते आणि अशा बदलत्या सभ्यतेनुसार (Civilization) ही शास्त्रे बदलतात. तशी ती बदलायलाही पाहिजेत. तदवतच ही शास्त्रे (ह्या व्यवस्था) समाजातील ठराविक लोकांनी, ज्यांना म्होरके म्हटल्या जाते, ज्यांचे समाजावर वर्चस्व असते, त्यांनी निर्माण केलेली असतात आणि ते समाजातील सर्वच लोकांच्या सारख्याच फ़यद्याची, उपयोगाची असावयास पाहिजेत,. तशी ती असतात अशीच आपली सर्वांची धारणा असते, समज असते. परंतु अशी समज, अशा ह्या धारणा चुकीच्या असतात, आहेत. आपल्या समाजातील नियम, व्यवस्था ह्याचा सखोल अभ्यास केल्यास, त्या ठराविक लोकांनी मुख्यत्वेकरून त्यांच्याच म्हणजे ठराविक लोकांच्याच फ़ायद्याकरिता केलेल्या आहेत आणि अशा व्यवस्थेत या ठराविक लोकांचा फ़ायदा इतर बहुसंख्य लोकांचे नुकसान करूनच केल्या जातो. म्हणजे अशा ह्या सामाजिक शास्त्रात, व्यवस्थेत बहुसंख्य लोकांना उजेडाच्या नावाखाली अंधारात ढकलल्या जाते.

अशा या मानव निर्मित सामाजिक शात्रांमधून ज्ञानाच्या नावाखाली अज्ञानच पसरविल्या जाते. लोकशाहीच्या नावाखाली नेतेशाही पोसल्या जाते. वैदिक काळात ब्राम्हण प्राबल्य असलेली

व्यवस्था निर्माण केल्या गेली आणि त्या व्यवस्थेत इतरांना गुलामगिरीत ठेवण्याची, कमी लेखण्याची, इतकेच काय, काही मानसांना शुद्र संबोधून कस्पटासमान लेखण्याची तरतूद मुद्दामच केल्या गेली व तशी व्यवस्था राबविल्या गेली. आजही या व्यवस्थेनुसार धर्माच्या नावाखाली आपणाला अंधश्रध्दांचे गुलाम बनविण्यात येते. अशा गुलामगिरीत जखडून ठेवण्यात येते. आणि म्हणून शरीराने जरी आपण स्वतंत्र झालेलो असलो, तरी विचाराने अजूनही गुलामच आहोत. ढोंगीसाधू, बुवा, महाराज आदिंना आत्मज्ञान आहे, हे आपण त्यांचे ज्ञान न तपासता, आत्मज्ञान म्हणजे तरी काय, याचा विचारही न करता, अशांचे भगवे कपडे आणि त्यातील अवतार पाहून खरे माणतो. आणि मग त्यांचे आत्म(अ)ज्ञान आपण स्वीकारतो. आणि आपली स्वतःचीच फ़सवणूक करून घेतो. ब्राम्हणप्राबल्य व्यवस्थेबरोबरच आता मोठमोठ्या उद्योजकांचे, कारखानदारांचे, भांडवलदारांचे प्राबल्य असलेली व्यवस्था पण निर्माण झालेली आहे व ती वृध्दींगत होत आहे. या व्यवस्थेमुळेच आज देशातील ८० ते ८५ टक्के संपत्ती १० ते १५ टक्के लोकांकडे केंद्रीत झालेली असून देशाताल ८० ते ८५ टक्के लोक आर्थीक गुलामगिरीत जीवन जगत आहेत. औद्योगिकीकरणाच्या, जागतिकीकरणाच्या आणि मुक्तीकरणाच्या आपल्या सरकारच्या धोरणांमुळे आपली औद्योगिक व्यवस्था ही

परदेशीयांच्या हातात तर जाणार नाही ना! आणि यातून प्रथम परदेशीयांची औद्योगिक गुलामगिरी व नंतर परतंत्र तर पुन्हा वाट्याला येणार नाही ना १ अशी भिती व्यक्त केल्या जात आहे. अशा या धार्मिक, आर्थीक गुलामगिरी बरोबरच विद्वत्ता, श्रेष्ठता, कुशलता ह्या गोष्टीसुध्दा सर्व-सामाण्य माणसांना, बहुजनांना मानसिक गुलामगिरीत ढकलत आहेत व त्यांची फ़सवणूक करण्यास हातभारच लावित आहेत.

विद्वान म्हणजे कोण, विद्वान नक्की कोणाला म्हणतात, कोणाला म्हणाव, विद्वानांचे क्षेत्र कोणते, हे आपण बरोबर जाणून घेतच नाही. ज्याला एखाद्या विषयाच खूप खोल, प्रगाढ असे ज्ञान असते, तो त्या विषयाचा, त्या क्षेत्रातील विद्वान असतो. तसेच असते कुशलतेविषयी. एखाद्याने एखाद्या कलेत, क्षेत्रात कुशलता, नैपुण्यता, यशस्वीता मिळविली की तो त्या कलेतील, क्षेत्रातील श्रेष्ठवान असतो. अशा या विद्वानांची वा श्रेष्ठवानांची त्यांच्या त्यांच्या क्षेत्रातील मते ग्राह्य धरण्यास, व त्या त्या क्षेत्रात त्यांचे अनुकरण करण्यास हरकत वा आडकाठी असण्याच काही कारण नाही. तशी हरकत वा आडकाठी नसावी. परतु अशा विद्वानांच्या विद्वत्तेची तसेच श्रेष्ठवानांच्या श्रेष्ठत्वाची आपणाला इतकी भुरळ पडते, आणि त्यांच्या व्यक्तीमत्वाने आपण इतके भारावून जातो की, मग अशांची लुडबुड आपण, त्यांची क्षेत्रे सोडून, इतर क्षेत्रात,

जेथे ते आपल्यासारखेच अज्ञानी असतात, चालु देतो, त्यांना लुडबुड करू देतो, त्यांना फ़सवू देतो, आपण स्वतःला फ़सवून घेतो.

पाहाना! संगणक क्षेत्रात, जे विद्वान आहेत, त्याबद्दल त्यांचा त्या क्षे्त्रात आदरच करायला हवा. परंतु म्हणून का, त्यांनी ज्योतिष्य शास्त्र हे शात्रच आहे असे बिनबुडाचे विधान करावे आणि लोकांना भुलवून, जे क्षेत्र आपल नाही त्या क्षेत्राविषयी आपल अज्ञान, आपल्या अंधश्रध्दा लोकांवर थोपवाव्यात, तसा प्रयत्न करावा! येथेच तर विद्वत्ता आणि विवेकता यातील फ़रक लक्षात घ्यायला हवा. एखाद्या विषयात विद्वान झाला, त्या विषयाची विद्वत्ता आली म्हणजे विवेकताही येते असे नाही. विद्वत्ता ही माहिती करून घेण्याची प्रक्रिया आहे, तर विवेकता ही जी माहिती आपण करून घेतो ती सत्य की असत्य हे पडताळून पाहण्याची, तीचा योग्य ठिकाणी, योग्य वापर करण्याची वैचारीक प्रक्रिया आहे. विद्वत्ता ही ठराविक विषयांचे बाबतीत, ठराविक (Particular) असते. विवेकता मात्र ही सर्व बाबीविषयी (General) असते. कोणत्याही ज्ञानाचा उपयोग जर योग्य होत नसेल, ज्ञानाचा उपयोग योग्य रितीने कसा करावा याच ज्ञान, भान नसेल, तसा विवेक अंगी नसेल, तर अशा ज्ञानाला, ज्ञान म्हणताच

येणार नाही. अशा ज्ञानाला माहितीचे कोठार भलेही म्हणा. आणि विद्वानाला वाटल्यास माहितीचे आगर (मोठे कोठार) म्हणा.

विद्वत्ता आणि विवेकता या दोन्हीच्या संगमातून मनुष्य ज्ञाता बनू शकतो. त्यालाच ज्ञाता म्हणायला, माणायला पहिजे. हाच नियम कौशल्यवानांचे, श्रेष्ठवानांचे बाबतीत पण लागू होतो. क्रिकेटपटूंनी क्रिकेट या खेळात कौशल्य संपादन केले, अभिनेत्यांनी पडद्यावरील कलेत निपूणता मिळविली, लोकनेत्यांनी वक्तृत्व आदि कलेने लोकप्रियता मिळविली, या सर्वांनी आपआपल्या क्षेत्रात यशस्वीता मिळविली, उच्चता मिळविली, नावे कमाविली, ते त्यांच्या क्षेत्रातील श्रेष्ठवान. अशांना तसेच इतर अन्य क्षेत्रातील श्रेष्ठवानांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात मान्यता द्यायला कोणीच हरकत घेण्याचे कारण नाही. परंतु हे श्रेष्ठवान इतरही क्षेत्रात श्रेष्ट आहेत असे मानायचे आणि इतर क्षेत्रात त्यांना लुडबुड करू द्यायची, त्यांनी केलेल्या जाहिरातीवर भूलून जावून, एक रुपयाही किंमत नसलेली पेये दहा रुपयांपेक्षाही जास्त किंमत देऊन विकत घेऊन फ़सायच, त्यांना आपणाला फ़सवू द्यायच! आपल्या लोकप्रियतेचा फ़ायदा घेत, समाजाला भूलवून आपला स्वार्थ साधणारे, गडगंज संपत्ती जमविणारे, समाजाला दुषण आहेत. भलेही मग महाराष्ट्र भूषण ही पदवी देवून सरकार त्यांचा गौरव का करेना! जो विवेकता शिकेल, सारासार विचार करण्याची तारतम्य

बुध्दी ठेवील, खऱ्या-खोट्याची पारख ज्याला करता येईल, खऱ्याचा, प्रामाणिकतेचा पुरष्कार करण्याची हिंमत ज्याला दाखविता येईल, तोच जीवनात खऱ्या अर्थाने आनंदी असेल, त्याचच जीवन सार्थकी असेल. मग तो भलेही कमी शिकलेला का असेना. अर्थात अशा विवेकाला जर विद्वत्तेची, कुशलतेची, शिक्षणाची जोड मिळाली तर दुधात साखर.

विद्वत्तेशिवाय विवेकता उपयोगाची असू शकते, परंतु विवेकतेशिवाय विद्वत्ता फ़सवी, कुचकामी आणि दुःखदायकच.

## (५)

# मन दुखणे, मन दुखविणे आणि मन सांभाळणे

जीवनात सत्यावर आधारित चिरस्थायी आनंद मिळविणे, हाच जीवनाचा उद्देश. जो जीवनात आनंदी राहण्यास शिकला, त्यालाच जीवनाचा अर्थ समजला, बाकी आयुष्य निरर्थकच, आयुष्यात उगीच धडपड, व्यर्थ उठाठेव. असा खरा आनंद फ़क्त व्यापक प्रेमातूनच मिळू शकतो. याकरिता जितक्या जास्त लोकांचे प्रेम संपादन करता येईल तितके संपादावयास हवे. आपण कोणाचे भले नाही केले, आपल्या हातून कोणाचे भले नाही झाले तरी चालेल, परंतु कोणाच वाईट आपल्या हातून घडू नये, घडू देवू नये. दुसऱ्याचे वाईट करून स्वतःचे भले करणारे, कधीच आनंदी होवू शकत नाहीत. ते दुःखीच होतात, असतात; वरवर जरी ते आनंदी दिसत असलेत तरी. म्हणून कोणाचेच वाईट चिंतु नये. कोणालाच शत्रू माणू नये, समजू नये. सर्व मित्रच असावेत, समजावेत. कोणाविषयीही कोणत्याही प्रकारचा आकस बाळगू नये. प्रेम दुरावा निर्माण होईल असे कार्य करू नये. सगळीकडे प्रेमाचा ओलावाच पसरवावा. कोणालाच लहान आणि महान समजू नये. सर्वच माणसे जन्माने समान असतात. ती नेहमीच समान राहावयास हवीत.

समान म्हणजे सर्वांना सारखा मान. मग कोणाचा सन्मान करणे आणि कोणाचा अपमान करणे; कोणी कोणाला सन्मानित (मोठे) आणि कोणी कोणाला अपमानित (लहान, शुद्र) समजणे हेही बरोबर ठरत नाही. याकरिता; मान, अपमान स्वतःला शिवू न देण्याकरिता, मनाची ठेवण करण्याचा (Programming of Mind) सदैव प्रयत्न करावयास हवा.

ज्या मणसाला मान-सन्मान मिळतो, त्याची मान (मुंडी)ही उंचच राहणार; त्यात नवल कसले. परंतु अपमानात सुद्धा ज्याची मान (मुंडी) ताठ राहते, तोच खरा मानी, खरा स्थितप्रज्ञ. हेच जीवनाच खर तत्वज्ञान आहे, असावयास पाहिजे; असे मी म्हणतो. आनंदी जीवनाकरिता हवे असणारे प्रेम जोपासण्यासाठी, ते वृद्धिंगत करण्यास्तव आयुष्यात मने जोडण्याचीच कामे करावयस हवीत. मने तोडण्याची नव्हेत. मने तोडणे जितके सोपे असते, सहज असते; तितकेच मने जोडणे कठीण. आणि याच कारण म्हणजे आपला अहंभाव, जो आपण संस्कारातून जोपासत येत असतो, येत आहोत. दुसऱ्याच मन दुखविणे आणि आपल मन दुखवून घेणे, ह्या क्रिया माणसाच्या मनाच्या घडणीतूनच होतात. याचा उगम माणसाच्या अहंकारातच असतो. जीवनाच्या चुकीच्या समजातून असे घडते. आप्त-स्वकीयांची, मित्रांची, तसेच इतर सर्वांची मने जरूर सांभाळावयास हवीत. कोणाचेच मन सहसा

दुखवू नये. परंतु असे करतांना जर तुमच स्वतःचेच मन दुखविल्या जात असेल; असे केल्यानंतर जर तुमच स्वतःच मनच तुम्हाला सदैव खात राहिल; तुमच्या जीवनात तणाव आणि दुःख निर्माण करित राहिल, तर तेही योग्य ठरणार नाही. स्वतःच मन तोडून दुसऱ्यांची मने सांभाळण्यात सुद्धा मग अर्थ उरत नाही. म्हणून आपल्या आणि आपल्या सहवासातील दुसऱ्यांच्या भावनांचा सदैव मेळ घालावयास, बसवावयास हवा. नेहमी आपल्याच भावना दुखवून, दुसऱ्यांच्या भावना सांभाळीत राहणे किंवा दुसऱ्यांच्या भावना दुखवित राहून आपल्या भावना सांभाळीत राहणे; या दोन्हीमुळे काहीच साधणार नाही. , साधत नसत. यामुळे जीवनात तणावच फ़क्त वाढत असतात.

नजिकच्या लोकांच्या भावना दुखविल्या जावू नयेत म्हणून आपण त्यांना आवडणार नाहीत, परंतु सत्य अशा गोष्टी त्यांचेपासून लपवून ठेवतो. आपल्याला जे पटत नसत, जे खर नाही अस वाटत, ते आपण मनातच दाबून ठेवतो. यामुळे आपण तर तणावात राहतोच; परंतु ज्यांचेकरिता म्हणून हे करतो, त्यांचाही तोटाच करित असतो. क्षणैक जरी त्यांच्या भावना राखल्याचे दिसत असले, तरी जेंव्हा त्यातील खोटेपणा उघडकीस येतो, तेंव्हा ते फ़सलेलेच असतात. त्यांच मन आतापर्यंत जे तुम्ही चोरून सांभाळलेले असते, ते कितीतरी पटीने मग दुखविल्या जाते. आणि

त्यांना वेळीच सावध न केल्याच दुःख तुम्हालाही होत राहत. म्हणजे काहीच साध्य होत नाही, होत नसत. म्हणून सत्य लपवून वा असत्यपणे दुसऱ्याच मन सांभाळणे हेही घातकच. अंती ते दोघांचेही मन दुखविते. याकरिता माझ्या मते खरा आनंद वृद्धिंगत करावयाचा असेल तर स्पष्ट बोलण्याची; मतांतर, विचारांतर असलेल्या बाबींवर सविस्तर चर्चा करण्याची खरोखरच गरज आहे. हे सर्वांकरिता, सर्वच बाबतीत, सर्वच विषयांकरिता लागू होते. परंतु अशा चर्चा किल्मिष मनात न ठेवता, खुल्या वातावरणात, खुल्या मनाने (Open Mind) होणे आवश्यक आहे.

कोणत्याही मतांतराविषयी, विचारांतराविषयी तीन पर्याय असतात. एकतर तुमची मते, विचार पटवून द्या किंवा यावरील दुसऱ्यांची मते पटवून घ्या, दुसऱ्यांना तशी संधी द्या. आणि हे दोन्हीही होत नसेल, तर सन्मानपूर्वक, आदरपूर्वक दोघांपुरता तो विषय बाजुला ठेवा. (Respectfully agree to disagree). दोघांचे काही विषयांवर एकमत होत नाही, विचार जुळत नाहीत; म्हणून एकमेकांचा द्वेष करण्याची, तिरस्कार करण्याची, वैरत्व जोपासण्याची आवश्यकता नाही. तशी प्रवृत्ती जोपासू नये. असहमताचा विषय सोडून इतर सर्व बाबतीत दोघांनीही सामान्यपणे वागायला पाहिजे. असे झाले तरच एकमेकाचा सन्मान केल्यासारखे होईल. समानता रुजविल्यासारखे होईल. आपण

शिक्षणाने, धनाने, नात्याने, अधिकाराने मोठे आहोत म्हणून आपल्यापेक्षा लहान (वयाने, मानाने) असणाऱ्यांनी आपले ऐकलेच पाहिजे असा हेका योग्य ठरत नाही. दुसऱ्यांना आपली प्रतिक्रिया व्यक्त करू दिल्याने, त्यांचेशी संवाद साधल्याने; दोघांमध्ये तणाव निर्माण न होण्यास, करण्यास मदतच होईल. आपली मते पटवून न देता, आपण ती ज्यांचेवर लादतो आणि ज्यांचेपासून बिनशर्त आज्ञाधारकपणाची अपेक्षा करितो; त्यांची प्रगती आपणच खुंटवित असतो. त्यांच्या विचारंचे पंखच छाटत असतो. त्यांचे मन दुखवित असतो, आपले मन दुखवून घेत असतो..

खर सांगायच म्हणजे, दुसऱ्यांच्या वागण्याने, बोलण्याने, दुसऱ्याने आपल्या विचारांवर केलेल्या टिकेमुळे आपल मन दुखायलाच नको. एका व्यक्तीची प्रतिक्रिया, ही दुसऱ्या व्यक्तीच्या ठराविक क्रियेवर, विचारांवर टिका असते, असावी; ती त्या व्यक्तीच्या संपूर्ण व्यक्तीमतांवर टिका नसते, नसावी; हे जर दोघांनीही मानल, तर मग वैरत्वाच्या भावनेला वाव राहात नाही. आणि आपल मनही दुखावल्या जात नाही. टिका ही कृतीवर असावी, तशी ता मानावी; ती व्यक्तीवर नसावी, तशी ती माणू नये.

आपण खोलात विचार केल्यास, आपल्या अस लक्षात येईल की, आपल्याला दुःख होणे, राग येणे, तणाव येणे, अपमानित

वाटणे हे दुसऱ्या व्यक्तीच्या बोलण्यामुळे, कृतीमुळे होत नसते. दुसरी व्यक्ती याला जबाबदार नसते. आपणच याला जबाबदार असतो. दुसऱ्या व्यक्तीच्या वागण्याने, कृतीने नव्हे, तर त्यावर आपण कशी प्रतिक्रिया करतो, यामुळेच हे सर्व घडत असत. आपण ह्या गोष्टी मनाला लावून घेतो म्हणून हे घडते. आपणच आपल्या भावना दुखावून घेत असतो. सत्य काय, असत्य काय, खर कोण, खोट कोण; हे त्रागा करून कळत नसते. याविषयी सकारात्मक भूमिका (Positive Attitude) घेवून दुसरा सांगतो त्यातही अर्थ असू शकतो, हे मानण्याची भूमिका ठेवून, सखोल विचार करावयास पाहिजे. आणि विचारांतीही दुसऱ्यांचे म्हणणे पटले नाही तर; जाऊ द्या, त्याचे विचार त्याचे जवळ; अशी भूमिका त्रागा न करता घेतली पाहिजे. कोणी आपणाला शिव्या दिल्यात तर, आपणही प्रत्युत्तरादाखल त्याला शिव्या देवून, हम भी कुच कम नही, अस दाखविण्यापेक्षा, तिकडे दुर्लक्ष करून, त्याचे बोलणे स्मरण पटलावरून तेंव्हाच पुसून टाकले पाहिजे. अशा गोष्टी स्मरणात ठेवल्याने, आपण दुःखी-कष्टी होत असतो आणि मग उगीच तणावात जगत राहतो. तदवतच आपणाला एखाद्याच्या एखाद्या गोष्टीविषयी राग आलेला असेल तर त्यामुळे आपण त्या व्यक्तीशी; इतर बाबतीत, दुसऱ्या गोष्टींविषयी सुद्धा राग दाखवितो, अबोला ठेवतो; हेही योग्य नसते. एका गोष्टीविषयी राग, नाराजी

दाखविल्यानंतर, ती गोष्ट, तो विषय तेथेच बंद करून, इतर बाबतीत, इतर गोष्टींविषयी; जसे काहीच झाले नाही असे समजून वागाल; तर दोघांमध्ये निर्माण होणारा तणाव टाळण्यास मदतच होईल.

मी, मन दुखणे आणि मन दुखविणे हे टा्ळण्याकरिता आणि सर्वांचीच मने सांभाळण्याकरिता, कशा तऱ्हेचे संस्कार रुजवावयास हवेत, याविषयीची माझी मते मांडलेली आहेत. माझी मते, माझे विचार बरोबरच असतील असे नाही. इतकेच काय, तज्ञांचे त्यांचे क्षेत्रातील सर्वच विचार बरोबरच असतात असे मानणेही चुकच. कोणाचेही विचार नुसतेच ऐकून किंवा वाचून गृहित धरणे, केंव्हाही योग्य नसते. यामुळेच अंधश्रद्धा पसरतात. म्हणून माझ्या विचारांवर आपण स्वतः विवेकपूर्ण विचार करून ते पटलेत तरच ग्राह्य धरावेत आणि मग अनुभवातून तपासून पाहावेत. शेवटी.

*आपल्या दुःखास कारणीभूत नसे;*
*आपणाजवळील कोणत्याही गोष्टींचा अभाव*
*दुःख, तणाव-ताण देतसे आपणास;*
*आपलाची घडविलेला, घडलेला स्वभाव*

## (६)

# निस्वार्थीपणा, सेवा, त्याग

माणसाने स्वार्थी नसावे. निस्वार्थी असावयास हवे. स्वतःसाठी जीवन कोणीही जगत; दुसऱ्यासाठी जगणे हेच खरे जीवन; आदि मुक्ताफ़ळे आपण नेहमीच ऐकत असतो. पण निस्वार्थीपणा म्हणजे काय? खरोखरच लोक सेवा, त्याग करतात काय? याचा आपण विचारच करित नाही. प्रत्यक्षात मनुष्य हा स्वार्थीच असतो, आणि त्यात गैर, वाईट, चुकीचे असे काहीच नसते, नाही. जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाला जगाव लागत; जगण्याकरिता लागणाऱ्या गोष्टी कराव्या लागतात, आणि अशा प्रत्येक गोष्टीत त्याचा स्वार्थ सामावलेला असतो. आपण म्हणतो मनुष्य हा स्वतंत्र आहे. परंतु प्रत्येक माणसाच स्वातंत्र्य हे दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या आड न येई पर्यंत मर्यादित असत. दुसऱ्याच्या स्वातंत्र्याला धक्का पोहोचविण्याच स्वातंत्र कोणत्याच माणसाला नसत, नसावच. असेच असते स्वार्थाचे. प्रत्येक जन स्वार्थीच असतो. परंतु तुमचा असा स्वार्थ दुसऱ्याच्या स्वार्थात बाधा आणणारा; दुसऱ्याच स्वातंत्र हिरावून घेणारा नसावा. दुसऱ्याचे चांगले नाही केले तरी चालेल; परंतु त्यांचे वाईट करू

नका, चिंतु नका; यातच समानतेची भावना आहे; समाजवादाची रचना आहे; खरा निस्वार्थ आहे.

निस्वार्थी सेवा, त्याग करणारे असे जे दिसतात त्यांना आपण सामान्य माणसे, आपल्या संस्कारांमुळे मोठे समजतो. हा अशांचा मोठे पणा नसून आपला, सामान्य म्हणवून घेणाऱ्यांचा कमकुवतपणा आहे. हे आपल्या चुकीच्या संस्काराचे लक्षण आहे. ही संस्काराची आपल्यावर लादलेली गुलामगिरीच आहे; जी आपल्या समाज व्यवस्थेतून जोपासण्यात आलेली आहे, येत आहे. अशांनी स्वतःला मोठे समजणे, किंवा सामान्य जनांनी यांना मोठे मानणे; यात लहान-मोठेपणाचे; असमानतेचे बीज रोपन करणेच आहे. एकीकडे हे लोक लहान-मोठे कोणीच नसते असा उदघोष करित असतात आणि दुसरीकडे आपला मोठेपणा रुजविण्याकरिता पडद्याआड नाही त्या गोष्टी करित राहतात.

सेवा, त्याग कोणीच करित नसत. जे सेवा, त्याग करतात अस आपणाला दिसत; तो आपला भ्रम (Delusion) असतो. आणि खरी गोश्ट ही आहे की, आपल बहुतांशी आयुष्य हे आपण भ्रामक कल्पनांवरच आधारित केलेले आहे. ध्येयवादाच्या भाषेत सांगायचे झाल्यास; खरी सेवा, त्याग तोच असतो, जो कोणाला दिसत नाही, कोणाला दाखविल्या जात नाही. अशी सेवा, त्याग

करण्यात सुद्धा स्वार्थ दडलेला असतोच; आणि तो म्हणजे यातून अशांना मिळणारा आनंद; निखळ आनंद की ज्याला खरोखरच मोल नसत. परंतु अशी सेवा, त्याग जगजाहिर झाली, अशा सेवेने, त्यागाने माणसाला मोठेपण, अलगपण आले; त्याच्या सत्कार्याचे मोल सत्काराने मिळाले, मिळविले की मग तो आनंद निखळ, निव्वळ राहत नाही; आसुरी आनंद होतो. आज आपण सर्वजन अशाच आसुरी आनंदाच्या मागे धावत आहोत. नाहीतर वीतभर सेवा आणि हातभर प्रचार, जाहिरात कशासाठी? नेत्यांनी, सेवा करतो असे म्हणणाऱ्यानी, प्रबोधन करणाऱ्यानी हारतुरे कशासाठी घालून घ्यायचे! जे स्वतःला साधू, महाराज समजतात त्यांनी; ज्यांचेजवळ स्वतःचे अंग झाकायला पैसे नाहीत; आपल्या लहान मुलांना गोडधोड खाऊ घालायला पैसे नाहीत अशांकडून मिळालेल्या दक्षिणेतून रेशमचे कपडे घालणे, तुपरोटी गोडधोड खाणे, मोटरगाडी, एअर-कंडिशन रेलवे कोच. विमान यातून फ़िरणे, कशासाठी? अवगत केलेल्या अप्रामाणिक कलेतून लोकांना भूरळ पाडून फ़सविण्यशिवाय, असले लोक दुसरे काहीच करित नसतात. आपल्या संस्कारातून आपल्याला अंधश्रद्ध बनविलेले असल्यामुळे आपणही अशांच्या भूलवणींना भूलत असतो. अशातऱ्हेने आपले संस्कार, अध्यात्म, प्रवचन, किर्तन आदि आपणाला, सामान्यमाणसांना अनादिकालापासून कमकुवत

बनवित आलेले आहेत, बनवित आहेत आणि अनादिकालापर्यंत बनवित राहणार आहेत. माझ्यासारख्याने कितीही लिहिले तरी त्याचा फ़ारसा परिणाम होणे नाही याचीपण मला पूर्ण जाणीव आहे. ह्जारोवर्षांच्या संस्काराची गुलामगिरी सहजासहजी जाणे नाही. मनुष्य नाममात्र म्हणायला स्वतंत्र आहे. वास्तवात तो संस्काराचा गुलामच असतो. अशी गुलामगिरी हेच माणसाने आपले जीवन माणलेले आहे.

निस्वार्थ सेवा करणाऱ्यांना आपल्या सेवेचा डंका वाजविण्याचे काय कारण? नेते, जसे की आमदार, खासदार आदि; हे तर जनतेची सेवा करण्याकरिताच निवडून दिलेले असतात असे आपण मानतो. अर्थात जनता यांना निवडून देते; की हे जनतेकडून आपणाला निवडून घेतात; हा शोध-प्रबंधाचा विषय व्हावा. नाहीतर लाखो-करोडो रुपये खर्च करून लोकांची सेवा करण्याचा अधिकार विकत घेण्याची आवश्यकता काय? असे खर्च होणारे पैसे खरोखरच अशांच्या घामाच्या कमाईचे असतात काय? असू शकतात काय? निवडणूकीत उगीच खर्च केल्यापेक्षा, स्वकमाईचे असे पैसे जो कोणी खऱ्या अर्थाने समाज कार्याकरिता खर्च करील त्याला, जीवनात परमोच्च आनंद मिळू शकतो; जो मंत्री, आमदार, खासदार आदि होवून आज मिळणे शक्य नाही. आणखी म्हणजे आमदार, खासदार आणि इतर पदाधिकारी आदिंना जनता समाज

कार्याकरिता निवडून देत असते ना! आणि असे निवडून आलेले लोक जी काही कामे करितात, ती सरकारच्या म्हणजे जनतेच्याच पैशातून करतात ना! मग अशी कामे केलीत म्हणून स्वतःचीच वाहवा करून घेण्याकरिता, हे जाहिरातीवर लाखो रुपये का खर्च करतात? अशा जाहिरातीद्वारे हे असे भासवितात की जणू काही, ती कामे त्यांनी स्वतःच्याच पैशातून केलेली आहेत. जाहिरातींना सुद्धा हे सरकारचा म्हणजे जनतेचा, ते ज्या संस्थेवर आहेत त्या संस्थांचाच पैसा वापरतात ना! आपणही त्यांना असा पैसा वापरू देतो ना! अशा जाहिरातींवर खर्च केलेल्या पैशातून आणखी कितीतरी समाजोपयोगी कामे होवू शकतात, याची जाणीव आपण त्यांना का देत नाही? जाहिरातच करायची असेल तर ती, स्वतःच्या कमाईतून करा, असे आपण त्यांना का बजावित नाही? प्रामाणिकपणे कमाविलेल्या स्वतःच्या घामाच्या पैशातून लाखो रुपयांच्या देणग्या देणे; शक्यच नसते. खऱ्या घामाच्या पैशातून फ़ार तर शेजारी जर उपासी झोपत असेल तर त्याला जेवू भलेही घालता येईल. (ही संस्कृती पण आता लोप पावत असल्याचे दिसते); मग सेवा करणाऱ्यांजवळ असा पैसा कोठून येतो, याचा आपण विचारच करित नाही. एकीकडून आपल्या बुद्धीच्या करामतीने, अवगत कलेने, (हात) चलाखीने सामान्य माणसांना फ़सवून, भूलवून करोडो रुपये जमा करायचे, लुटायचे आणि दुसरीकडे अशा

लुटीतून लाखो रुपयांचे दान द्यायचे. असे त्यांनी केले की, मग त्यांची वाईट कृत्ये, पापे आपणच धूवून देतो. आपणच त्यांना डोक्यावर घेवून नाचत सुटतो. खरे पाहता निस्पृह समाजसेवा, त्याग करणारे विरळेच असतात. ते प्रकाशित नसूही शकतात. तुम्ही प्रकाशित, त्यागी गणण्यात आलेल्या संत, महंत, नेते, जेते, कर्ते यांचे आयुष्य खोलात तपासा म्हणजे तुमच्या लक्षात येईल की यातील बहुतेकांना स्वतःच घर व्यवस्थित सांभाळता आलेले नाही; कुटूंब, नातेवाईक आदिंशी सुरळीत संबंध ठेवता आलेले नाही. , फ़िकीर मात्र यांनी केलेली आहे दुसऱ्यांची घरे सांभाळण्याची, सुधारण्याची. स्वतःची घरे वाऱ्यावर सोडून. अशा त्यागाला काही अर्थ आहे असे मला वाटत नाही. अशांच्या घराच्या दुर्व्यवस्थेला तेच जबाबदार ठरत नाहीत काय? तदवतच कोण्याही त्यागी, मोठे गणल्या जाणाऱ्याने देशाला, समाजाला जितके दिले नसेल; त्यापेक्षा कितीतरी पटींनी जास्त देशाने, समाजाने अशांना दिलेले आहे. दुसरे असे की, असे मोठे गणल्या जाणारे लोक जसे आयुष्य जगलेत, तसे आयुष्य जगायल आपल्यापैकी किती लोक तयार होतील!

आज सामान्य माणसांना चुकीचे आदर्शवादी बनविण्याचा प्रयत्न करणाऱ्या खोट्या, फ़सव्या आदर्श गणल्या जाणाऱ्या माणसांची नव्हे, तर सामान्य माणसांना, सामान्य जीवन आनंदात

कसे जगावे हे सांगणाऱ्या सामान्य माणसांचीच नितांत आवश्यकता आहे. संत, महंत, बुद्धीवंत, किर्तनकार, प्रवचनकार यांनी समाज प्रबोधनाच कार्य करून समाज जीवनात मूल्ये रुजविल्याच आपण नेहमीच वाचतो, ऐकतो, म्हणतो. मग प्रश्न पडतो की, अशा लोकांची भरपूर परंपरा लाभलेल्या आपल्या राज्यात, देशात, आज समाज इतका भरकटलेला कसा, भ्रष्टाचार बोकाळलेला कसा; अप्रामाणिकपणा रक्तात भिनलेला कसा; जीवनमूल्यांचा सर्वच क्षेत्रात ऱ्हास झालेला कसा? याच संयुक्तीक उत्तर कोणी देवू शकेल काय? खरी गोष्ट अशी आहे की, या सर्वांनी आदर्शवादाच्या नावाखाली जीवनाविषयीच्या भ्रामक कल्पना, अंधश्रद्धाच पसरविलेल्या आहेत. सामान्य जनतेला, बहुजनांना कमकुवत करण्याचेच कार्य केलेले आहे, करित आहेत. समाजाच्या रुढीप्रित्यर्थ, चालीरीतीनुसार मनाविरुद्ध त्याग, सेवा करणे; खोटा मान, खोटी प्रतिष्ठा मिळविण्याकरिता त्याग-सेवा करणे; हा त्याग-सेवा याचा अपमान आहे. हे सर्व त्याग-सेवा नसून ढोंग असत. अशाने हे शब्दच मूळी आपण डागाळलेले आहेत. स्वतः दुःखे भोगून, कुटुंबाला वेशीवर टांगून, दुसऱ्यांना आनंदी करणे हेही योग्य ठरत नाही. स्वतः आनंदी राहून, सहज प्रवृत्तीने, आपल्या समाज कार्याने (सेवेने नव्हे) दुसऱ्यांना आनंदी करून आपला आनंद द्वीगुणीत करणे, हेच खरे निस्वार्थी कार्य. यानेच

समाज जीवन निकोप होईल आणि सर्वांनाच खेळीमेळीचा आनंद लाभू शकेल. शेवटी

म्हणती जीवन जगावे परार्थ

जीवनात सदैव साधावा परमार्थ

परि जीवनाचे वास्तव असे फ़क्त स्वार्थ

स्वार्थास्तवचि आपण जगतो एकमेकार्थ

परावलंबित्व नव्हे, परस्परावलंबित्व हवे, जगण्यार्थ

आणि संपूर्ण जगणे हवे, खेळीमेळीच्या आनंदार्थ.

## (७)

# विचार, मत आणि मन

आपल्या मनाप्रमाणे जीवन जगायला मिळाल्यास जीवनात आनंद मिळेल, मिळतो असे प्रत्येकालाच वाटत असते. प्रत्येकाला जीवनात आपल्या मताप्रमाणे वागावे, मतानुसार कार्य करावे असेही वाटत असते आणि त्याकरिताच प्रत्येकाचे प्रयत्न असतात. यामुळेच जीवन सार्थक, सफ़ल होते असे त्यांना वाटते. परंतु हे खरे आहे काय? असे आपले मन आणि मत असते तरी काय? याविषयी मात्र आपण फ़ारसा विचार करितो असे दिसत नाही.

मन म्हणजे नक्की काय? मन हे शरीरातील अवयव आहे की संकल्पना! मन हे शरीराचे अवयव असेल तर ते शरीरात कोठे वसलेले आहे? याविषयी आपल्या कल्पना भ्रामकच आहेत. पुष्कळ लोक मन आणि आत्मा एकच आहे असे मानतात. तर पुष्कळांना मन याच मूळ न दिसणाऱ्या, न स्पर्श करता येणाऱ्या आत्म्यात आहे असे वाटते. मग असा आत्मा म्हणजे काय असा प्रश्न पडतो. आत्मा हा माणसाच्या शरीरात वास करित असलेला परमात्म्याचा अंश आहे अशी सर्व साधारणपणे सर्वांची समजूत आहे. परमात्म्याचे असे अंश, विश्वातील सर्व अणूरेणूत विभागूनही परमात्मा अखंड उरतो, असेही आहे. आत्मा जर परमात्म्याचा अंश

आहे, तर तो उन्नतच असणार.! मग आत्मोन्नती आदि शब्द सभ्रमच निर्माण करणारे नाहीत काय? तसेच आत्मा ज्यात मन असते त्यात परमात्म्याचा अंश आहे, म्हणजे काय आहे ? हा अंश निरनिराळ्या माणसांच्या आत्म्यात निरनिराळ्या तऱ्हेचा असतो की सारखाच असतो? स्वतःच्या अंशाद्वारे जर परमात्मा आपले आयुष्य नियंत्रित करित असेल तर मग आपल्या हातून वाईट कृत्ये कशी घडतात? एकीकडे आत्म्याद्वारे, त्यातील मनाद्वारे परमात्मा आपले जीवन नियंत्रित करितो असे म्हणायचे आणि दुसरीकडे माणसाला क्रियास्वातंत्र्यही आहे असे सांगायचे; याचा मेळ घालणे शक्यच नाही. जे असा मेळ बसविण्याचा प्रयत्न करितात, ते फ़क्त निव्वळ बुद्धीभ्रम करित असतात.

मनाविषयी बरेच अनाकलनीय सिद्धांत, कल्पना मांडलेल्या आहेत. प्रोफ़ेसर ऱ्हाईन आणि त्याची पत्नी डॉ. ऱ्हाईन तसेच त्यांचे मित्र डॉ. हेलगे (ड्युक विद्यालय) यांनी आपल्या संशोधनातून इएसपी-ज्ञानचक्षु शिवाय ज्ञान (Extra Sensory Perception); दिव्यदृष्टी (Clairvoyance) म्हणजे दृष्टीआडचे दिसणे; टेलिपॅथी (Telepathy) म्हणजे दुसऱ्याच्या मनातील ओळखणे; आणि (Pre-Cognition) म्हणजे पुढे भविष्यात होणाऱ्या घटना जाणणे; हे सिद्ध झाल्याचे सर्वदूर प्रसिद्ध केले होते. परंतु नंतर डॉ. अडमास (कोलगेट विश्वविद्यालय), डॉ. प्राईस

(मिन्नेसोटा विश्वविद्यालय), डॉ. कुव्हर (स्टॅनफ़ोर्ड विश्वविद्यालय) आणि प्रो. स्कार्न यांनी ऱ्हाईन दांपत्यांचे सर्व सिद्धांत समुळ खोटे आहेत, फ़सवे आहेत (Humbug) असे सप्रमाण सिद्ध केलेले आहे. डॉ. जंग या तज्ञाने व्यक्त मनाच्या पलिकडे अव्यक्त मन आहे आणि त्यात आत्मा वास करितो असा सिद्धांत मांडून आपल्या प्रचलित कल्पनांना की आत्म्यात मन असते, मन हा आत्म्याचा भाग आहे, धक्काच दिलेला आहे.

ह्या सर्व मानसशास्त्राशी सादृश्य असलेल्या (Parapsychological) कल्पना आहेत आणि त्यांना मूळी कसलाच आणि कोणताच आधार नाही. इएसपी, दीव्यदृष्टी, टेलीपॅथी आदि प्रकार म्हणजे निव्वळ फ़सवेगिरी (Farce) किंवा ज्यांना असे वाटते तो त्यांच्या मनातील भ्रम (Delusion) असतो. अशा प्रकारचे दावे करणाऱ्यांनी शेजारच्या खोलीत काय चालले आहे, शेजारच्या खोलीत बसलेल्या माणसाच्या मनात कोणते विचार आहेत; हेच सांगावे. हे त्यांना जाहिर आव्हाण. मग हजारो योजने (मैल) दूर असलेल्या ठिकाणी काय चालले आहे किंवा तेथील माणसाच्या मनातील विचार ओळखणे, हे तर फ़ार दुरचे होईल. मला माहित आहे, हे आव्हाण कोणीच स्वीकारणार नाही. म्हणून अशा मनाविषयीच्या भ्रामक कल्पनांपासून सावध असावयास, राहावयास पाहिजे.

या व्यतिरीक्त मानसशास्त्रज्ञांनी मनाविषयी अद्वैत (Monism) आणि द्वैत (Dualism) असे सिद्धांत पण मांडलेले आहेत. द्वैत सद्धांतानुसार मन आणि शरीर; मानसिक आणि शारिरीक हे अलग अलग असल्याचे सांगितलेले आहे. अद्वैतामध्ये वस्तुनिष्ठ अद्वैत (Materialistic Monism) आणि बुद्धीनिष्ठ अद्वैत (Mentalistic Monism) असे प्रकार पाडलेले आहेत. वस्तुनिष्ठ अद्वैत सिद्धांतानुसार सर्वच वस्तुमय आहे. मन सुद्धा वस्तुच आहे. मानसिक असे काहीच नसते. याउलट बुद्धीनिष्ठ अद्वैतानुसार सर्व मानसिकच आहे. जे वस्तुनिष्ठ दिसते तेही मानसिकच असते किंवा मानसिकतेचे प्रकटीकरण असते. याशिवाय अद्वैत सिद्धांतात तटस्थ अद्वैत (Neutral Monism) हा प्रकार सुद्धा सांगितलेला आहे आणि यानुसार मन ही क्रिया (Process) असल्याचे प्रतिपादन केलेले आहे. मन म्हणजे जाणीव (Conscious) असेही वर्णण्यात येते. जाणीवेची व्याख्या करता येत नाही. उदाहरणांवरून काय ते दर्शविता येते. जसे की, मी आता लाकडी पॉलीस केलेल्या टेबलावर असलेला पांढरा कागद पाहतो; मी घड्याळात दहा वाजण्याचे ठोके ऐकतो; मी मला माझ्या मित्राचे आलेले पत्र आठवतो; मी मला सतावित असलेल्या प्रश्नांवर विचार करून त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करितो; मी पेन उचलतो आणि लिहायला लागतो; ह्या सगळ्या पाहण्याच्या-ऐकण्याच्या

(Perception); संस्मरणाच्या (Memory), विचाराच्या (Thought) आणि स्वयंस्फुर्त कृतीच्या (Action) क्रिया आहेत. ह्या सर्व क्रियांना जाणीवेमध्ये गणतात. ह्या क्रिया मनाचाच भाग, बुद्धीचाच खेळ मानण्यात येतात. परंतु डॉ. फ्राईड या मानस तज्ञाने मनाच्या जागृत वा बोध (Conscious); अर्धजागृत वा उपबोध (Sub-Conscious); आणि निद्रिस्त वा अबोध (un-Conscious) अशा तीन अवस्था सांगून मनाचे स्वरूप व कार्य याविषयी जे मनोविश्लेषण केलेले आहे; त्याविषयीही सांशकताच आहे.

तत्ववेत्यांमध्ये सुद्धा मनाविषयीच्या सिद्धांतात तफ़ावत आढळून येते. प्लेटो या तत्ववेत्यनुसार मन हे अभौतिक (Metaphysical) आणि अद्रव्य (Immaterial)आहे, तर अरिस्टॉटल ह्या तत्ववेत्यानुसार मन ही क्रिया (process, Function, Activity) आहे. वाढ हा वस्तुचा गुणधर्म तर विचार हा मनाचा गुणधर्म असेही मानन्यात येते.

शब्दाच्या उत्पत्ती शात्रानुसार (Etymology) इंग्रजी मध्ये मनाला माइन्ड (mind) म्हणतात. माइन्ड हा शब्द इंग्रजी भाषेचे मूळ असलेल्या इंडोजर्मन या भाषेतील मॉन्ड (mond) या शब्दापासून आलेला आहे. आणि मॉन्ड या शब्दाचा म्हणून माइन्ड या शब्दाचा अर्थ आहे विचार. आपल्या देशात मन हा शब्द आर्यन

भाषा समूहातील संस्कृत भाषेतील मानस या शब्दापासून आलेला आहे अणि मानस या शब्दाचा म्हणून मन या शब्दाचा अर्थ पण आहे विचार. संस्कृत -आर्यन तसेच इंग्रजी-इंडोजर्मन ह्या भाषा मुळच्या इंडोयुरोपियन ह्या भाषा समुहातील असल्यामुळे मॉन्ड-माइंन्ड आणि मानस यांचे अर्थ एकच म्हणजे विचार असे असावे..

मनुष्य जन्माला आल्यानंतर आपल्या सामाजिकी-करणाच्या आणि संस्कृतीकरणाच्या म्हणजे संस्काराच्या प्रक्रियेद्वारे त्याच्या ज्ञानेंद्रियामार्फ़त, त्याला आपल्या भोवतीच्या निसर्गाची, आपल्या जीवनाची तसेच समाज जीवनाची-नियमांची माहिती होते. ही माहिती चूकही असू शकते आणि अचूकही. अचूक माहिती म्हणजे ज्ञान आणि चूक माहिती म्हणजे अज्ञान. एखाद्या गोष्टीविषयी काहीच माहिती नसणे, याला पण त्या गोष्टीविषयीचे अज्ञानच म्हणतात. माहिती चूक की अचूक (बरोबर); खोटी की खरी; अनिश्चित की निश्चित हे ठरविण्याच्या प्रक्रिया आपल्या मज्जातंतू व्यवस्थेत (Nervous System) की ज्यात मेंदू (Brain) आणि स्मरणशक्ती (Mrmory) स्मृतीभंडार पण येतात; त्यात घडत असते आणि ही प्रक्रिया म्हणजेच आपली विचार प्रक्रिया. आपल्या शरीरात असलेली घेयके Receptors) जसे की नाक, कान, डोळे, त्वचा, जीभ आदि शरीराबाहेरून येणाऱ्या संवेदना (Stimuli), माहिती स्वीकारतात आणि

मज्जातंतू व्यवस्थेतील न्युरॉन नावाच्या पेशीयुक्त संवाहकाद्वारे ती माहिती आपल्या मेंदूत पोहोचवितात. ही नवीन येणारी माहिती आणि आपल्या मेमरीमध्ये अगोदरच असलेली माहिती यांचे मध्ये आदान-प्रदानाची प्रक्रिया होते आणि अशा या प्रक्रियेलाच विचार म्हणतात. या विचार प्रक्रियेतून माहिती चूक की बरोबर ठरविल्या जाते. जी माहिती पूर्ण विचारांती आपल्याला अचूक वाटते, तिला आपण ज्ञान म्हणून ग्राह्य धरतो. अर्थात आपणाला अशी अचूक वाटणारी माहिती चूकही असू शकते आणि असे असते म्हणूनच आपले कितीतरी ज्ञान हे अज्ञान असते आणि अशा अज्ञानालाच आपण ज्ञान समजून वावरत असतो.

जी माहिती; चूक आहे की बरोबर, निश्चित स्वरुपाची आहे की अनिश्चित-भ्रामक स्वरुपाची; हे आपली विचार प्रक्रिया ठरवू शकत नाही, ती माहिती, आपल्या विचारप्रक्रियेत मत वा मन म्हणून राहाते. माझ्या मताप्रमाणे मला असे वाटते किंवा माझे मन मला असे असे सांगते, हे सारखेच वाकप्रचार मत आणि मन हे दोन्ही विचाराचे भाग असल्याचेच दर्शवितात. आपले मत तसेच मन चूक की बरोबर हे ठरविण्याची प्रक्रिया आपल्या मेंदूत, मज्जातंतू व्यवस्थेत नेहमीच चालू राहते. यालाच आपण मनन, चिंतन, अंतर्विचार आदिने संबोधितो. आपल्या संस्कारातून वृद्धिंगत होणारा आपला विवेक-तर्क वा विकार-भावना; आपल्या

विचारप्रक्रियेतील माहिती चूक की बरोबर हे ठरविण्यास हातभार लावतात. तर्कातून मत तर भावनेतून मन बनते. तर्क-मत हे वस्तुनिष्ठ (Objective) असते आणि यात विश्वास असतो, तर भावना-मन हे आत्मनिष्ठ (Subjective) असते आणि यात श्रद्धा असते. श्रद्धा, भावना, मन तसेच विश्वास, तर्क, मत हे सर्व आपल्या संस्कारातून बनतात. म्हणजेच आपले मन, मत, विचार हे सर्व संस्कारावरच अवलंबून असतात. याकरिताच; द्वेषरहित, प्रेमळ मने घडविण्याकरिता; खरी समाजोपयोगी मते बनविण्याकरिता योग्य संस्कारांची नितांत आवश्यकता असते. परंतु खेदाने म्हणावे लागते की आपल्या चुकीच्या संस्कारातून असत्य, खोट्या, भ्रामक जीवनविषयक कल्पना आपण रुजविल्यामुळे; आपण आपली मने आकुंचित, कलुषित व द्वेषमूलक करून बिघडविलेली आहेत. आणि आपल्या दुराग्रही संस्काराने समाजाला घातक, मारक अशी मते ठसवून घेतलेली आहेत. निकोप समाजजीवनाकरिता हे बदलणे गरजेचे आहे. भ्रमविरहित, सत्यावर आधारित अशा योग्य संस्कारांची, की ज्यातून निखळ, प्रेमळ मने आणि एकमेकांना पुरक मते बनतील; त्याची आवश्यकता आहे. पण होईल का हे! की शिक्षणाचे यांत्रिकीकरण; सत्ता, संपत्ती आणि सन्मान यांचे वृथा आकर्षण, परिस्थीती आणखीच बिघडवतील?

## (८)

## अभिमान, अहंकार, गर्व

प्रत्येकाला स्वाभिमान असावा. असे सर्वच जन म्हणतात. परंतु त्याबरोबरच गर्व नसावा असे पालुपदही या म्हणण्याला जोडण्यात येते. स्वाभिमान कोठे संपतो आणि गर्व कोठून सुरु होतो, हे मात्र कोणीच सांगत नाही, कोणालाच ते सांगताही येणार नाही. मला जो माझा स्वाभिमान वाटतो, तो दुसऱ्याला माझा गर्व भासू धकतो. तसेच स्वाभिमान म्हणजे स्वतःचा अभिमान अथवा स्वतःविषयीचा अभिमान. परंतु स्वतःचा म्हणजे कशाचा, स्वतःविषयीचा म्हणजे आपल्याला समाजात असलेल्या स्वतःच्या दर्जाचा, संपत्तीचा, विद्वत्तेचा, प्रतिष्ठेचा अभिमान असतो. साहजिकच येथे आपल्यापेक्षा कमी दर्जांच्या लोकांना कमी लेखण्याचा, आपल्या श्रेष्ठत्वाचा विचार येतो. म्हणून असा हा अभिमान मग अभिमान राहात नसून अहंकार ठरतो.

अभिमान, अहंकार आणि गर्व यातील सीमारेषा फ़ारच पुसट आहेत. बहूतेक ज्याला आपण स्वाभिमान समजतो, तो आपला प्रत्यक्षात अहंकारच असतो. स्वाभिमान हा समानतेवर आधारित पाहिजे. आपल्याला कोणी कमी लेखले; मान-सन्मान

दिला नाही; तर आपल्या अहंकाराला ठेच पोहचते. आपल्याला कोणी चांगले म्हटले, श्रेष्ठत्व दिले, सत्कारित केले तर आपला अहंकार फ़ुलत असतो. प्रत्येकाला आपला अहंकार फ़ुललेला आवडतो. ही माणसाची संस्कारातून आलेली कमकुवतता आहे. असा अहंकार फ़ुलवून घेण्याकरिता मग, नाना कृत्यांनी श्रेष्ठत्व मिळविण्याचा प्रयत्न होतो. अशा प्रतिष्ठेत, सन्मानात, सत्कारातच असमानतेचे बीज पेरल्या जाते; असमानतेच्या बीजातूनच हे उगविलेले असते; हे लक्षातच घेतल्या जात नाही.

समाज कार्य हे सामाजिक जीवनाचा एक आवश्यक भाग, आपला वाटा म्हणून; अशा कार्यातून सर्वांबरोबर आपणासही जीवनात आनंद मिळावा म्हणून करायच असत. परंतु अशा कार्याचा समाजसेवा म्हणून उदोउदो करणे, हा अहंकार फ़ुलवून घेण्याचाच प्रकार आहे. जे लोक प्रामाणिक पणे समाजकार्य करून समाज जीवनात खेळीमेळीचा आनंद पसरवित असतात, आनंद स्वतः घेत असतात; त्यांना आपण श्रेष्ठ ठरवून, पद्व्या देवून, त्यांच्या समानतेच्या तत्वावरच आपण घाला घालित असतो आणि एकप्रकारे त्यांचा अपमानच करित असतो. तदवतच जे लोक अशा पदव्या स्वीकारतात ते स्वतःच आपल्या कार्यातील स्वतःच्याच प्रामाणिक हेतू विषयी संशय ओढून घेत असतात. जो मान वा अपमान मानीत नाही, ह्या गोष्टी मनाला शीवू देत नाही,

तोच खरा अभिमानी. म्हणूनच एखाद्या माणसाला; गरीब म्हणून जर श्रीमंतांनी तुच्छ लेखले, अशिक्षित म्हणून जर विद्वानांनी अडाणी लेखले, तरी जो मनुष्य स्वतःला अपमानीत समजत नाही, स्थितप्रज्ञच राहतो; यातच त्याचा स्वाभिमान राखण्यासारखे असते. आपणाला गरीब वा अडाणी म्हटल्यामुळे जर आपण चिडलो, तर ते सुद्धा आपला अहंकार ठेचाळल्याचेच प्रदर्शन केल्यासारखेच होते. कोणी आपणाला अडाणी वा गरीब म्हटले; विद्वान वा श्रीमंत गणले म्हणून आपण तसे होत असतो किंवा असतोच असे नाही. कोणी आपणाला काहीही म्हणो, गणो, लेखो आपण मात्र जसे असतो तसेच राहतो. म्हणूनच दुसऱ्यांनी कमी वा तुच्छ लेखल्यामुळे विचलित न होणारे; दुसऱ्यांनी स्तुती केल्याने भारून न जाणारे; असे लोकच खरे स्वाभिमानी. दुसऱ्यांना जे गरीब वा अडाणी वा अन्य तऱ्हेने हिणवितात असे लोक आपले श्रेष्ठत्व दाखवित नसून आपला कमकुवतपणाच जगजाहिर करित असतात. अशाने ते स्वतःच आपल्या अभिमानाला ठेच पोहचवित असतात. तदवतच जेंव्हा आपण दुसऱ्यांना मोठे समजत असतो, श्रेष्ठ मानीत असतो, तेंव्हा आपणच समानतेच्या तत्वाला, समाजात सर्वच समान असतात याला तिलांजली देत असतो. अशाने आपण आपलाच अभिमान अपमानीत करित असतो. स्वाभिमान गहान ठेवित असतो. यावरही आपण जेंव्हा अशांचा स्वागत सत्कार

करितो, तेंव्हा अशांचा आपणच अहंकार फुलवित असतो, त्यांचा गर्व फुलविण्यास हातभार लावित असतो. आणि असे हे स्वतःस मोठे समजणारे, जेंव्हा असा सत्कार करून घेत असतात, तेंव्हा ते स्वतःच आपला स्वाभिमान नव्हे तर अहंकार जोपासत असतात. अशा अनेक सत्कारातून ते आपल्या अहंकाराला खतपाणी घालून त्याचे गर्वात रुपांतर होण्यास मदत करित असतात. अशा तऱ्हेने समाजातील सर्वच; लहान-मोठे, गरीब-श्रीमंत, अडाणी-विद्वान; हे आपल्या वृथाहिनतेमुळे किंवा वृथा मोठेपणामुळे आपाआपल्या स्वाभिमानतेला तडाच देत असतात.

असेच आहे आपल्या जाती-धर्माविषयीच्या, देशाविषयीच्या स्वाभिमानाचे. एका जातीने दुसऱ्या जातीला श्रेष्ठ वा कनिष्ठ लेखणे, मानणे, आपल्या देशाचा मान वाढविण्याकरिता दुसऱ्या देशाचा अवमान करणे, अशा देशाच्या स्वातंत्र्यात हस्तक्षेप करणे ह्या गोष्टी स्वाभिमानाच्या नसून दुराभिमानाच्या आहेत. आपल्या धर्माचे श्रेष्ठत्व दाखविण्यासाठी, जोपासण्यासाठी दुसऱ्या धर्मियांचा द्वेष करणे; हा धर्माभिमान नसून, धर्मांधता आहे. ही सर्व अंधाभिमानतेची लक्षणे आहेत.

कोणत्याही तऱ्हेचा, वृथा हिनपणा तसेच वृथा मोठेपणा ह्या दोन्ही गोष्टी समानतेच्या विरुद्ध आहेत आणि म्हणून निकोप समाज-जीवनाला घातक, मारक आहेत. यामुळेच आपला समाज

भरकटलेला आहे. समाजात विषमताच विषमता आहे. द्वेष भावनेचे विष सर्वत्र पसरलेले आहे. एकमेकांवर कुरघोडी करण्याची प्रवृत्ती बोकाळलेली आहे. आपल्या चुकीच्या समाज व्यवस्थेतून, संस्कारातून आपण अशीच सभ्यता (Civilization) निर्माण केलेली आहे. , संस्कृती अंगिकारलेली आहे. यावरही विशेष म्हणजे आपले समाज धुरीण, साधू महाराज, प्रबोधनकार, नेते, वक्ते हे सुद्धा; त्यांना लाभलेल्या वक्तृत्व कलेद्वारा; अवगत झालेल्या मधूर, रसाळ, गोड वाणी द्वारा; लोकांना भूरळ पाडून अंधश्रद्धाच पसरवित असतात आणि अशाच विषमता पसरविणाऱ्या संस्कृतीच जतन करित असतात. लेखन कौशल्य लाभलेले साहित्यिकही या बाबतीत मागे नाहीत. अशांच्या साहित्यिक लेखनात किंवा कोणात्याही वक्त्याच्या चांगल्या, प्रभावी भाषणात चांगले विचार असतातच असे नाही, जरी अशा भाषणांना आपणांकडून जोरदार टाळ्या मिळत असल्या व लेखनाची तारीफ़ होत असली तरी. आपल्या भावना जपणार, आपल्या मतांशी सहमत, आपणाला आवडत ते बोलल; जो वक्ता बोलतो तो आपल्या पक्षाचा, जातीचा, धर्माचा पुरस्कार करणारा असला; की मग तो त्या अनुषंगाने जे बोलेल, त्याला आपण टाळ्या वाजवित असतो. मग तो कितीही खोटे, अवास्तव, अवाजवी, अस्थानी, तर्कहिन का बोलेना! आपल्या भावना दुखविणारे, आपल्या जाती-

धर्मावर टिका करणारे कोणी बोलले की ते आपल्या पचनी पडत नाही. मग असे बोलणे कितीही वास्तव, सत्य का असेना! असेच असते लिखानाविषयीपण. आपण असे वक्तव्य तसेच लिखाण भावनेतून ग्रहण करितो; आणि अहंकारातून त्यावर प्रतिक्रिया देतो. विवेकातून ते तपासत नाही. हे बदलावयास पाहिजे. विचारांचे आदान-प्रदान समानतेच्या तत्वावर, चर्चेद्वारा व्हायला पाहिजे. आणि ते भ्रामक कल्पनांवर नव्हे तर शुद्ध तर्कांवर आधारित पाहिजे. तसेच विचार कितीही तर्कशुद्ध असले तरी, ते आचरणात आणतांना; अशा विचारांना व्यवहाराची, समाजभावनेची सांगड पुष्कळ वेळा घालवी लागते. आपल्या समाजव्यवस्थेत ते अपरिहार्य ठरते. परंतु म्हणून खोलात, मुळात, तर्कशुद्ध विचार करून तो मांडूच नये असे नसावे.

बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले या उक्तीत शुद्ध विचारच अभिप्रेत आहे. (खरे-चांगले) बोले तैसा (खरे-चांगले) चाले, त्याची वंदावी पाऊले असाच याचा अर्थ घ्यावा लगेल. शब्दशः अर्थ घेतो म्हटले तर (खोटे-वाईट) बोले तैसा (खोटे-वाईट) चाले, त्याची वंदावी पाऊले, असाही अर्थ निघू शकेल. अजाणते वा नकळत आपण असाच अर्थ घेतो की काय कोण जाणे? म्हणूनच की काय, आपण उघडउघड भ्रष्टाचार करणाऱ्या; धादांत खोटे बोलणाऱ्या, खोटी आश्वासने देणाऱ्या, आपल्या नेत्यांची

पाऊले वंदित असतो; अशीही शंका डोकावते. अशाने आपण स्वतःच्या अभिमानाला गालबोट लावून घेत असतो आणि दुसऱ्यांच्या खोट्या मोठेपणाला, त्यांच्या अहंकाराला प्रोत्साहन देत असतो.

अहंकार कमी होण्याकरिता समाजातील संस्कार प्रक्रियेत बदल होणे आवश्यक आहे. अहंकाराची भावना न येण्याकरिता लहानपणापासूनच तसे संस्कार रुजविण्याची आवश्यकता आहे. माणसातील अहंकार, गुण-दोष तसेच त्याचा स्वभाव ही त्याला पूर्णत्वाने नसले तरी जास्त करून समाजाचीच देण असते कारण त्याच्यावर तसे संस्कार समाजच घडवितो. असे असले तरी, माणसाच्या दोषांबद्दल समाज मात्र त्यालाच दोषी ठरवित असतो. म्हणूनच कोणत्याही माणसातील नव्हे तर समाज व्यवस्थेतील, संस्कारातील त्रुटी समोर आणण्याचा येथे प्रयत्न आहे की जेणेकरून त्या त्रुटी दूर करण्यावर विचार होईल. श्रीमंत-गरीब, विद्वान-अडाणी, श्रेष्ठ-कनिष्ठ वा अन्य काही म्हणून अहंकार पोषक तसेच द्वेषमूलक, अस्थिर जीवन जगण्यापेक्षा, आपण जसे आहोत तसे किंवा जसे सहजपणे होवू शकतो तसे होवून, तणावरहित, खंतविरहित, भयमुक्त, प्रांजळ जीवन जगण्यात माणसाचा खरा स्वाभिमान आणि आनंद आहे आणि हे त्याच्या हातातच आहे. फ़क्त खंबीर मन आणि प्रबळ इच्छा हवी.

# (९)

# जीवनातील सुख, समाधान

जीवनातील सुख, समाधान याविषयी विचार करतांना जीवन काय आहे, याचा उहापोह करणे योग्य ठरावे. थोडे साहित्यिक भाषेत सांगावयाचे झाल्यास; जीवन हा कल्पनांचा खेळ आहे; जीवन भावनांची भरारी आहे; जीवनात गुंतागुंतीची सांगड आहे; जीवन काव्यमय आहे तसेच कथास्वरुप पण आहे; जीवन शांत आहे आणि रुद्रही आहे, त्यात वादळे सुद्धा उत्पन्न होवू शकतात; जीवनात बालपणाची निरागसता आहे, तारुण्याची उन्मादकता आहे, वार्धक्याची मायाळूता आहे; जीवन आज आहे उद्या नसेलही; जीवनात ध्येय संभव असू शकेल किंवा नसेलही; जीवन मुख्यत्वेकरून अकल्पित आहे पण कल्पित जीवन असू शकत नाही असेही नाही; जीवनात उजेडाबरोबर अंधारपण आहे; जीवन अपूर्ण आहे, पूर्ण जीवनाकरिता फ़क्त धडपड चाललेली असते तरीही जीवन अपूर्णच राहते; जीवनात आनंद आहे पण त्याबरोबरच जीवनात दुःख आणि शिसारी सुद्धा आहे; जीवन सागरासारखे विशाल पण तितकेच खोल आहे; जीवन आकाशासारख भव्य आहे; जीवन प्रितीमय आहे तसेच

वासनाधिन पण आहे; जीवनात प्रेम आहे तसेच तिरस्कार, द्वेष, छळ पण आहे; जीवन वाहात्या पाण्यासारखे जिकडे वाट मिळेल तिकडे जाणार आहे; जीवनात चढ-उतार आहेत; जीवन पवित्र असू शकेल, अपवित्रही असू शकेल; जीवनात उल्हासाबरोबर उदासिनता पण आहे; जीवन ज्या तऱ्हेने कलाटणी बसेल त्या तऱ्हेने बदलणार आहे; जीवन स्थीर आहे आणि अस्थीरही आहे; जीवनसुसंघटीत आहे तसेच अस्ताव्यस्त पण आहे; जीवन सरळ अणि दयेने भरलेले आहे तितकेच कावेबाज आणि कठोर पण आहे; जीवन नक्की काय आहे आणि काय नाही हे सांगणे कठीण; जीवन सर्वच आहे आणि काहीच नाही; परंतु जीवनात एकूण धडपड असते ती फ़क्त सुखाकरिता.

सुख हे तुलनात्मक आहे. सुखाचा भास मृगजळासारखा आहे. कधीही पूर्ण न होणारी इच्छा म्हणजे सुख. सुखाची व्याख्या करणे अशक्यच. श्रीमंत सुखी आहेत की गरीब; विचारी सुखी आहेत की अविचारी, ज्ञानी सुखी आहेत की अज्ञानी हे सांगणे कठीणच. विकारात्मक पूर्तीने लाभ झालेलाही सुखी नाही व विचारात्मक मनाने विकसित झालेला मनुष्यही सुखी नाही. सुखाचा संबंध मनाच्या विचाराशी आहे तसाच देहाच्या विकारांशी पण आहे. अति महत्वाकांक्षा ही सुखाच्या मार्गातील सर्वात मोठी धोंड आहे. सुख हे क्षितीजासारखे आहे. जसजसे त्याचे जवळ जावे

तसतसे ते दूर दूर पळते. सुख हे कधिही न उमलणाऱ्या हिरव्यागार पर्णांकित झाडाच्या फ़ुलासारखे आहे. ते फ़ुल उमलण्याकरिता योग्य खतपाणी व मशागत त्या झाडावर करणे हेच फ़क्त मानवाच्या हाती आहे. म्हणून जीवनाची चढण, जेंव्हा योग्य मार्गाने चढल्या जाईल तेंव्हाच सुखाच फ़ुल उमलण्याची आशा उत्पन्न होते. अर्थात ते पूर्णपणे उमलणे अशक्यच. अयोग्य मार्गाने जीवनाची चढण चढू गेल्यास सुखाच फ़ुल उमलण्याची आशाच नाही. सुखाच फ़ुल उमलण्याची आशा उत्पन्न होणे, यालाच समाधान म्हणतात. आज आपण समाधानालाच सुख मानतो, म्हणतो. थोडक्यात; मनाला समाधान लाभणे, लाभविणे हेच सुख ठरत. तेच जीवनाच ध्येय ठरत, ठराव.

मनाला समाधान लाभणे हे आपल्या मनावरच अवलंबून असते. त्याकरिता इकडे-तिकडे भटकावे लागत नाही. परंतु हे न ओळखल्यानेच आज मनुष्य तसेच समाज भरकटलेला दिसतो. वास्तव सोडून मृगजळाचा पाठपुरावा करतांना आढळतो. जीवनाविषयीच्या भ्रामक कल्पनांमुळे स्वतःला ग्रासून घेतो. नैसर्गिकतेपासून दूर जावून कृत्रीमतेत वावरतो. अवतीभवतीच्या कृत्रीम वातावरणामुळे भूलून जातो. , आणि नाही त्या गोष्टींचा हव्यासी बनून कुडत राहतो. तुलना आणि स्पर्धा यात मोकळे न धावता, त्यात क्रिडावृत्ती न बाळगता; अशा स्पर्धा आपणच

जीवघेण्या करून उगीच स्वतःच त्यात स्वतःला गुरफ़टून घेतो व मग गुदमरत जगतो. स्वतःच्या यशापेक्षा दुसऱ्याच्या अपयशावर जास्त आनंद मानणारा बनून आनंदालाच अर्थहिन करतो आणि आपल्या यशाच्या आनंदापासून वंचित राहतो. आपल्याला मिळालेल्या यशाचा आनंद न घेता; दुसऱ्याला आपल्यापेक्षा जास्त यश मिळाल्यामुळे खिन्न होतो. परिक्षेत पास होवून, मेरिट मध्ये आल्याचा आनंद न भोगता, पहिला न आल्याच दुःख उगाळित राहतो. पहिला आलेला आपल्यापेक्षा सकस आहे म्हणून प्रेमाने त्याच कौतूक करून, अनुकरण करण्यापेक्षा, त्याचा तिरस्कार करून आपल्या मनात द्वेषाच्या भावनेला थारा देतो. आपण पुढे गेल्यापेक्षा आणि त्याकरिता प्रयत्न केल्यापेक्षा, आपला समकक्ष आपणापुढे कसा जाणार नाही याकरिताच आपण जास्त प्रयत्न करितो. आपण भरारी मारण्यापेक्षा, आपला समकक्ष आपल्या मागे आहे, यातच आपण आनंद पाहाण्याचा, शोधण्याचा प्रयत्न करितो. आपणाला खोटी स्तुती करणारे, आपली वाहवा करणारे, आपणाला जे वाटते ते कितीही चूक असले तरी योग्य, बरोबर आहे असे सांगणारेच आवडतात. अशांनाच आपण आपल्या भोवती जमा करितो. मग हे आपणाला लुबाडणारे का असेनात. आपल्यातील दोष दाखविणारे, आपल्या चुका समोर मांडणारे आपणाला आवडत नाहीत. अशांचा दृष्टीकोण भलेही आपल्या

कितीही फ़ायद्याचा का असेना! अशांना आपण टाळतो, दूर ठेवितो. निंदकाचे घर असावे शेजारी हे फ़क्त म्हणण्यापुरतेच असते. अशा तऱ्हेने आपण स्वतःच स्वतःला फ़सवित राहातो, असतो.

निखळ, निव्वळ, प्रामाणिक आनंदापेक्षा वृथा, खोटा, फ़सवा अशा आनंदाच्याच मागे आपण धावतांना दिसतो. आणि अशा तऱ्हेचा आनंद नुसता भ्रम असतो हे जेंव्हा समजते, तेंव्हा उशीर झालेला असतो. आपण आजचा मिळालेला, मिळणारा आनंद उपभोगण्यापेक्षा कालच्या दुःखाचा तसेच उद्या येऊ शकणाऱ्या कल्पित दुःखाचा विचार करून, आजच्या आनंदावर विरजन टाकतो. आपण आपणावरील चुकीच्या संस्कारातून, आपली मानसिकताच अशी करून ठेवलेली आहे की, आपण आपल्या आनंदाला स्वतःच ग्रहण लावत असतो. मनाला समाधान मिळण्याकरिता आणि यामुळे जीवन सुखी-आनंदी होण्याकरिता, काही हव असेल, तर मी म्हणेल, फ़क्त समर्थ मन आणि त्याची योग्य घडण. धन आणि श्रेष्ठपण ह्या गोष्टी समाधान देतात; सुख-आनंद देतात अशाच समजूती रुजलेल्या आहेत. म्हणून शिक्षण पण धन मिळविण्याकरिताच घेण्यात येते. परंतु किती धन आणि किती मोठेपण आनंद देईल याच्या सीमाच ठरलेल्या नाहीत. कितीही धन मिळाले, मोठेपण लाभले, तरी ते कमीच पडते. जास्तीची लालसा निर्माण होते आणि यातच तुमचा आनंद, सुख, समाधान हे

तुमच्यापासून दूर दूर पळत राहते. आणि अशा लालसेतून, लालसा पूर्ण करून घेण्याच्या आक्रस्ताळी हट्टापायी दुःख, तणावच पदरात पडतात, आपण पदरात पाडून घेतो. यामुळेच कितीतरी अतिश्रीमंत तसेच उच्च सन्मानाच्या पदावर असलेले लोक अशांत, तणावपूर्ण असमाधानी जीवन जगत असलेले आढळतात. याउलट कमी धनात आणि मानसन्मानाशिवाय सुद्धा, मनाची घडण योग्य असल्यास मनाला समाधान लाभू शकत, आनंद उपभोगता येऊ शकतो. कोणत्याही गोष्टींच्या अभावांमुळे आपणाला जितका त्रास होत नाही, त्यापेक्षा कितीतरी जास्त त्रास, दुःख आपण आपल्या स्वभावामुळे करून घेत असतो. आपल्या असमाधानाला अभाव नव्हे तर स्वभावच मुलतः, मुख्यतः कारणीभूत असतो. म्हणूनच माणसाने आयुष्यात काहीही घडण्याआधी, घडण्याचे अगोदर, घडण्यापूर्वी स्वतःच मन योग्य तऱ्हेने घडविणे आणि ते समर्थ बनविणे, आवश्यक असते. नाहीतर तुम्ही काहीही घडलात तरी; मन, योग्य स्वभाव न घडल्यामुळे, दुःखी आणि तणाव युक्तच राहाल. याचा अर्थ माणसाला आशा, आकाक्षा असू नये असा नव्हे. माणसाला आयुष्यात ध्येय जरूर असावे आणि ते पूर्ण करण्याचा, गाठण्याचा सुद्धा त्याने प्रयत्न करावा. परंतु तुमचे मन योग्य घडलेले असेल तरच ध्येय प्राप्ती न झाल्यास तुम्हाला नैराश्य शिवणार नाही, वैफ़ल्य येणार नाही. आणि ध्येयप्राप्ती झाल्यास

तुमचा आनंद खऱ्या अर्थाने तुम्ही उपभोगू शकाल. उगीच उच्च ध्येयाच्या तात्काळ विचाराने तुमच्या ध्येयप्राप्तीच्या आनंदाला तुम्हीच ग्रहण लावणार नाही. आनंदी मनानेच उच्च ध्येयाचा, अधिक आनंदाचा विचार कराल. शेवटी इतकेच की;

आशा, आकांक्षा यानुरुपच असते, असावे सर्वांचे ध्येय
परि मिळालेल्यात समाधान मानणे, यातचि मनाचे श्रेय

# (१०)

# व्यक्तिमत्व विकास आणि स्वविकास

आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास झाला पाहिजे; आपल व्यक्तीमत्व उठून दिसल पाहिजे; खुलले पाहिजे; आपल्या व्यक्तीमत्वाची छाप इतरांवर पडली पाहिजे; आपल्या व्यक्तीमत्वामुळे इतर लोक आपणाकडे आकर्षित झाले पाहिजेत; इतरांना मोहित करणार अस आपल व्यक्तीमत्व असल पाहिजे; आपण ज्या ज्या निरनिराळ्या क्षेत्रात काम करतो तेथे आपले वजन वाढले पाहिजे; असेच बहूतेकांना वाटत असते. अशीच बहूतेकांची इच्छा असते. आणि याकरिताच, यानुसार प्रत्येक जन आपल व्यक्तीमत्व घडविण्याच्या प्रयत्नात असतो. आईवडिलांना आपल्या मुलांचे व्यक्तीमत्व चांगले घडावे म्हणून फ़ार काळजी असते. त्याबाबतीत ते फ़ार दक्ष असतात. म्हणूनच ते आपल्या पाल्यांना चांगल्या बालक मंदिरात, कॉन्व्हेंटमध्ये, नावाजलेल्या विद्यालयात-महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्याचा आटोकाट प्रयत्न करित असतात. याकरिता आपल्या उत्पनाचा बराचसा भाग खर्च करतांना सुद्धा दिसतात. स्वतः आर्थिक झीज, त्यामुळे होणारा त्रास सहन करून आपल्या मुलांना व्यवस्थित कपडे, पुस्तके, इतर

सर्व सोयी सुविधा मिळाव्यात, याकडे जातीने लक्ष पुरवितात. आपल्या मुलांचे व्यक्तीमत्व घडविण्याच्या जबर इच्छेतून, अगदीच लहान वयात त्यांचे पाठीवर दप्तरांचे ओझे लादतांना, आपण त्यांचे बालपण तर हिरावून घेत नाही ना, याचा विचार मग ते करिनासे होतात. मुलांना शिस्तबद्ध करतांना, त्यांच्या स्वातंत्र्यावर, बालपणी त्यांना हव्या असणाऱ्या मोकळया, स्वच्छंदी वातावरणावर तर आपण गदा आणित नाही ना! त्यांना बंदिस्त आणि निसर्गापासून तर दूर करित नाही ना! याचाही विचार ते करिनासे होतात. अस व्यक्तीमत्व का घडवायच असत! तर त्याला अशा घडलेल्या व्यक्तीमत्वातून आनंद मिळावा म्हणून. परंतु मग आजचा त्यांचा बालपणचा आनंद हिरावला जातो त्याचे काय? हा विचारच नाही. बालपणचा आनंद कायम ठेवून व्यक्तीमत्व घडविण्याचे मार्ग शोधण्याचा प्रयत्नच नाही. बरे असे व्यक्तीमत्व घडते म्हणजे काय होते; मुले शिष्टाचार, सभ्याचार (Etiquette) शिकतात, म्हणजे काय :तर कपडे कोणते आणि कसे घालावे, कसे बसावे, कसे बोलावे, कसे खावे-प्यावे, थोडक्यात कसे वागावे म्हणजे इतरांवर आपली छाप, वजन पडेल हे शिकतात. मुलांना याविषयी आवड निर्माण होवून ते जर सहज रित्या तसे वागायला शिकलेत आणि त्यापासून आनंद घेवू लागलेत, तर ते चांगलेच ठरावे. परंतु हे, ज्याला शिष्टाचार समजल्या जातो, असे वागणे बहूतेक मुलांच्या

मनांच्या विरुद्ध, कडक शिस्तीच्या नावाखाली, त्यांचेवर जुलुम जबरदस्तीने लादण्यात येते आणि बहूतांशी मुले नाईलाजाने अशी गुलामगिरी पत्करून असे संस्कार अंगिकारतात. अशा वागण्यात, शिष्टाचारात अगतिकता, कृत्रीमता आढळते. सहजता, निसर्गतः दिसत नाही. आणि तेथेच व्यक्तीमत्व विकास आणि स्वविकास यात फ़रक निर्माण होतो.

व्यक्तीमत्व विकासात स्वविकास सामावलेला असतो, असावयास पहिजे. परंतु हे होत नसल्यामुळे व्यक्तीमत्व विकास हा वरपांगी विकास बनल्याचे, असल्याचे जाणवायला लागते. असा विकास हा मनापासूनचा न राहिल्यामुळे, त्यामुळे आनंद मिळतोच, मिळेलच असे नाही. आजकाल व्यक्तीमत्व विकासाच्या शाळा, कार्यशाळा यांना उत आलेला आहे. अशांचा उपयोग तुम्हाला तुमच व्यक्तीमत्व वाढविण्यात, तुमच्या व्यक्तीमत्वाची छाप पाडून नोकरी मिळविण्यात, पेशात, व्यवसायात, धंद्यात, उद्योगात, भरभराट करण्यात, हाती घेतलेल्या गोष्टीत यश मिळविण्यात; होत असला तरी यात जर प्रामाणिक पणा नसेल तर, असे दुसऱ्यांना फ़सविणारे व्यक्तीमत्व कितीही विकसित दिसत असले तरी, ते अविकसितच म्हटले पाहिजे. व्यक्तीमत्व विकास हा बाह्यांगी, बाह्यात्कारी विकास (External Manifestation) होवू पाहात आहे, झालेला आहे. चलाखी, हुशारी, कुशलता, निपूणता, चातूर्य,

सामर्थ्य, योग्यता, कर्तुत्व, लायकी तसेच स्मरणशक्तीची आणि बुद्धिमत्तेची वाढ, या गोष्टींनी व्यक्तीमत्व निश्चितच वाढते, वाढेल आणि याकरिता शिक्षण, प्रशिक्षण; शाळा-कार्यशाळांमधून घेणे अनावश्यक नसते. परंतु या गोष्टींचा तुम्हाला खरा फ़ायदा, लाभ तेंव्हाच होईल, जेंव्हा याचा उपयोग तुम्ही योग्य रीतीने करायला शिकाल आणि याकरिता स्वविकास (self Development) आवश्यक ठरते. बुध्दिमत्तेचा, व्यवसायातील कुशलतेचा, घडलेल्या व्यक्तीमत्वाचा उपयोग जर लोकांना फ़सविण्यात, लुबाडण्यात होत असेल तर खचितच असे व्यक्तीमत्व विकासाच लक्षण गणल्या जावू नये. तसेच स्मरणशक्ती वाढविण्याचे प्रशिक्षण घेवून, स्मरणशक्ती वाढवून जर त्यात भुसाच भरायचा असेल, भरल्या जाईल तर त्याला व्यक्तीमत्व विकास म्हणता येईल काय? स्मरणशक्ती वाढविण्याआधी स्मरणशक्तीत काय साठवायचे आहे, याविषयी जाणणे आवश्यक आहे. स्मरणशक्ती वाढवून नुसतेच पोपटपंची बनून काहीच साधणे नाही

कुशलता, निपूणता, संपादन करतांना त्याचा योग्य तऱ्हेने कसा उपयोग करायला पाहिजे याचेही ज्ञान होणे आवश्यक आहे. लेखण कला आणि वक्तृत्व कला ह्या फ़ार प्रभावशाली आणि व्यक्तीमत्व घडविणाऱ्या कला आहेत. परंतु अशा कलांचा, त्यातून घडलेल्या व्यक्तीमत्वाचा दुरुपयोगच जास्त वा सर्वत्र होतांना

आपण पाहतो, आपल्या लेखण शैली, तसेच वक्तृत्व कौशल्याने, व्यक्तीमत्व घडलेले; लेखक, वक्ते, नेते हे; गोड, साहित्यिक; लोकांना भावणारे, लोकांच्या भावना जपणारे शब्द वापरून, लोकांची मने जिंकून, लोकांना भुलवितच आलेले आहेत. सत्यापासून समाजाला यांनीच दूर ठेवलेले आहे. समाजात भ्रामकता, अंधश्रद्धा पसरविण्यत यांचाच जास्त हात आहे. संत, महंत, किर्तीवंत, बुद्धिवंत, सत्तावंत यापैकी कुणीच यात मागे नाहीत. वक्र बुद्धिनेच गडगंज संपत्ती जमविण्यात येते. निश्चितच ही सर्व व्यक्तीमत्व विकासाची लक्षणे नाहीत. त्यांच्या भोतिक विकासाची, भरभराटीची लक्षणे भलेही असतील. अशामुळे वरकरणी फ़ायदे होत असलेले जरी दिसते असलेत, तरी ते फ़सवे आहेत. अशी माणसे उत्तुंग व्यक्तीमत्वाची वाटत असलीत, दिसत असलीत तरी वास्तवात ते आनंदरहित, तणावयुक्त जीवन जगत असल्याचे, जवळून पाहिल्यास लक्षात यायला वेळ लागणार नाही. खरा आनंद मिळविण्याकरिता असे अप्रामाणिक, ढोंगी व्यक्तीमत्व. मग ते कितीही उच्च भासत असेना, कुचकामी ठरते. खऱ्या आनंदाकरिता अंतरंगी विकास, योग्य दिशा असलेल्या विचारांचा विकास होणे आवश्यक आहे. विवेकपूर्ण विचार करावयास शिकविणारा, तारतम्य जाणवून देणारा स्वविकासच माणसाला निर्मळ, आनंद देऊ शकतो; मग तुमचा बाह्यात्कारी व्यक्तीमत्व

विकास झालेला का नसेना! अर्थात अशा स्वविकासाबरोबर व्यक्तीमत्व विकासही झाला तर दुधात साखर. स्वविकास झाला तरच प्रामाणिकपणे व्यक्तीमत्व विकासाचा योग्य वापर करता येईल. यामुळेच व्यक्तीमत्व विकासाचे खरे फ़ायदे मिळू शकतील. जीवन मूल्यांची ओळख आणि जपणूक करून स्वविकास केल्याशिवाय, नुसत्या व्यक्तीमत्व विकासामुळे आपले जीवन जरी आपणाला सर्व सोयींनी, सुविधांनी, गुणांनी युक्त वाटत असले तरी ते तणाव पूर्णच राहणार. भलेही तुम्ही आनंदी दिसत राहा, आनंदी आहात असे दाखवित राहा.

बाह्यात्कारी व्यक्तीमत्व विकासाशिवाय, स्वविकास निर्मळ आनंद देवू शकतो. परंतु स्वविकासाशिवाय बाह्यांगी व्यक्तीमत्व विकासामुळे मिळणारा आनंद भ्रामक. मृगजळासारखाच असणार. स्वविकासाबरोबरच व्यक्तीमत्व विकास साधल्यास आनंदास भरती. परंतु प्राधान्य स्वविकासासच हवे.

# (११)
# चांगला आणि मोठा

चांगला आणि मोठा हे शब्द आपण निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या तऱ्हेने, अर्थाने वापरतो. मुलतः चांगला हा गुणदर्शक शब्द असून, मोठा हा संख्यादर्शक शब्द आहे. चांगला गुणविशेष (Quality) दाखवितो, तर मोठा परिमाणाची (Quantity) कल्पना देतो. जेंव्हा आपण एखाद्याला तू मोठा आहेस असे म्हणतो तेंव्हा तो वयाने मोठा, उंचीने मोठा, शरिराने मोठा असे अर्थ बहूदा अभिप्रेत असतात. तसेच जेंव्हा तो मोठा माणूस आहे असे आपण म्हणतो, तेंव्हा तो पैशाने, शिक्षणाने, अधिकाराने, मानाने मोठा आहे असे समजल्या जाते. तू चांगलाच मोठा आहेस, येथे चांगलाच म्हणजे बराच, जास्तच मोठा असा अर्थ निघतो. तू मोठा चांगला आहेस, हे उपरोधिक बोलणे होते.

समाजात ज्यांना सन्मान मिळतो, त्यांना मोठे समजण्यात येते. खरे पाहता त्यांनाच मोठे मानायला पाहिजे, ज्यांना असा सन्मान आपल्या सदगुणातून, गुणविषेशातून मिळतो. म्हणजेच मोठी माणसे ही चांगलीच असावयास हवीत. या तऱ्हेने मोठा माणूस आणि चांगला माणूस हे समानार्थी असावयास हवेत. परंतु

वास्तवात तसे मुळीच नाही. मोठा माणूस चांगला असेलच असे नाही. किंबहूना त्याची चांगली असण्याची शक्यता फ़ारच कमी. आणि चांगल्या माणसांची मोठ्यात गणना होणे पण दुरापास्तच. आपल्या समाजात फ़क्त मोठ्यानाच प्रसिद्धी मिळते आणि म्हणून समाजाला त्याची ओळख पटते, राहते, होते. किंबहूना अशी मोठी माणसे असे आपले मोठेपण अशाच तऱ्हेने स्वतःच प्रसिद्धी करून किंवा करवून घेवून मिळवित असतात. आणि हे वर्तमान पत्रातून ज्या निरनिराळ्या जाहिराती वाचावयास मिळतात त्यावरून सहज लक्षात येते. चांगल्या माणसांना लोकांनी आपणाला चांगले म्हणावे याची फ़िकीर नसते. ते लोकांनी चांगले म्हणावे म्हणून चांगले वागत नसतात. चांगल्या लोकांचे चांगले वागणे हा त्यांचा सहज आत्मसात केलेला गुणविशेष असतो. ते आपले जीवन आनंदी जावे म्हणून चांगले वागतात. आपल्या चांगल्या वागण्याने दुसरेही चांगले वागतील व आपला आनंद द्विगुणीत करतील, वाढवितील अशी त्याच्या मनाची घडण असते. सर्व समाज आनंदी व्हावा, असावा म्हणजेच आपण आनंदी राहू शकू, नांदू शकू अशी त्यांची विचारधारा असते.

परंतु मोठ्या माणसांचे तसे नसते. त्यांना स्वतः चांगले, मोठे असण्यापेक्षा, लोकांनी त्यांना तसे म्हणावे, समजावे, माणावे यातच जास्त रस असतो. ते सर्व प्रसिद्धी लोलुप असतात आणि

मग येन केन प्रकारेन आपली प्रसिद्धी करून घेण्याचे प्रयत्नात असतात. यातच मग स्वतःचे सत्कार करून घेणे, घडवून आणणे हे आलेच. लहान मुलांचे कौतूक सोडलेत तर कुणाचेही सत्कार खऱ्या अर्थाने, मनाभावापासून दुर्मीळच केल्या जातत. बहुधा ज्यांचा सत्कार केल्या जातो; त्यांच्या अधिकारांचा, सत्तेचा व समाजातील त्यांच्या प्रतिष्ठेचा; सत्कार करणाऱ्यांना वा त्यांच्या संस्थांना फ़ायदा झालेला असतो, होणार असतो किंवा होण्याची शक्यता असते, म्हणूनच अशा व्यक्तींचा असे लोक वा अशा संस्था सत्कार करित असतात; किंवा असा सत्कार केल्याने अशा लोकांचे, अशा संस्थांचे नाव वाढणार असते. पुष्कळदा सत्कारमूर्ती स्वतःच किंवा आपल्या नजिकच्या व्यक्तींच्या मार्फ़त पैसे खर्च करून वा अन्य तऱ्हेने असे सत्कार घडवून आणित असतात.. आतातर पुरस्कार प्रदान करणाऱ्या कितीतरी संस्थांचे पेवच फ़ुटलेले आहे. असे पुरस्कार वितरण करण्याचा तसेच सत्कार घडवून आणण्याचा धंदाच होतो की काय, असे वाटायला लागते.

समाज कार्य, सत्कार्य हे स्वतःला आनंद मिळण्याकरिता, निरपेक्ष, निस्वार्थ, त्यागी वृत्तीने करावयाचे असते आणि हे फ़क्त चांगली माणसेच करू शकतात, करतात. मोठी माणसे आपल्या सत्कार्याचे मोल सत्कार रुपाने घेवून आपला मोठेपणा नावाचाच आहे, हेच सिद्ध करतात. सत्कार्याच मोल सत्काराने घेतल्यानंतर

सत्कार्य उरतेच कोठे आणि अशा सत्कार्याचे मोल सुद्धा पुष्कळ वेळा अशा तऱ्हेने घेण्यात येते, घेतल्या जाते की मग ते सत्कार्य कार्यही उरत नाही. त्या कार्याला स्वार्थाचा भ्रष्ट वास यायला लागतो.

आपले संस्कार हे माणूस चांगला व्हावा याकरिता असावयास पाहिजेत. आपल्या सामाजिकरणाच्या तसेच संस्कृतीकरणाच्या प्रक्रिया याच अनुषंगाने असावयास पाहिजेत. आपल्या जीवनमुल्यात तसेच शिक्षणात घडण्यावर, घडविण्यावरच जास्त भर द्यायला पाहिजे. माणूस नुसताच व्यवहारी दृष्ट्या, वरपांगी, दुसऱ्यांना दिसण्यातच मोठा व्हायला नको. तर तो अंतरंगातून, विचाराने निर्मळ, चांगला, विवेकी निपजायला पाहिजे. अशा चांगल्या माणसाचे आयुष्य मोठ्या, पैसेवाल्या, खूप शिकून पदव्या मिळविलेल्या, येने-केन प्रकारे सन्मान मिळविलेल्या माणसांपेक्षा निश्चितच चांगल राहिल. वास्तविक पाहता शिक्षणाने ज्ञान प्राप्तीतून मनुष्य चांगलाच व्हायला पाहिजे, परंतु तशी परिस्थीती आता राहिलेली नाही. शिक्षण हे आजकाल फ़क्त पैसा मिळविण्याकरिता आणि खोटा, वृथा मान-सन्मान मिळविण्याकरिताच घेतल्या जाते, दिल्या जाते. म्हणून प्रचलित शिक्षण पद्धतीतून शिक्षणाने माणसे शिक्षित जरी होत असलीत तरी शहाणे, चांगले होतातच असे नाही, ते

शिक्षणतून विद्वत्ता मिळवित असलेत तरी विवेकता अंगी बांधतीलच असे नाही.

तसेच झाले आहे आपल्या जीवनमुल्यांचे. समाजातील जीवनमुल्यांची इतकी घसरण झालेली आहे की, प्रामाणिकता आणि सचोटीचे व्यवहार दूर्लभ झाल्यासारखे वाटतात. प्रत्येकाल झटपट पैसा मिळविण्याची, श्रीमंत होण्याची घाई असते. हेच प्रत्येकाचे ध्येय झाल्यासारखे दिसते. गडगंज पैसा मिळविल्यानंतर मग मनुष्य समाजसेवेकडे, दानधर्माकडे वळतो. लाखो-करोडो रुपयाची कमाई करायची आणि मग हजारो-लाखो रुपयाचे दान करून दाता म्हणून प्रसिद्धी मिळवायची, असेच चालू आहे. प्रामाणिकपणे सचोटीने पैसे कमावून मोठ्या रकमेचे दान देणे फ़ारच कमी जनांना शक्य होते. बहूतेक जन इच्छा असून सुद्धा, प्रामाणिक कमाईतून असे दान देवू शकत नसतात. वाईट भ्रष्ट मार्गाने मिळविलेल्या पैशांमुळे पाप होते. अशा पापाला देवाने शिक्षा करू नये म्हणून मंदिरात निनावी दान करण्यात येते आणि अशा भ्रष्ट पैशांच्या दानाने पुण्य कमावून पाप क्षालन करण्याचे प्रयत्न होतात. अशा निनावी पैशातूनच मंदिरे कळसावर कळस चढवित, देवस्थान जागृत असल्याची प्रसिद्धी मिळवितात. वाम मार्गाने पैसे कमाविणऱ्यांना अशा तऱ्हेने अभय देण्यात येते, प्रोत्साहित करण्यात येते; इकडे लक्षच दिल्या जात नाही. मंदिरातील भगवान

सुद्धा आपल्या नावावर अशी पापकर्मे होवू देतो, चाललेली नुसताच पाहत राहतो. ही निश्चितच चांगुलपणाची लक्षणे नाहीत. अशा तऱ्हेने तुमचे पाप, वाईट मार्ग भलेही नजरेआड होतील, पण तुमचेच अंतरंग तुम्हाला खात राहिल. ते तुम्हाला समाधान मिळू देणार नाही. हं, केलेल्या वाईट कृत्यांचे मनापासून प्रायश्चित घेवून, प्रामणिकपणाचा मार्ग अवलंबविण्यास सुरवात केली तर मात्र आपणाला खरोखरीची शांती मिळायला, समाधान लाभायला पुन्हा सुरवात होवू शकते. परंतु हे सर्व स्वेच्छेने, कोणतेही किल्मिश मनात न बाळगता सहजतेने करायला, व्हायला हवे.

पैसा मिळविल्यानंतर माणसे राजकरणात शिरून मान-सन्मान मिळविण्याचा प्रयत्न करतात, मिळवितात. पुष्कळ वेळा याचे उलटही घडते. राजकारणात सत्ता, अधिकार मिळवून पैसा कमाविल्या जातो आणि यातील पुष्कळसा पैसा सत्ता अबाधित ठेचण्याकरिता खर्च केल्या जातो. एकदा तुम्ही राजकारणात नेते झालात की समाजसेवक असे बिरूद तुमच्या मागे लागले की मग तुम्ही लोकांची सेवा (वास्तवात जी स्वतःचीच असते) अधिक चांगल्या रितीने करता यावी म्हणून लोकंजवळून वर्गणी जमा करून आपल्याकरिता मोटार कार, जीपगाडी आदि पण विकत घेता. सेवा चांगली करता यावी म्हणून तुम्ही लोकांकडून तुमच्या जन्मदिवशी हजारोंच्या-लाखाच्या थैल्या घेता. अशा गाड्या-थैल्या घेतांना

आपण आपल्या अधिकाराचा, सत्तेचा दुरुपयोग करताच, तदवतच अशा गाड्यात-थैल्यात आपणाजवळील कितीतरी काळा पैसा पांढरा करून घेता. अशा तऱ्हेने आपण मोठे व्हाल, समाजाच्या डोळ्यात धूळ फ़ेकून आपण आपली वाहवा पण करून घ्याल; पण अशामुळे तुम्ही चांगले ठरणार नाहीत. लोकांच्या डोळ्यावरील झापडीमुळे ते तुम्हाला चांगले म्हणतीलही, परंतु तुमचे अंतरंगच याचे उलट सदैव तुम्हाला जाणीव देत राहील.

शिक्षणातून बुद्धिमत्ता, हुशारी, चतुराई, गुणवत्ता; अनुभवातून कौशल्य, कर्तुत्व, लायकी; मनापासून केलेल्या प्रयत्नातून एखाद्या क्षेत्रातील कलाकुशलता, कसब, उत्कृष्टता आपण प्राप्त करू शकता. शिक्षण, प्रशिक्षण, अनुभव, मनाची एकाग्रता आणि कल्पकता यांच्या संयोगातून आपण एखाद्या क्षेत्रात अद्वितियता, विलक्षणता, पण मिळवू शकता. समाजकारण, राजकारण करून आपण मोठे होवू शकता. परंतु हे सर्व खरा आनंद, समाधान देणारे गुण तेंव्हाच ठरतील, जेंव्हा हे सर्व तुम्ही प्रामाणिकपणे प्राप्त कराल आणि चांगल्या तऱ्हेने वापराल, उपयोगात आणाल. असे झाले तरच तुमच्या समाधानात भर पडेल. तुमचा खरा आनंद वृद्धिंगत होईल आणि तुम्हाल दृढ मनःशांती लाभेल. अन्यथा तुम्ही कितीही ईश्वराची पूजा, प्रार्थना केली, दानधर्म केलेत, श्रेष्ठता आणि लोकप्रियता मिळविली, तरीही त्यात

प्रामाणिकपणा, चांगलेपणा नसल्यामुळे, बाह्यांगी तुम्ही आनंदी दिसलात, आनंद दाखविलात तरी अंतरंगी मनःशांती असणार नाही.

जीवनात पैसा, मान-सन्मान, मोठेपणा याला जे महत्व आलेले आहे, ते आपल्या चुकीच्या समाजव्यवस्थेची देणगी आहे. आणि यामुळेच समाज जीवनात अशांती आहे. समाजात शांतता नांदण्याकरिता प्रत्येकाला मनःशांती लाभणे आवश्यक आहे आणि याकरिता मोठेपणाची नव्हे तर चांगलेपणाची आणि प्रत्येकाचे तसे मन घडण्याची, घडविण्याची नितांत गरज आहे. पहा, आपल्याला हे पटते काय आणि शक्य होते काय! नाहीतर जसे चालू आहे तसे चालू आहेच.

## १२

# आयुष्याचे व्यवस्थापन

व्यवस्थापनाविषयी (Management) फ़ारच गैरसमज असल्याचे दिसून येते. जसे की, व्यवस्थापण ही परदेशातून आलेली नविन अशी संकल्पना आहे. व्यवस्थापन हे उद्योगधंदे, कारखाने आणि प्रतिष्ठाने याकरिताच असते. व्यवस्थापन ही संकल्पना औद्योगिक क्रांतीनंतर अस्तित्वात आलेली आहे. व्यवस्थापन हे निश्चित स्वरुपाचे ज्ञान असून त्याने हमखास फ़ायदा होतो. व्यवस्थापन हे फ़ार कठीण असते. व्यवस्थापनाला खुप शिक्षण लागते, चांगलीच बुद्धि लागते, चातुर्य लागते. व्यवस्थापन हे उद्योगधंदे, व्यवसाय, आदि मधून जास्त नफ़ा, पैसा कमाविण्याकरिता असते, लागते. व्यवस्थापन हे बहूतकरून श्रीमंत तसेच शिक्षित लोकांकरिताच असते. ते गरीब आणि अडाणी लोकांकरिता नसते. व्यवस्थापन हे, ज्यांच्या कामाचा खूप पसारा आहे, व्याप आहे त्यांनाच लागते. व्यवस्थापन हे अजब आणि समजण्यास दुर्बोध असे किचकट विज्ञान शास्त्र आहे. तदवतच ते सहसा अवगत न होणारी कला आहे. व्यवस्थापनात जास्तीकरून काम करावयाचे नसून काम करून घ्यावयाचे असते. व्यवस्थापन लिखीत असते की अलिखीत, व्यवस्थापन हे सर्वांना माहित

असलेले असते की सुप्त आणि अद्यावृत, व्यवस्थापन हे वैयक्तीक असते की सामूहिक वगैरे वगैरे.

मनुष्य हा वैयक्तीक तसाच सामाजिक प्राणी (Bio-Social Animal) आहे. माणूस एकटा राहूच शकत नाही. त्याला समूह करूनच राहावे लागते. समूह म्हटला की व्यवस्था आलीच. व्यवस्था या शब्दाचे पृथःकरण वि+अवस्था म्हणजे विकसित अवस्था असे असावे. मानवाने आपल्या अवस्था विकसित करित करित आजची समाजव्यवस्था अस्तित्वात आणलेली आहे, निर्माण केलेली आहे. व्यवस्था म्हटले की नियम ठरविणे आलेच. हे नियम आणि अशा नियम पाळण्यावर नियंत्रण म्हणजे व्यवस्थापन. माणसाचे शरीर निरनिराळ्या अवयवांच्या समूहाचे बनलेले आहे. या सर्व अवयवांचे संगोपन आणि परस्परानुकुल कार्यकरण (Co-ordination) करण्याकरिता शरीराचे व्यवस्थापन करावे लागते. किंबहूना असे व्यवस्थापन योग्यरित्या केल्या जात नसल्यामुळे शारिरीक प्रश्न निर्माण होतात. मन हे शरिराचाच भाग आहे. ते माणसाच्या मज्जातंतू यंत्रणेतील (ज्यात बुद्धिपण येते) विचार प्रक्रियेचाच भाग आहे. म्हणून मी मानसिक प्रश्न सुद्धा शारिरीक प्रश्नातच गणतो.

व्यवस्थापन हे वैयक्तीक तसेच सामूहिक पातळीवर असते, भलेही त्याचे स्वरुप अलग अलग असू शकेल. व्यवस्थापन ही

नुसतीच संकल्पना नसून कृती, क्रिया आहे. कोणतीही गोष्ट करतांना, करण्यासाठी व्यवस्थापन लागते. सर्वच जन असे व्यवस्थापन करित असतात. इतकेच की काही जन असे व्यवस्थापन समजून-उमजून करित असतात तर काही नकळत, अजाणते करित असतात. ते अशाला नुसतेच काम म्हणतात, व्यवस्थापन समजत नाहीत, म्हणत नाहीत. आटोपशीर, पद्धतशीरपणे केलेल्या कामालाच व्यवस्थापन म्हणण्याची पद्धत आहे. गैर-आटोपशीरपणे, अस्ताव्यस्त पद्धतीने केल्या जात असलेल्या कामाला गलथानपणा (Mis-Managemrnt) म्हणण्यात येते.

माणसाला जन्माला आल्यानंतर काळानुरूप, परिस्थितीनुरूप निरनिराळया अवस्थांमधून जावे लागते. ह्या अशा अवस्था ठरलेल्या नसतात किंवा मोघमपणे त्या ठरविलेल्या असल्यासारख्या वाटत असल्या तरी त्यात न ठरविलेल्या पुष्कळ बाबी असतात. बऱ्याच अवस्था अचानक, नकळत, नको असतांना पण उदभवतात. स्त्री-पुरुषांना प्रचलित समाज व्यवस्थेत निरनिराल्ळय असंख्य भूमिका करावयाच्या असतात. जसे की; मुलगा, मुलगी, नातु, पणतु, नाती, पणती, बहिण, भाऊ, नणद, दीर, पति, पत्नी, भावजय, वहिणी, सून, जावई, सासू, सासरे, आई, बाप, आजी, पणजी, आजोबा, पणजोबा, मामा, मामी, मावशी, मावसा,

प्रसंगी विधूर, विधवा, वगैरे वगैरे. नंतर नोकरी करित असल्यास किंवा व्यवसाय, धंद्यात काम करित असल्यास ज्या पदावर काम करितात त्या पदांची व त्यानुरूप येणाऱ्या निरनिराळया नात्यांच्या, संबंधाच्या भूमिका; सामाजिक क्षेत्रात कार्यरत असल्यास अशा क्षेत्रातील स्वीकारलेल्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याकरिता लागणाऱ्या भूमिका कराव्या लागतात. समाजात मित्र, मैत्रिण, नेते, कार्यकर्ते, गुरू, शिष्य, वडिलपण, लहानपण आदि भूमिकापण निभवाव्या लागतात. ही स्त्री-पुरुषांच्या भूमिकांची ठोकळमानाने केलेली यादी आहे. यात त्यांच्या सर्वच भूमिका आल्या असतीलच असे नाही. तदवतच आयुष्य हे स्थीर नसल्यामुळे अशा ह्या भूमिका बदलत पण असतात. काही भूमिका काळाच्या गर्तेत नाहीशा होतात तर काही नविनच भूमिका करणे भाग पडते. इतकेच नव्हे तर जून्या भूमिकांचे स्वरूप पण बदलत असते.

अशा तऱ्हेने स्त्री पुरुषांना जीवनात निरनिराळ्या वेळी, निरनिराळ्या प्रसंगी, ठिकाणी, परिस्थितीत निरनिराळ्या भूमिका वठवाव्या लागतात. अशा ह्या सर्व भूमिका (Roles) मुख्यत्वेकरून तीन भूमिका समूहात (Role Sets) विभागता येतील. त्या म्हणजे घराभोवतीच्या, कार्याभोवतीच्या आणि इतराभोवतीच्या भूमिकांचा समूह; म्हणजेच कौटुंबिक भूमिकांचा समूह (Family Role-set), अर्थार्जनार्थ भूमिकांचा समूह

(Career Role-set), आणि सामजिक भूमिकांचा समूह (Social Role-set). नाती-गोती यांच्यात वावरतांना भूमिका ह्या काही अंशी कौटुंबिक तर काही प्रमाणात सामजिक भूमिका असू शकतात.

तहान, भूक, निवारा, प्रेम (भावना, वासना), भय ह्या माणसाच्या नैसर्गिक प्रवृत्ती (Natural instincts) आहेत. ह्या सहज प्रवृत्ती जन्मतः उपजतच माणसात असतात. तदवतच आपल्या सामाजिकीकरणाच्या आणि संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेतून म्हणजेच संस्कारातून, शिक्षणातून, संगोपणातून निरनिराळ्या सामाजिक प्रवृत्ती मानवात निर्माण होतात, केल्या जातात. जसे की; प्रत्येकालाच समाजात मान्यता हवी असते. आपण इतरांपेक्षा अलग, निराळे असावे, आपल्यात काहीतरी अदभूत, अलौकिक असावे असे पण वाटत असते. समाजात इतरांपेक्षा आपणाला श्रेष्ठ मानल्या जावे अशीच प्रवृत्ती असते आणि मग अशा करिताच धडपड असते. अशा ह्या दोन्हीही नैसर्गिक आणि सामाजिक प्रवृत्ती जपण्याकरिता, साधण्याकरिता आपल्या समाजव्यवस्थेत मानवाला पैशाची गरज असते आणि म्हणूनच त्याला अर्थार्जनार्थ भूमिका पण कराव्या लागतात. यासाठीच त्याला मोलमजूरी, नोकरी, व्यवसाय, धंदा आदि करावे लागतात. आपण आज आपल्या संस्कारातून जीवनात श्रीमंत होणे

ही सामाजिक प्रवृत्ती म्हणूनच ग्राह्य धरलेली आहे आणि शिक्षणाने श्रीमंत होता येते म्हणून शिक्षण घेणे, शिक्षित होणे ही पण सामाजिक प्रवृत्तीच झालेली आहे.

माणसाची प्राथमिक भूमिका ही कौटुंबिक जबाबदारीच असते, असावयास पाहिजे. त्यानुसारच भूमिकांना त्याने प्राधान्य द्यावयास पाहिजे. आणि ह्या प्राथमिक भूमिका करण्याकरिता, ज्या काही प्राथमिक, कौटुंबिक गरजा असतील, त्या पूर्ण करण्याकरिता अर्थार्जन, पैसे मिळविणे आवश्यक ठरावे. आपले शिक्षण, संस्कार हे पण अशा प्राथमिक भूमिका पार पाडण्यास प्रथमतः भर देणारे असावयास पाहिजे. परंतु याचबरोबर कुटुंबात आपण समाधानी असणे, कुटुंबातील इतरांना समाधान लाभवून देणे, म्हणजेच; कुटुंब आनंदी करणे, ठेवणे; कुटुंबातील आनंद टिकविणे, सांभाळणे ह्याविषयीच्या माणसाच्या प्राथमिक भूमिका असावयास पाहिजेत. आपल्या कुटुंबातील आनंद अबाधित राखून, समाजातील दुसऱ्या कुटुंबाला आनंदी करण्यात सहभाग देणे, याकरिता झटणे आणि यातून खेळीमेळीचा आनंद मिळविणे ही माणसाची सामाजिक भूमिका. अशा ह्या कौटुंबिक आणि सामजिक भूमिकांमध्ये संतुलन साधणे अत्यंत आवश्यक आहे. नुसत्या कौटुंबिक भूमिका केल्यानेच पूर्णतः आनंद, समाधान मिळणे शक्य नाही. तशातच पूर्वीची अविभाज्य, एकत्र कुटुंब रचना आता जवळ जवळ लोप

पावल्यामुळे ते आता आणखीच कठीण. तुम्ही घरात कितीही आनंदी असलात तरी अवतीभवती असलेल्या इतर लोकांशी तुमचे संबंध चांगले नसल्यास तुम्हाला तुमचा आनंद उपभोगणे दुरापस्तच. समाजातील खेळीमेळीच्य वातवरणाकरिता असे संबंध जोपासणे पण आवश्यक ठरते. तदवतच, कौटुंबिक भूमिकांकडे दुर्लक्ष करून, कुटुंब दुःखी करून नुसत्या सामाजिक भूमिकाच करणे योग्य ठरणार नाही. अशा भूमिका (ज्याचे समाजसेवा असे चुकीचे नामाधिकरण आपण केलेले आहे) केल्यामुळे तुम्हाला मोठेपणा, वृथा आनंद कदाचित मिळेलही; पण खरा आनंद, दृढ मनःशांती मिळणे शक्यच नाही. असे लोक वरवरून कितीही आनंदी दिसत असलेत, तसे ते दाखवित असलेत तरी अंतरंगी ते तसे नसतात. आपण ज्यांना मोठे मानतो, समजतो, ज्यांची श्रेष्ठत्वात गणना करतो, त्या बहूतेक सर्वांची हीच शोकांतिका आहे. हे जर आपण अशा मोठ्यांचे चरित्र वाचले, तपासले तर सहज लक्षात येईल. यातही विशेष म्हणजे अशा मोठ्या गणल्या जाणाऱ्या लोकांचे आदर्श आपण जपण्याचा सदैव प्रयत्न करित असतो; ही आणखी दुर्दैवाची गोष्ट. ज्यांना स्वतःचे कुटुंब सांभाळता येत नाही, ते दुसऱ्यांना कुटुंब कसे आनंदी करावे, ठेवावे हे शिकवित असतात. लोकासांगे ब्रम्हज्ञान स्वतः कोरडे पाषाण अशातलाच हा प्रकार. ही आपल्या चुकीच्या शिक्षणाची, संस्काराची देण आहे. शिक्षण हे

माणसाला सुज्ञ बनवून त्याचे जीवन आनंदी करण्याचे आपले मुळ कर्तव्य न करता, आजकाल ते माणसाला पैसे मिळविण्याचे जणू काही यंत्रच बनवित आहे. शिक्षण हे आज फ़क्त अर्थार्जनाच्या भूमिकेतूनच घेतल्या जाते. शिक्षण घेवून वा अन्य प्रकारे पैसे कमावून श्रीमंत होणे ही सामाजिक प्रवृत्तीच झालेली असल्यामुळे आज अर्थार्जनार्थ भूमिका ही जवळजवळ सामाजिक भूमिकेत एकरुप झालेली आढळते. अर्थार्जनार्थ भूमिका ही कुटुंब सुखी ठेवण्यापेक्षा, श्रीमंत होवून समाजात मान्यता मिळविण्याकरिताच वठविल्या जाते. अशा तऱ्हेने जीवनात उत्क्रांती करतांना आपण दुय्यम भूमिकांना प्राथमिक आणि प्राथमिक भूमिकांना दुय्यम केलेले आहे. आणि म्हणूनच समाज भरकटलेला आढळतो. प्रत्येकाचे आयुष्यात आनंदापेक्षा तणावच जास्त आहेत. प्रेम आणि मित्रत्व यापेक्षा हेवेदावे आणि असूयाच जास्त. प्रामाणिकपणापेक्षा ढोंगीपणा आणि फ़सवेगिरीच जास्त. हे जर बदलायचे असेल, तणावरहित जीवन जगायचे असेल, जीवनात निखळ, निव्वळ, निकोप आनंद मिळवायचा, उपभोगायचा असेल, तर मग आयुष्याचे व्यवस्थापन करणे अति आवश्यक आहे.

आयुष्याचे सुव्यवस्थीत व्यवस्थापन करण्याकरिता तुमच्या आस्था निरनिराळ्या भूमिका समूहात योग्य प्रमाणात विभागणे अत्यंत महत्वाचे ठरावे. अविभाज्य, एकत्रित कुटुंब

पद्धती पासून दूर जावून आपण कौटुंबिक भूमिकांविषयी ज्या अनास्था निर्माण केलेल्या आहेत, त्या घालविण्याकरिता फ़ेरविचार करणे, होणे गरजेचे आहे. कौटुंबिक आणि सामाजिक भूमिकांमध्ये संतुलन राखणे निकडीच आहे. अर्थार्जनार्थ भूमिका (करीयर) ही मुख्यत्वेकरून जास्त प्रमाणात कोटुंबिक जबाबदारी पार पाडण्याकरिता असावी. Career is for life; Life is not for Career. (करियर हे आयुष्याकरिता आहे, आयुष्य हे करियर करिता नाही) परंतु आजकाल करीयर करिता कुटुंबाकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यात येते. कौटुंबिक भूमिका विसरून जणू काही करीयर (अर्थार्जनार्थ भूमिका) हेच जीवनाचे सर्वस्व होते आणि म्हणून करीयर मध्ये सफ़लता मिळवूनही अशांच्या जीवनात, कुटुंबात अशांतता आणि तणावपूर्ण वातावरण असल्याचे आढळते.

कुटुंब दुःखी करून, समाजात वृथा सन्मान, खोटे श्रेष्ठत्व, भरपूर पैसा मिळवून तणावपूर्ण जीवन जगण्यापेक्षा सामान्य माणूस म्हणून तणावरहित आनंदी जीवन जगण्याकरिता आयुष्याचे व्यवस्थापन करावयास हवे. पहा आपणाला हे पटते का. जमते का आणि अशातऱ्हेने आयुष्याचे व्यवस्थापन आपण करू शकता का!

# (१३)

# संस्काराची गुलामगिरी

१९४७ सालचे अगोदर आपल्या देशावर परकीयांचे राज्य होते. अशा परकीयांच्या राज्यात आपण स्वतंत्र नव्हतो, पारतंत्र्यात होतो म्हणून परतंत्र होतो. १९४७ साली आपणाला स्वातंत्र्य मिळाले. तेंव्हापासून आपण स्वतंत्र म्हणून वावरत आहोत. आपण स्वतंत्र असल्याचा अभिमान बाळगत आहोत. परंतु खरोखरच आपण स्वतंत्र आहोत का? याचा आपण कधी विचार करतो काय? आपल्यावर राज्य कोणी करावे, आपले राज्यकर्ते कोण असावेत, हे आपल्या मताद्वारे ठरविण्याचा अधिकार आपल्याला आहे. म्हणून आपण स्वतंत्र आहोत; असे मानणे कितपत योग्य आहे? लोकशाही व्यवस्थेत आपले राज्यकर्ते निवडण्याचा अधिकार लोकांना असतो आणि तात्विक दृष्ट्या हे जरी खरे असले तरी वास्तवात तसे घडते काय? तसे असते काय? स्वतंत्र देश लोकशाही अंगिकारीत असलेत आणि लोकशाही राज्यात लोकांचे राज्य असते, असे म्हटल्या जात असले तरी हा भ्रम असतो, भ्रम आहे. १०० विरुद्ध ९० मतांनी निवडून आलेला राज्यकर्ता हा ९० विरोधकांच्या मन आणि मत या विरुद्धच कारभार

करित असतो, म्हणजे त्यांना पारतंत्र्याचीच वागणूक देत असतो. विधानसभेत तसेच संसदेत विरोधकांना आपले मत मांडित राहण्यापेक्षा आणि सरकारी पक्षाला विरोध करित राहण्यापेक्षा दुसरे काय स्वातंत्र्य असते. लोकशाहीतील प्रस्थापित निवडणूक पद्धतीमुळे सरकार बनविणाऱ्या पक्षांना ५० टक्क्यांपेक्षा कितीतरी कमी मते असू शकतात आणि असे सरकार त्यांना मते न देणाऱ्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त लोकांच्या भावना जपते काय? त्यांच्या मतांना किंमत देते काय? यातही विशेष म्हणजे निवडून आलेल्या राज्यकर्त्यांना जी मते मिळालेली असतात ती सुद्धा स्वतंत्रपणे दिलेली असतीलच हेही सांगता येत नाही. यापैकी किती लोकांनी दडपणाखाली मते दिलीत, किती लोकांनी पैसे घेवून आपले स्वातंत्र्य गहान ठेवलेत; यात किती मतांची अन्य तऱ्हेने हेराफ़ेरी केलेली, झालेली असेल हे गृहित धरता खरोखरच आपले राज्यकर्ते जनमताने निवडून आलेले समजणे म्हणजे स्वतःला जाणून बुजून अंधारात ठेवणेच आहे. निवडणूकीला उभे राहिलेले, लाखो-करोडो रुपये निवडणूकित खर्च करून लोकसेवेचे पद विकत घेऊ जाणारे प्रामाणिक असू शकतात काय? आणि म्हणून अशां निवडून आलेल्यांना मिळणारी मते प्रामाणिक असू शकतात काय?

कोणत्याही पक्षातील सर्वच लोक त्या पक्षाची ध्येय-धोरणे त्यांना मंजूर असतात म्हणून त्या पक्षात सामिल होतात, असे मुळीच नाही, नसते. बहुसंख्येने लोक स्थानीय राजकारण लक्षात घेवून; तसेच आपल्याला कोणत्या पक्षात सत्ता, पद, अधिकार मिळू शकते याचा अंदाज घेवून किंवा घराण्याच्या, जात-धर्माच्या परंपरेनुसार पक्ष निवडत असतात. मते सुद्धा स्वतंत्रपणे दिली जात नाहीत हे वास्तव नाकारून, त्याकडे कानाडोळा करून भलेही तुम्ही स्वतंत्रतेचा आव आणित राहा. आज्ञाधारकपणाच्या, पक्षाच्या बांधिलकीच्या नावाखाली, तुम्ही तुमच्या भ्रष्ट नेत्यांच्या भ्रष्ट कृत्यांवर, आपल्या स्वतंत्रपणे विचार करण्याच्या शक्तीला बंदिस्त करून; पांघरून घालता. अशा कृत्यांचे मनाविरुद्ध समर्थन करता; हे पारतंत्र नाही तर काय आहे! आपले स्वार्थ साधण्यासाठी, ते जपण्यासाठी आपण आपल्या पक्षाच्या बांधिलकीच्या संस्काराची गुलामगिरी स्वतःवर लादून घेता; हे सत्य आहे, भलेही तुम्ही ते कितीही नाकारा.

निव्डून आलेले नेते मंत्री आदि हे सुद्धा नोकरशहांनी अगोदरच तयार करून ठेवलेल्या नियमांचे गुलाम असतात. त्यांना सुद्धा प्रस्थापित व्यवस्थेच्या साफ़ळयातच वावरावे लागते, ते वावरतात. हा साफ़ळा तोडण्याचा, त्यातून बाहेर येण्याचा प्रयत्नही ते करित नाहीत. साफ़ळयातच गुलाम राहून, आपल्या स्वतःच्या

फ़ायद्याचे जतन करून; ते मग जे बांधव त्यांना निवडून देत असतात त्यांचेच अकल्याण करण्याकरिता सिद्ध होत असतात. म्हणूनच तर शेतकरी असलेले, शेतकऱ्यांच्या मतावर निवडून आलेले नेते, हे सुद्धा शेतकरी विरोधी, शेतकऱ्यांच्या अहिताचे कार्यच करतांना दिसतात. शेतकऱ्यांना, सामान्यांना त्रासदायक, हानीकारक असे, प्रचलित कायद्याचे, नियमांचे, अर्थ, प्रशासन आदि कृत्रिम शास्त्रांचे जोखंड, त्यांना झुगारताच येत नाही. ते जुन्या, प्रस्थापित व्यवस्थेत बंदिस्त राहतात. शेतकऱ्याच्या, सामान्याच्या प्रगतीच्या मार्गात खोळंबा आणणारी, अडथळे निर्माण करणारी, मोजक्यांच् लोकांच्या फ़ायद्याची असणारी व्यवस्था संपूर्ण पणे मुळातूनच बदलवून सर्वस्वी शेतकरी धार्जीणी, सामान्यांच्याच हिताची, त्या सर्वांना सोपी, सरल, सुलभ व्यवस्था निर्माण करण्याचे, प्रस्थापित करण्याचे स्वातंत्रच जणू यांना नसते. त्यांची याबाबतची विचारांची गुलामगिरी, त्यांच्या स्वतंत्रपणे, मुळात, खोलात विचार करण्याच्या सामर्थ्यावर मात करित असते. एखादा नेता असा स्वतंत्रपणे विचार करू जाहला, त्याला लोकोपयोगी कृत्ये करायची इच्छा झालीच, त्याने तसा प्रयत्न करण्याचा प्रयत्न केलासच, तर, त्याला नोकरशहा हे कृत्य नियमात बसत नाही असे सांगून मोडता घालतात. मंत्र्यांच्या, नेत्यांच्या स्वार्थाची कृत्येसुद्धा नोकरशहा आपली फ़ी या ना त्या तऱ्हेने वसूल करूनच नियमात बसवित

असतात, करित असतात. नियम बदलविण्यास लावून, किंवा नियम बदलवून घेवून लोकोपयोगी कृत्ये, की त्यात त्यांचा अजिबात कोठलाही, कसाही काहीच स्वार्थ नसतो, अशी कृत्ये नोकरशहांना करण्यास भाग पाडणारे, निस्वार्थी स्वतंत्र बाण्याचे, खंबीर नेते आहेतच कोठे? आणि असलेतच तर ते किती? बहूतेक नेते हे तर आपल्या स्वार्थाचे पदलालसेचे गुलाम आहेत.

राजेशाही, सरंजामशाही, हुकूमशाही आदि व्यवस्थेत गुलामगिरी ही जबरदस्तीने लादण्यात येते, बळाच्या जोरांवर ती प्रस्थापित करण्यात येते, टिकवून ठेवण्यात येते. मग हळूहळू लोकांची संस्कारीत मानसिकता पण तशीच होवून जाते. ही गुलामगिरी दूर करण्याकरिताच लोकशाही व्यवस्था अस्तित्वात आली. परंतु वास्तव हे आहे की, आजचा मनुष्य हा स्वतंत्र, लोकशाही देशात राहात असला तरी, तो पूर्णपणे गुलामगिरीच्या संस्कारांचाच गुलाम झालेला आहे. असे हे संस्कार माणसाला समाज व्यवस्थेतून मिळतात. समाज व्यवस्था समाज जीवनाकरिता जी जीवनमुल्ये ठरविते त्यानुसार तुमचा धर्म, कायदेव्यवस्था चालिरिती, रूढी, प्रथा आदि अस्तित्वात येतात आणि यानुसारच माणसांवर संस्कार घडत असतात. आणि अशा घडलेल्या संस्कारानुरुप मनुष्य वावरत असतो. परंतु खेदाची गोष्ट म्हणजे आपले प्रचलित संस्कार हे बऱ्याच अंशी असत्यावर, भ्रामकतेवर,

आधारित आहेत. हे संस्कार, सत्य लपविणारे, भ्रामकता पसरविणारे, अतिरंजितता-चमत्कारिता प्रसारित करणारे, वृथा अभिमान, गर्व, प्रतिष्ठा, मानमरातब, आव ऐट जोपासणारे असे आहेत. जीवनाविषयीची, जीवनाच्या उद्देशांविषयीची, जीवनात काय करावे, जीवन कसे जगावे याविषयीची; सत्य माहिती नाही असे कबूल करणारे आणि हेच माहित नसलेले सत्य, सत्य आहे त्याला सामोरे जा; असे सांगणारे सत्यवान, हिंमतवान समाजधूरीणंच्या कमतरतेमुळेच, पारदर्शक, सत्याला अनुसरून असलेले संस्कार पसरविल्या गेलेले नाहीत, पसरविल्या जात नाहीत, हीच आपल्या समाजव्यवस्थेची शोकांतिका आहे.

निसर्गाच, मानवी जीवनाच सत्य माहित नाही म्हणून समाजात भ्रामक संस्कार कोणी आणि कसे रुजविलेत याचा इतिहास तपासण्यात आता काही अर्थ नाही. परंतु अशा संस्कारांमुळेच मानव जीवनातील प्रेम आकुंचित केलेले, झालेले आहे. मनुष्य आज साचेबंद झालेला आहे. तो विचारशून्य झालेला आहे. कितीतरी गोष्टी, कर्मकांडे, विधी, व्यवहार आपण का करितो, याचा यत्किंचितही विचार तो न करेनासा झालेला आहे. त्याच्या विचारात नुसतीच न्यूनता नाही तर उणेपणा पण आलेला आहे. त्याचे विचार विवेकी असल्यापेक्षा विकारीच आहेत. चुकीच्या प्रवाहाच्या दिशेनेच तो वाहत आहे. अशा प्रवाहाच्या विरूद्ध

पोहण्याचे त्याचे सामर्थ्य तर सोडाच परंतु त्याची तशी विचार करण्याची प्रवृत्ती नाही. क्षमता नाही. अशा संस्कारांचाच जबरदस्त पगडा मानवावर आहे. तो अशा संस्कारंचाच गुलाम झालेला आहे. समाज आज जो भरकटलेला आढळतो त्याचे हेच प्रमुख कारण आहे.

मनुष्य मेंदूचा गुलाम असतो असे म्हणणाऱ्यांना, मानणाऱ्यांना तो संस्कारांचा गुलाम असतो अस म्हणायच असत; असाव अस मला वाटत. कारण वास्तवात मेंदू हा शरीरात असलेला हाडामासाचा एक गोळाच असतो. अर्थात अशा या मेंदूत आणि तो मेंदू ज्या आपल्या मज्जतंतू यंत्रणेचा भाग आहे त्यात, मानवाच्या शरीरातील अन्य सर्व भागावर नियंत्रण करण्याची शक्ती असते. तशीच मानवाच्या शरीराची रचना आहे. माणसाच्या नैसर्गिक प्रवृत्ती जसे की तहान, भूक, भिती. वासना आदि यांचे नियंत्रण मेंदू निसर्गतः भलेही करू शकेल. परंतु माणसाच्या सामाजिक प्रवृत्तीचे कारण आणि त्यावरील नियंत्रण मेंदूवर होणाऱ्या संस्कारांच्या प्रक्रियेतूनच होते. आणि म्हणून समाजजीवनात मनुष्य हा त्याच्या मेंदूवर झालेल्या, होत असलेल्या संस्कारांचा गुलामच असतो.

याकरिता, भरकटलेला समाज पुन्हा व्यवस्थित करावयाचा असेल, व्हावयाचा असेल; मानवी जीवन खऱ्या

अर्थाने विस्तारित आणि आनंदी करावयाचे असेल तर असे भ्रामक, चुकीचे संस्कार त्यागणे, बदलणे अत्यंत आवश्यक ठरते. आपले संस्कार हे आपल्याला निर्भिडपणे, बेहिचक सत्य (ते कितीही कटू असले तरी) सांगणारे, दाखविणारे, सत्य अंगिकारण्यास लावणारे, सत्यास सामोरे जाण्यास सांगणारे असावेत, असावयास हवेत. आपल्या संस्कारात निसर्गाचा नागवेपणा, नागडेपणा हवा. अशा संस्कारांमुळेच मानवी जीवनात निरपेक्ष प्रेम वृद्धिंगत होऊ शकेल; समाज जीवन आनंदी होईल.

विचारशून्यतेची, विकारी विचारांची गुलामगिरी पसरविणाऱ्या संस्कारांची गुलामगिरी त्यागून, सत्य, प्रामाणिकता, पारदर्शकता यावर आधारित संस्कार रुजविल्यानेच समाजाच, मानवाच हित होणारे आहे. मग अशा स्वतंत्रपणे विचार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या संस्कारांची गुलामगिरीसुद्धा पत्करायला हरकत नाही. कारण अशा अवस्थेत गुलामगिरी आणि स्वतंत्रता यात फ़रक असणार नाही. होवू शकतील काय आपल्या संस्कारात असे बदल? होईल का मानवी जीवन सुकर? आतापर्यंतचा इतिहास याला साक्ष नाही. पुढचा इतिहास तसा घडतो काय, घडेल काय. तेच पाहयचे.

# (१४)
# गुलामगिरीचे संस्कार

खऱ्या धर्माचे प्रयोजन आणि धर्म व्यवस्थांचे आयोजन मानवता धर्म समाजात रुजविणे हे आहे, हेच असावे. धर्माने माणसात माणूसकी संस्कारायला पाहिजे. खरा धर्म हा शेजारधर्म, समाजधर्म, नीतिधर्म, हाच आहे. असा धर्म रुजविणे, पसरविणे, दृढ करणे आणि सर्व मानवांमध्ये एकमेकांविषयी प्रेमभाव निर्माण करणे, सलोखा साधणे हेच सर्व धर्म व्यवस्थांचे कर्तव्य ठरावे. परंतु खेदाने म्हणावे लागते की, सर्वच धर्मव्यवस्था हेच करित नाहीत. धर्मपुरस्कृत निती फ़क्त नावापुरतीच आहे. धर्मव्यवस्थांना नीतिधर्मापेक्षा धार्मिकविधी, कर्मकांडे रुजविण्यातच जास्त रस आहे. कारण यामुळेच धर्मव्यवस्थापकांचे फ़ावणारे आहे, असते. समाजात धर्मव्यवस्थाच सर्वात जास्त अंधश्रद्धांना, घातक श्रद्धांना खतपाणी घालतात. आपल्या संस्कारांनी आपल्याला धर्मांध बनविलेले आहे. अशा धर्माभिमुख संस्कारांनी आपल्याला विचारांनी पंगू बनविलेले आहे. विचार शून्यता आपल्या मनात रुजविलेली आहे. अशा गुलामगिरीच्या संस्कारांनी, आपण गुलामासारखे, काहीही विचार न करिता, कोणतेही प्रश्न न

विचारता, हास्यास्पद कर्मकांडे करित असतो. अतर्कट गोष्टींवर विश्वास ठेवित असतो. अशी कर्मकांडे करतांना, आपण काय करितो? कशाक्रिता करितो? असे केल्याने काय होणार आहे? याने जे घडते, होते असे सांगितल्या जाते, ते खरोखरच कधी घडले आहे काय? घडेल काय? याचा मुळीसुद्धा विचार करित नाही. याबाबतीत आपण आपली विचार करण्याची क्षमताच मुळी झाकून ठेवतो, बाजुला ठेवतो, किंवा आपली अशी ही क्षमता अनाकलनीय तर्क लढविण्यात घालवून, आपण जे करितो ते योग्यच आहे असे स्वतःला भासविण्याचा, दुसऱ्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करितो. सारासार बुद्धी सुद्धा आपण का वापरित नाही? सर्व कर्मकांडे, विधी, अंधपणाने का करितो, हेच कळत नाही. नाईलाजाने म्हणावे लागते की, काही मुठभर धर्म व्यवस्थापकांनी समाजावर गुलामगिरीचे संस्कार रुजवून समाज जनांना गुलाम, दुय्यम राहण्याचे शिकविलेले, बनविलेले आहे. आणि खेदाची गोष्ट म्हणजे समाजातील उच्च शिक्षित, विद्वान म्हणविणारे सुद्धा असेच गुलामगिरीचे विचार बाळगतात. आपण फ़ार धार्मिक आहोत हे दाखविण्याकरिता समाजातील शिक्षित, नेते, म्होरके अशी कर्मकांडे करण्यात अग्रेसर दिसतात. असे गुलामगिरीचे संस्कार त्यागल्याशिवाय समाजाला तरणोपाय नाही. आपल्या परिस्थितीविषयी दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा, दुसऱ्यांवर

खापर फ़ोडण्यापेक्षा, आपल्या विचारातील दोष शोधून. कृती करणेच योग्य ठरावे. म्हणून आतापर्यंत जे झालेले आहे ते विसरून, समाजबांधवांनी कोणतेही कर्मकांड करतांना आपल्यालाच खालील प्रश्न विचारून पाहावेत आणि त्याची उत्तरे शोधावित.

(१) ज्या विधी आपण करितो, त्या खरोखर प्रसंगोचित, आवश्यक आहेत काय?

(२) ह्या विधींनी, त्या विधीचे जे साध्य सांगितलेले आहे ते पूर्ण होते काय

(३) ह्य विधी (योग्य-अयोग्य; उपयोगी-निरुपयोगी) धर्मशास्त्रात सांगितल्यप्रमाणे होतात काय?

(४) करित असलेल्या विधी विषयीचे धर्मशात्रात दिलेले मंत्र (उपयोगी असो वा नसो), ज्यांचे कडून आपण विधी करून घेता, त्यांना तरी खरोखर अवगत असतात काय? की संस्कृत सारख्या भासणाऱ्या, आपल्याला न समजणाऱ्या शब्दांची ते संगीतमय बडबड करित असतात.

(५) मंत्रात शक्ती आहे, ते म्हटल्याने, विशिष्ट तऱ्हेने म्हटल्याने फ़ायदा होतो असे जरी क्षणभर मानले तरी, मग अशा मंत्रांचा फ़ायदा, जे भटजी मंत्र म्हणतत त्यांनाच होणार. तुम्हाला त्याचा फ़ायदा कसा संभवणार?

वस्तुतः मंत्रांनी साधा भाजलेला पापड सुद्धा फ़ुटत नाही. तो तसा कोणीही फ़ोडून दाखववावा, हे माझे आव्हान. तसेच धर्मशात्राप्रमाणे ज्या ब्राह्मणांनी वेदपठन केलेले असते, त्यांनाच धर्मिक विधी करण्याचा अधिकार दिलेला आहे. धर्मशास्त्र, वेदपठन न केलेल्यांना ब्राह्मण मानितच नाहीत. वेदपठन न केलेल्यांनी, केलेले विधी निरर्थक म्हणून सांगितलेले आहे. मग तुम्ही ज्यांच्याकडून असे विधी करून घेता, त्यांनी वेदाध्ययन, वेदपठन केलेले असते काय? ते खरोखरच ब्राह्मण असतात काय? मग तुम्ही केलेले विधी व्यर्थच ना!

वरील अनुषंगाने खालील काही विधी आपण तपासून पाहाव्यात.

लग्नात आपण मंगलाष्टके म्हणतांना ज्वारीच्या वा तांदळाच्या अक्षता वधूवराचे अंगावर का आणि कशाकरिता फ़ेकतो? अशा सर्व अक्षता त्यांचे अंगावर पडतात तरी काय? तशी प्रथा आहे, ती ब्राह्मण-भटजींनी घालून दिलेली आहे म्हणून फ़ेकतो, हे म्हणणे उचित होइल काय? या तऱ्हेने व्यर्थ गमाविलेल्या धान्यातून काही अपंग उपाशी लोकांच पोट भरू शकते, असा विचार का केला जावू नये?

लग्नात सप्तपदी वा होम-हवन कशाकरिता करितात? असे केल्याने खरोखरच काही फ़ायदा होतो काय? कोणाचा झालेला आहे काय? असे सर्व सोपस्कार करूनही, कितीतरी लग्न झालेली जोडपे एकमेकापासून दुरावलेली आपण पाहतो आणि याउलट नोंदणी पद्धतीने विवाह झालेली जोडपे गुण्यागोविंदाने नांदत असलेली पण आपण पाहतो.

मुहूर्त पाहून, यथायोग्य धार्मिक विधी करून बसविलेले कितीतरी योजनांचे दगड, जे मोठमोठ्या लोकांचे हातून उदघाटन करून बसविलेले असतात, ते दगडच राहतात; इमारतीचे रुप त्यांना येत नाही; हेही आपण पाहत असतो आणि यदाकदाचित अशा दगडातून इमारती उभारल्यातच, तर त्या लवकर उध्वस्त झाल्याचेही आपण पाहतो. याउलट मुहूर्त न पाहता, उदघाटन, समारंभ आदि विधी न करता, सुरू केलेली कितीतरी लोकांची कितीतरी कार्ये फ़ळास गेल्याचे पण आपण पाहतो.

असेच लग्नाचे बाबतीत, कुंडल्या. आणि छत्तीस गुण जुळवून जमविलेले कितीतरी विवाह अयशस्वी होतात हे आपण पाहतच असतो. तरीही मुहूर्त पाहणे, कुंडल्या जुळविणे, हास्यास्पद कर्मकांड करणे आपण का सोडित नाही?

लग्न झाल्यानंतर वर-वधू जेंव्हा आपल्या म्हणजे वराच्या घरी येतात तेंव्हा दरवाजा ओलांडतांना धान्याने मुख्यत्वेकरून तांदुळाने भरलेला तांब्या वधूने रिता करण्याची, पायाने उलथून देण्याची जी प्रथा आहे, तिचे काय महत्व आहे? अशाने काय साधल्या जाते? अशाने नुकसान काही होतही नसेल, परंतु म्हणून काय, काहीही करित राहायचे?

आपले वडिल वारल्यानंतर आपण आपल्या डोक्यावरील केस कापतो. असे मुंडन केल्याने खरोखर काय होते? आपल्या पूर्वजांच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून आपण दरवर्षी त्यांचे श्राद्ध करून, ब्राम्हण भोजनाचे रुपाने त्यांना अन्न पोहोचवितो. शरीर मर्त्य आहे, आत्मा अमर आहे असे आपण मानतो. अन्न हे शरीराला अवश्यक असते, अन्न खाण्याकरिता, पचविण्याकरिता, तोंड तसेच इतर अवयव हवे असतात. आत्मा तर शरीराहून वेगळा, सुक्ष्म मानलेला आहे. मग पूर्वजांचा असा आत्मा अन्न कसे खाणार? आणि ब्राम्हणांनी भक्षण केलेले अन्न पूर्वजांच्या आत्म्यात कसे जाणार? तदवतच मनुष्याचा अमर आत्मा, शरीर मृत झाल्यानंतर, नव्यानेच जन्माला येणाऱ्या शरीरात प्रवेश करतो, तो नव्याने जन्माला घातलेल्याला मारून अन्न भक्षण करायला येतो आणि अन्न खाल्यानंतर पुन्हा त्या मृत शरीरात प्रवेश करून जीवंत करतो.! मग असे नविनच जन्माला आलेले, मृत झालेले

आणि असे मृत पुन्हा जिवंत झालेले सर्वांनाच दिसले नसते काय?. या सर्व गोष्टींवर आपण विचार करणार नाही आहोत काय?

देवाला नैवेद्य वाहण्याचे बाबतीत पण असेच. देवच तर आपणासर्वांना अन्न पुरवितो. असे आपण मानतो. मग अशा देवाला आपण अन्न देण्याची आवश्यकता काय? आणि निर्गुण-निराकार; सगुण-निराकार, देव अन्न खाणार कसे. त्याला शरीर तोंड आहे कोठे? अशा या सर्वाचा फ़ायदा ईश्वरंच्या एजंटांना, ब्रम्हण-भटजींनाच होतो आणि त्या करिताच हा सगळा प्रपंच असतो; हे आपण लक्षात का घेत नाही?

तसेच आपण दैदिप्यमान, प्रकाशमान देवापुढे, जो सर्व प्राणिमात्रांना प्रकाश दाखवितो, देतो; त्याचेसमोर पणती, दिवा का लावतो? देवाला प्रकाश, मार्ग दाखविण्याकरिता की आपला चेहरा त्याचेसमोर उजळून दिसण्याकरिता? देवाची किंवा कोणाचीही आरती ओवाळल्याने काय होते? खरच काही होते काय? वेळ घालविण्याकरिता हे असेल आणि यात आर्थिक वा अन्य काही नुकसान नसेल आणि आपण हे जाणत असाल तर असे करण्यास हरकत नसावी. पण याला काही अर्थ आहे, महत्व आहे, यापासून काही भरीव फ़ायदा होतो अशा धारणा असतील तर विचार करावा एवढेच.

यज्ञ केल्याने जर पाऊस आला असता, पिके आली असती, समृद्धता मिळाली असती, पुत्रप्राप्ती झाली असती, प्रत्येक गोष्टीत यश संपादन करता आले असते. विजय मिळविता आले असते. विश्वशांती होऊ शकली असती, तर आज जिकडे-तिकडे यज्ञ होण्याचा, करण्याचा सुळसुळाट झाला नसता काय?

वरील सर्व गोष्टींचा विचार करून आता तरी आपण संस्का्रातून अंगिकारलेली गुलामगिरी टाकून देवून, विवेकपूर्ण स्वतंत्रपणे विचार करायला लागून, जीवनातील प्रत्येक प्रसंगी निव्वळ, निखळ, निर्मळ आनंद देणारे, साध्या स्वरुपातील सांस्कृतिक कर्यक्रम अंगिकारणार आहोत का? यातूनच खेळीमेळीचा खरा आनंद मिळू शकेल.

# (१५)

# समाज सेवेचा धंदा

मी एकदा नागपुरात त्रिमूर्तीनगर मध्ये एका ठिकाणी कामाकरिता गेलो होतो, तेंव्हा बाजुच्या घरांवर असलेली नावाची पाटी वाचण्यात आली. त्या पाटीवर लिहिलेले होते, श्री अमूक-अमूक "समाजसेवक"

पंतप्रधान, मुख्यमंत्री, मंत्री, खासदार, आमदार, जिल्हापरिषद अध्यक्ष, निरनिराळ्या संस्थाचे पदाधिकारी, नगरसेवक वगैरे-वगैरे पण नावांपुढे लिहिण्यात येते. येथे लोकांनी निवडून दिल्यामुळे त्या व्यक्तींना मिळालेली सत्तेतील पदे दर्शविण्यात येतात. काही काही संस्थांच्या, महामडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या नेमणूका सरकार करित असते. राजकारणाचा एक भाग वा खेळी म्हणून अशी पदे त्यांना बहाल करण्यात येतात. अशी ही पदे त्या व्यक्तींना मिळालेला मोठेपणा दर्शवित असतात. जितके पद ऊंचीचे तितका तो माणूस मोठा समजण्यात येतो. आपल्या लोकशाही देशात पंतप्रधानांचे पद सर्वात मोठे, सन्मानाचे गणल्या जाते. अशी ही पदे समाज व्यवस्थेत निर्माण झालेली आहेत. माण्यता पावलेली आहेत. ही सर्व राजकीय पदे असून,

अशी पदे असणाऱ्या व्यक्ती समाजसेवक असतात, असही गृहित धरल्या जात. अशा ह्या पदांचा काळ संपल्यानंतर; अशी पदे गेल्यानंतर, दुसऱ्या पक्षाचे सरकार सत्तेत आल्यावर, अशांना अशा पदांवरून हटविल्यानंतर; अशी पदे लिहिणे बंद होत नसते, फ़क्त पदाचे मागे माजी लावण्यात येत असते. समाजात आजी-माजी अशी दोन्ही पदे वापरत असतात.

जे लोक राजकारणात वरील व्यक्तींप्रमाणेचे सक्रीय असतात, परंतू निवडणूकीत निवडून येत नाहीत, किंवा ज्यांच्या नेमणूका होत नाहीत, म्हणून त्यांना कोणतीच पदे मिळत नाहीत, त्यांचेकरिता समाजाने काहीच व्यवस्था करून ठेवलेली नाही, राजकारणात निवडणूकीत सर्वात जास्त मते मिळवून निवडून आलेली व्यक्ती व त्या व्यक्तीचे खालोखाल दोन नंबरची मते मिळालेली व्यक्ती ह्यांच्या मतांमध्ये बऱ्याच वेळा फ़ारच कमी अंतर असते. कधीकधी एक ते दोन टक्केच असते. मग मला सांगा एक किंवा दोन टक्के मते कमी मिळालीत म्हणून अशा व्यक्ती कमी ठरतात काय? किंवा अशा हरलेल्या व्यक्तींपेक्षा फ़क्त एक किंवा दोन टक्केच मते जास्त मिळालीत म्हणून जिंकलेल्या व्यक्ती फ़ार मोठ्या, किर्तीवान ठरू शकतात काय? तर मग अशा निवडून आलेल्या व्यक्तींना एकदम ऊंच पद, मंत्री आदि आणि एक दोन टक्यांनीच हरलेल्या व्यक्तींना काहीच नाही, पदरी अपमानच

अपमान, हा हरलेल्या व्यक्तींवर होत असलेला अन्यायच नाही काय? मग अशा निवडणूकीत पराजित झालेल्या व्यक्तिनी आपल्या नावांपूढे अयशस्वी खासदार, आमदार अशी बिरूदे का लावू नयेत! आपण निवडून आलेल्या व्यक्तिपेक्षा जास्त प्रमाणांत, कमी किर्तीवान नाही हे दर्शविण्याकरीता अयशस्वी खासदार, आमदार (१-२ टक्यांनी)अशीही बिरुदे लावण्यात येतील.

ज्या व्यक्ति राजकारणांत सक्रीय असतात; परंतू निवडणूका लढवत नाहीत, पक्षाने तिकीट न दिल्यामुळे वा अन्यथा; तसेच ज्या अशा व्यक्तिंच्या, त्यांच्याच पक्षाचे सरकार असूनहि, कोणत्याच पदावर नेमणूका होत नाहीत; अशा व्यक्तिंनी काय करावे! ते काय किर्तीवान नसतात! भलेहि त्यांची किर्ती सद्यस्थितीत समाजांत माण्यता पावलेली नसावी. पंतप्रधान, मुख्यमंत्री, मंत्री, खासदार, आमदार आदि पदव्या, अशा व्यक्तिंची नुसती ओळखच दाखवितात असे नाही,, तर त्या अशा व्यक्तिंची जाहीरात पण करतात. म्हणून अशा पदव्या नसलेल्या, न मिळालेल्या परंतू राजकारणांत सक्रीय असणाऱ्या व्यक्तिंनी जर आपल्या नावांपूढे समाजसेवक असे लिहून आपली स्वतःची जाहीरात केली तर त्यांत खटकण्यासारखे काय असावे! अशाच जाहिरातीतून हेही पद, जे सद्या माण्यता प्राप्त नाही, तेही अधिकृत होईल, माण्यता पावेल.

सरकारी सेवेत असलेले लोक, मुख्यतः अधिकारी वर्ग सुद्धा आपल्या नावांपूढे अशा पदव्या लिहीत असतात. जसे की विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, मुख्यपालन अधिकारी वगैरे वगैरे. माझ्यासारखे शिक्षणांत बऱ्याच पदव्या घेतलेले लोक सुद्धा आपण खुप शिकलेले आहोत हे दर्शविण्याकरीता आपल्या नावापूढे शिक्षणातील पदव्या लिहीत असतात. वास्तविक शिक्षणातील पदव्या आणि शिक्षीतता याचा संबंध असतोच असे नाही. ज्यांना एक किंवा दोन शिक्षणातील पदव्या आहेत, तेहि अशा पदव्या आपल्या नावापूढे लिहीतात. शिक्षणांतील अशा पदव्यांची बिरुदे नावांच्या आधी लिहीण्याची पण प्रथा पडलेली आहे. जसे की, इजिं. (इजिंनिअर); डॉ. (डॉक्टर), ऍड. (ऍडव्होकेट), प्रा. (प्राध्यापक) आदि. हा प्रघात जरी ओळख करुन देण्याकरीता पडलेला असेल, तरी आज त्याला जाहीरातीचेच स्वरुप आलेल आहे, हे नाकारता येणार नाही. विद्याविभूषित, विद्वाण, ज्ञानी, ज्ञान सम्राट, ज्ञानयोगी आदि पदव्यांचा संकेत तिकडेच मोडतो. नावांच्या पाटीवंर आपण श्री अमूक अमूक वकिल, आर्किटेक्ट, सिव्हील इजिंनिअर, कॉन्ट्रॅक्टर वगैरे वगैरे लिहीलेले पण वाचत असतो. येथे ह्या उपाध्या त्या व्यक्तिचा पेशा, व्यवसाय दर्शवितात. मग नावांपूढे लिहीण्यास सुरुवात झालेली समाजसेवक ही उपाधी काय दर्शविते!

स्वातंत्र मिळाल्यानंतरच्या ६० वर्षांपेक्षाही जास्त काळात, आपण इतका ऱ्हास केलेला आहे की आज व्यवसाय, पेशा अस काहीच शिल्लक उरलेले दिसत नाही. सर्वच धंदा झालेला आहे. अगोदर राजकारण केल्या जात होत समाजकारणासाठी, समाजाच भल करण्यासाठी; आज समाजकारण केल्या जात राजकारणासाठी. लोकांच समाजकार्य, तथाकथित समाजसेवेच ढोंग हे फक्त राजकारणांत त्यांना पद मिळण्याकरिता असते. समाजकार्याची, समाजसेवेची सर्व धडपड ही फ़क्त याच स्वार्थापोटी असते. राजकारणात स्वातंत्र्यपूर्व काळात लोक त्यागी वृत्तीने भाळलेले होते. स्वातंत्र्यासाठी कोणताही त्याग (प्राणाची आहुती सुध्दा) करण्यात आनंद मानणारे, घेणारे होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यागी वृत्ति ही समाजसेवेत रुपांतरीत झाली. लोकांच कार्य, आपल स्वतःच नुकसान न करता करुन, आनंद मिळवायचा ही प्रवृत्ती. हळूहळू मग सेवेच पेशांत, व्यवसायांत रुपांतर झाल. आपण समाज कार्याला वेळ देतो, मग त्याचा वाजवी मोबदला घ्यायला हरकत नसावी, हा विचार प्रवाह. आणि आता राजकारण हा संपूर्णपणे धंदा झालेला आहे. याकरीताच निवडणूकीत लाखो रुपयांची लागत (Investment), करण्यात येते. आणि या लागतीवर मिळकती करीता (Return on

Investment), राजकारणी लोकांना धंदेवाईक व्हाव लागत, ते तसे होतात, होत असतात, भलेही कबूल न करोत.

समाजकार्यात त्यागापेक्षा, सेवेपेक्षा किंवा हाल अपेष्टा सहन करण्यापेक्षा, मेवा कसा खायला मिळतो, खाल्ला जातो, किंबहुना असा मेवा मिळण्याच्या कशा व्यवस्था केलेल्या आहेत, खासदार, आमदार, मंत्री, इतर पदाधिकारी यांना किती सवलती दिल्या जातात. महागड्या गाड्या, टेलीफ़ोनस आदिच्या सुविधा, दिमतीला कर्मचारी पुरविल्या जातात; हे आपण पाहाव, समाजसेवा हा धंदा आहे अस माणाव आणि अशा धद्यांचा फायदा समाजसेवक घेणारच, मेवा खाणारच, अस गृहित धराव. नियमानुसार किंवा करुन ठेवलेल्या व्यवस्थेनुसार खाल्लेला मेवा अधिकृत. व्यवस्था करुन न ठेवलेला, नियमांत न बसणारा मेवा खाणे हा भ्रष्टाचार. तोही उघडकीस आला, सिध्द झाला तर. बस फरक इताकच.

# १६
# आपल्या समाज व्यवस्थेतील दोष - उणीवा
# आणि
# शिक्षणातून त्याविषयीचे मिळणारे ज्ञान-अज्ञान

मी एम. ए. (लोकप्रशासन शास्त्र; अर्थशास्त्र; राज्यशास्त्र; समाजशास्त्र; मानसशास्त्र; तत्वज्ञान; भाषाशास्त्र; इतिहास; मराठी; हिंदी; इंग्रजी; प्राचिन भारतिय इतिहास, संस्कृती व पुराण वस्तु शास्त्र) तसेच एम. बी. ए. (व्यवस्थापन शास्त्र), एम. सी. जे. (संवाद शास्त्र), एम. एस. (सायकोथेरापी अँड कौंसेलिंग) ह्या स्नातकोत्तर पदव्या घेतलेल्या आहेत. स्नातक स्तरावर मी मुळात बी. ई. (इलेक्ट्रीकल) असून एल. एल. बी. (विधीशास्त्र-लॉ), बी. जे. (जर्नालिझम-वृत्तपत्रकारिता) ह्या पदव्या मिळविलेल्या आहेत. तदवतच एल. एल. एम. (प्रि. -पदव्युत्तर लॉ भाग-१), डी. बी. एम. आणि नेचरोपॅथीचा डिप्लोमा हे अभ्यासक्रम सुद्धा पूर्ण केलेले आहेत. आणि आता वयाच्या ७३ व्या वर्षी एम. ए. मानव-शास्त्र (Anthropology-Science of Human being) ह्या विषयाचा अभ्यास करित आहे.

वरीलपैकी बी. ई. (इले.) ही भौतिक शास्त्राची पदवी सोडली तर बाकीच्या सर्व पदव्या सामाजिक शात्रांच्या आहेत. शिक्षणात ज्ञान दोन शास्त्र समूहात विभागल्या जाते. एक भौतिक शास्त्रे (Physical Sciences) व दुसरे सामाजिक शास्त्रे. (Social Sciences). भौतिक शास्त्रे (विज्ञान) हे निसर्गनिर्मित असून बऱ्याच प्रमाणात स्थायी स्वरुपाचे आहेत. याचे नियम प्रयोगशाळेत केंव्हाही, कोणालाही सिद्ध करून पाहता येतात. म्हणून ते ज्ञानच असते, अचूक असते याविषयी दुमत असण्याचे कारण नाही.

सामाजिक शास्त्रांविषयी मात्र तसे नाही. सामाजिक शास्त्रांतून आपणाला आपल्या समाजव्यवस्थेच्या निरनिराळ्या अंगाची, विभागाची माहिती करून देण्यात येते. तदवतच अशा व्यवस्था कशा निर्माण झाल्यात, अशा व्यवस्था समाजात रुढ होण्यामागील आधार काय आहेत, त्यामागील तत्वे कोणती, जीवनमुल्ये कोणती याची पण कारण मिमांसा सामाजिक शास्त्रांच्या निरनिराळ्या शाखांमधून, विषयांमधून करण्यात येते. वरील सर्व समाजशास्त्रांच्या विषयांचा अभ्यास करतांना, त्या विषयांची माहिती अवगत केल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, यातील कितीतरी व्यवस्था, पद्धती, त्यामागील आधार तत्वे ही समाज विघातक आहेत. समाजातील बहूसंख्य लोकांच्या गैरफ़ायद्याची आहेत. मुठभर लोकांच्याच फ़ायद्याची आहेत.

आपल्या सामाजिक व्यवस्था आणि म्हणून सामाजिक शास्त्रे ही मानव निर्मित आहेत. विविध विभागातील, मुठभर म्होरक्यांनी, आपल्या आपल्या विभागाविषयीच्या व्यवस्था त्यांचा स्वतःचाच स्वार्थ डोळयासमोर ठेवून केलेल्या आहेत. आणि समाजातील आपल्या वजनाचा, लोकप्रियतेचा फ़ायदा घेवून, ह्या व्यवस्था सर्व जनतेच्या फ़ायद्याच्या, भल्याच्या आहेत, असे आम जनतेच्या गळी उतरविण्यात मात्र ते यशस्वी झालेले आहेत. अशा चुकीच्या व्यवस्थांचा, तत्वांचा पुरस्कार जी शास्त्रे करतात, ती ज्ञानापेक्षा अज्ञानच जास्त पसरवितात. समाज शात्रांचा अभ्यास करतांना मला त्यातील अज्ञानच अवगत झाल. म्हणूनच मी ह्या माझ्या अज्ञानाच्या पदव्या आहेत अस माणतो. अज्ञानाचे ज्ञान होणे(अभिज्ञान) हेच खरे ज्ञान मी माणतो. परंतू इतर अशा अज्ञानालाच ज्ञान माणतात. आणि विव्दान, ज्ञानसम्राट पण होतात. हीच आपली ज्ञानाची, उच्च शिक्षणाची खरी शोकांतिका आहे. अज्ञानाचे ज्ञान होणे आणि अज्ञानाला ज्ञान माणने यातील फ़रक नीट जाणावा, ओळखावा. आता ह्या समाज शात्रातील चुकीच्या ज्ञानाविषयी, समाज व्यवस्थेतील दोष-उणिवांविषयी.

राज्य व्यवस्था

आपल राज्यशास्त्र सुद्धा कितीतरी चुकीच आहे. त्यात सुद्धा अज्ञान पुरेपुर भरलेले आहे. जसे की मुख्यमंत्री, पंतप्रधान आदिच्या नेमणूका. मा. श्री बाजपेयींना लोकसभेत बहूमत आहे असे माणून, राष्ट्रपतींनी त्यांना पंतप्रधान पदाची शपथ देऊन त्या पदी त्यांना विरजमान केले होते. परंतू १७ दिवसातच ते विश्वास ठराव पास न करू शकल्यामुळे त्यांना पाय उतार व्हावे लागले होते. वाजपेयी १७ दिवस घटना बाह्य, बेकायदेशीर पंतप्रधान राहिलेत. आता याल जब्बाबदर कोण. याऐवजी सुरवातीलच संसद बोलावून, भरवून खासदारांनीच बहूमताने पंतप्रधन का नेमू नये. परंतू असा सरळ, सोपा, योग्य उपाय कोणाच्याच कसा लक्षात येत नाही, की मुद्दामच तिकडे डोळेझाक करण्यात येते. हेच मुख्यमंत्री नेमण्याचे बबतीतही योग्य नसणार कय?

### अनाठायी, अनावश्यक आणि अनाकलनीय प्रशासनशास्त्र

नोकरांच्या पगारांवर महाराष्ट्र सरकारचे ६५ ते ७० टक्के उत्पन्न खर्च होते. असे. वाचल्याचे आठवते. म्हणजे महाराष्ट्र सरकार २५ ते ३० रुपये सर्व सामान्यांकरिता खर्च करण्याकरिता ६५ ते ७० रुपये पगार वाटपात गमावते. मला आता सांगा, अशा व्यवस्थेच, अशा सरकारच काही काम आहे का! अशा सरकारला

कुशल म्हणता येईल काय? अशाने खरोखरच भल होणार आहे काय? आणि ह्या व्यवस्थेच शिक्षण आपण घेत असतो, पदव्युत्तर पदव्या मिळवित असतो. मग ह्या अज्ञानाच्याच पदव्या नव्हेत काय? माझ्याजवळही अशीच एम. ए. लोकप्रशासन ही पदवी आहे.

सत्तेच्या लोभापायी नेत्यांनी आपली प्रशासन व्यवस्था भ्रष्ट केलेली आहे. येथे नावापुरतीच लोकशाही आहे. चिरीमिरी साठी, वरकमाई साठी प्रशासकांनी, नोकरशहांनी आपली प्रशासन व्यवस्था वेळकाढू (Red-tapism) आणि उगीचीच क्लीष्ट केलेली, करून ठेवलेली आहे. आपल्या प्रशासन व्यवस्थेचे आपल्या संविधानानुसार नावापुरतेच विकेन्द्रीकरण केलेले आहे. वास्तवात ती व्यवस्था केन्द्रीतच आहे..

शेतकऱ्यांच्या, सामान्यांच्या अहिताचे अर्थशास्त्र

आपल अर्थ शास्त्र घ्याना! आपली अर्थ व्यवस्था ही सामान्य माणसांना सहजासहजी आकलन न होणारी, आर्थिक विषमता पसरविणारी, मोठ-मोठे मुठभर उद्योगपती, कारखानदार, भांडवलदार यांचेकडे देशाची संपत्ती केन्द्रीत करणारी, आणि शेअर बाजारासारख्या जुगारातून हजारोकरोडो रुपयांची उलाढाल, देवाण-घेवाण करण्यास परवाणगी देणारी अशी आहे माझ्या मते,

हे संपूर्णशास्त्र, ज्ञान चुकीच आहे, पक्षपाती आहे. अर्थ शास्त्राची वाढ झाली, आजच अर्थ शास्त्र निर्माण झाल ते औद्योगिक क्रांतीनंतर. बड्याबड्या उद्योगपतींचा राजकारणावर दबावच राहिलेला आहे. त्यांनीच हे अर्थशास्त्र त्यांना सोयीस्कर, फ़ायदेशीर अस केलेल आहे. आणि याचाच दुष्परिणाम म्हणजे आज जवळजवळ ८५ टक्के संपत्ती ही १० ते १५ टक्के मोठमोठे कारखानदार, उद्योगपतींकडे केन्द्रित झालेली आढळेल. निसर्ग माणसांना समान जन्माला घालतो. गरीब, श्रीमंत माणूस हा आपल्या अर्थ शास्त्राने तयार केलेला आहे. सुरुवातीला अर्थ शास्त्र निर्माण झाल ते वस्तुंना वस्तुंच्या अदलाबदलीतून. ज्याला इंग्रजीत Barter पद्धती म्हणतात. दोन किलो ज्वारी देवून एक किलो गहू घेणे वगैरे वगैरे. ही परिमाणे वस्तुंच्या निकडीप्रमाणे, मागणीनुसार, आवडीनुसार ठरायचीत. खर तर जेथे एकाचे अनेक होतात, नविन उत्पत्ती होते (Primary Industry), तेथेच पैसा असावयास हवा. परंतु आपल्या अर्थशास्त्रात अशा ठिकाणी पैसा नाही. आणि जेथे एका वस्तुचे दुसऱ्या वस्तुत रुपांतर होते (Secondary Industry) तेथे पैसाच पैसा. थोडक्यात शेती उत्पादणे, खनीज संपत्ती, वन संपत्ती, जल संपत्ती आदि जी नेहमी निसर्गामुळे वाढत राहते तेथे पैसा नाही. परंतु कारखाण्यात जेथे एका वस्तुचे दुसऱ्या वस्तुत रुपांतर होते, तेथे मुबलक पैसा. जस की सरकीच्या एकाच बी पासून

अनेक बोंड्या तयार होवून निर्माण होणाऱ्या कापसाला भाव नाही. परंतु याच कापसाच रुपांतर कापडात झाल की पैसा अनेक गुणीता होतो. नारळ, करडी, शेंगदाना, तिळ या शेतीत एकाचे अनेक होणाऱ्या पदार्थात पैसा नाही. पण यापासून तयार होणाऱ्या तेलात नफ़ाच नफ़ा. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. आपणावर जाहिरातीद्वारे लादलेली संस्कारांची, विचारांची गुलामगिरी आणि चुकीच पक्षपाती अर्थशास्त्र जे कृत्रीम रित्या तयार केलेले आहे तेच याला जबाबदार.

व्यवस्थापन शास्त्राची शिकवण, अशी ही अर्थ व्यवस्था प्रामाणिक वा अप्रामाणिकपणे बळकट करण्यास मदत करणारी आहे. कारखानदाराच्या करखान्याची किंमत शेकडो करोड रुपये असते, परंतू पुस्तकात Balance sheet madhye ती नगण्य दाखविल्या जाते, दाखविलेली असते. आपली अर्थ व्यवस्थाच मूळी गावकऱ्यांना, शेतक्ऱ्यांना निरंतर दारिद्र्यात खितपत ठेवणारी, त्यांची फ़सवणूक, लुबाडणूक करणारी, होवू देणारी आहे.

(गैर) कानूनी, (अ) न्यायी कायदे शास्त्र, व्यवस्था

एखाद्या माणसाला कामधंदा मिळत नाही, तो उपासी मरत असतांना जर त्याने जीवंत राहण्याकरिता हलवायाच्या दुकानातून खाण्याचा पदार्थ चोरला आणि तो पकडल्या गेला तर पोलीस

आणि आपली कायदेव्यवस्था त्याचे काय हाल करतात! आणि कितीतरी लोक करोडो रुपयांचा घोटाळा करून कसे मोकळेच असतात हे आपण पाहतच असतो. हा अन्यायच नव्हे काय? आपण अजूनही इंग्रजांनी आपणाला गुलामगिरीत घट्ट जखडून ठेवण्याकरिता केलेले कायदेच अमलात आणतो. आजच्या परिस्थितीनुरूप आपण त्यात पाहिजे तसे बदल केलेच नाहीत. दुसरे म्हणजे इतके कायदे केलेले आहेत की, मला वाटत असा एकही मनुष्य सापडणार नाही की जो कोणतातरी कायदा मोडत नसेल. मी सेवा निवृत्तीनंतर जवळ जवळ दोन वर्षे वकिलीचा पेशा-व्यवसाय केला. त्यावेळी केन्द्रिय प्रशासकीय न्यायालयाने एका एका दिवसात १५०-१६० प्रकरणे हाताळल्याच मी पाहिले होते. आता मला सांगा इतकी प्रकरणे जर एक न्यायालय एका दिवसात हाताळत असेल तर त्या सर्व प्रकरणांना न्याय दिल्या सारख होईल काय? नाहीतरी न्यायालये किती न्याय देतात हा संवादाचाच विषय ठरावा. ते फ़क्त निकाल देतात. आणि तो सुद्धा इतक्या उशीरा की जरी तो निकाल न्यायी असला तरी तो अन्यायीच ठरावा. न्यायालयात दुसरी गोष्ट माझ्या लक्षात आली ती म्हणजे कितीतरी वकील मंडळी त्यांच्या एक ते दीड तासाच्या न्यायालयीन कामाकरिता संपूर्ण दिवस वाया घालवितात. वकीली व्यवसाय

किती अनुत्पादक आहे याची यावरून कल्पना यावी जरी त्यात कमी-अधिक पैसा मिळत असला तरी.

एका माणसाला, कायदा मोडला म्हणून पोलीस अटक करतात, तुरूंगात टाकतात, त्याचेवर खटला भरतात, तहसिल न्यायालय त्याला कायद्याप्रमाणे दोषी ठरवून शिक्षा करते, अपीलमध्ये जिल्हा न्यायालय त्यावर शिक्का मोर्तब करते, परंतु उच्च न्यायालय, त्याचे समोर हे प्रकरण आले असता, त्या माणसाला निर्दोष सोडते. अशी कितीतरी प्रकरणे असतील, आहेत. पण याचा खोलात, मुळात अर्थ काय? याचा कोणीच विचार करित नाही. जो कायदा पोलीसांना, तसेच तहसिल व जिल्हा न्यायाधिशांना सुद्धा बरोबर कळला नाही. असा कायदा आरोपीला समजणे शक्य आहे काय? कायद्याच विश्लेषण न्यायालयांनी चुकीच केल्यामुळे आरोपीला गुन्हेगार म्हणून (गुन्हेगार नसतांना) उगीच शिक्षा भोगावी लागते, त्याला जबाबदार कोण? न्यायाधिशांना, वकिलांना सुद्धा कायदे संपूर्ण माहित नसतात, माहित असणे शक्य नाही. मग तेंव्हा सर्व कायदे सर्वांना माहित पाहिजेत, माहित असतात अस गृहित धरणे आणि त्यानुसार आरोप लावून शिक्षा करणे हे कितपत न्यायी आहे. आणि असे हे सर्व कायदे सर्व जनतेला माहित व्हावे याकरिता काहीतरी प्रयत्न करण्यात येतात काय?आपले कायदेही किती किचकट, क्लीष्ट,

दुर्बोध आहेत. सरळ, सोपे, सहज समजण्यासारखे, एक अर्थी कायदे का केल्या जाऊ नये. मग अस हे शास्त्र कितीतरी चुकीच आहे, त्यात अज्ञान आहे अस म्हणण खोट का ठराव

आपल्या न्याय व्यवस्थेत निर्णय, निकाल दिल्या जातात. ते तांत्रिक बाबीवरच जास्त आधारित असल्यामुळे न्यायी असतीलच असे नाही. अणि चुकून न्यायी असलेतच, तरी निर्णय देण्यास लागलेल्या विलंबामुळे त्या न्यायाला काही अर्थही उरत नाही.

समाज शास्त्र-मानस शास्त्र

आपल्या समाजशास्त्रातील आपणाला कमकुवत बनविणारे संस्कार जर आपण मुळात बदलविलेत तर कितीतरी मानसशास्त्रातील सिद्धांत फ़ोल ठरतील, चुकीचे ठरतील. मुळातच जर संस्कार आपली इच्छाशक्ती वाढवतील, अवाजवी भिती मनात रुजविणार नाहीत, भ्रामक जीवन संकल्पना पेरणार नाहीत; तर आपले पुष्कळ मानसिक प्रश्न आपोआपच दूर होण्यास मदत होईल.

आपली संस्कार प्रक्रिया जाती व्यवस्थेला खतपणी घालणारी, जाती-जातीत वैमनस्य निर्माण करणारी, लहान-मोठे भेद जोपासणारी आहे. आपल्या चुकीच्या संस्कारातून

लहानपणापासूनच आपणावर भितीचे दडपण लादण्यात येते. जीवनाविषयीच्या भ्रामक, असत्य कल्पना आपल्या मनावर रुजविल्या जातात,. हे सर्व बदलले तर मानसशास्त्राचे बरेच सिद्धंत खोटे ठरावेत.

आपल्या शिक्षण व्यवस्थेत मिळालेले शिक्षण, पदव्या ह्या नोकरी मिळवून वा व्यवसाय, धंदा करून पैसा मिळविण्यासच योग्य आहेत. माणूस घडविण्याचे, खरी जीवन मूल्ये शोधून ती रुजविण्याचे, शिक्षण संस्थेने केंव्हाच सोडून दिलेले आहे.

तत्वज्ञान शास्त्र -धर्म शास्त्र

या सर्वास जे आपले तत्वशास्त्र आहे तेच कारणीभूत आहे, त्यात तर नुसते अतर्कटच आहेत. मोठमोठे शब्द वापरून जसे की, आत्मज्ञान, अतिन्द्रिय ज्ञान, आत्मसाक्षात्कारी ज्ञान, अनुभूतितून प्राप्त ज्ञान, अंतिम ज्ञान आणि यातून जन्मोजन्मीच्या फ़ेऱ्यातून मुक्ती म्हणजेच मोक्ष वगैरे वगैरे. तसेच स्थूल शरीर, आत्मायुक्त सुक्ष्म वा लिंग शरीर, कर्मविपाक, कर्मफ़ळ, पूर्वकर्म, पुनर्जन्म, अमरात्मा, प्रेतात्मा (भूतात्मा), पिशाच्च योनी, स्वर्ग-नरक, प्रेतलोक (मृत्युलोक), पितृलोक, यज्ञकांड, कर्मकांड, यातुविद्या, मंत्र-तंत्र विद्या, होमहवन आदि परस्पर विरोधी कल्पनांचा हैदोस या

शास्त्रांमध्ये घातलेला आहे. या शब्दांचे अर्थ तसेच या संकल्पना समजून देण्यात तत्वशास्त्र असफ़लच आहे.

जीवन काय आहे? जीवन कशासाठी आहे? जीवन कस जगाव?जीवनात आपण कोठून आणि का आलोत? मृत्युनंतर माणसाच काय होत? ज्या विश्वात आपण राहतो त्या विश्वाची उत्पत्ती कशी झाली? कोणी केली? का केली? ह्या प्रश्नांची उत्तरे माहित करून घेण्याची जिज्ञासा प्रत्येक मणसात असते. आणि ती पूर्ण करण्याकरिता ते तत्वज्ञानी लोकांचा आधार घेतात. तत्वज्ञानी लोकांनी, त्यांना ह्या प्रश्नांची उत्तरे माहित नसल्यामुळे, परंतु तसे मानणे, स्वीकारणे त्यांना कमीपणाचे वाटल्यामुळे; अशा गोष्टींचा उहापोह करतांना, त्यांनी स्पष्ट काहीही न सांगता, नुसताच शब्दछल, बुद्धिभेद, बुध्दीभ्रम केलेला आहे. आणि अशा बुद्धिभेदातून जीवनाविषयीच्या असत्य, भ्रामक कल्पनाच जनमानसांवर रूजविलेल्या आहेत. याविषयी काथ्याकुट करतांना ते स्वतःच किती विरोधाभासात्मक सांगत आहेत याकडेही त्यांनी दुर्लक्ष केलेले दिसते. आपल्याला उत्तर माहित नसले की, मोठमोठे, क्लीष्ट शब्द वापरून समोरच्याला विचलित करणे, गोंधळात टाकणे हे विद्वत्तेच एक लक्षण आहे. आणि असेच तत्वज्ञानी लोकांनी तत्वशास्त्रात केलेले आढळते. तर्कशास्त्राचा उगम हा तत्वशास्त्रापासूनच झालेला आढळतो. परतु निरनिराळी शास्त्रे,

तर्कशास्त्रे धरून निर्माण करणाऱ्या तत्वशास्त्रातच अनाकलनीय तार्किकता जास्त प्रमाणात आढळून येते. तर्कशास्त्रानुसार एका गोष्टीपासून तिच्याशी संबंधित अन्य गोष्टींचा तर्क करता येतो. परंतु ज्या गोष्टीवरून अन्य गोष्टींचा तर्क केला जातो, तीच गोष्ट खरी नसेल तर तर्काने अनुमानित अन्य गोष्टी खऱ्या कशा असणार? तत्वशास्त्रात एक गोष्ट जीची सत्यासत्यता वादग्रस्त आहे, ती सत्य धरून कितीतरी अनुमाने काढलेली आहेत. म्हणूनच मी म्हणतो की, तत्वशास्त्रात निष्कर्ष नसून अदमास, नुसत्या अटकळी, वादग्रस्त अनुमानेच आहेत. अशा अनुमानांना लोकांनी सत्य मानावे म्हणून, तत्ववेत्यांनी विद्वत्तापूर्ण परंतु अविवेकी कारणमिमांसा केलेली आहे. विश्वनिर्मितीच्या, ईश्वराच्या अस्तित्वाविषयीच्या, ईश्वराच्या स्वरुपाविषयीच्या, मानव विश्वातील सर्वात श्रेष्ठ निर्मिती मानणाऱ्या कितीतरी वादातीत कल्पना स्वीकारून, ग्राह्य धरून कितीतरी परस्परविरोधी निष्कर्ष काढलेले आहेत; बेमतलबी प्रथा, रूढी, विधी यांचे स्तोम माजविलेले आहे. जीवनाविषयीच्या अनाकलनीय, भ्रामक कल्पना रुजवून; अंधश्रद्धा-घातक श्रद्धा भिनवून; मानवाला उगीच्याच कर्मकांडात पुरतेच गुरफ़टलेले आहे. सखोल मुळात विचार केल्यास, एकही विधी केला नाही तरी काहीच बिघडत नाही.

बहूतांशी विधी आपण स्वतः करितच नसतो. विधींची सफ़लता अशांचे मंत्र विशिष्ट तऱ्हेने म्हणण्यात असते आणि तेही स्वतः म्हणण्यात असते. असे शास्त्रे सांगतात. आपण तर स्वतः मंत्र म्हणत नाही, भटजी, पुरोहितच मंत्र म्हणतात. मग अशा विधींचा फ़ायदा (यदाकदाचित असलाच तर) आपल्याला कसा होणार. मंत्र भटजी म्हणतात. मग अशाने देव पावलाच तर भटजीलाच पावेल.. अर्थात कोणत्याच मंत्राने काहीच होत नसते. मंत्रात खरोखरच काही शक्ती, जादू, ताकद असती, तर लोक कामधंदा न करता मंत्र म्हणू म्हणू सर्व इच्छित प्राप्त करित राहिले असते. नुसते यज्ञच करित राहिले असते.

आपण आपल्या चुकांची जबाबदारी न स्वीकारता ती नियतीवर ढकलणे आणि आपली अकार्यक्षमता दूर करून कार्यक्षम बनण्यापेक्षा काल्पनिक विधी अन्वये कल्पित दैव शक्तीची याचना करून फ़ळाची अभिलाषा करणे, हे कमकुवततेचेच लक्षण नव्हे काय? म्हणून आपण जोपर्यंत असा कमकुवतपणा सोडणार नाही; कर्मकांडाचे जोखंड झुगारून देणार नाही; तोपर्यंत आपण कर्मकांडाच्या गुलामगिरीत; स्वतःच स्वतःला दुय्यम समजून राहणार, वावरणार आहोत. आणि बौद्धिक स्वातंत्र्यापासून दूर दूरच जाणार आहोत.

असेच आहे ज्योतिष्य शास्त्राच, हस्तरेखा शास्त्राच, मंत्र-तंत्र शास्त्राच, या सर्व शास्त्रात नुसत अज्ञानच भरलेल आहे. स्पष्ट दिसणाऱ्या चुकीच्या पायांवर ही शास्त्रे आधारित आहेत. परंतु संस्कारातून आपल्या मनावर या शास्त्रांचा इतका पगडा बसलेला आहे की आपण ही शास्त्रे संपूर्णपणे खरी मानत असतो आणि आपली फ़सवणूक करून घेत असतो.

मानवप्राणी हा इतर सजीव प्राण्यांप्रमाणे तसेच जड पदार्थाप्रमाणे मुलतः निसर्गाची देण आहे. निसर्गाला मग भलेही तुम्ही ईश्वर म्हणा, माणा. विज्ञानाचे शोधांमुळे निसर्ग किती चमत्कारिक आहे याचा प्रत्यय येतच आहे. अजूनही निसर्गाच्या उदरात काय काय दडलेले आहे, ते पूर्णतः सांगणे कठीणच. निसर्गाचा पूर्ण ठाव केंव्हा लागेल, लागेल किंवा नाही हे सांगणे अशक्यच. असेच आहे जीवनातील सत्याविषयी पण. जीवनातील सत्य हेच आहे की ते कोणालाच माहित नाही. आणि ते माहित होण्याची सुतराम शक्यता नाही. तरीपण, जीवनातील सत्याविषयी, जीवनाच्या उद्देशांविषयी आपण काहीतरी बिरूदे जीवनाला चिकटविलेली आहेत.

निसर्गाच्या नियमानुसार आपण जीवनात येतो. निसर्गाच्या नियमांनी, निसर्ग घटनांनी आणि या नियमांवरील प्रक्रियात्मक

सामाजिक बंधनांनी, नियंत्रित अस जीवन आपण जगत असतो. अस जीवन निरुद्देशीय वाटण्याची शक्यता असली तरी; जीवनात कशाचीही भिती न बाळगता, यत्किंचितही निराश न होता, असेल त्या, येईल त्या परिस्थितीला सशक्तपणे सामोरे जात, आनंदात जगणे; हेच जीवनाच्या उद्देशाचे योग्य बिरूद (ज्ञान) ठरावे. आणि उगीच काथ्याकुट करण्यापेक्षा, याचच शिक्षण देण, तशाकरिता योग्य अशा व्यवस्था स्थापणे, हेच समाजाच्या, मानवजीवनाच्या हिताचे ठरावे. आज मात्र आपल्या शिक्षण व्यवस्थेत मिळणार शिक्षण, पदव्या; ह्या नोकरी मिळवून वा व्यवसाय, धंदा करून पैसा मिळविण्यासच योग्य आहेत. माणूस घडविण्याचे, खरी जीवन मूल्ये शोधून ती रुजविण्याचे, शिक्षण संस्थेने केंव्हाच सोडून दिलेले आहे.

# (१७)

# महान-मोठे; किती खरे-किती खोटे

माणसे वयाने मोठे होतात, तसेच ते धनाने, ज्ञानाने (शिक्षणाने), मानाने पण मोठे होतात. सत्ता, अधिकार प्राप्ती, यामुळेसुद्धा माणसे मोठी होतात. तदवतच एखाद्या क्षेत्रात, जसे की, कला, क्रिडा, अभिनय, आदित, निपूणता, कौशल्य, मिळवूनही माणसे मोठी होतात. अशी माणसे मोठी होतात, ती आपण त्यांना मोठ मानतो म्हणून. त्यांना असे मोठे मानण्याविषयीचे संस्कारच आपल्यावर लहानपणापासून रुजविल्या जातात. परंतु खरोखरच ते मोठे असतात काय? मोठे म्हणजे काय? ह्या अशा मोठ्यातील किती खरे आणि किती खोटे असतात, याविषयी आपण विचारच करित नाही. अशा ह्या मोठ्यातील कितीतरी खोटे मोठे आपल्याला भुरळ पाडून फ़सवित असतात. ते आपणाला नकळत सदैव लुटतच असतात. त्यांचेवरील आपल्या विश्वासाचा गैरफ़ायदा घेवून स्वतःचे स्वार्थ साधत असतात. म्हणून अशा मोठ्यांच्या खऱ्या-खोट्यापणाविषयी विचार करणे अगत्याचे ठरते.

सर्व प्रथम पोषाखावरून खऱ्या-खोट्याविषयी. एखादा नुकताच शिक्षा भोगून, समजा कोल्हापूर जेलातून सुटलेला

गुन्हेगार, नागपूर जवळच्या एखाद्या खेड्यात; भगवे कपडे आणि गळयात रुद्राक्ष माळा घालून आला आणि मंदिरात पूजा करित राहिला, तर थोड्याच वेळात त्या खेड्यातील लोक त्याचेभोवती जमा होतात आणि तो जे जे सांगेल ते ऐकतात. तो सांगतो ते त्या गावकऱ्यांना मोठे विचार वाटतात. आणि मग अशा गुन्हेगारालाही गावकरी फ़ार मोठे समजून त्याच्या पाया पडतात, त्याची पुजा करतात. तदवतच खांद्यावर भगवे दुपटे असले आणि हाती पंचांग असले की मग त्या भटजीने काहीही सांगितले, भविष्याचे आदि बाबतीत, ते आपणाला खरेच वाटते. आणि अशांना जर बोलण्याची, आपणाला भारावून टाकण्याची चतुरस्त्र कला अवगत असली म्हणजे मग बोलायलाच नको. त्यांचे म्हणणे, बोलणे,, तो म्हणेल तसे करणे मग शिरसावंद्य. अशा भटजींने खरोखरच शास्त्राचा (खऱ्या-खोट्या) अभ्यास केलेला आहे काय? शास्त्र खरोखरच त्याला अवगत आहे काय? हेही पाहाण्याचे प्रयोजन नसते. नुसत्या त्याच्या पोषाखावरून तो वेद पंडित आहे असे मानल्या जात. सुटबुट घातलेल्यांनाही आपण मोठे समजतो. आणि म्हणूनच सुटाबुटातील भामट्यांकडून निरंतर सामान्य लोकांच्या फ़सवणूक होण्याच्या कथा वाचत असतो. पांढरे शुभ्र कपडे घातलेले नेते, ज्यांना आपण मोठे समजतो, समाजसेवक समजतो, हे निवडून येण्याकरिता, वा सत्ता टिकविण्याकरिता जनतेला

आश्वासनांच्या खैराती देत असतात. परंतु स्वतःचा स्वार्थ साधणे आणि सत्ता टिकवून ठेवणे यापलिकडे काहीच करित नसतात. असे करितांना जर जनतेचा काही लाभ झालाच तर तो अपघातच.

तदवतच एखाद्याला समाजात मोठ स्थान मिळाल, तो लोकप्रिय झाला, त्याला मग आपण डोक्यावर घेतल; की त्याची वाचाळ बळबळ, अविचार हे पण आपणाला फ़ार मोठे विचार वाटतात. गुन्हेगार प्रवृत्तीचे लोक निवडणूक जिंकून आमदार, खासदार, मंत्री झालेत की त्यांचे गुंडप्रवृत्तीचे घातक (अ)विचार पण उपयुक्त वाटतात. आपल्या मंत्र्यांचे, नेत्यांचे विचार, त्यांना ज्या क्षेत्राच अजिबात ज्ञान नाही, त्या क्षेत्रात सुद्धा मोठे वाटतात.

नेत्याला मिळालेल्या सत्तेपुढे, लोकप्रियतेपुढे लोक त्यांचे विचार नुसतेच स्वीकारीतच नसतात, तर अशा नेत्यांसमोर अक्षरशः लोटांगन घालून अशा विचारांना डोक्यावर सुद्धा घेतात, भलेही मग अशा नेत्याला कोर्टाने गुन्हेगार घोषित केलेले असेना. स्वतः आजारी पडल्यानंतर परदेशात जावून किंवा परदेशातील डॉक्टर बोलावून, जनतेचे करोडो रुपये खर्च करून उपचार करून घेणारे पंतप्रधान, आपल्या लोकशाहीत अधिकारावर असलेल्या पक्षाचे अध्यक्ष आदि मोठे कसे असू शकतात. त्याग करून लोकांची सेवा करायचे तर सोडाच, पण सामान्य माणसांना

उपचाराकरिता जे डॉक्टर यांनी उपलब्द करून दिलेले असतात, त्यांचेकडून उपचार करून घेवून, आपणही सामान्य जनतेसारखेच आहोत; अशी निस्पृह भावना हे का बाळगित नाहीत. हे स्वतःला समाजसेवक समजतात, जनतेकरिता आयुष्य अर्पिले असे भासवित असतात, हे सर्व ढोंगच नव्हे काय? तदवतच स्वतःच्या वैयक्तीक कामासाठी सरकारी विमाने वापरून त्याचा करोडोचा खर्च न भरणारे पंतप्रधान, भ्रष्ट मार्गाने मिळविलेले करोडो रुपये खासदारांना वाटून आपल्यावरील अविश्वासाचा ठराव नामंजूर करून घेणारे पंतप्रधान अशांना आपण डोक्यावर घेत असतो. केवढा हा दैवदुर्विलास. पंतप्रधानाचे पद हे आपल्या देशातील सर्वात मोठे पद, परंतु ते पद भुषविणारे असे हे खोटेच ना! मग इतर अनेक नेते खोटे असल्यास नवल ते कसले.

एखाद्याने लेखण वा वक्तृत्व शैलीत कुशलता मिळविली; लेखक, वक्ता म्हणून गणला जावू लागला; की अशांचे लेख, भाषण आपणाला भुरळ पाडतात. ते जे सांगतात, लिहितात ते आपण खरे मानतो. वास्तवात ते खोटे, असंबंद्ध, अस्थायी असलेत तरी. वक्त्याने काय विचार मांडले यापेक्षा तो कसा प्रभावी बोलला यालाच जास्त महत्व दिल्या जाते. प्रभावी भाषणात प्रभावी, योग्य विचार असतातच असे नाही. म्हणूनच नुसते वाचून वा ऐकून कोणतेच विचार ग्राह्य धरू नये. अशा विचारांचे शांतचित्ताने,

पूर्वग्रह बाजुला ठेवून, विवेकपूर्ण दृष्टीने, शुद्ध तर्कसंगत विश्लेषण करावे आणि नंतर पटलेत तरच गृहित धरावे. माझ्या लेखांविषयी पण हीच सूचना.

समाजात ज्यांचेजवळ धनसंपत्ती असते, त्यांना सुद्धा मोठे समजल्या जाते. भलेही मग ते शिकलेले असोत वा नसोत. त्यांची संपत्ती भ्रष्ट, वाम व अवैध मार्गाने का मिळविलेली असेना! आणि अशा श्रीमंतांनी जर आपल्या संपत्तीचा थोडासा अंश जर समाजकार्या करिता खर्च केला, तर आपण त्यांना मानाच्या शिखरावर बसविण्यास सुद्धा मागेपुढे पाहात नाही. अशा तऱ्हेने कारखानदार, भांडवलदार, जे गुप्तपणे, सुप्तपणे अक्कल हुशारीने सामान्य माणसांना नुसतेच लुटण्याचे काम करित असतात, पण मिळकतीचा थोडासा अंश दानधर्मात खर्च करतात, अशांना आपण सामान्य माणसेच मोठेपण देत असतो

शिक्षणाचे बाबतीत पण हेच. एखाद्याने खुप पदव्या घेतल्यात, डॉक्टरेट आदि मिळविली, की त्याला मोठ समजल्या जात. घेतलेल्या पदव्यांचा आकडा बराच वाढला की अशांना ज्ञानयोगी म्हणूनही संबोधिण्यात येते. परंतु अशा पदव्यातून ज्ञान मिळते काय? भ्रष्ट राज्य व्यवस्थेच, वेळ काढू, बरेच अनाठायी, अनावश्यक प्रशासकिय व्यवस्थेचे शिक्षण घेवून; आपण

राज्यशात्राची, प्रशासन शात्राची पदवी मिळवितो. गरीबांना गरीबच ठेवणारी, शेतकऱ्यांना पिचणारी, श्रीमंतांना आणखीच श्रीमंत करणारी अर्थ व्यवस्था शिकून आपण अर्थशात्राची पदवी घेतो. कायद्याची पदवी घेवून खोट्याच खर कस कराव हे आपण शिकतो आणि प्रामाणिक माणसांवर अन्याय करण्यास मदतच करतो. व्यवस्थापनाच्या पदवीतून येनकेन प्रकारेन (भ्रष्टाचार धरून) धंद्यात जास्तीत जास्त नफ़ा कसा मिळविता येईल हे आपण ग्रहण करतो. वैद्यकिय शिक्षण, व्यवसाय ज्याला आदरणीय समजल्या जाते, समाज सेवा समजल्या जाते, त्या व्यवसायाला पण कलंकीत करतो आणि म्हणून ’डॉक्टर की कसाई ’ अशा तऱ्हेचे लेख वर्तमान पत्रातून वाचतो. तत्वज्ञानाची पदवी घेवून आपण अंधश्रद्धा, घातक श्रद्धाच पसरवितो. अशी ही शिक्षणाची महती. आणि असे हे शिक्षित, खोटे पण तरीही मोठे. वास्तवात सत्याची पारख करणारे, सत्य सांगण्याची हिंमत ठेवणारे, सत्याला सामोरे जाणारे आणि मिळविलेल्या ज्ञानाचा प्रामाणिक उपयोग करणारे शिक्षितच खरे शिक्षित. मग ते कमी शिकलेले असो की जास्त. त्यांच्या जवळ किती पदव्या आहेत हे गौण.

कलाकारांचेही असेच असते. एकाद्या क्षेत्रात, कलेत एखाद्याने कुशलता संपादिली, यशस्वीता मिळविली; त्या कलेतून आपल्यावर भुरळ पाडली; जसे की क्रिडा, अभिनय, संगीत, नृत्य,

आदि, की मग अशांना आपण डोक्यावर घेतो, लोकप्रिय करतो, मोठे करतो. मग असे मोठे कलाकार मॅच फ़िक्सिंग करून काळाबाजार का करिणात! अंडरवर्ल्डचा पैसा का वापरीत ना! बेकायदेशीर रित्या चरस, भांग, गांज्या का पित ना! बेकायदेशीरपणे रायफ़ल आपल्याजवळ का बाळगीत ना! आयकर भरणे का चुकवित ना! अशांनी कितीही बेकायदेशीर कामे केलीत, आपले क्षेत्र सोडून इतर क्षेत्रात कितीही नंगानाच करून आपणास फ़सविले, तरी ते आपल्याला क्षम्य असत. कारण त्यांचा मोठेपणा आपण सर्वच क्षेत्रात मानत असतो. इतकेच काय अशांना देव बनवून त्यांची मंदिरे बांधण्यास सुद्धा आपण प्रवृत्त होतो. ही त्यांच्या खोट्या मोठेपणाची, लोकप्रियतेची किमया, की जनमाणसाच्या मनोवृत्तीची वा विकृतीची लिलया.

अशा तऱ्हेने आपण बहूतांशी खोट्यांनाच मोठे समजत असतो. अशा खोट्या मोठ्या लोकांच जीवन दुरून जरी आपणाला फ़ार आनंदी भासत असल, तरी जवळून न्याहाळल्यास, पाहिल्यास, असे लोक फ़ार चिंताग्रस्त आणि तणावामुळे निर्माण होणाऱ्या शारिरीक व्याधींनी पिडलेले दिसतील. कुटुंबाच्या खेळीमेळीच्या आनंदापासून ते कोसो दूर असतात. खोट्या प्रतिष्ठेत जगून ते स्वतःचीच फ़सवणूक करित असतात. हे तुम्ही जर सगळ्या मोठ्या लोकांच्या (नेते, संत, महंत अभिनेते आदि) जीवन

चरित्रांचा अभ्यास केल्यास सहज लक्षात यावे. एकाही अशा मोठ्या माणसाला आपले घर सांभाळता आलेले नाही, घरातील माणसांना सुखी आनंदी ठेवता आलेले नाही. कोणालाही सुखी करता आले नाही तरी चालेल, पण एकालाही दुःखी करू नये. घर वेशीला टांगून इतरांना सुखी करण्याचा प्रयत्न करून भ्रामक मोठेपणा मिळविणे योग्य आहे असे मला वाटत नाही. स्वतः आनंदी राहून, कुटुंबाला आनंदात ठेवून, सहज आनंदाने. आनंदात इतरांना आनंद देण्य़ाचे कार्य करून आपला आनंद वाढविणे हेच खरे मोठेपण. मग भलेही त्याला समाजाची पावती मिळो वा न मिळो. समाज सेवा नव्हे (कारण सेवा या शब्दात उपकाराची भाषा येते) तर इतरांना आनंद देण्याचे समाज कार्य, मोठेपणा मिळविण्याकरिता नव्हे तर स्वतःचा आनंद वाढविण्याकरिता करायला हवे. आनंदाकरिता मोठे व्हावे लागतेच असे नाही. ती आपली भ्रामक कल्पना आहे. हे लक्षात घ्यावे, बस इतकेच.

# १८

# समाजाला घातक राजकारण

राजकारण हे समाजकारण करण्यासाठी, समाजकार्य करण्यासाठी, समाजात संतुलन साधण्यासाठी, समाज एकत्र ठेवण्यासाठी, समाजात समानता व शांतता प्रस्थापित करण्यासाठी, कोणावरही अन्याय न होवू देण्यासाठी, समाजातील वाईट प्रवृत्तीचे निर्मुलन करण्यासाठी, समाजात वाईट प्रवृत्ती न होवू देण्यासाठी; करायचे असते. हेच खरे जनकार्य, समाजकार्य असते. राजसत्तेचे हेच ध्येय आणि धोरण असते, असावयास पाहिजे. राजकारणी लोकांचे हेच कर्तव्य असते. राजकारण फ़क्त राजकारणी लोकांच्या स्वतःच्याच वा आपल्या गटाच्या, हितसंबंधियाच्या फ़ायद्याकरिता. स्वार्थाकरिता करावयाचे नसते, तर ते समाजात सर्वत्र खेळीमेळीचा आनंद नांदावा म्हणून करावयाचे असते.

स्वातंत्र्यपूर्व काळात अशा या समाजकारणाला वाहणाऱ्या लोकांमध्ये त्यागाची भावना होती. अभूतपूर्व त्याग या देशाकरिता, या देशातील समाजाकरिता करायला ते तयार होते. कित्येकांनी केला सुद्धा. जात-पात आदी आंकुंचित भावनांना अशांच्या विचारात थारा नव्हता. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर त्यागी वृत्तीची

जागा सेवने घेतली. समाजातील प्रत्येकाला आता स्वातंत्र्य मिळाले म्हणून त्यागाची गरज भासेनासी झाली असावी. नुसती जनसेवा, लोकसेवा करून समाजकारण साधण्याची प्रवृत्ती निर्माण झाली असावी. पुढे याच सेवेच्या प्रवृत्तीचे पेशात रुपांतर झाले. आपण दुसऱ्यांची कामे करतो, त्यांची सेवा करतो, परंतु आपणालाही कुटुंब आहे, त्यांची जबाबदारी आहे; ती पूर्ण करण्याकरिता अर्थाजनाची गरज आहे; मग असे जनकार्य करतांना ज्यांची कामे आपण करतो त्यांचेकडून वाजवी मोबदला घेणे गैर का असावे! असे वाटायला लागले असावे. निखळ, निकोप, विशुद्ध पेशाविषयी कोणाची हरकत असण्याचे कारण नसावे. किंबहुना सर्वच जनांनी आपले व्यवसाय, एक पेशा म्हणून स्वीकारलेत, केलेत तर समाजातील सर्वच व्यवहार निकोप व्हावेत, याच भावनेतून जनकार्याचे पेशात रुपांतर झाले. आणि याच भावनेतून जनप्रतिनिधींना वेतन देण्याची, सोयी सवलती देण्याची, जनप्रतिनिधी आपला जो वेळ जनकार्याकरिता देतात त्याचा मोबदला देण्याची प्रथा बळावत गेली. परंतु आजच्या घडीला जनकार्य हे पेशा राहिलेले नसून, त्याचे धंद्यात रुपांतर झालेले आहे. राजकारणाचा धंदाच झालेला आहे. राजकारण हे आता समाजकारणासाठी केल्या जात नसून; समाजकारण, जातकारण, धर्मकारण आदी मात्र राजकारणात आपले वर्चस्व प्रस्थापित

करण्याकरिता केल्या जाते. म्हणूनच जाती, धर्माच्या नावावर निवडणूका लढविल्या जात आहेत. एखाद्या धर्माच्या, जातीच्या, वर्गाच्या लोकांची मते आपणाला मिळावी म्हणून तशी व्यूहरचना राजकारणात सर्वच पक्ष करतांना दिसतात. यासाठी मग धर्म निरपेक्षता बाजुला ठेवण्यात येते किंवा धर्मनिरपेक्षतेचा खोटा आव आणण्यात येतो, दाखविण्यात येतो. भाजपा, मुस्लीम लीग, शिवसेना आदी उघड उघड धर्माच्या नावावर राजकारण करतात. परंतु इतर सुद्धा आपणच दिनदलित, मागासवर्गिय, अल्पसंख्यांक यांचे कैवारी असण्याचा दावा करून, दिखावा करून; त्यांच्या मतांचा गठ्ठा आपल्याच पक्षाला मिळविण्याचा खटाटोपात नेहमीच असतात.

राजकारण आज समाजकारणासाठी, जनकार्यासाठी राहिलेलेच नाही. ते फ़क्त राजकारणी लोक आपला स्वार्थ साधण्यासाठी करतात. शिक्षण घेवून वा न घेवून शेती व अन्य व्यवसाय, व्यापार, उद्योग, धंदा व मजूरी करणे, हे जसे जीवन जगण्याची साधने आहेत, तसेच राजकारणी लोकांनी आपले जीवन ऐषारामी बनविण्यासाठी, जगण्यासाठी राजकारण हा धंदा केलेला आहे. पुष्कळांचे बाबतीत हा जोडधंदा पण असू शकतो. इतकेच नव्हे तर असा हा राजकारणाचा धंदा पूर्णतः व्यापारी वृत्तीने केल्या जातो. आणि इतर धंद्यामध्ये होणाऱ्या काळाबाजारापेक्षा कितीतरी

पट जास्त काळाबाजार राजकरणाच्या धंद्यात होतो. राजकारणी भ्रष्ट आहेत, भ्रष्ट असल्याशिवाय, झाल्याशिवाय राजकारण आजच्या घडीला करणेच शक्य नाही. प्रामाणिक माणसाचा राजकारणात टिकाव लागणे शक्यच नाही. राजकारणात शिरल्यानंतर एकतर त्यांना अप्रामाणिक व्हावे लागते वा राजकारण सोडावे लागते अन्यथा त्यांना राजकारणातून बाहेर फ़ेकल्या जाते. तसे पाहता, ही समाजाला लाजीरवाणी, शरमेची, कलंकित करणारी गोष्ट आहे. तरीपण समाज अशा राजकारण्यांना अजूनही डोक्यावर घेवून नाचतो. अशांचा सत्कार करण्यात, अशांना निवडून देण्यात समाजच पुढे असतो. आजच्या समाजाची हीच खरी शोकांतिका आहे. राजकारण्यांबरोबर इतर समाज धूरीण पण भ्रष्ट होत नाहीत ना! आणि हे सर्व मग समग्र समाजाला पण भ्रष्ट तर करित नाहीत ना! नासवित नाहीत ना! अशी पण शंका येते.

राजकारणात ध्येयाला, जनकार्याला आज अजिबात महत्व उरलेले नाही. आपला धंदा जोरात चालावा म्हणून जसे उद्योजक आपला माल विकण्याकरिता लोकांना भुलविणाऱ्या फ़सव्या जाहिराती करित असतात, तशाच तऱ्हेच्या जाहिराती राजकारणी लोक आपली सत्ता टिकविण्याकरिता; लोकांच्या डोळ्यात धूळ फ़ेकणाऱ्या जाहिराती करित राहतात. अशाने ते आपले मार्केट पक्के ठेवण्याचा प्रयत्न करित असतात. आपला

माल खपावा, त्याची मागणी वाढावी, यांचा माल म्हणजे यांची खोटी इज्जत, इभ्रत समाजात दृढ राहावी, यांचा सन्मान होत राहावा, यांच्या सत्कारांची संख्या वाढत राहावी, म्हणून हे आपल्या मालाचा म्हणजे स्वतःचा प्रचार, प्रसार करण्याकरिता जाहिरातीबरोबरच आपल्या काही कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रित्या कमिशन एजंट्स पण नेमत असतात. राजकारणात मग नेत्यांबरोबर अशा कमिशन एजंट्सचा धंदा पण फ़ोफ़ावत असतो. असे कमिशन एजंट्स, कार्यकर्ते अशा नेत्यांजवळ तितकाच वेळ असतात, जितका वेळ असे नेते सत्तेत असतात, अशा नेत्यांपासून त्यांचा फ़ायदा होत असतो. अशा त्यांच्या नेत्यांवर ते सदैव स्तुती सुमने उधळीत असतात. अशी स्तुतीसुमने उधळण्यात निरनिराळया कार्यकर्त्यांमध्ये, एजंटांमध्ये, ज्युनिअर कार्यकर्त्यांमध्ये जणू काही स्पर्धाच लागते. परंतु अशा नेत्यांची खुर्ची जाताच, अशा नेत्यांकडून आपला फ़ायदा होत नाहीसे दिसताच हे दुसऱ्या सत्तेत भक्कम असलेल्या राजकारणी धंदेवाईकाकडे, नेत्यांकडे वळतात.. जुन्या खुर्ची गमाविलेल्या नेत्यांकडे ते पाठ फ़िरवित असतात.. इतकेच नव्हे तर, ज्या जुन्या नेत्यांचा हे टाहो फ़ोडून प्रचार करित होते, नाही ती सुमने त्यांचेवर उधळीत होते, अशा नेत्यात आता त्यांना खोट दिसू लागते. आणि आपला नवा माल, नवा नेता आणखी जोरात विकला जावा की

जेणेकरून आपला चांगलाच फ़ायदा होईल म्हणून हे, जुन्या नेत्यांचे, मालाचे सर्वच दोष आणि नसतील तेही पुढे आणण्यात मागेपुढे पाहात नाहीत. अशा तऱ्हेने राजकारणाच्या धंद्यात हीन स्वरुपाच्या स्पर्धा चालतात. ज्या जुन्या नेत्याचे काही दिवसापूर्वी हे एजंट होते, त्यांचे कार्यकर्ते होते, त्या नेत्याला वाटेल तशा शिव्या द्यायला सुद्धा मग हे कचरत नाहीत. वेळ पडल्यास जुन्या नेत्यांची काळीबेरी, भ्रष्टाचाराची लफ़डी बाहेर काढून त्यांचे मागे पोलीसांचा, लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या, आयकर खात्याच्या अधिकाऱ्याचा ससेमिरा पण लावतात. अर्थात आपल्या न्यायव्यवस्थेत,, न्यायप्रक्रियेत राजकारणी आणि मोठे घपले करणारे यांना शिक्षा होणे फ़ारच दुरापास्त, असे लोक प्रामणिक म्हणून नव्हे तर पुराव्या अभावी सुटत असतात; सुटत आलेले आहेत. अशामुळे राजकारणी लोकांना आपला धंदा भ्रष्ट मार्गाने वाढविण्यास मदतच होते. हे उघड गुपित आहे की, कोणत्याच निवडणूकित बहूतेक उमेदवार कायद्याने ठरविलेल्या खर्चाचे बंधन पाळित नाहीत. असे असले तरी त्यांनी सादर केलेले खर्चाचे खोटे हिशोब ग्राह्य धरल्या जात असल्यामुळे, त्यांना अपात्र ठरविण्यात येत नाही. जणूकाही कायदा खोटे खर्चाचे हिशोब सादर करण्याकरिताच आहे. तदवतच प्रत्येक पक्षाजवळ जमा होत असलेल्या पैशांचा योग्य हिशोब कोणताच पक्ष ठेवित नाही, देत

नाही. पक्षाला वा राजकारण्यांना देणगी स्वरुपात मिळणारा पैसा, एकतर काळा असतो, वा सामान्य जनांची लुट करून मिळविलेला असतो. मोठमोठे उद्योगधंदे, कंपन्या, कारखानदार, देणगीदार हे पक्षांना, राजकारण्यांना ज्या मोठमोठ्या देणग्या देत असतील, त्याच्या कितीतरी पटीने आपला फ़ायदा अशांकडून करून घेत असतील. अशा तऱ्हेने राजकारण्यांचा धंदा हा मोठमोठ्या कारखानदारांसोबत वाढतच आहे आणि वाढतच राहणार आहे. राजकारणी लोक आपला धंदा फ़ोफ़ावा म्हणून मोठमोठ्या उद्योगधंदेवाल्याकडून मोठमोठी मदत घेत राहणार आणि अशा मोठमोठ्या कारखानदारांना मग ते सामान्य जनांना लुटू देणार. अशा तऱ्हेने राजकारणी आणि मोठमोठे कारखानदार आपला धंदा खुप वाढावा म्हणून जनतेची मुख्यत्वेकरून शेतकऱ्यांची, गावकऱ्यांची लुट करित आहेत, करित राहाणार आहेत. म्हणूनच आज देशातील ८०-८५ टक्के संपत्ती ही मुठभर लोकांक्डे केन्द्रित झालेली आहे. संपत्तीच्या विकेन्द्रिकरणाची तसेच समान वाटपाची भाषा बोलणाऱ्या आपल्या समाजवादी, लोकशाही देशाच्या घटनेची ही विल्हेवाट. अशी ही शोकांतिका. पाहा मग आता राजकारणाचा असा हा धंदा थांबविता येतो काय?

इतके मात्र निश्चित की, राजकारण्यांनी, नेत्यांनी आपला राजकारणाचा धंदा बंद केला आणि प्रामाणिकपणे जनकार्य

करण्याचे आरंभिले तर कोणत्याच सरकारी अधिकाऱ्याचे पैसे खाण्याची हिंमत होणार नाही. सरकारी अधिकारी मग भ्रष्टाचार करू शकणार नाहीत. सरकारी योजनांची कामे सुद्धा प्रामाणिकप्णे होतील. मोठमोठे उद्योगपती, कारखानदार सामान्य माणसांना लुटू शकणार नाहीत. संपत्तीचे विकेन्द्रिकरण होण्यास, करण्यास सुलभ होईल. थोडक्यात म्हणजे समाज व्यवस्थेतील भ्रष्टाचारांची मूळे ही राज्यकर्त्यांच्या, नेत्यांच्या म्हणजेच राजकारण्यांच्या अप्रामाणिकपणात आहेत. म्हणून समाज निकोप होण्याकरिता, करण्याकरिता सर्वप्रथम राजकारण्यांनी प्रामाणिक होणे आवश्यक आहे. होवू शकेल का असे? बनू शकेल का समाज निकोप?

# १९

# स्त्री-पुरुष समानता

जागतिक महिला परिषदेने ठरविल्याप्रमाणे १९१० सालापासून दरवर्षी ८ मार्चला जागतिक महिला दिवस साजरा करण्यात येतो. अशाच तऱ्हेने कितीतरी इतर दिवस-दिन साजरे केले जातात; जसे की, बालक दिन, ग्राहक दिन, वन दिवस, व्हॅलेंटाईन डे वगैरे वगैरे. असे दिन साजरे करण्याची प्रथा कशी आणि केंव्हा सुरु झाली हे सांगणे कठीण. परंतु असे दिन साजरे करण्यामागील उद्देश एकच की, ज्यांचेकरिता म्हणून तो दिवस साजरा केल्या जातो त्यांचेविषयी समाजात जागृती निर्माण व्हावी. अर्थात अशामुळे खरोखरच जागृती निर्माण होते काय आणि झालीच तर कितपत होते हा संशोधनाचाच विषय ठरावा. ज्यांचेकरिता म्हणून असे दिवस साजरे केले जातात, त्यांचे विषयी ठोस, भरीव असे काही केल्या जात नाही; करण्याची प्रामाणिक इच्छा असते किंवा नाही याविषयी सुद्धा सांशकताच असते. अशांचे आसू मात्र असे दिन साजरे करण्यातून काही अंशी पुसल्या जात असावेत. पाहा ना, जागतिक महिला दिन हा महिलांविषयी म्हणजे महिलांच्या स्वातंत्र्याविषयी, महिला-पुरुष समानतेविषयी जागृती निर्माण

व्हावी म्हणून साजरा केल्या जातो. आपल्या पुरुषप्रधान व्यवस्थेत महिलांना स्वातंत्र्य नाही, मोकळीक नाही; त्यांना पुरुषांपेक्षा कनिष्ठ समजल्या, गणल्या जाते; दुय्यम, पुष्कळ अंशी गुलामगिरीची वागणूक दिली जाते; त्यांचे जीवन पुष्कळ अंशी बंदिस्त असते, परावलंबी असते; पुरुषांची छाया म्हणूनच त्यांना वावरावे लागते. हे सर्व बदलावे ह्याकरिता जागृती व्हावी, समाजमने घडावी, वातावरण निर्माण व्हावे हाच उद्देश, असा दिन साजरा करण्यामागचा असावा.

पूर्वी, नवरा मरण पावला असता, त्याचे प्रेतासोबत स्वतःला जाळून घेवून स्त्रीया प्राणार्पण करित. परंतु पत्नि वारली असता तिच्या प्रेताबरोबर नवऱ्याने स्वतःला जाळून घेवून प्राणार्पण केल्याचे वाचण्यात, ऐकण्यात नाही. अशी ही सती जाण्याची प्रथा स्त्रीयांकरिताच का म्हणून होती, पुरुषांकरिता का नव्हती; हे धर्ममार्तंड, की ज्यांचेमुळेच अशी प्रथा सुरू झाली होती, तेच सांगू जाणे. अशाच तऱ्हेने विधूरांना गांधर्व विवाह करण्यास मोकळीक पण विधवांना पूनर्विवाह करण्यास बंदी का होती, हे सुद्धा धर्ममार्तंडांनाच माहित. काळाच्या ओघात आता ह्या प्रथा तसेच बालविवाह प्रथा बंद झाल्यासारख्याच आहेत. केल्या गेलेल्या कायद्यांनी ह्या प्रथा बंद होण्याला, करण्याला हातभारच लावलेला आहे. परंतु द्विभार्या प्रतिबंधक आणि हुंडा प्रतिबंधक कायद्यातील

पळवाटांमुळे हे दोन्ही प्रकार पुष्कळ अंशी सुरू असल्याचे अजूनही जाणवते. हुंडा सर्वत्र दिला, घेतला जात असल्याचे प्रत्ययास येते. हुंडाबळीच्या निरनिराळ्या कथा वर्तमानपत्रातून वाचावयास मिळतच असतात. तसेच मोठमोठे नेते, अभिनेते एक बायको असतांना दुसरी बरोबर लग्न करून वा न करून उघड उघड दोघींबरोबर वावरतांना, संसार करतांना दिसतात अणि अशांपुढे कायदा हतबल असल्याचे प्रकर्षाने लक्षात येते. विवाहित स्त्रीचे परपुरुषांशी संबंध आल्यास समाजात तिला भ्रष्ट गणल्या जात. परंतु परस्त्रीशी संबंध आलेल्या, असलेल्या विवाहित पुरुषाला मात्र समाजात भ्रष्ट म्हटल्या जात नाही. पूर्वी नवऱ्याने टाकल्यानंतर स्त्रीला घटस्फ़ोट मिळण्याची, व तिने दुसरा विवाह करण्याची सहज सोय नव्हती. आता कायद्याने तिला घटस्फ़ोट घेता येतो व दुसरे लग्न करता येते. अशा तऱ्हेने काळाच्या ओघात स्त्री स्वातंत्र्याबद्दलची उत्क्रांती बऱ्याच बाबतीत झालेली आहे; पुष्कळ बाबतीत ती व्हायची आहे. अशीच उत्क्रांती पुढेही होतच राहाणार आहे. परंतु याविषयी सखोल विचार करून, निश्चित धोरण मात्र आखण्यात येत नाही.

जागतिक दिनाचे दिवशी ज्या स्त्रीची सबला म्हणून, जगत जननी म्हणून, तोंड भरून (मग ती तोंडदेखली का असेना) स्तुती केल्या जाते, त्या महिलेला दुर्बल करण्यात, अबला ठरविण्यात,

सर्वात जास्त हात असेल, भाग असेल तर तो आहे धर्माचा. आपल्या धर्मानेच स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवलेले होते. धर्माने स्त्रीयांवर नाही ती बंधने लादलेली, लावलेली आहेत. तिचे आयुष्य चुल आणि मुल इतक्यापुरतेच सिमित केलेले आहे. तिला पुरुषांची दासी बनविलेले आहे. असे असूनही, आश्चर्याची गोष्ट अशी की, कोणत्याही धार्मिक कार्यक्रमाला स्त्रीयाच प्राधाण्याने, प्रामुख्याने उपस्थित असतात. त्यात त्याच बहुसंखेने भाग घेतात. कितीतरी अर्थहिन कर्मकांडे, विधी करण्यात स्त्रीयाच अग्रेसर असतात. अशी कर्मकांडे करण्यास लागणारे स्वातंत्र्य ते पुरुषांकडून हक्काने मिळवित असतात. जो धर्म आपल्यावर अधर्म करतो त्या धर्माबद्दलच्या स्त्रीयांजवळील ह्या अंधश्रद्धा ही आपल्या संस्कारांची किमयाच म्हटली पाहिजे.

स्त्रीयांना स्वातत्र्य नाही, स्त्रीया सबला नाहीत; हे जर खरे असते तर इंदिरा गांधी, मार्गारेट थेचर, सिरिमाओ बंदरनायके आदि स्त्रीया आपअपल्या देशात पंतप्रधान झाल्याच नसत्या. इतर कितीतरी अन्य क्षेत्रात कार्यरत राहिलेल्या, असलेल्या अनेक स्त्रीयांविषयी सुद्धा असेच म्हणावे लागेल. परंतु हे तितकेच खेदाचे की, अशा स्त्रीयांनी सुद्धा सत्ता आपल्या हाती असतांना, सामान्य स्त्रीयांच्या मनात निर्माण केल्या गेलेले, झालेले न्युनगंड कमी करण्याकरिता काहीच केलेले नाही. सद्याचेच पाहा ना! आमदार,

खासदार ह्यांच्या जितक्या जागा आहेत त्यापैकी ३० टक्के जागा महिलांना आरक्षित करण्याविषयी, ठेवण्याविषयी घोळ केंव्हापासूनचा चाललेला आहे. परंतु सोनिया गांधी ज्या कॉग्रेस सारख्या फ़ार काळ सत्तेवर राहिलेल्या राष्ट्रीय पक्षाच्या अध्यक्षा आहेत; स्त्री आहेत; त्यांनीच पुढाकार घेवून आपल्या पक्षात तरी स्त्रीयांना जास्त प्रमाणात उमेदवारी का देऊ नये. ? इतर पक्षातील नामांकित स्त्रीयांनी सुद्धा आपली पदे पणाला लावून असा हट्ट का धरू नये. ? पक्षाला सत्ता मिळवून देण्यापेक्षा स्त्रीला स्वातंत्र्य, समानता मिळवून देण्याला स्त्रीयांनीच प्राधान्य का देवू नये? आपल्या नवऱ्यांचे, भाऊ-वडील आदिंचे न ऐकता, स्त्रीयांनी स्त्रीयांनाच फ़क्त मतदान करून आपली शक्ती का दाखवू नये? सत्ता, अधिकार, स्वातंत्र्य हे मागून मिळतेच असे नव्हे. पुष्कळ वेळा ते हक्क दाखवून, ठसवून हस्तगत करावे, मिळवावे लागते मुळात विचार केल्यास स्त्रीयांच्या सद्याच्या अवस्थेला, दुरावस्थेला म्हणा हवे तर, जी अस्तित्वात आलेली व्यवस्था कारणीभूत आहे, ती निर्माण होवू देण्यात स्त्रीयांचा सुद्धा तितकाच हात आहे; हे जाणून घेणे आवश्यक आहे. स्त्रीयांना जर पुरुषांच्या दबावापासून वाचायचे असेल, त्यांचेविषयीच्या वाईट चालीरीती, प्रथा बंद करून त्यांची कथा बदलावयाची असेल, त्यांच्या विषयीच्या अनास्था घालवून त्यांचेविषयी सुंदर गाथा रचायची असेल, तर स्त्रीया सुद्धा याकरिता

पुढाकार घेवू शकतात. त्यांनीच पुढाकार घ्यायला पाहिजे. पुरुषांना जन्म देणारी, आयुष्यात आणणारी, स्त्री ही पुरुषांपेक्षा कनिष्ठ असूच शकत नाही. स्त्रीयाच स्वतःला कमी लेखतात, स्त्रीयाच आपण पुरुषांपेक्षा दुय्यम आहोत असे संस्कार येणाऱ्या स्त्रीयांच्या पिढीवर रुजवित असतात. मला नाही वाटत; घरातील, कुटुंबातील सर्व स्त्रीया एकत्र आल्यास त्या घरातील, कुटुंबातील पुरुषांचे काही चालेल म्हणून. स्त्रीच तर आपल्या मुलाला मुलीपेक्षा मोठे गणते, मुलाचे मुलीपेक्षा जास्त लाड पुरविते. स्वतःच आपल्या मुलीला तसेच सुनेला कनिष्ठ वागणूक देते. हुंडाबळीच्या कितीतरी प्रकरणात सासवांचाच प्रामुख्याने हात असल्याचे वर्तमानपत्रातून वाचण्यात येते. सुनेला मुलाऐवजी मुलगी होत असल्यास सासूच तिला गर्भपात करावयास लावते. सुनेला मुलगी झाल्यास सासूच तिचा छळ करिते, मुलाकडून सुनेचा छळ करून घेते. सुनेला मुल होत नसल्यास सासूच सुनेला वांझोटी ठरवून तिचे जीवन असह्य करिते; मग भलेही दोष आपल्या मुलात का असेना! येथूनच तर स्त्रीच्या पारतंत्र्याची, गुलामगिरीची, असमानतेची, दुय्यमतेची बीजे रोवली जातात आणि अशा तऱ्हेने याला प्रामुख्याने स्त्रीयाच जबाबदार असतात.

स्त्रीला आपल्या मुलांना, मुलींना सारखीच वागणूक देवू द्या! सुनांना सुद्धा आपल्या मुलींसारखे प्रेम, वागणूक देवू द्या!

विवाहित मुलींना सुद्धा आपल्या आपल्या सासूवर आईसारखेच प्रेम करू द्या;! मग पाहा घरातील पुरुषांची काय हालत होते ते! अधिकार सत्ता जावूनही पुरुषांची हालत फ़ारच आनंदी असेल! यामुळे स्त्री-पुरुष समानताच नुसती रुजणार नाही तर कुटुंबात आपोआप शांतता पण नांदेल. भगिनिंनो, पाहा तुम्हाला हे पटते काय? आणि यानुषंगाने तुम्ही काही भरीव कृती करू शकता काय?

# २०

# भ्रष्टाचार झालाय शिष्टाचार

सर्वत्र भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. जीवनातील अस एकही क्षेत्र नसाव की ज्यात भ्रष्टाचार नसेल. आपली संपूर्ण व्यवस्थाच भ्रष्ट झालेली आहे. कोणत्याही सरकारी कामाची सरकारी फ़ी देतांना तेथील बाबुंची, अधिकाऱ्यांची फ़ी (लाच) पण द्यावी लागते. न दिली तर साध्या कामासाठी, सामान्य जनांना इतके हेलपाटे खावे लागतात, किंवा जाण्या-येण्यात इतका वेळ वा पैसा खर्च करावा लागतो की, त्यापेक्षा ते वरची फ़ी देण्याचेच ठरवितात, पत्करतात; मनाविरुद्ध असले तरी.

बहुतेक सर्वच जन जेथे शक्य असेल तेथे, त्यांच्या पदाला अनुसरून, परिस्थितीनुरुप वरची कमाई करित असतात. अशी वरची कमाई करणाऱ्यांना पण जेंव्हा त्यांचे काम दुसऱ्या क्षेत्रात पडते, तेंव्हा त्यांना सुद्धा वरची फ़ी द्यावीच लागते. ज्यांना वरची कमाई होते त्यांना वरची फ़ी देणे अखडत नसावे. परंतु सामान्य माणसांना की जे खरोखरच प्रामाणिकप्णे जगू इच्छितात व ज्यांच उत्पन्न शेतीवर, मजुरीवर, छोट्या-मोठ्या व्यवसायांवर अवलंबून असते, ज्यांना वरच्या कमाईची हाव नसते आणि असली तरी वाव नसतो, त्यांना वरची फ़ी देणे किती दुरापास्त असते व अशामुळे

त्यांना किती मनःस्ताप सहन करावा लागतो हे अशांनाच माहित. कमी शिकलेले, साधे, भोळे, अडाणी लोक यांना वरच्या कमाईचे डावपेच तितके माहित नसतात. परंतु व्यवसायात, व्यवहारात, राजकारणात अनुभवी आणि शिकलेल्या लोकांना ही कला चांगलीच अवगत असते. त्यात ते निपूण होत असतात, झालेले असतात. पूर्वी अशी वरची फ़ी टेबलाखालून दिली जात असे. आता तर उघड उघड टेबलावरच, कागदावरच वजन ठेवल्या जाते. आणि विशेष म्हणजे असा हा भ्रष्टाचार सर्वजन उघड्या डोळ्यांनी पाहात असतात. तरीपण तो थांबविण्याकरिता कोणी काहीच करित नाही. भ्रष्टाचार आज शिष्टाचार झालेला आहे. जे भ्रष्टाचार करित नाहीत, जास्तिचा पैसा मिळवित नाहीत; त्यांना सामाजिक प्रतिष्टेपासून वंचित राहाव लागत. प्रामाणिकपणा अडगळीत पडत आहे. अप्रामणिकपणला प्रतिष्ठा प्राप्त होत आहे. असा आजचा समाज बनलेला आहे. त्याच वर्णन करतांना मी म्हणेल;

*सर्व ज्ञात आहे हे आज*
*भरकटलेला, विखुरलेला आपला समाज*
*जीवनाविषयी प्रत्येकाचे असती निरनिराळे अंदाज*
*नेत्यांना चढला आहे येथे सत्तेचा माज*
*विद्वांनांना जडली असे विद्वत्ता पाजळण्याची खाज*

*धनवान भुषविती अंगावरी श्रीमंतीचा साज*
*अधिकाऱ्यांना आपले अधिकार, पद यांचाच नाज*
*कर्मचारी नियम दाखवून काम पुढे ढकलण्यात चालबाज*
*म्हणण्या सेवक, परी त्रास दिल्याविणा, न करिती जनतेचे काज*
*गरीब आणि अज्ञानी, यांचा रडका चेहरा, दबका आवाज*
*मध्यम वर्गीय, कात्रीत जसा, सदैव निराश नि नाराज*
*प्रत्येकच पैसा, प्रतिष्ठा मिळविण्या, होवू पाहतो कावेबाज*
*जिकडे तिकडे ज्याच्या त्याच्या जाहिरातीच भडकबाज*
*ओळखणे कठीण, कोण प्रामाणिक आणि कोण दगाबाज*
*उरली नसे येथे कुणालाच कुणाचीच लाज*
*दुसऱ्याच्या सरणावर, स्वतःची पोळी भाज*
*सर्वांनाच हवा आहे येथे, संगमरवरी ताज*
*स्वतःच्या उत्कर्षासाठी, मग दुसऱ्याला पाणी पाज*
*संपूर्ण व्यवस्था सडकी, कुजकी झाली आहे आज*
*मेला आहे प्रत्येकाच्या, अंतर्मनातील आवाज*
*हेच आहे आजच्या, दुःखी अशांत समाजाचे राज*

अशी ही समाजाची भ्रष्ट व्यवस्था का झाली, याचा शोध घेता अस लक्षात येईल की, पैसा मिळविणे आणि भौतिक सुख उपभोगणे हेच जीवनाचे सार झालेले आहे. तोच जीवनाला अर्थ

आलेला आहे. शिक्षण घ्यायच, ते नोकरी मिळवून किंवा व्यवसाय करून गडगंज पैसा मिळविण्याकरिताच, व्यापार उद्योग करायचा तो सुद्धा अमाप पैसा मिळविण्याकरिताच आणि भरपूर पैसा जमा झाला की मनुष्य मग लागतो मान, सन्मान. पद सत्ता मिळविण्याच्या पाठीमागे, किंवा अगोदर सद्या झालेले गलिच्छ राजकारण करायच, खोटी प्रचलित प्रतिष्ठा मिळवायची, सत्ता हस्तगत करायची आणि या सर्वांचा उपयोग नंतर पैसा मिळविण्याकरिता करायचा अस चक्र अव्याहत फ़िरत असत.

शिक्षण, पैसा, सन्मान ह्या गोष्टी जीवनातील साध्य मिळविण्याकरिता साधन जरूर असतील, परंतु आज आपण ह्या साधनांनाच साध्य मानून बसलेलो आहोत. जीवनाच खर साध्य काय? याविषयी विचार करणेच सोडून दिलेले आहे. संपूर्ण समाज यामुळे असाच भरकटतच आलेला आहे, चाललेला आहे. जीवनाला अर्थापेक्षा अनर्थच आपण जास्त चिकटविलेले आहेत. जीवनाचा अर्थ (हेतू, उद्देश) फ़क्त अर्थच (पैसा, संपत्ती) झालेला आहे. यामुळे भौतिक सुख मिळत असल्याचे जरी दिसत असले तरी तणाव खुपच वाढलेले आहेत.

शिक्षण भ्रष्ट झालेले आहे. आपण तसे ते केलेले आहे. लाखो रुपये इंजिनिअरींग किंवा वैद्यकीय महाविद्यालयातील

प्रवेशाकरिता व शिक्षणाकरिता अवैध मार्गाने खर्च करून, जे इंजिनिअर वा डॉक्टर होतात ते आपल्या व्यवसायात नंतर भ्रष्ट मार्गाचा अवलंब करित असल्यास नवल ते काय! त्यात त्यांना तरी दोष देता येतील काय? सर्वच पेशातून, व्यवसायातून प्रामाणिकपणा लुप्त झालेला आहे, होत आहे. व्यापार, उद्योग हे तर भ्रष्टाचार केल्याशिवाय चालुच शकत नाहीत. आपले इंग्रजी धर्तीवर केलेले, असलेले अव्यवहारी कायदे, नियमच बहुतेकांना भ्रष्टाचार करण्यास, अप्रामाणिकपणा करण्यास प्रवृत्त करतात. मोठमोठ्या उद्योग धंद्यातील, कारखाण्यातील अधिकारी, व्यवस्थापक, कर्मचारी हे कितीही प्रामाणिक असलेत तरी व्यापार, उद्योग, धंदा वाढविण्याकरिता त्यांना भष्टाचाराचा अवलंब करावाच लागतो. किंबहूना मी तर असे म्हणेल, की लाच देणे, आमीष दाखविणे हा त्यांच्या नोकरीचा अविभाज्य भागच बनलेला आहे. फ़रक इतकाच की ते ही लाच कायदेशीर बनवून देतात. व्यापार, उद्योगातील भ्रष्टाचार कायदेशीर करण्याच्या कितीतरी पध्दती शोधून काढण्यात आलेल्या आहेत.

ज्या कंपन्या खूप नफ़ा कमावितात, ज्यांच्या शंभर रुपयांच्या शेअर्सची किंमत हजार रुपयांपेक्षाही जास्त असते, ज्या त्यांच्या भागधारकांना चांगला लाभांश देतात, त्यांची खूप वाहवा, स्तुती करण्यात येते. परंतु इतका अगडबंब नफ़ा कसा कमाविल्या

जातो, यात व्यवस्थापन कुशलतेचा भाग किती आणि भ्रष्ट मार्गाचा अवलंब किती याविषयी कोणीच विचार करित नाहीत. ज्या वस्तुंना जास्त मागणी आहे, त्या वस्तु तयार करण्याकरिता सरकारला कमीत कमी कारखाण्यांना परमीट देण्यास लावणे किंवा अशा वस्तुंना लागणारा कच्चा मालाचा कोटा सरकारकडून जास्तीत जास्त मिळविणे, थोडक्यात म्हणजे; राज्यकर्त्यांना, सरकारी अधिकाऱ्यांना लाच देवून, दबाव गट तंत्राचा वापर करून मोनॉपलि (मक्तेदारी) निर्माण करणे; तदवतच जाहिरातीद्वारे कृत्रीम मागणी तयार करणे; अणि अशा परिस्थितीचा फ़ायदा घेवून शंभर रुपयाची वस्तु हजार रुपयात विकून, सामान्य जनांना लुबाडून, नऊसे प्रतिशत नफ़ा कमाविणे हा भ्रष्टाचार नाही तर आणखी काय?

भ्रष्टाचाराशिवाय राजकारण करता येईल काय? सेवाभाव म्हणून प्रामाणिकपणे आनंद मिळविण्याकरिता राजकारण, समाजकारण करण्याचे दिवस केंव्हाच निघून गेलेत. लाखो-करोडो रुपये निवडणूकीत निवडून येण्याकरिता खर्च करणारे आमदार, खासदार प्रामाणिक असू शकतात काय? राहू शकतात काय? त्यांच्या भ्रष्टाचाराच्या पद्धती निरनिराळ्या असू शकतात. प्रमाण कमी जास्त असू शकत. त्यांचाही भ्रष्टाचार कायदेशीर असू शकतो. यदा कदाचित प्रामाणिक माणूस आमदार, खासदार झालाच तर त्याला राजकारणात टिकून राहण्याकरिता भ्रष्ट मार्ग स्वीकारावे

लागतात किंवा भ्रष्टाचाराकडे दुर्लक्ष करावे लागते. भ्रष्टाचार करणाऱ्यांना पाठीशी घालावे लागते. आणि हे जर केले नाही तर त्यांना बाहेर जावे लागते. स्वतःहून न गेल्यास त्यांना पद्धतशीरपणे बाहेर फ़ेकल्या जाते. याबाबत कोणालाही दोष देणे उचित होणार नाही. भ्रष्ट निवडणूकीच्या प्रक्रियेतून भ्रष्ट सरकारेच अस्तित्वात येणार आणि अशी सरकारे भ्रष्टाचारच वाढविणार, मग ती कोणत्याही पक्षाची असोत. कितीही भ्रष्टाचार निर्मुलनाच्या गोष्टी करोत. भ्रष्टाचार निर्मुलनाकरिता चळवळी करणाऱ्यांच्या हे लक्षात येत नाही काय? की भ्रष्ट राज्य सरकार भ्रष्टाचार निर्मुलन करील कसे? भ्रष्टाचार निर्मुलन हा स्वस्त लोकप्रियता मिळविण्याकरिता एक जाहिरातीचाच प्रकार राजकारणात, समाजकारणात वावरत आहे. भ्रष्टाचार करित असलेले पण भ्रष्टाचार उघडकीस न आलेले कितीतरी लोक, आम्ही भ्रष्ट नाही, प्रामाणिक आहोत हे रुजविण्याकरिता अशा चळवळीत पुढे पुढे करित असतात. हे तपासा अंती सहज लक्षात यावे.

सरकारात नसलेले विरोधी पक्षाचे लोक सतत सरकार भ्रष्ट आहे अशी टिका करित असतात. परंतु ही टिका फ़क्त सत्ता हस्तगत करण्याकरिताच असते. विरोधक सत्तेत आलेत म्हणजे तेही भ्रष्टाचारच करितात. हा आपल्या राजकारणाचा स्थायी भाव झालेला आहे.

सरकारवर किंवा सरकारातील कोणावरही भ्रष्टाचाराबाबत टिका किंवा आरोप झालेत की, सरकार त्याबाबतीत काहीतरी मलमपट्टी लावण्याचे काम करते; जसे की, ज्याचा भ्रष्टाचार उघडकीस आला त्याला सरकारातून काढून टाकणे, संशोधन करण्याकरिता आयोग नेमणे इत्यादि. मुळात कारण शोधण्याचे व त्यानुसार त्यावर उपाय करण्याचे होतच नाही. आणि हे जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत भ्रष्टाचार वाढतच राहिल.

मुळात विचार केल्यास असे लक्षात येईल की, या सर्व गोष्टीला कारणीभूत आहेत आपल्या सामाजिकीकरणाच्या; संस्कृतीकरणाच्या प्रक्रिया, म्हणजे थोडक्यात संस्कार; की ज्या द्वारे आपण भौतिक सुखाच्या लालसा वाढवितो, अप्रामाणिकपणाचेच संस्कार रुजवितो, शिक्षणातून ते कमी करण्यापेक्षा वाढवितो, आणि जोपर्यंत आपण हे बदलणार नाही, तोपर्यंत समाज भरकटतच राहणार, तणावाखालीच जगत राहिल. सध्यातरी इकडे कोणाचेच लक्ष आहे असे दिसत नाही. बघाव पुढे काय होते ते!शेवटी

*भ्रष्टाचारी भ्रष्टाचार निर्मूलन*

*ज्यांनी हाती बांधिलेले असते, समाजसेवेचे कंकण*

*जे स्वतःचे करुनी घेताती, समाजसेवक असे नामकरण*

*सरसावती ते करण्या समाजातूनी, भ्रष्ट गोष्टींचे उच्चाटन*

*यासाठी करणे जरुर असते, व्यापक चळवळ आणि आंदोलन*
*परि उभारण्या ते, हवे असते विपूल धन*
*शक्य नसतेच ते जमविणे, प्रामाणिक कमाईतून*
*पुढे येती ते देण्या, उजेडात न आलेले भ्रष्ट जन*
*उद्देश्य त्यांचा, झाकण्या आपली दुष्कृत्ये आणि वाईट वर्तन*
*आपली समाजाविषयीची खोटी कळकळ आणि श्रेष्ठता जनात रुजविण*
*समाजात दुर्जन, अशातऱ्हेने; वावरताती बनूनी सज्जन*
*समाजसेवकाहि, निस्पृह सेवेपेक्षा; प्रसिध्दिचेच आकर्षण*
*त्यामुळेच ते स्वीकारती, भ्रष्टाचाऱ्यांपासूनी दान*
*भ्रष्टाचाराचे, भ्रष्टाचारी पैशानेच करु जाती; निर्मूलन*
*वरुनी जरी, दिसत असली, यांची उंच मान*
*तरी, अंतरी ते, स्वतःचेच करिती अवमूल्यन*
*समाजसेवका आता तरी, करुन घे; याची तू जाण*
*उपकारदर्शक समाजसेवा नव्हे, समाज कार्यातच हो रममाण*
*भ्रष्टाचार निर्मूलना आवश्यक, प्रत्येकांतरी प्रामाणिकता रुजविण*
*त्यासाठी लहानपणीच द्यावे लागेल, योग्य संस्कार आणि शिक्षण*

# २१

# मरावे परि किर्ती रूपे उरावे

" मरावे परि किर्तीरूपे उरावे " ही म्हण सर्वांच्याच परिचयाची आहे. लहान मुलांना शिकवितांना हाच उपदेश केल्या जातो. बिघडलेल्यांना वठणीवर आणण्याकरिताही हेच बोल वापरल्या जातात. जीवनाचा अर्थसुद्धा ह्याच म्हणीतून सांगितल्या जात असतो. मेल्यानंतर आपले शरीर मातीत वा पंचमहाभूतात विलीन होवून जात, आपण उरतो ते फ़क्त इतरांजवळ असलेल्या आपल्या आठवणीतून. आणि अशा तऱ्हेने प्रत्येक जनच कमी अधिक प्रमाणात उरत असतो. अत्यल्प ते अति काळ उरत असतो. मनुष्य कसाही असला, आपल्या भाषेत वाईट जरी असला, त्याने आपण ज्याला वाईट कृत्ये म्हणतो ती जरी केलेली असलीत, तरी त्याचे नातेवाईक, ओळखीचे लोक, त्याला त्याचे मृत्युनंतर काही काळतरी, वाईट तऱ्हेने का होईना, पण स्मरतातच. माणसाच्या जीवनात किती जनांचा सहवास आला, त्या सर्वांबरोबर तो कसा वागला, यावर त्याच्या मरणोत्तर, तो त्यांच्या कसा व किती स्मरणात राहिल हे अवलंबून असते. जो जास्त लोकात कार्य करतो, वावरतो; जास्त लोकांचा ज्याला सहवास घडतो; तो मरणोत्तर जास्त लोकांच्या स्मरणात राहतो. तसेच सहवास हा

प्रत्यक्षच असला पाहिजे असेही नाही. अप्रत्यक्ष सहवास पण स्मरणात राहत असतो. हा अप्रत्यक्ष सहवास म्हणजे त्या माणसाचे त्याचे सहवासाशिवाय ज्ञात होणारे त्याचे कार्य. पूर्वीच्या काळी अशा कार्याची इतरांना माहिती ही त्या कार्याचे परिणाम पाहून होत होती. तसेच अशा परिणामांची माहिती, ज्यांनी असे परिणाम पाहिलेले आहेत, त्यांचेकडून ऐकून होत होती. आता तर प्रसार माध्यमाचे युग आहे. सर्वात जास्त प्राधान्य प्रसार माध्यमांनाच आहे. प्रसार माध्यमाद्वारे अशी माहिती आता क्षणात वणव्यासारखी सर्वत्र पसरत असते. चांगल्याच कृत्याची माहिती, महती पसरते असे नव्हे, वाईट गुणांची, वाईट कृत्यांची माहिती सुद्धा तात्काळ सर्वत्र पसरत असते. वाईट कार्य जो करतो त्याची अपकिर्ती व चांगले कार्य करतो त्याची किर्ती, जी सर्वांना ज्ञात होत असते, ती नंतरही पुष्कळ काळ लोकांच्या स्मरणात राहते. मनुष्य मेल्यानंतरही ती उरते. ती त्याच्या काळातील हयात असलेल्या व्यक्तींच्या स्मरणात उरते, तसेच पुस्तकाद्वारे वा अन्य माध्यमाद्वारे ती पुढील पिढ्यांच्या स्मरणात सुद्धा आणण्यात येते, पसरविण्यात येते. जितके दूरवर पसरलेल्या जास्त लोकांच्या, जितका जास्त काळ, त्या व्यक्तीच, चांगले-वाईट असे कार्य लोकांच्या स्मरणात येत राहिल, तितकी मरणोत्तर त्या माणसाची अपकिर्ती-किर्ती राहते, पसरत असते. अशी किर्ती-अपकिर्ती त्या व्यक्तीच्या

घराण्यात, नात्यात वा गावापुरतीच सिमित असू शकते; किंवा संपूर्ण राज्यात, देशात व जगात सुद्धा पसरू शकते. आणि असे कार्य, असे विचार जितका काळ (त्या व्यक्तीच्या मृत्युनंतर) लोकांना उपयुक्त, संदर्भयुक्त वाटतात, तितका काळ ते ज्ञात राहते. त्या माणसाची किर्ती-अपकिर्ती तितका काळ टिकून राहते.

फ़ारच व्यापक चांगले-वाईट कार्य करणाऱ्या लोकांची किर्ती-अपकिर्ती आता इतिहास लेखनाद्वारे सुध्दा बराच काळ, टिकवून ठेवल्या जाते. माणसाच्या अपकिर्तीची निंदा होत असते. किर्तीची वाहवा, तारीफ़ होत असते, कौतूक होत असते. ज्या व्यक्तीची निंदा होते, अपकिर्ती होते; ती त्या व्यक्तीपुरतीच मर्यादित असते असे नाही. त्याच्या देखत, त्याच्या हयात काळात आणि त्याच्या मृत्युनंतरही, त्याची झळ त्याच्या नजिकच्या नातेवाईकांना, त्याची ज्यांचेशी ओळखी होती, संबंध होते त्यांना पण बसत असते, लागत असते. आणि ज्याची किर्ती पसरत असते त्याचा फ़ायदा पण समीपच्या व्यक्तींना होत असतो. परंतु किर्तीचा फ़ायदाच होतो असे नाही. किर्तीवान व्यक्तींच्या समीपच्या लोकांवर एक वेगळीच जबाबदारी येवून पडत असते. अशा व्यक्तींची तुलना त्या किर्तीवान व्यक्तीबरोबर केल्या जात असते. आणि अशी तुलना करतांना पुष्कळ वेळा अशांना खजील पण केल्या जात असते. जसे की, याचा बाप पाहा कसा बुद्धीवान, होता

आणि हा पाहा कसा ’ढ’ निघाला. याच्या आजोबाच्या वेळी या घराण्याच काय नाव होत, आणि आज याला कोणी ओळखत पण नाही, वगैरे वगैरे. तदवतच अपकिर्ती पसरलेल्यांच्या समीपच्या चांगल्या लोकांना पण खजील केल्या जात. हा फ़ार हुशार आहे, पण काय उपयोग, शेवटी खुन्याचा, दरोडेखोराचा, चोराचाच पोरगा आहे. अशा रितीने किर्ती-अपकिर्ती पसरत राहते, चांगले वाईट परिणाम करित राहते.

”’मरावे परि किर्ती रूपे उरावे” याचा साधा, सरळ अर्थ जीवनात चांगले वागा, चांगले कार्य करा म्हणजे तुम्हाला तुमच्या मृत्युनंतरही लोक स्मरतील. तुम्ही जसे वागलात तसे वागतील. तुमचे अनुकरण करतील. विशेष म्हणजे तुमच्या नजिकच्यांना याचा जास्त फ़ायदा होईल. परंतु "मरावे परि किर्ती रूपे उरावे " याकरिता आता सर्वच जन ओढून ताणून किर्ती मिळविण्याचे मागे लागतात, लागलेले दिसतात. माणसाची किर्ती ही त्याच्या जीवनातील सर्वच क्षेत्रातील कार्यावर अवलंबून असावयास पाहिजे. परंतु एखाद्याने एखाद्या ठराविक क्षेत्रात खूप किर्ती मिळविली, लोकप्रियता मिळविली; की मग आपण त्याची इतर क्षेत्रातील अपकिर्ती, अपकार्य, वाईट कृत्ये सहज माफ़ करित असतो. त्या व्यक्तीच्या एका प्रबळ गुणांमुळे आपण त्याच्या अपकिर्ती, दुर्गुणांवर पांघरून घालत असतो. जसे की, क्रिकेटमध्ये

प्राविण्य मिळविणाऱ्यांना, तसेच सिनेमातील अभिनयामुळे लोकप्रिय, किर्तीवान झालेल्यांना, आपण त्यांच्या इतर वाईट कार्याविषयी माफ़ी देत असतो. सिने अभिनेत्यांवरील धाडीत करोडो रुपयांची संपत्ती सापडणे, सिने अभियंत्याने करोडो रुपये आयकर न भरणे, क्रिकेटपटूंच्या मॅच फ़िक्सिंग कडे दुर्लक्ष करणे, आपल्या लोकप्रिय राज्यकर्त्यांवर, नेत्यांवर अवैध संपत्ती जमविल्याबाबत खटले भरले जाणे, त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली दोषी ठरविले जाणे; वगैरे वगैरे आपण विसरत असतो; तिकडे दूर्लक्ष करित असतो. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.

आज प्रत्येकच जन किर्ती मिळविण्यात आयुष्य खर्ची घालतो. किर्तीच्या मागे धावत असतो. धावत आहे. किर्ती म्हणजे लोकप्रियता असेही समीकरण होत आहे. झालेल आहे. आणि म्हणून अशी किर्ती, लोकप्रियता मिळविण्याकरिता, सद्याच्या फ़ारच प्रगल्भ अशा, जाहिरात माध्यमांचा वापर करण्यात येत आहे. येत असतो. जाहिराती ह्या सत्यापेक्षा, भडकपणांवर, अवाजविकतेवर जास्त आधारित असतात. लोकांना भुलविणे, लोकांना आपण जे सांगतो त्याविषयी भूरळ पाडणे हा जाहिरातीचा उद्देश असतो. सत्य दडवायच आणि खोट भासवायच (Suppressio veri and suggestio falsi) हा जाहिरातीचा

आधार असतो. वाईट मार्ग अवलंबविण्यामुळे माणसाला अपकिर्ती मिळायला पाहिजे, परंतु जाहिरातबाजीची किमया, अशांना अपकिर्ती ऐवजी किर्ती मिळते. तुमच्या भल्या मोठ्या दुष्कृत्यांना लपवून एखाद्या छोट्याशा कार्याला डोंगराएवढी प्रसिद्धी मिळवून देते. आणि त्यामुळे तुम्हाला लोकप्रियतेच्या शिखरावर चढविते. किर्तीवान बनविते, अपकिर्तीला किर्तीमध्ये बदलविते.

आज लोकप्रियतेच्या, किर्तीच्या शिखरावर असलेले लोक, फ़क्त नावाचेच किर्तीवान असतात. प्रत्यक्षात ते जास्त अपकिर्तीवानच असतात. हे सर्व चालत कारण आपण ज्यांना किर्तीवान समजतो, ते खरोखरच किती किर्तीवान आहेत, हे तपासण्याच प्रयोजनच मुळी आपल्याजवळ नसते, नाही.

तुम्ही ज्यांना ज्यांना किर्तीवान समजता; समाज सुधारक समजता; समाजसेवक समजता; त्यागी समजता; आदर्शवान मानता त्या सर्वांच वैयक्तीक, कौटुंबिक आयुष्य मुळात तपासा आणि स्वतःशीच प्रामाणिक राहून सांगा की, समजा ते जसे जगलेत तसे आयुष्य तुम्हाला दिले तर तुम्ही पत्कराल काय? न पत्कराल तर का नाही? ते जगलेत तस वैयक्तीक, कौटुंबिक आयुष्य जगणे जर तुम्हाला पसंत नाही, तर त्यांच संपूर्ण जीवन तुमच्याकरिता आदर्श कसे? हा असा आदर्शवाद, ध्येयवाद वृथा आहे. जो आपले

कुटुंब सांभाळू शकत नाही, सुखी आणि आनंदी ठेवू शकत नाही, त्याने दुसरी कितीही कुटुंबांना आनंद देण्याचा प्रयत्न केला तरी तो श्रेष्ठ होवूच शकत नाही. अशांनी दुसऱ्यांची कुटुंबे सुखी, आनंदी करण्याचा प्रयत्न करायचा आणि मग काय यांच कुटुंब दुसऱ्यांनी सुखी करायच की त्यांना दुःखात जगू द्यायच? स्वतःच घर सांभाळून, स्वतःच्या कुटुंबातील सर्वांना सुखी, आनंदी ठेवून, समाज कार्यातून (समाजसेवेतून नव्हे, सेवेला उपकाराचा, सन्मान मिळण्याचा स्पर्श आहे) दुसऱ्यांनाही आनंदी करून आपला व कुटुंबाचा आनंद वाढविणारा सामान्य माणूसच श्रेष्ठ असतो. भलेही त्याला प्रसिद्धी मिळो वा न मिळो. किर्तीच्या मागे धावण्यात आपल आयुष्य बरबाद करणे आहे आणि याच ज्वलंत उदाहरण म्हणजे आपले माजी पंतप्रधान मा. श्री. नरसिंहराव. या सज्जन, विद्वान, साधा, सरळ दिसणाऱ्या माणसाने किर्तीच्या मागे धावून कशी अपकिर्ती मिळविली, आपल्या आयुष्याच्या शेवटच्या पर्वात मानसिक दुःख भोगल; हे त्यांना झारखंड मुक्ती मोर्चा प्रकरणात, आपले पंतप्रधानपद टिकविण्याकरिता लाच दिली म्हणून दोषी ठरविण्यात आलेल्या कोर्टाच्या निकालावरून दिसून येते. जाहिरातबाजीतून किंवा वाईट मार्गाने किर्ती मिळविणीऱ्यांना, मिळू पाहणाऱ्यांना हा धडा होवू शकेल काय? अपकार्यामुळे जी किर्ती सद्या मिळत आहे, किर्ती मिळविण्याकरिता जी अकृत्ये केली जात

आहेत, ती यापासून धडा घेवून थांबतील काय? मला नाही वाटत अस काही होईल म्हणून. अस असत तर, ज्या पंतप्रधानांनी(मा. नरसिंहरावांनी झामुमोचे खासदार विकत घेवून) ५ वर्षे राज्य केले, त्या देशातील लोक शांत राहिलेच नसते. भ्रष्ट मार्गाने सत्ता मिळविणे, मिळवू देणे हे आपणा सर्वांना मान्य आहे, असे मानायचे काय? या पंतप्रधानांचा भ्रष्टपणा उघडकीस आला, बाकीच्या पंतप्रधानांचा, राज्यकर्त्यांचा उघडकीस आलेला नाही, येणार नाही; सिद्ध होणार नाही. परंतु सत्ता माणसाला भ्रष्ट करते या तत्वानुसार ते सर्व किर्तीवान लोक भ्रष्ट कशावरून नसतील. कधीकधी सत्तावान मनुष्याच्या उत्तुंग व्यक्तीमत्वामुळे अशी प्रकरणे समोर येत नसावित. देशात सर्वात जास्त सन्मानाच पद, म्हणून सर्वात जास्त किर्तीवान पंतप्रधान असतात, त्यांची ही कथा, तर इतर किर्तीवानांच काय? म्हणून मरणोत्तर आपण अशा रितीने, तऱ्हेने किर्तीरूपे उरणार आहोत काय? आहात का? याचा विचार आपणच की आणखी कोणी करावे. ; हे सुद्धा आपणच ठरवावे. शेवटी मी इतकेच म्हणेल की भलेही आपण मरणोत्तर किर्ती-विनाकिर्ती रूपे उरावे, पण,

"मरावे परि सहज प्रामाणिकपणे आनंदी जगूनि जावे "

# (२२)

# आराम आहे हराम

"आराम है हराम " ही म्हण हिंदीत चांगलीच रुजलेली आहे. ह्या म्हणीचा मराठीत पण बराच वापर होतो. हरामी म्हणजे बेईमानी. म्हणून या म्हणीचा अर्थ, आराम करणे हे आपल्या जीवनाशी बेईमानी करणे असा होईल. ही म्हण प्रचलित करण्यामागचा उद्देश हाच असावा की, लोकांनी काम करावे, की जेणेकरून त्यांचा विकास होईल. त्यांनी ऐदी आणि माझ्या (नावा) सारखे आळशी होवू नये. प्रगतीकरिता काम करणे आवश्यक आहे. परंतु प्रगती म्हणजे काय? खरोखरच काम केल्याने प्रगती होते काय? आणि कोणतेही काम केल्याने प्रगती होते काय?

खरे काम म्हणजे अंग मेहनत. परंतु अंग मेहनतीचे काम केल्याने जर प्रगती होणार असती, तर आज खेड्यात शेतीवर राबणरे शेतकरी; शेतमजूर, शेतीशी निगडीत इतर काम करणारे लहान लहान व्यवसायी जसे की सुतार, लोहार, गुराखी आदी तसेच इतर निरनिराळ्या तऱ्हेची काम करणारे कारागीर; मजूर हे प्रगत झाले नसते काय? ते आर्थीक दृष्टया मागे राहिले असते काय? अर्थात यातील पुष्कळ कारागीर हे आपले काम करण्यात

प्रामाणिक नसतात हेही तितकेच खरे. आज नोकऱ्या मिळणे दुरापास्त झालेले आहे. पण चांगले कारागीर यांचीही चणचणच जाणवते. चांगल्या प्रशिक्षित कारागीरांना अजूनही कामाची कमतरता नाही. परंतु प्रामाणिक अंग मेहनतीने प्रगती होते, यावरचा त्यांचाही विश्वास उडालेला असावा. कारण जे काम करून प्रगत झालेले दिसतात, ते तरी प्रामाणिक आहेत काय? कदाचित ते खूप वेळ कामात घालवित असलेले दिसत असतील, परंतु त्यांचे काम, त्यांची नियत प्रामाणिकच असेल याची ग्वाही देता येईल काय?

दुसरे म्हणजे, एखादा जर शिकून पदवीधर झाला आणि त्याला नोकरी मिळाली, मग ती कचेरीतील कारकुनाची असो, शिक्षकाची असो की अधिकाऱ्याची वा अन्य कोणतीही असो; त्यांना जे काम करावे लागते ते काम; आणि शिक्षणात अयशस्वी राहिल्यामुळे वडीलोपार्जित व्यवसाय म्हणून कारागीरांना किंवा कारागीरांचे दुय्यम समजले जाणारे शिक्षण घेणाऱ्यांना जे काम करावे लागते, ते काम सारखेच असते काय? पहिल्या तऱ्हेच्या कामात किती आराम, सवलती असतात, मिळकत असते; पुष्कळसे काम तर पांढऱ्या कागदावर काळे करणेच असते. माझे हे लेख लिहीणेही त्यातलेच एक असू शकते. तरीही या कामाला आपण श्रेष्ठता देतो, उच्च दर्जा देतो. याउलट अंग मेहनतीचे कामात कितीही घाम असला तरी त्याला आपण दुय्यम समजतो, अशांना

अपमानास्पद वागणूक देतो, कमी मेहनतनामा देतो. या जगात, आजच्या बुद्धिवादी युगात बुद्धिला अनन्य महत्व आलेले आहे; मग ती वक्र बुद्धि का असेना! अशा बुद्धिवादामुळेच समाजवाद बाजुला गेलेला आहे. पूर्वीच्या काळी वेदाध्यायी ब्राम्हण बुद्धिवादी म्हणून, अंग मेहनतीचे काम करणाऱ्या वैश्य, शुद्र यांचेपेक्षा सर्वच बाबतीत श्रेष्ठ समजल्या जात होते. आणि आजही तसेच आहे. बुद्धिवाद्यात ब्राम्हणांबरोबर इतर शिकलेल्यांची भर पडली इतकेच. खर म्हणजे बुद्धिवादी लोकांनी हे जाणायला पाहिजे. परंतु खेदाने म्हणावे लागते की, तेच भेद वाढवितात, भेदाचा पुरस्कार करतांना आढळतात. खऱ्या समाज जीवनाकरिता, माणसा-माणसातील लहान-मोठे भेद नष्ट होण्याकरिता, हे बदलणे आवश्यक आहे. परंतु हे तेंव्हाच होईल, जेंव्हा सर्व बुद्धिवादी विवेकवादी होतील.

अशा या व्यवस्थेला आपले राज्यकर्ते हेही तितकेच जबाबदार आहेत. हे लोक स्वतःला समाजसेवक समजत असलेत तरी, ते खऱ्या अर्थाने समाज भेदक आहेत. समाजवादाचा पुरस्कार करून हे नेते होतात आणि एकदा नेते झाले की ते प्रचलित व्यवस्थेत गुंतून जातात. स्वतःचाच आर्थिक विकास आणि सत्ता टिकविणे यात गुंरफ़टल्या जातात.. आणि असे करतांना जर काही थोडे फ़ार समाजकार्य झालेच तर तो अपघात असतो, योजनाबद्ध कार्यच नसते. आणि जितकी अशी कामे हे करित असतात, त्याचे

कितीतरी पट वर्तमानपत्रातून आपण केलेल्या कामाची जाहिरात करण्याचेच काम हे करतात. आजकाल अशा स्वतःच स्वतःची प्रसिद्धि करून घेण्याचे पेवच फ़ुटलेले आहे. आपले राज्यकर्ते, मोठमोठे नेते ज्यांना आपण प्रतिष्ठीत, प्रगत समजतो; ते १७-१८ तास दररोज काम करित असल्याचे सांगितल्या जाते. परंतु यातील जास्तीत जास्त वेळ ते भाषणात, स्वतःचा सत्कार करून घेण्यात, ज्याचेपासून आपला फ़ायदा होवू शकतो अशांचे सत्कार करण्यात, काम सुरू करतांनाचे तसेच काम पूर्ण झाल्यानंतरचे उदघाटने करण्यात, आपल्या पक्षाच्या भ्रष्टाचारी कामावर पांघरून घालण्याच्या आणि विरोधकांचे भ्रष्टाचार उघडकीस आणण्याच्या मोहिमेत, निवडणूका लढविण्यात, निवडणूकात प्रचार करण्यात, आपले कार्यकर्ते सांभाळण्यात, थोडक्यात स्वतःची किंमत, स्वतःचा सन्मान, स्वतःचा हुद्दा वाढविण्यात, खुर्ची टिकविण्यात खर्ची घालतात. आता मला सांगा; राज्यकर्त्यांचे; खालच्या स्तरावर जावून एकमेकांच्या उखाड्या-पाखाड्या काढणे; समाजासमाजात बेदिली पसरविणे; जातीवादाला खतपाणी घालणे; धर्मांधतेला प्रोत्साहन देणे, विरोधकांचा काटा काढण्याचा, त्यांचा सफ़ाया करण्याचा प्रयत्न करणे, सत्ता टिकविण्यासाठी भ्रष्टाचार करणे, भ्रष्टाचाराला पाठीशी घालणे, हे सर्व हराम नव्हे काय?त्यांनी अशा कामात व्यस्त राहून, तणावपूर्ण, तणावयुक्त परंतु

ज्याला व्यवहारी भाषेत प्रगती म्हणतात ती केल्यापेक्षा; घरी बसून आराम करणेच समाजाच्या आरोग्याकरिता अधिक चांगले होणार नाही काय?

असेच आहे आपल्या देशातील सर्वात प्रगत, विकसित गणल्या जाणाऱ्या मोठमोठ्या कारखानदारांचे की, ज्या अशा मुठभर लोकांजवळ आज देशातील जवळ जवळ ८० ते ८५ टक्के संपत्ती एकवटलेली असेल. ह्या लोकांनी अशी प्रगती म्हणे, दिवसरात्र काम करून केलेली असते. जरूर. परंतु दिवस रात्र हे कोणती कामे करतात, कशी करतात याचा शोध घ्यायला हवा. यावर शोध निबंध लिहायला हवा. यांच्या कामापैकी यांचा किती वेळ पंचतारांकित हॉटेलांमध्ये सुक्या ओल्या पार्ट्यात, मजा करण्यात जातो; प्रतिस्पर्ध्यांवर भ्रष्टाचारी मार्गाने कुरघोडी करण्यात जातो; राज्यकर्त्यांबरोबर लागेबांधे साधण्यात जातो; त्यांचे बरोबर गैरमार्गाने देवाण-घेवाण करण्यात जातो; कितीतरी जनांना बेमालूमपणे लुबाडण्यात जातो; सामान्य माणसांना त्यांचे नकळत फ़सव्या जाहिरातीद्वारे वा अन्यथा भुलविण्यात जातो; निरनिराळे कितीतरी प्रकारचे लफ़डे करण्यात जातो; हे अशा शोध निबंधातून बाहेर यावे. काही नगण्य लोकच कधीकधी साफ़ळयात अडकतात, अन्य अगणित लोक कायदेशीरपणे बेकायदेशीर कृत्ये करण्यात सफ़ल झालेले असतात, आणि हे कोणाला कळतही नसत. आणि

कळल तरी काही उपयोग नसतो. अशांना आपण कर्तबगार म्हणतो, हरामी नाही. आता याला काय म्हणावे?

शेवटी आरामाविषयीची माझी नेहमीचीच गोष्ट. इंग्रजांचे काळात, उन्हाळयात एके दिवशी, जिल्ह्याचे कलेक्टर, एका गावच्या भेटीला, शेतसारा आदी (Revenue) जमा करायला निघाले होते. गावापासून साधारणपणे दोन-तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या एका शेतात, सकाळी १० वाजताचे सुमारास, एका आंब्याच्या झाडाखाली, आपल्या पागोट्याची उशी करून, पायावर पाय ठेवून, निर्धास्तपणे पहूडलेला एक शेतकरी त्यांनी पाहिला. कलेक्टरला वाटले, हा शेतकरी आत्ताच पायीपायी घरून आलेला असल्यामुळे, दमलेला असेल म्हणून थोडा आराम करून कामाला जुंपेल; करिता तिकडे दुर्लक्ष करून कलेक्टर गावात गेले. गावातील सर्व कामे उरकलीत. पाटलांची मेजवानी घेतली आणि तीन वाजताचे सुमारास परतीस निघालेत. परततांना त्यांना तोच शेतकरी, त्याच शेतात, त्याच आंब्याच्या झाडाखाली, इतर शेतकऱ्यांसोबत चौसर खेळतांना आढळला. कलेक्टरला आश्चर्य वाटले. त्यांनी आपल्या शिपायाकरवी त्या शेतकऱ्याला बोलाविले आणि विचारले की, का रे बाबा तू दिवसभर आराम, मौजच करतो. शेतकाम का करत नाही. यावर शेतकऱ्याने, शेतीची सर्व कामे झालेली आहेत, पावसाची वाट बघतो आहे; पाऊस आला की

पेरणी करील असे उत्तर दिले. यावर कलेक्टर पुन्हा म्हणाले, नाही नाही, असा व्यर्थ वेळ गमावू नको, आणखी जास्त शेतीची मशागत कर. शेतकरी म्हणाला, साहेब त्याने काय होईल? कलेक्टर उत्तरले, काय होईल! तुला पीक जास्त येईल, जास्त उत्पन्न होईल. शेतकऱ्याचा पुन्हा प्रश्न, साहेब मग काय होईल? कलेक्टरचे उत्तर; काय होईल! अरे जास्त पैसा मिळाला की तू चांगला आराम करू शकशील. शेतकरी यावर उत्तरला, पण मग साहेब, मी आता काय करित आहे.

या गोष्टीतील अतिशयोक्ती सोडून "आराम आहे हराम" याचा खरा अर्थ समजून घ्यावा. जीवन जगण्याकरिता लागणारे अर्थार्जन मिळविण्याकरिता काम, ठरलेल्या वेळी करणे अत्यंत गरजेचे असते, यात वादाचे कारणच नाही. तदवतच कामाबरोबर प्रकृती योग्य राखण्याकरिता, आरोग्य-निरोगी ठेवण्याकरिता, स्वास्थास्तव आरामाची पण आवश्यकता आहेच. याकरिता फ़ॅक्टरी ऍक्ट आणि इतर कायद्यानुसार आठवड्यात ४८ तासापेक्षा आणि रोज साडेनऊ तासापेक्षा जास्त काम करण्यास मज्जाव आणलेला आहे. तसेच सतत पाच तास काम केल्यानंतर आरामाकरिता एक तासापर्यंत सुट्टी देण्याची पण तरतूद कायद्यानुसार केलेली आहे. परंतु कामाचे वेळातही आरामच करणे, हॉटेलवर चहापाणी पीत राहणे, पाणपट्ट्यांवर पान खात राहणे,

फ़ोनवर घरी, सहकाऱ्याशी गप्पा मारित राहणे, जे कामाकरिता आपणाकडे येतात त्यांना ताटकळत ठेवणे, त्यांच्या कामाची टोलवा-टोलवी करणे, त्यांना भंडावून सोडणे,; अशाने आपला पगार मिळणे थांबणार नाही; परंतु समाजाची प्रगती, स्वतःचा वैयक्तीक मनसिक विकास नक्कीच होणार नाही, खरा मानसिक आनंद मिळणार नाही. नेमून दिलेले काम, नेमून दिलेल्या वेळात, कार्यक्षमरित्या प्रामाणिकपणे करणे हेच खरे उत्पादित कार्य (productive work), हीच खरी समाजसेवा, समाजकार्य. यातून निर्मित खेळीमेळीच्या वातावरणातच खरा निखळ आनंद. अनुत्पादित, अनावश्यक, अकार्यक्षम, समाजविघातक, वृथा प्रतिष्ठा-सन्मान वाढविणारे, भ्रष्ट आणि भ्रष्टाचार जोपासणारे काम करणे, (मग ते तुम्ही कितीही तास का कराना आणि भ्रामक आनंद उपभोगाना) ते हरामच; हे सुद्धा जाणावे. एवढेच. शेवटी, नुसताच आराम जरूर हराम; पण हरामी कामही हराम

# २३

# श्रद्धा आणि अंधश्रद्धा

## समज-गैरसमज

श्रद्धा आणि अंधश्रद्धा याविषयी बरेच गैरसमज आहेत. आपण ठेवतो त्या श्रद्धा आणि इतरांच्या अंधश्रद्धा. शिक्षित लोकांच्या श्रद्धा आणि अशिक्षित-अडाणी लोकांच्या अंधश्रद्धा. खेड्यातील लोकांच्या अंधश्रद्धा आणि शहरातील लोकांच्या श्रद्धा. श्रीमंतांच्या श्रद्धा आणि गरीबांच्या अंधश्रद्धा. अशा तऱ्हेचे बरेच गैरसमज समाजात पसरलेले आहेत. असे चुकीचे समज सोयीस्कररित्या पसरविलेले आहेत. श्रद्धा कोठे संपतात आणि अंधश्रद्धा कोठून चालू होतात हे कळणे कठीण आहे, अस मानल्या जात. आणि म्हणूनच श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धेच स्तोम माजवू नका आणि अंधश्रद्धा निर्मूलन करतांना श्रद्धांचा बिमोड करू नका अशासारखे प्रश्न विचारले जातात, उठविले जातात. परंतु श्रद्धा म्हणजे काय? श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात काय फ़रक आहे, हे कोणीच विषद करतांना दिसत नाहीत. याविषयी मुळात विचार केल्यास आपल्या अस लक्षात येईल की, आपण सर्वच शिक्षित-अशिक्षित, गरीब-श्रीमंत, शहरवाशी-

खेडेवाशी अंधश्रद्ध आहोत.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्या व्याख्या केल्यानंतरच आपणाला त्यातील फ़रक समजू शकेल. शब्दांच्या व्याख्या शब्दांनीच कराव्या लागतात. आणि आपण एका शब्दाचा अर्थ दुसऱ्या शब्दांनी कितीही अचूक सांगण्याचा प्रयत्न केला तरी तो तंतोतंत असेल किंवा नाही याविषयी सांशकताच असते. कारण प्रत्येक शब्दाला आपल स्वतंत्र अस अस्तित्व असत. पुन्हा शब्दांची उत्पत्ती पाहिल्यानंतर, शब्द ज्या विशिष्ट अर्थाने किंवा अर्थाकरिता उत्पन्न होतो, तोच अर्थ कायम राहात नाही. कालपरत्वे, उपयोगानुसार शब्दांचे अर्थ बदलत जातात. माझ्या मते श्रद्धा हा शब्द उत्पन्न झाला तेंव्हा तो फ़क्त धर्माशीच निगडित असावा. धार्मिक बाबीवर अतुट, प्रगाढ विश्वास म्हणजे श्रद्धा, अशी या शब्दाची उत्पत्ती असावी. परंतु आता श्रद्धा हा शब्द व्यवहारात अनेकार्थाने वापरल्या जातो. व तो शब्द फ़क्त धर्माशीच निगडित राहिलेला नाही. शब्दाचा मुळ अर्थ (उत्पत्तीतून आलेला) काय आहे याला महत्व नसाव. त्या शब्दाचा सद्या वापर कसा होतो, त्या शब्दाचा प्रचलित काय अर्थ आहे, आहेत हे महत्वाच ठराव. आणि या दृष्टीने अपण श्रद्धा या शब्दाविषयी बघणार आहोत.

माझी माझ्या आईवडिलांवर श्रद्धा आहे. संतावर श्रद्धा, गुरुवर श्रद्धा, येथे श्रद्धा म्हणजे आदरामुळे असलेला विश्वास असा होतो. तसेच दुसऱ्यांचे चांगले केले म्हणजे आपलेही चांगले होते अशी माझी श्रद्धा आहे. येथे श्रद्धा म्हणजे धारणा अशा अर्थी उपयोग होतो. सजीव वस्तुप्रमाणेच आजकाल निर्जीव वस्तुविषयीचा आदर दाखविण्याकरिता श्रद्धा या शब्दाचा वापर करतात. जसे की, नदीवरील श्रद्धा, पर्वतावरील श्रद्धा, भाषेवरील श्रद्धा, देशावरील श्रद्धा वगैरे वगैरे.

याप्रमाणे श्रद्धा आणि विश्वास हे शब्द बऱ्याच प्रमाणात समानार्थी वापरले जातात. इंग्रजीमध्ये श्रद्धा म्हणजे Faith आणि विश्वास म्हणजे Trust, Confidence. श्रद्धा, धारणा, विश्वास (Faith, Belief, Trust, Confidence) हे सर्व शब्द proneness दर्शवितात म्हणजे शक्यता दर्शक, प्रवृत्ती दर्शक आहेत. तसेच capacity, दर्शक म्हणजे शक्यतेच प्रमाण दर्शक आहेत. competency दर्शक म्हणजे पूर्णत्व दर्शक नाहीत. हे सर्व dispositional मनाचा कल दर्शक, व्यवस्था दर्शक तसेच modal म्हणजे रीत, तऱ्हा, पद्धती, प्रकार, मार्ग दर्शक शब्द आहेत. आपण जर एका टोकाला अनिश्चितता आणि दुसऱ्या टोकाला निश्चितता अशी रेषा काढली तर या रेषेवर अंदाज, शक्यता, भरवसा, मत, धारणा, खात्री, श्रद्धा, विश्वास, दृढविश्वास हे शब्द असतील.

श्रद्धा हा शब्द जरी पुरावा वाचक किंवा सत्यवाचक नसला तरी जीवनात श्रद्धा राहातीलच. त्या का आणि कशा राहातील हेच आता आपण बघणार आहोत. जन्मल्यानंतर आपणाला निसर्गाविषयीची किंवा सभोवतालची, समाजाविषयीची, जीवनाविषयीची माहिती मुख्यत्वेकरून तीन प्रकारांनी मिळते. पहिले, प्रत्यक्ष प्रमाणातून, (Perception) आपण जे पाहातो अनुभवतो त्यामधून. दुसरे, शब्द प्रमाणातून, (Oral Testimony) आपले आई-वडिल, आप्तजन, गुरुजन, वडिलजन जे आपणाला सांगतात त्यामधून, इतकेच काय, पुस्तके वाचून जी माहिती मिळते, ती याच सदरात मोडते. येथे आपणाला बोललेले नव्हे तर लिहिलेले शब्द माहिती देतात. आणि तिसरे, अनुमान प्रमाणातून. (Inference) आभाळात ढग आले म्हणजे पाऊस येणार, धूर निघत असलेला दिसला की काहीतरी जळत असणार. हे अनुमान प्रमाण.

वरील तिन्ही प्रमाणांच निरिक्षण केल, तर अस दिसून येईल की या तिन्ही प्रमाणाद्वारे माहिती मिळविण्याकरिता श्रद्धेची नितांत आवश्यकता आहे. वरील प्रमाणातून मिळते ती माहिती असा शब्द प्रयोग मी मुद्दाम केलेला आहे. ज्ञान हा शब्द वापरलेला नाही. माहिती आणि ज्ञान तस पाहिल तर एकच, तरीपण यात फ़रक आहे. तो असा की माहिती चूक असू शकते. अचूक माहिती म्हणजे ज्ञान.

मिळालेल्या माहितीची सत्यासत्यता तपासल्यानंतर ती अचूक असेल तर तिला ज्ञान. म्हणावे, समजावे.

शब्द प्रमाणातून मिळालेली माहिती ही श्रद्धेवरच अवलंबून असते. तुम्ही ज्या व्यक्तीकडून किंवा जेथून माहिती घेता तेथे तुमची श्रद्धा नसेल तर तुम्हाला माहिती मिळणार नाही. ज्यावर आपली श्रद्धा आहे, विश्वास आहे तेथून मिळालेली माहितीच आपण गृहित धरतो. ती पुष्कळ प्रमाणात खरी मानतो. येड्या-गबाळ्याने सांगितलेली माहिती आपण लक्षातच घेत नाही. जीवनात शब्द प्रमाणातून मिळालेल्या माहितीवर, ज्ञानावर अवलंबून राहावच लागत. जोपर्यंत ती माहिती चूक आहे अस आपणाला ठामपणे कळत नाही तोपर्यंत तरी ती खरी मानावीच लागते. सर्वच गोष्टी प्रत्यक्ष प्रमाणातून कळू शकत नाहीत. तुम्ही तुमच्या आईच्या पोटी जन्म घेतला हे तुम्हाला पाहाण, अनुभवन शक्य नाही. विष प्राशन करून विषाची परिक्षा घेता येईल का? तसेच बऱ्याच प्रत्यक्ष दर्शनी बघीतलेल्या, अनुभवलेल्या गोष्टी सुद्धा खऱ्याच असतील अस नाही. आपण जेथून त्या पाहातो किंवा जो कोणी आपणाला त्या गोष्टी दाखवितो, त्यात सुद्धा फ़सगत असू शकते. त्याची सत्यासत्यता श्रद्धेवरच अवलंबून असते. अनुमान प्रमाणाचे सुद्धा तसेच. जी अनुमाने आतापर्यंत निघालेली आहेत, काढलेली आहेत ती गृहित धरावीच लागतात व त्यावरून पुढील

अनुमाने काढावी लागतात, काढली जातात. मूळ जे ग्राह्य धरल्या जात तो श्रद्धेचाच भाग असतो. मूळ ग्राह्य धरलेल्या गोष्टी सत्य किंचा असत्य आहेत हे शोधित बसलो तर नवनवीन अनुमाने निघणारच नाहीत, संशोधन (नवीन शोध लावणे), विज्ञानाची प्रगती होणे दुरापास्त होईल. म्हणून माहिती मिळण्याकरिता श्रद्धेची नितांत आवश्यकता आहे. आई-वडिलांवर, गुरुंवर आणि इतर बऱ्याच गोष्टींवर जर आपली श्रद्धा नसेल तर आयुष्यात आपणाला काहीच माहिती मिळू शकणार नाही. म्हणून आपण अस म्हणू शकतो की, श्रद्धा, विश्वास हा एक मार्ग आहे, माहिती मिळविण्याचा. समाजात माहितीचे आदानपादान व्हावे म्हणून श्रद्धा ही एक सामाजिक संस्कारातून निर्माण केलेली व्यवस्था आहे आणि ही व्यवस्था जर समाज रचनेत नसेल तर जीवन अशक्य होईल. श्रद्धेला लाभलेल हे सामाजिक अधिष्ठान आहे.

आपल्या सभोवतालची किंवा जीवनाला आवश्यक माहिती मिळविण्याचा श्रद्धा हा एक मार्ग जरी असला किंवा ती एक सामाजिक, संस्कारित व्यवस्था जरी असली तरी ती अंधच असते, आहे; याविषयी माझ दुमत नाही. आपण जर मुळात, खोलात, शुद्ध विचार केला तर आपणालाही ते पटाव. डोळस श्रद्धा हा शब्दप्रयोग कधीच ऐकण्यात आलेला नाही, अस्तित्वात नाही. पूर्ण विचारांती जरी श्रद्धा ठेवली तरी ती अंधच असते. श्रद्धा या शब्दाच विश्लेषण

श्रत् +धा म्हणजे श्रवण करून धारण केलेले. नुसतेच ऐकून ग्राह्य धरलेले, विचार न करता, सत्यासत्यता न पडताळता. अशा या श्रद्धेतूनच आपण आपले आई-वडिल आपणाला जे सांगतात ते खरे मानतो. परंतु आईवडिलांचा आदर ठेवूनही आपण असा विचार करित नाही की, त्यांच्या जवळील माहिती जी ते आपणाला सांगतात ती चूक असू शकते. अशी चुकीची माहिती आपले आईवडिल सुद्धा श्रद्धेतून खरे मानित आलेले असतील असा विचारच आपणाला शिवत नाही. अशी ही परंपरा आपल्या सामाजिक व्यवस्थेत सामाजिकीकरणाच्या (Socialization), व संस्कृतीकरणाच्या (Culturalization) म्हणजे संस्काराच्या (Nurture) प्रक्रियेतून चालूच राहाते, किम्बहूना तशी ती चालूच राहणार, जोपर्यंत आपणाला स्वतःला ह्या गोष्टींची असत्यता पटत नाही व असत्यता पटल्यानंतर आपण संस्कार बदलत नाही तोपर्यंत.

श्रद्धा ठेवल्यानंतर संशयाला वाव राहत नाही. श्रद्धेतून मिळालेल्या माहितीची सत्यासत्यता पडताळण म्हणजे ती श्रद्धा राहत नाही. अश्रद्धा बनते. तात्पर्य अस की, श्रद्धा ह्या अंधच असतात. श्रद्धा आणि अंधश्रद्धा असा भेद करता येत नाही. अंधश्रद्धा हा शब्दप्रयोगच मुळी चुकीचा आहे. श्रद्धा ह्या समाजात, जीवनात राहतीलच. श्रद्धेतून मिळालेली माहिती गृहित धरावीच

लागते, लागेल. परंतु जेंव्हा अशी मिळालेली माहिती चुकीची आहे. अयोग्य आहे अस आपणाला धडधडीत दिसत असून सुद्धा आपण ती माहिती श्रद्धेतून, चुकीच्या संस्कारातून खरीच मानित राहतो, व त्यामुळे स्वतःचे, समाजाचे नुकसान, कळत नकळत करित राहतो ते योग्य ठरत नाही. श्रद्धा अंध की डोळस हा मुद्दा गौण असावा. खरा मुद्दा आहे किंवा असावा, श्रद्धा चूक की बरोबर, श्रद्धा घातक की अघातक, श्रद्धा उपकारक की अपकारक. अशा घातक श्रद्धांनाच आपण सर्वसाधारणपणे अंधश्रद्धा मानतो. अशा घातक श्रद्धांचे-अंधश्रद्धांचे दुष्परिणाम समाजाला फ़ार नुकसानकारक, अहितकारक असतात. म्हणून अशा प्रवृत्तीच निर्मूलन करणे आवश्यक ठरत, समाजहिताच ठरत. यामुळेच घातक श्रद्धा-अंधश्रद्धा निर्मूलनाच कार्य महत्वाच ठरत, अति आवश्यक ठरत.

घातक श्रद्धा-अंधश्रद्धा निर्मूलनाची पहिली पायरी म्हणजे सारासार, विवेकपूर्ण, खोलात, मुळात विचार करण्याची सवय जडविणे. आपण श्रद्धेतून स्वीकारलेली माहिती चुकीची आहे अस लक्षात आल्यानंतर ती नाकारणे म्हणजे ज्या श्रद्धावंताकडून आपणाला ती माहिती मिळाली त्यांचा अपमान करणे होत नाही, किंबहूना अशा श्रद्धावंताला सुद्धा त्याची चुक सुधारायला अशामुळे मदतच होणार. आज्ञाधारकपणा स्तुत्य आहे. परंतु

आज्ञाधारकपणाच्या नावाखाली जाणूनबुजून स्वतःला, समाजाला अहितकारक गोष्टी करणे हे नक्कीच सुज्ञपणाचे नाही. जीवनाला पुरक नाही. यामुळे जीवन आनंदी होण्यापेक्षा आपण जीवनात तणाव आणि दुःखच ओढवून घेत असतो आणि हे आपल्या लक्षातही येत नसते. आणखी म्हणजे श्रद्धेचे आपण इतके गुलाम होत असतो की ज्या व्यक्तीवर आपली एकदा श्रद्धा जडली, त्या व्यक्ती, त्यांची कृत्ये, बोल खरेच आहेत हे ठरविण्याकरिता आपण निरनिराळ्या श्रद्धावान व्यक्तींच्या बाबतीत एकाच गोष्टीकरिता निरनिराळ्या चाचण्या वापरत असतो. जसे की, श्रीराम पुरुषोत्तम होता कारण तो एक पत्निव्रता होता. मग श्रीकृष्ण ज्याला आठ बायका होत्या तोही पुजनीय कसा, याची सांगड घालता येईल का? कशी घालाल? अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा याविषयीचा माझा दृष्टीकोन मी मांडलेला आहे. या विषयावर दुसऱ्या बाजूनेही विचार असू शकतो. दुसराही दृष्टीकोण असू शकतो. परंतु उद्देश एकच असावा की ज्यामुळे समाजतील अहितकारी रुढी, प्रथा, विधी, गोष्टी यावर मात करता येईल व खेळीमेळीच जीवन सुखकारक होईल. लक्षात अस आलेल आहे की कोणतेही काम, समाजकार्य, समाजसेवा आजकाल प्रसिद्धी मिळविण्याकरिता, प्रकाशात येण्याकरिता केल्या जात व अस करतांना मूळ उद्देशालाच मूळी बगल दिल्या

जाते. यामुळे चुकीच्या, अयोग्य, घातक श्रद्धा-अंधश्रद्धा निर्मूलनाच कार्य तसेच इतरही समाजहितकारक कार्य गतीमान होत नाहीत, म्हणून यात बदल व्हायला हवा. आपण तसा तो करायला हवा.

## (२४)

# जीव, शरीर व मन :वैज्ञानिक दृष्टितून

तत्वमिमांसक, अध्यात्मवादि तसेच कित्येक तत्वज्ञ यांच्या मते सर्व मानव प्राण्यांच्या शरीरात अमर आत्मा वास करतो. मात्र याबाबत कोणाच्याही मनात सुस्पष्ट कल्पना असलेली दिसून येत नाही. काहींच्या मते आत्मा हाच जीव आहे. म्हणूनच आत्म्याला जीवात्मा म्हणून संबोधिल्या जाते. काहींच्या मते आत्मा म्हणजे मन तर काहींच्या मते तो जीव व मन यांचा संयोग आहे. मरणानंतर शरीर नाश पावते आणि आत्मा नविन रूप धारण करतो. शरीर हे नश्वर, नाशवंत (Mortal) आहे. आत्मा शाश्वत, निरंतर (eternal-everlasting) आहे. शरीर हे जडतत्व असून आत्मा म्हणजे निव्वळ चैतन्य. परंतु आजवर प्रगत झालेल्या शास्त्रीय सिध्दांताच्या आधारे, विश्वात जडतत्वा व्यतिरीक्त अन्य काहीही नाही, हे मान्य करणे भाग पडते. जडतत्व (Matter) व मन (mind आणि भौतिक (Material) व परलौकिक, अध्यात्मिक (Spiritual) हे जुने भेद व्यर्थ ठरतात. आजच्या विज्ञान युगात ते टिकत नाहीत.

जीव, चैतन्य (Life), एक प्रकारची ऊर्जा

खगोल शास्त्रज्ञांच्या गणनानुसार इतर ग्रहांप्रमाणेच पृथ्वीचाही जन्म सुमारे चारसे कोटी वर्षापूर्वी अंतराळातील कणांच्या एकत्रित येण्यामुळे झाला. पृथ्वीवर सुयोग्य तापमान व वातावरण तयार झाल्यानंतर, रासायनिक प्रक्रियेच्या परिणाम स्वरूप जीवाची उत्पत्ती झाली. पृथ्वीच्या आदिम वातावरणातील मीथेन, अमोनिया व पाणि यापासून सूर्याच्या शक्तीच्या प्रभावाखाली जीवनश्रम सेंद्रिय द्रव्याचे अणू तयार झालेत. पुढे श्वासोच्छवासासारख्या प्रक्रियेमुळे प्राणवायुशी होणाऱ्या संयोगातून (Oxidation) संख्यावृध्दी होत गेली आणि या अणूत याच रासायणिक प्रक्रियेमुळे ऊर्जा उत्पन्न झाली. अशा या ऊर्जेलाच आपण जीव, चैतन्य म्हणतो. आदिकालिन पृथ्वीवर निर्माण झालेल्या जीवयोग्य सेंद्रिय द्रव्याच्या रेणूपासून एकपेशीयुक्त जीव उत्पन्न झाला. कालांतराने लक्षावधी वर्षातील विकसनातून हल्लीची वनस्पती सृष्टी तसेच प्राणसृष्टी अवतरली.

जीव, जीवात्मा म्हणजे वेगळे काही नसून जैव(सेंद्रिय) पदार्थात उपलब्ध असणाऱ्या ग्लुकोज, चर्बी व प्रथीन यासारख्या पौष्टीक द्रव्यांच्या अतिमंद ज्वलन क्रियेमुळे (श्वासोच्छवासामुळे) निर्माण होणाऱ्या ऊर्जेचाच तो एक प्रकार आहे. पेशींमध्ये होणाऱ्या रासायनिक अभिक्रियेचे ते फ़लित आहे. जीवाची उत्पत्ती होण्यास तीन द्रव्यांची आवश्यकता असते. (१) जगण्यायोग्य मुलद्रव्य

(प्रथीनात्मक जीवद्रव्य) (२) अन्न व पाणी यांच्या स्वरुपातून पोषण आणि (३) प्राणवायू. या तीन पैकी पहिले आपल्या शरीरात उपलब्ध असते. उर्वरित दोन आपणास बाहेरून मिळतात. अशाप्रकारे जीवाच्या उत्पत्तीसाठी शरीर अत्यावश्यक आहे. शरीर असल्याशिवाय ऊर्जा तयार होण्यास आवश्यक असलेली श्वासोच्छवासाची प्रक्रिया तसेच पेशीमधील रासायनिक अभिक्रिया संभवत नाही.

असे असले तरी, पृथ्वीवरील आदिम वातावरणाची स्थिती ऊत्तेजित करून नोबल पारितोषक विजेते

डॉ. हरगोविंद खुराणा आणि डॉ. पोनॅमपेरूमा हे, आपल्या प्रयोग शाळेमध्ये जीवयोग्य सेंद्रिय द्रव्याचे रेणू तयार करण्यात सफ़ल झालेत. त्यांनी पदार्थ व जीव म्हणजेच जडद्रव्य व चैतन्य एकच आहेत हे सिध्द केले. जडपदार्थात उपलब्ध असणारे मूलभूत कण म्हणजे केवळ ऊर्जाच.

मनाबाबतची संकल्पना

शरीर आणि जीव यांच्या व्यतिरिक्त काही सेंद्रिय रचनांमध्ये तिसरे तत्व असते, ते म्हणजे मन. जीव आणि मन ही शरीरातील विभिन्न प्रकारच्या पेशींमध्ये रासायनिक प्रक्रियांद्वारा उत्पन्न होणारी वेगवेगळी तत्वे आहेत. सर्व सेंद्रिय प्राण्यांमध्ये जीव

समान असला तरी, मन मात्र उच्च श्रेणीच्या प्राण्यातील मेंदू घटित करणाऱ्या न्युरॉन या विशिष्ट पेशी असणाऱ्या प्राण्यांमध्ये असते. एखादा टवटवीत बटाटा, अंडे, झाड यामध्ये जीव अवश्य असतो पण मन नसते. उंदीर, घुस, मांजर किंवा मनुष्यप्राणी यांमध्ये जीव व मन ही दोन्ही असतात. झाड असो, की मनुष्यप्राणी असो, की माकड यामध्ये तसेच एकपेशी वा बहूपेशीय प्राण्यांमध्ये जीवाची गुणवत्ता एकसारखीच, समान असते. वनस्पती, किडा, किंवा मनुष्यप्राणी यामधील जीवतत्वात मुळीही भेद नसतो. भेद असतो तो फ़क्त मानसिक विकासाच्या प्रमाणात, जीवात नाही. मनाची गुणवत्ता मज्जातंतू रचनेच्या (न्युरॉन पेशीच्या) विकासानुसार बदलते. वनस्पतीमध्ये क्लोरोफ़िल नावाचे द्रव असल्यामुळे त्यांच्यामध्ये मज्जातंतू रचना नसते व चलनवलनाचा आधार असणाऱ्या या रचनेची त्यांना आवश्यकताही नसते. इतर प्राण्यांमध्ये मज्जातंतू रचना आवश्यक असते. कारण की त्यांच्यात क्लोरोफ़िल नसल्यामुळे त्यांना अन्नाच्या शोधार्थ हालचाल करणे प्राप्त असते, अशा प्रकारे टवटवीत बटाटा किंवा वनस्पती यामध्ये मज्जातंतू रचना, मन नसले तरी किड्यांमध्ये प्राथमिक स्थितीतील व मनुष्यप्राण्यात विकसित मन असते,

पृथ्वीवर अस्तित्वात असणाऱ्या सर्व प्राण्यांमध्ये मानवाचा मेंदू कमालीचा विकसित आहे. त्यामुळे आपल्या

ग्रहावरील अन्य प्राण्यांच्या आटोक्यापलीकडे असणारे सर्जनशील विचार व युक्तीवाद यांच्या मदतीने ते आपल्या बांधवांशी भाषा व लेखन या माध्यमातून संपर्क साधू शकतात. निम्नश्रेणीच्या प्राण्यांमध्ये पाहण्याची, समजण्याची शक्ती मानव प्राण्यांपेक्षा अधिक असली तरी त्यांच्या जीवन पध्दतीत युगानुयुगे मुळीच प्रगती झाली नाही. याचे कारण म्हणजे मनुष्य प्राण्यांप्रमाणे त्यांना कल्पक विचार करता येत नाही. आजचा कोळी विणीत असलेले जाळे, कुंभार गांधील माशांच्या घरकुलांचे स्वरूप, विणकर पक्षी व शिंपी पक्षी हे बांधित असलेली घरटे, ही त्यांच्या हजारो वर्षापूर्वीच्या मुळ पूर्वजांप्रमाणेच असतात.. तसेच आजची माकडे देखील त्यांच्या आद्य पूर्वजांसारखेच जीवन जगत आहेत. मनुष्यप्राण्याने मात्र निवारा, अन्न, वस्त्र, दळणवळण, स्वास्थ, संरक्षण, समाजजीवन, आर्थीक स्थैर्य इत्यादि क्षेत्रात आजपर्यंत झपाट्याने प्रगती केलेली आहे आणि अशा प्रगतीचा वेग सतत वाढतच आहे.

बुध्दीची अभिवृध्दी

मानवी मेंदूची उत्क्रांती मेंदूच्या प्रशिक्षणाने होते. ती काही जैव किंवा शारीरिक प्रगतीमुळे होत नाही. गत हजारो वर्षात मानवाच्या मेंदूमध्ये म्हणण्यासारखा कोणताही घटनात्मक बदल

झालेला नाही. पुरापस्तर युगातील मनुष्यात आधुनिक मनुष्याप्रमाणेच स्मरणशक्तीचे सर्व कप्पे, सर्व संबधित क्षमता, युक्तीवादाची शक्ती, नविन शिकण्याची क्षमता, इंद्रीयज्ञान मिळविण्यासाठी धडपड; या सर्व बाबी विद्यमान होत्या. परंतु मेंदूच्या माध्यमातून मन सतत सक्रिय राहिल्यामुळे बुध्दीची वाढ होवून नवनवीन परिस्थिती निर्माण होत राहिली. केवळ पृथ्वीचाच विचार करता, मानवाजवळ इतर सर्व प्राण्यांपेक्षा अधिक विकसित झालेला मेंदू असला तरी, संबंध विश्वाच्या दृष्टिने तोच सर्वश्रेष्ठ बुध्दीमान प्राणी आहे, असे समजण्याचे कारण नाही.

मनाचे कार्य

मनाचे कार्य कसे चालते हे आपल्याला मध्यवर्ती मज्जा यंत्रणा आणि परिघीय मज्जा यंत्रणा, जी आपल्या शरीरभर पसरलेली आहे, त्याचा सखोल अभ्यास केल्यास कळून येईल. अनेक प्रकारांच्या, तऱ्हेच्या संवेदना सर्व दिशांनी आपल्या शरारातील निरनिराळया प्रापक, घेयक केन्द्राद्वारे, जसे की कान, नाक, डोळे, त्वचा, जिव्हा आदि; आपल्या शरीरात प्रवेश करतात; आणि आपल्या मज्जा यंत्रणेतील न्युरॉन्स पेशींच्या संवाहक जाळयातून आपल्या मेंदूत प्रवेश करतात. ह्या मज्जा प्रोत्तेजना मेंदूत वाहून नेण्याची प्रक्रिया वैद्युत-रसायन आहे. नवीन संवेदना मेंदूतील स्मरण

शक्तीत अगोदरच असलेल्या संवेदनांना बळकटी आणतात किंवा त्यात बदल घडवितात किंवा वाढ करतात. या सर्व प्रक्रियेलाच आपण विचार प्रक्रिया म्हणतो. आणि हे सर्व मेंदूतील मध्यवर्ती प्रक्रिया केन्द्रात घडते.

सारांश

वरील विवेचनावरून जीव, मन (आत्मा) अभौतिक नाहीत, तसेच पारलौकिक वा अध्यात्मिकही नाहीत हे स्पस्ट होईल. या सर्वांचे स्वरूप भौतिकच आहे. मन (आत्मा) या सर्वांकरिता शरीर अत्यावश्यक आहे. शरीराशिवाय या कोणाचेही अस्तित्व संभवत नाही. जीव आणि मन ही दोन वेगवेगळी तत्वे आहेत. जीव शरीरातील सेंद्रिय पेशींच्या श्वासोच्छवासातून उत्पन्न होतो. मन हे शरीरातील न्युरॉन्स पेशी युक्त मज्जातंतू यंत्रणेत घडून येणारे भौतिक-वैद्युत रासायनिक प्रक्रियांचा परिपाक आहे. सर्वच सेंद्रिय प्राण्यांमध्ये जीवतत्व सारखेच असले तरी, मनाचा दर्जा (विकसन) मज्जा यंत्रणेच्या गुंतागुंतीवर तसेच मेंदूच्या प्रशिक्षणावर अवलबून असते.

# (२५)

# भारतात उदयास आलेल्या धर्मांची ओळख

हिंदु, बौध्द, जैन, शीख, पार्सी, यहूदी, ख्रिस्ती. इस्लाम, झरथृष्ट्री, ताओ, कनफ़्युशी, शितो आदी प्रमुख जागतिक धर्म आहेत. हिंदु धर्म, बौध्द धर्म, जैन धर्म, व शीख धर्म यांचा उदय भारतात झालेला आहे.

हिंदुधर्म

हिंदु धर्म प्रदीर्घ चार हजार वर्षांची अखंड परंपरा असणारा धर्म मानला जातो. सप्तसिंधू प्रदेशात, सिंधू नदीच्या खोऱ्यात वसाहत करणाऱ्या मानव समूहास हिंदु आणि त्यांनी विकसित केलेल्या धर्मसंकल्पनांना हिंदुधर्म ही संज्ञा मिळाली. वैदिक धर्म, आर्यधर्म या समानार्थी संज्ञा मानल्या जातात. वेद-उपनिषदे-श्रुतिप्रस्थान, वेदांतसुत्र-सूत्रप्रस्थान आणि भगवदगीता-स्मृतीप्रस्थान अशा तिन्हीचा समावेश प्रस्थानत्रयी हिंदुधर्माचे अधिष्ठान मानले जाते. हिंदु धर्मात मोक्ष-मुक्ती मिळविणे हे माणसाचे परम कर्तव्य मानलेले असून ते मिळविण्याचे ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग आणि कर्ममार्ग असे तीन मार्ग सांगितलेले आहेत. हिंदु धर्म ईश्वरीय असून, ईश्वराविषयीच्या परस्पर भिन्न कल्पना धर्मात

आहेत. जसे की अनेकेश्वर, एकेश्वर, सर्वेश्वर (देवाधिदेव), तसेच सगुण-निर्गुण ईश्वर, साकार-निराकार ईश्वर, वगैरे वगैरे. या धर्मात असंख्य देव-देवता आढळतात. या धर्मानुसार शक्तीमान झालेल्या अधर्मियांचा तसेच समाजात बळावलेल्या राक्षसी वृत्तीचा नायनाट करण्यासाठी ईश्वर पृथ्वीवर मनुष्य रुपात अवतार घेत असतात असे अवतार आतापर्यंत झालेले आहेत, हे पण नमुद केलेले आहे. तदवतच हा धर्म आत्मवादी पण असून निर्गुण-निराकार परमात्म्याचा अंश आत्मा हा प्रत्येक माणसात असतो आणि अशा आत्म्याची ओळख आणि आत्मज्ञानातून आत्म्याशी संलग्नता म्हणजे मुक्ती-मोक्ष अशीही कल्पना आहे. याचप्रमाणे सगुण साकार ईश्वराची मनोभावे भक्ती-प्रार्थना करून मुक्ती-मोक्ष ही भक्तीमार्गाची कल्पना. ईश्वर भक्तीने, प्रार्थनेने पापमुक्ती होते तसेच ईप्सित साध्य होतात अशीही कल्पना आहे. संसारी लोकांच्या मुक्तीस्तव कर्म मार्ग सांगितलेला आहे. जीवनात धर्माने सांगितल्याप्रमाणे वर्णधर्म व आश्रमधर्म यांचे आणि सत्य, अहिंसा, अस्तेय (चोरी न करणे), अपरिग्रह (गरजेपेक्षा जास्त न साठवणे) आणि धर्माचरण यांचे पालन करून मुक्ती-मोक्ष मिळविणे अशी शिकवण आहे. कर्ममार्गाबरोबर भक्तीमार्गाची सांगड पण घातलेली आढळते.

हिंदु धर्मात आत्मा अमर आहे. आणि माणसाचे मृत्युचे वेळी तो त्याचे मृत शरीर सोडून नव्याने जन्माला येणाऱ्या

माणसाच्या शरीरात प्रवेश करतो असे एकीकडे सांगितलेले आहे तर दुसरीकडे माणसाच्या चांगल्या-वाईट कर्मानुसार मृत्युनंतर त्याला स्वर्ग वा नरक याची प्राप्ती होते, असेही सांगितलेले आहे. स्वर्गात परमसुख आणि नरकात यातनाच यातना असतात, असे धर्म सांगतो. याशिवाय माणसाचे या जन्मीची कृत्ये ही पूर्वजन्मीच्या बऱ्या-वाईट कर्मांवर अवलंबून असतात, असे एकीकडे सांगतांना दुसरीकडे माणसाला क्रिया स्वातंत्र्य असते असेही सांगितलेले आहे. माणसाच्या कर्मफ़ळानुसार त्याला जन्मोजन्मीच्या फ़ेऱ्यातून जावे लागते आणि असे कर्मफ़ळ संपल्यानंतर त्याला मोक्षप्राप्ती होते अशीही संकल्पना आहे. तपश्चर्या, ईश्वराचे नामस्मरण, जप, भक्ती, प्रार्थना केल्याने दैवी-ईश्वरी साक्षात्कार, ईश्वरप्राप्ती होते अशीही शिकवण आहे.

हिंदुधर्मात यज्ञ करून, मंत्रोच्चाराने ईश्वराची आळवणी व त्यातून ईप्सित प्राप्ती याचाही पुरस्कार आहे. निरनिराळ्या देवतांना प्रसन्न करण्याकरिता यज्ञात म्हणावे लागणारे मंत्र वेदात दिलेले आहेत. यानुसारच; मुले होण्याकरिता, पाऊस पडून पिके चांगली येण्याकरिता, विजय मिळण्याकरिता, शत्रूंच्या नायनाटासाठी, युध्द जिंकण्यासाठी, यश संपादण्याकरिता, विश्वशांतीकरिता यज्ञ आदि होत असल्याचे या धर्मात आढळते. याव्यतिरिक्त जन्मापासून

मरणापर्यंतच्या निरनिराळ्या अवस्थेत, प्रसंगी करावयाची निरनिराळी कर्मकांडे पण या धर्मात विस्ताराने दिलेली आहेत. जन्माचे वेळी, नामकरण करतांना, अन्नप्राशन करतेवेळी, लग्नविधी करतांना, मृत्युसमयी अंतेष्टी आदि अनेक कर्माबरोबर मृत्यु पावलेल्या पूर्वजांच्या आत्म्याच्या शांतीकरिता त्याच्या जीवित नातलगांना श्राध्द हे कर्मकांड पण करावयाचे असते. अशा श्राध्दांचे पण निरनिराळे प्रकार आहेत. प्रत्येक कर्मकांडात ब्राह्मण भोजन, दक्षिणा देवून तसेच व्रते, उपवास आदिंनी ईश्वरास प्रसन्न ठेवणे हे पण आहे.

बौध्दधर्म

भारतात उदयास आलेला बौध्द धर्म हा निरीश्वरवादी म्हणून ओळखण्यात येतो. तसाच हा धर्म अनात्मवादी पण आहे. इ. स. पूर्व पाचवे शतक ते इ. स. दहावे शतक या पंधराशे वर्षाचे काळात या धर्मात बरीच स्थित्यंतरे, परिवर्तन झालेली आढळतात. या काळातच बौध्द धर्माने श्रीलंका, ब्रह्मदेश, तिबेट, चीन, जपान इत्यादि राष्ट्रात प्रतिष्ठा व सन्मान मिलविलेला आहे. दहाव्या शतकानंतर हा धर्म भारतातून जवळजवळ लुप्त झाला होता. परंतु विसाव्या शतकाचे शेवटी डॉ. आंबेडकरांनी भारतात या धर्माचे पुनरुज्जीवन केलेले आहे.

बौद्ध धर्मात अनात्मवाद, शुन्यवाद, विज्ञानवाद आदीविषयी तत्वज्ञान मांडलेले आहे. बौध्द धर्मात गौतमबुध्दांनी वर्ण, जात, पंथ, कर्मकांड, हिंसा यांना झुगारून, सद्सद्विवेक, साधेपणा, नितीनिष्ठा, मानवता यावर भर दिलेला आहे. जन्म, जरा (म्हातारपणा), मृत्यु, शोक, विलाप, औदासीन्य, हे सारे दुःखमय आहे. अप्रिय वस्तूंशी संयोग, आणि प्रिय वस्तूंचा वियोग, इष्ट वस्तूंची अप्राप्ती या सर्वात दुःखमयता आहे. दुःखाचे मूळ कारण तृष्णा, वासना होय. तीच पुनर्जन्माचे कारण आहे. तृष्णेपासून पूर्ण विभक्ती म्हणजेच दुःखमुक्ती होय आणि अशा दुःखमुक्तीने, दुःखनिरोधाने निर्वाण प्राप्ती होते अशा संकल्पना आहेत. आसक्ती, द्वेष, मोह, आणि भय या पापमुलक प्रवृत्तीपासून मुक्त होणे आणि निरहंकारी मनोवृत्ती निर्माण करणे, होणे हे निर्वाणप्राप्तीसाठी आवश्यक व इष्ट मानल्या गेलेले आहे. तसेच निर्वाण प्राप्तीकरिता प्रज्ञा, व करुणा या मुल्यांना श्रेष्ठ स्थान देणारा आणि सर्वसामान्यांना समान लेखणारा अष्टांग मार्ग सुचविलेला आहे. सत्य, अहिंसा, न्यायपूर्ण उपजीविका, सत्कर्म, सत्चिंतन, चित्ताची एकाग्रता, सतसंकल्प, आणि ज्ञानप्राप्ती, सम्यकदृष्टी ही अष्टांगमार्गाची अंगे होत. बौध्द धर्मातील हिनयान संप्रदाय हा परंपरानिष्ठ, अपरिवर्तनवादी तर महायान संप्रदाय हा परिवर्तनवादी आहे. तसेच

या धर्मातील वैभाषिक व सौभातिक ही दर्शने वास्तववादी तर योगाचार व माध्यमिक दर्शने शून्यवादी म्हटल्या जातात.

जैन धर्म

शरीर, इंद्रिये, मन, वाणी यांना संयमपूर्वक, निग्रहपूर्वक जिंकणाऱ्या व्यक्तीस जिन म्हटले जाते. अशा जितेन्द्रियांची उपासना करणाऱ्यांना जैन म्हटले जाते. जैन धर्म हा तीर्थकर धर्म आहे. तसाच तो निरीश्वरीय धर्म म्हणून पण ओळखला जातो. धर्माचे प्रगटीकरण, प्रवर्तन करणारे महापुरुष म्हणजे तीर्थकर होत. तीर्थकरांना धर्माध्यक्ष मानलेले आहे. वर्धमान, महावीर यांच्या बऱ्याच अगोदरपासून ऋषभदेव वा आदिनाथ यांच्या सारख्या परंपरा या धर्मास असल्यामुळे जैनधर्म सुध्दा भारतातील प्राचिन धर्म आहे. अहिंसा, अनेकांतवाद ही या धर्माची तत्वे. आत्मा, परमात्मा आणि मोक्ष या धर्माला मान्य आहेत. कर्मसिध्दांतानुसार कर्मफ़ळ योग अनिवार्य असला तरी कर्म करण्याचे क्रिया स्वातंत्र्यही माणसाला असते, असे हा धर्म मानतो. व्यक्तीला स्वतःचे भवितव्य घडविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य व अधिकार हा धर्म मानतो. कर्मकांडाऐवजी मोह, आसक्ती, कर्मबंध दूर करणाऱ्या व आत्मसुख, आत्मज्ञान मिळवून देणाऱ्या तपोधर्माचा प्रसार यात आहे. धार्मिक आचरण, सदाचार, व तपाचरण यांनी कर्मबंध दूर

करून ऐहिक हित व परमार्थीक कल्याण साधण्यावर या धर्मात भर दिलेला आहे. स्वकर्मानुसार मनुष्य बंध वा मोक्ष यांना जबाबदार ठरतो. कर्मसिध्दांतानुसार त्याला जन्म-मृत्युच्या फ़ेऱ्यातून जावे लागते. कर्मबंधातून मुक्ती म्हणजे मोक्षप्राप्ती असे हा धर्म सांगतो. शास्त्रानुसार दृढ श्रध्दा म्हणजे सम्यकदर्शन. शा्स्त्रशुध्द तत्वांची प्रत्यक्ष अनुभूती म्हणजे सम्यकज्ञान आणि अहिंसा, सत्य, अस्तेय(चोरी न करणे)अपरिग्रह (गरजेपेक्षा जास्त न साठवणे) यावर आधारित चातुर्याम धर्माचे पालन म्हणजे सम्यकचरित्र, या तीन तत्वांना रत्नत्रय म्हणतात आणि हीच मोक्ष साधने होत. अशा आचरणानेच कर्मबंधातून मुक्ती मिळते.

य़ा धर्माच्या दिगंबर व श्वेतांबर या संप्रदायांमध्ये वस्त्रपरिधान याबाबतीत साधूंच्या आचरणातील महत्वाचा भेद असला आणि काही संस्कार भेद असलेत तरी ज्ञानशास्त्र, नितीशास्त्र याबाबतीत महत्वाचे भेद नाहीत. जैन संघाचे स्वरुप चतुर्विध मानले जाते. त्यामध्ये मुनी, आर्मिका (श्रमण-श्रमणी), श्रावक व श्राविका हे चार घटक मानले जातात. यानुसार जैनधर्मात मुनीधर्म वा श्रमणधर्म आणि श्रावक धर्म वा गृहस्थ धर्म यांचे सविस्तर विवेचन केलेले आढळते.

शीखधर्म

शीखधर्म हा भारतात पंधराव्या शतकात उदयास आला. गुरुनानक या धर्माचे आद्य प्रवर्तक आणि गुरुग्रंथसाहेब हा पवित्र ग्रंथ. हा धर्म एकेश्वरी म्हणून गणल्या जातो. आणि या धर्मानुसार निर्गुण व अद्वैत ब्रह्म ही अंतिम सत्ता होय. या धर्मात औपचारिक धर्मविधींपेक्षा आंतरिक शुध्दता आणि ईश्वरनिष्ठा महत्त्वपूर्ण समजल्या जाते. या धर्माची क्षमा, आणि दान ही महान मुल्ये तर धर्मनिष्ठा तसेच राष्ट्रनिष्ठा या संजीवनी आहेत.

या धर्मात धर्मश्रध्देला, शौर्य, तेज, धैर्य, राष्ट्रीयता या मूल्यांची जोड दिलेली आहे. धर्मदीक्षेत केस, कंगवा. कच्छ, कडे व कृपान या पंच कंकराचा अंतर्भाव आहे. या धर्माला दैववाद अमान्य आहे पण माणूस हा स्वतःच स्वतःच्या कर्मांना जबाबदार असून त्याच्या कर्म-संस्काराने पाप-पुण्यात्मक उपाधिने तो जन्म-मरणाच्या चक्रात सापडतो हे मान्य आहे. सामाजिक समता पसरविणारा हा धर्म असून जातीभेद त्याला अमान्य आहेत.

सन्यास वा वनवास यामुळे केवळ परमार्थ प्राप्ती होत नसून, संसार व समाजसेवा यातूनही ईश्वरसाधना घडू शकते, किंबहूना ते श्रष्ठ तप आहे असे हा धर्म मानतो. शुध्दाचरण, व अनन्यभक्तीभाव ही परमार्थाची साधने होत. जीवनात अनासक्त, वैराग्यमुक्त,

विवेकयुक्त बनून माणसाने प्रपंच ही ईश्वर सेवा मानून परमार्थसाधना केली पाहिजे. आत्मसाक्षात्कार हे जीवनाचे परमध्येय आहे अशी या धर्माची शिकवण आहे.

# (२६)

# परदेशात उदयास आलेल्या धर्मांची ओळख

हिंदू धर्म, बौध्द धर्म, जैन धर्म व शीख धर्म हे भारतात तर झरथुष्ट्री धर्म, ताओधर्म, कन्फ्युशीधर्म, शितो धर्म, यहूदि धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम धर्म आदि प्रमुख धर्म परदेशात उदयास आलेले आहेत.

झरथुष्ट्री धर्म

झरथुष्ट्री-पारसी धर्माचा उदय इराणमधील आहे. मूळ इराणी धर्मातील बहुदेवतावाद, मंत्र-तंत्र कर्मकांडाचे प्रस्थ, जादूटोणा काढून टाकून अग्निपूजेला अग्रस्थान देणारा एकेश्वरी धर्म म्हणून, हा पारसी धर्म उभारलेला आहे. इ. स. सातव्या शतकातील इस्लामी आक्रमनानंतर या धर्माचे अनुयायी भारतात आलेत. मानवाचे आचार स्वातंत्र्य तसेच संकल्प स्वातंत्र्य हा धर्म मान्य करितो. सत-असत, चांगले-वाईट, किंवा ईश्वरीमार्ग-सैतानमार्ग यापैकी निवड करण्याचे स्वातंत्र्य मानवाला आहे. त्यांच्या निवडीनुसार मनुष्य पुण्य व पाप यांना स्वतः जबाबदार असतो. आणि मरणोत्तर स्वर्ग वा नरक यांना पात्र ठरतो, असे या धर्माचे लोक मानतात.

झरथुष्ट्री धर्म हा यज्ञप्रधान धर्म असून यात प्रकाशपूजा प्रमुख आहे. परंतु केवळ भौतिक प्रकाश नव्हे तर दिव्य प्रकाश किंवा चित्प्रकाशपूजा, प्रामाणिकता, नम्रता, शांती, स्वावलंबन, ज्ञानप्रसार, सदाचार, स्वच्छता, मैत्रीभाव आदि सदगुणांवर झरथुष्ट्रांनी आपल्या ग्रंथांमध्ये भर दिलेला आहे. नितीशिवाय ज्ञान आणि ज्ञान व नितीशिवाय भक्ती हे प्रेरक व पोषक ठरत नाहीत. या धर्माचे नितीशास्त्र हे सुविचार, सुवचन आणि सुवर्तन या तीन शब्दात सामावलेले आहे

ताओधर्म

चीनच्या संस्कृतीच्या घडणीमध्ये लाओत्स या तत्ववेत्याचा ताओ धर्म, कॅन्प्युशियसचा कन्प्युशीधर्म आणि बौध्दधर्म यांनी भर घातलेली दिसते. बौध्दधर्म हा भारतातून चीन मध्ये प्रसूत झाला तर ताओ आणि कन्प्युशी धर्म चीनचाच संस्कृतिक वारसा होत. हे धर्म चीनमध्ये ख्रितिपूर्व पाच ते सहा या शतकात उदयास आलेले आहेत

ताओ धर्मानुसार ताओ ही परमसत्ता व मानवी जीवनाचे परममूल्य आहे. ताओ (ईश्वर) हे अनादि, अनाम, अचित्य, अव्यक्त, अग्राह्य, असीम, अनंत असे परिपूर्ण विश्वमूळ आहे. ते स्वयंप्रकाशित, स्वतःसिध्द ज्ञानतत्व आहे. ताओतत्व सर्वातर्यामी,

सर्वसाक्षी, सर्वज्ञ, सर्वशक्तीमान आहे. ताओ म्हणजे विश्वात्मक परमात्मा होय. ताओ निर्गुण, निराकार, अद्वैत असले तरी सृष्टीतील सगुण, साकार मानव जीवनाचे ते अधिष्ठाण आहे. ताओ धर्मातील सर्व सृष्टीला जन्म, आकार देणाऱ्या प्रवृत्तीशक्तीला "तेह" म्हणून ओळखण्यात येते. तेह याचा दुसरा अर्थ धर्मसाधन किंवा ईश्वर(ताओ) प्राप्तीचा मार्ग असा आहे. वासना, इच्छा, प्रेरणा, संकल्प जसजसे विलीन पावतात त्या-त्या प्रमाणात परमशांतीची प्राप्ती होते असे हा धर्म मानतो. या धर्माने संघर्ष, स्पर्धा, द्वेष, मत्सर, युध्द, जुलुम, शोषण यांची निंदा केलेली आहे. आणि व्यक्तीगत वा सामाजिक व्यवहारात प्रेम हे श्रष्ठ मूल्य मानलेले आहे. ताओची उपासना या धर्मात सर्वश्रेष्ठ मानलेली आहे. ताओ धर्म हा मुख्यतः निःश्रेयसप्रधान सर्वेश्वरवादी मोक्षधर्म आहे.

कन्प्युशी धर्म

कन्प्युशियस याने स्वतःला कन्प्युशी धर्माचा, ज्ञानाचा मूळ प्रवर्तक न मानता चीन संस्कृतीतील प्राचिन ज्ञानावर गाढ श्रध्दा असणारा ज्ञानाचा वितरक मानलेले आहे. विवेकनिष्ठा, न्यायबुध्दी, सरलता व साधेपणा, सत्यनिष्ठा, सर्वहितभाव सदाचार यावर याधर्मात भर दिलेला आहे. सर्व धर्माचे माहेर प्रेम होय. सामाजिक जीवनात प्रत्येकाला योग्य स्थान, दर्जा, प्रतिष्ठा लाभणे हा न्याय

होय. ज्याच्या अंगात खरी नम्रता असते त्यांनाच कर्तव्याची पूर्ती व अधिकाराचा वापर योग्य प्रकारे करता येतो. चांगले काय, वाईट काय याचा विवेक करणे आणि जे इष्ट, युक्त त्याचा स्वीकार करणे; जे अनिष्ट, अयुक्त त्याचा त्याग, जीवनाच्या विकासात आवश्यक असतो. व्यक्तीगत व सामाजिक जीवनात प्रामाणिकता, सज्जनता आवश्यक असते. सच्चेपणा नसेल तर व्यवहाराला अर्थच उरत नाही. ही समाजधर्माची मूलतत्वे या धर्मात अंतर्भूत दिसतात. समाजात प्रत्येकजन दुसऱ्याला सुधारु पाहतो. परंतु कन्फ्युशी धर्म प्रत्येकाला स्वतःची सुधारणा करायला सांगतो. स्वतःमध्ये सुधारणा झाली तर क्रमशः कुटुंब, संस्था, व समाज सुधारतात. माणसाला स्वतःतील दोष समजतात, पण ते दूर करण्याचा तो दृढतापूर्वक प्रयत्न करित नाही, हेच त्याच्या दुःखाचे, अपूर्णतेचे कारण होय असे हा धर्म मानतो. कन्फ्युशी धर्म हा मुख्यतः ईश्वरनिष्ठ प्रवृत्ति वादी समाज धर्म आहे.

शिंतोधर्म

जपानी राष्ट्रीय संस्कृतीचा धर्म म्हणून शिंतो धर्माचा उल्लेख करावा लागतो. "शिन" म्हणजे देवता आणि "तो" म्हणजे मार्ग, या दृष्टीने शिंतो धर्माचा अर्थ देवतेची उपासना, सेवा करण्याचा मार्ग (The way of the Gods) असा होतो. हा धर्म अनेक देवतावादी

असून यात निसर्ग देवता व पितृदेवता यांच्या उपासनेला प्राधान्य आहे. अतींन्द्रिय, निसर्गशक्ती, मृतपूर्वजांचे आत्मे, अतिमानुषी सामर्थ्याचे पुरुष यांची उपासना तसेच आत्मा, परलोक, मरणोत्तर जीवन या विषयीच्या श्रध्दा या धर्मात वाढलेल्या आढळतात. प्रत्येक कुटुंबात कुल-पितरांची पूजा, सूर्य देवतेची उपासना, सामाजिक जीवनात राष्ट्रीय पुरुषांची उपासना या धर्मानुसार केली जाते. कुल देवता व पितृदेवता ह्या सूचक स्वप्ने, शकून, देवीवाणी या द्वारे शुभ वा अशुभ घटनांची पूर्वसूचना देतात; कुलांचा सांभाळ करतात. अशा लोकश्रध्दा या धर्मात आढळतात. मृत्यु हा भयप्रद आहे; मृतशरीर अपवित्र असते, यातूनच सूतक पालनाची प्रथा या धर्मात वाढलेली दिसते. मंत्र-तंत्रात्मक गोष्टीस प्राधान्य, आंतरिक जीवनाच्या विकासावर भर, परतोच्या आनंदाकरिता भक्तीमार्ग आणि यामधून साक्षात्कार आदि सुद्धा या धर्मात आढळतात. प्रामाणिकपणा, नम्रता, आज्ञाधारकत्व, सरलता, निष्कपट स्वभाव हे शिंतो धर्माने उपासना मार्गाचे आवश्यक घटक मानलेले दिसतात. शिंतो धर्म आणि बौध्द धर्म यांच्या समन्वयातून जपानी धर्मसंस्कृतीत धर्मश्रध्देला साक्षात्काराचे अधिष्ठान लाभले. ध्यानमार्गी अंतर्निष्ठा आणि देवता उपासना; म्हणजेच सगुणोपासना आणि निर्गुण ज्ञान यांचा समन्वय सुध्दा जपानी धर्मसंस्कृतीत आढळतो.

यहूदीधर्म

इस्त्रायल राष्ट्रातील यहूदी वा ज्यू लोकांचा, मोझेस यांनी प्रस्थापित केलेला धर्म म्हणजे यहूदी धर्म. मोझेस यांना ईश्वरांकडून दहा पवित्र आज्ञा मिळाल्या त्यावर आधारित हा धर्म आहे. या आज्ञांम्ध्ये मुख्यतः सत्य, अहिंसा, अस्तेय, मातापितरांचा आदर, निस्वार्थीपणे परमेश्वराची उपासना, पूजा, कर्तव्यनिष्ठा यांचा पुरस्कार तर मोह व व्यभिचार यांचा तिरस्कार आहे. हा धर्म ईश्वर एकच आहे असे मानतो. "यहोवा" असे त्याचे नामाधिकरण स्वीकारतो. प्रेम, करुणा, व मैत्रीयुक्त आचरणाने तो प्रसन्न होतो. ईश्वर हा न्यायी, दयाळू, प्रेममय, करुणामय, क्षमाशील आहे. तसाच तो परमशक्तीशाली, अंतर्यामी, सर्वव्यापी, सर्वज्ञ, शाश्वत आणि नित्य आहे. मृत्युनंतर शरीर नष्ट पावते आणि आत्मा ईश्वराप्रत जातो. ऐहिक जीवन हे ईश्वर सेवचे परमसाधन आहे. दान, दया, आणि सत्कर्म ही यहूदी नितीशात्राची त्रिसुत्री आहे. प्रभूप्रेम, प्रभूकाम. प्रभूसेवायुक्त जीवन ही या धर्मातील ध्येय दृष्टी आहे. यहूदी धर्माला माणसाचे इच्छास्वातंत्र तसेच आत्म्याचे अमरत्व आणि पापपुण्यात्मक मरणोत्तर भवितव्य हे सुध्दा मान्य आहेत.

ख्रिस्ती धर्म

बायबल या धर्मग्रंथाचे दोन भाग आहेत. एकाला जुनी योजना, पूर्व विधान किंवा जुना करार (Old Testament), म्हणतात; तो यहूदी लोकांचा धर्मग्रंथ आहे. तर नवा करार (New Testament) हा ख्रिस्ती धर्माचा पवित्र ग्रंथ आहे. ख्रिस्ती धर्मानुसार परमेश्वर हा अनादी, अनंत, सर्वज्ञ, सर्वशक्तीमान, व सर्वव्यापी आहे. तो परमपवित्र, परमन्यायी आहे. करुणा, प्रेम, क्षमा यांचा सर्वोच्च अविष्कार म्हणजे परमेश्वर. सारे विश्व हे ईश्वर निर्मित आहे. ईश्वर सर्वांचा रक्षक, कृपामय, असा विश्वपिता आहे. सारी श्रुष्टी ही ईश्वर नियमांनी चालते, येशू ख्रिस्त हे ईश्वराचे लाडके व एकुलते एक पुत्र होत. ते ईश्वराने मानवाच्या उद्धारासाठी पाठविलेले प्रेषित होत. ईश्वराज्ञा मोडल्यामुळे मनुष्य पापी बनला; दीक्षाप्रसादाने तो मोक्षाधिकारी बनतो. पंडितांना पावन करणाऱ्या व मानवजातीचा तारणहार असणाऱ्या येशू ख्रिस्तांना अनन्यभावे शरण जाणे आणि प्रभुकृपा संपादन करणे हा पापमुक्तीचा श्रेष्ठ मार्ग. प्रभुकृपा संपादन करण्यासाठी सर्वांशी भ्रातृभावाने वागणे, सदाचरणी राहाणे, सेवाभाव-त्यागवृत्ती अवलंबिणे युक्त ठरते. कर्मकांड, पोथीनिष्ठा, यांत्रिक व्रताचरण या धर्माला अमान्य आहेत.

केलेल्या चुकीच्या कामाबद्दल दुःख व्यक्त करणे आणि केलेल्या पापाची कबुली देणे(Confession) आणि यामुळे मानसिक बदल(Conversion) घडणे याला ख्रिश्चन धर्मात फ़ार

महत्वाचे स्थान दिले जाते. अहंकारशून्य, अनन्यशरण ईश्वरभक्ती हे ख्रिस्ती धर्माचे प्रमुख अंग आहे. या भक्तीभावनांच्या विकासासाठी या धर्मात वैयक्तीक व सामुदायीक प्रार्थनेला महत्वाचे स्थान दिलेले आढळेल. निस्वार्थ, विनम्र, सर्वकल्याणाच्या दृष्टीने केलेल्या प्रार्थनेतील अध्यात्मिक सामर्थ्य ख्रिश्चन धर्म मानतो. ईश्वरावर, ईश्वराची प्रजा असणाऱ्या मानवजातीवर निरपेक्ष प्रेम करणे; शेजारी बांधव, आपदग्रस्त यांना सहाय्य करणे, शत्रुंवर वा अपकार कर्त्यांवरही प्रेम करणे, त्यांचे कल्याण चिंतने ही याधर्माची महान शिकवण. गरीब-श्रीमंत, काळा-गोरा, सुशिक्षित- अशिक्षित असा बाह्य, कृत्रीम भेद या धर्माला मान्य नाही. केलेल्या पाप-पुण्यादि कर्मानुसार स्वर्ग-नरक प्राप्ती या विषयीच्या श्रध्दा मात्र हा धर्म मानतो.

### इस्लाम धर्म

इस्लाम चा अर्थ शांती असा आहे. हा धर्म एकेश्वरी आहे. या धर्मानुसार ईश्वर-अल्लाह एकच आहे. त्याला रुप नाही, आकार नाही, मानवी रुपात किंवा अन्य रुपात तो भूतलावर अवतार घेत नाही. तो सृष्टीचा निर्माता व पालक आहे. सर्वज्ञ आहे. कुराण हा इस्लाम धर्माचा पवित्र ग्रंथ, परमेश्वराने पैगंबरांना पाठविला. त्यात असत्य काहीच नाही. फ़क्त परमेश्वराचे मन प्रगट झालेले आहे.

इस्लामच्या मते मनुष्य जेंव्हा जन्माला येतो तेंव्हा तो पूर्णतः निष्पाप असतो. पूर्व जन्मातील संस्कारांनी त्याचे मन पापमय नसते. प्रत्यक्ष जीवनात माणूस जे पाप करतो त्याचेच संस्कार त्याचे मनावर उमटतात. माणूस आपल्या कर्मास स्वतंत्र आहे. तो स्वतःच्या भविष्याचा शिल्पकार आहे. माणसाचे दुःख वा आनंद हे त्याच्या स्वतःच्या कर्माचे परिणाम असतात. आपले जीवन चांगले करावयाचे की नाही हे त्याच्या इच्छेवर, संस्कारावर अवलंबून असते. दुःख व आनंद हे त्याच्या स्वतःव्या कर्माचे परिणाम असतात. माणसाने आपल्या सदाचरणाने व निष्ठापूर्वक धार्मिक श्रध्देने ईश्वरी मार्ग आचरण करावा; त्याचा ईश्वरी मार्ग सुगम, सरल, आहे. यावर इस्लाम धर्माने भर दिला आहे. अंतिम निवाड्याचा दिवस ही या धर्माची प्रमुख श्रध्दा. या दिवशी माणसाच्या पाप-पुण्याचा हिशेब केला जाणार आहे आणि त्याला पापाचे प्रायश्चित म्हणून नरकवास व पुण्याचे पारितोषिक म्हणून स्वर्गसुख लाभणार आहे. मरणोत्तर भवितव्य, स्वर्ग-नरक प्राप्ती हे माणसाच्या पापपुण्यावरच अवलंबून आहे अशी या धर्माची शिकवण आहे.

अशी ही परदेशात उदयास आलेल्या धर्माची ओळख.

# (२७)

# अध्यात्म्याची अवैज्ञानिकता

अध्यात्म म्हणजे आत्म्याविषती ज्ञान. परंतु अध्यात्म्याची व्याप्ती आत्म्यापुरतीच मर्यादित नसून त्यात भौतिक विश्वाच्या पलिकडील वस्तुसंबंधी विचारही समाविष्ट आहेत. म्हणून अध्यात्म्याला अतिभौतिक शास्त्र (Metaphysics) असे सुध्दा संबोधण्यात येते. याशिवाय अध्यात्म्यात विश्वाचा उत्पत्तीकर्ता परमात्मा याची; आत्मा आणि परमात्मा यांच्या परस्पर संबंधाची पण चर्चा केली जाते. याचा अर्थ तत्वज्ञान आणि अध्यात्म एक नव्हेत. तत्वज्ञान अनात्मवादी असू शकते. साधारणपणे अध्यात्म आणि धर्म यांची सरमिसळ केली जाते.

अध्यात्म-- शब्द प्रामाण्य

अध्यात्मिक ज्ञान हे शब्द प्रमाण आणि अलौकिक साक्षात्कार यांच्यावर आधारित आहे. शब्दप्रामाण्य म्हणजे वेदातील शब्द तसेच अवतार, प्रेषित, धमगुरु यांचे शब्द हे ईश्वराचे शब्द म्हणून प्रमाण (खरे) मानलेच पाहिजेत. अलौकिक साक्षात्कार हा अतीन्द्रिय ज्ञान करून देणारा इन्द्रियातीत, अनुमानातीत असतो. याला अनुभूती असेही म्हणतात. ही अनुभूती

म्हणजेच आत्मज्ञान, अध्यात्मज्ञान. धर्मग्रंथ, वेद आणि धर्मगुरु यांची वचने पडताळून न पाहताच खरे मानायचे; यावरून अध्यात्मिक ज्ञान किती ठिसूळ पायवर उभे आहे याची कल्पना येते.

अध्यात्मज्ञान हे विज्ञानाप्रमाणे विश्वसनीय नाही; कारण विज्ञान-वैज्ञानिक पद्धतीने मिळालेले ज्ञान, हे वस्तुनिष्ट (Objective) असते. ते कोणीही तपासू शकते, अनुभवू शकते. परंतु अध्यात्मज्ञान हे आत्मनिष्ट (Subjective) असते. ज्याला असे ज्ञान प्राप्त होते, असे जो समजतो, मानतो, सांगतो, त्याचेशिवाय दुसऱ्याला ते तपासता येत नाही. म्हणून अध्यात्मज्ञान हे भ्रामक ज्ञान असू शकते, किंबहुना ते तसेच आहे. विज्ञानात भ्रमाला अजिबात वाव नसतो.

अध्यात्मज्ञान --जीवन मुक्ती, मोक्षप्राप्तीचे मार्ग

भारतीय तत्वज्ञानानुसार मानवी जीवनच मुळी दुःखमय आहे आणि कर्म सिध्दांताप्रमणे मानवाला पुनर्जन्माच्या अनंत फ़ेऱ्यातून जावे लागते आणि अनादी काळपर्यंत पिडीत आयुष्य जगावे लागते. अशा जन्मोजन्मीच्या पिडीत आयुष्यातून सुटका होण्यासाठी जन्मापासून सुटका-मुक्ती हा एकमेव उपाय अध्यात्म

सांगते. आणि अशा तऱ्हेची मुक्ती-मोक्ष अध्यात्म्यानुसार भक्तीमार्ग, ज्ञानमार्ग आणि कर्ममार्ग यातून मिळतो.

अध्यात्मात विश्व उत्पत्ती आणि जीव निर्मिती याविषयी मुख्यतः दोन विचार प्रवाह आहेत. एक ईश्वरवाद आणि दुसरा ब्रम्हवाद. ईश्वरवादात, सर्वशक्तीमान, सर्वव्यापी ईश्वर या विश्वापलिकडे असून, त्यानेच हे विश्व निर्माण केलेले आहे, व तोच त्याचे नियंत्रण करतो. ईश्वराचे आणि मानवाचे अतूट संबंध आहेत. भक्ती, प्रार्थना केल्यास; ईश्वराला शरण गेल्यास तो आपली ईप्सिते पूर्ण करितो आणि

शेवटी भक्तीमार्गाने मोक्षप्राप्ती होते अशी कल्पना आहे. दुसऱ्या वादात, ब्रम्हवादात, जगत निर्माता ब्रम्ह; निर्गुण-निराकार मानलेला आहे. त्याला परमात्मा म्हणून संबोधिलेले आहे. या परमात्म्याचा एक अंश, आत्मा मनुष्याच्या शरीरात वास करतो. या आत्म्यास ओळखून परमात्म्यास ओळखणे म्हणजे जीवनमुक्ती येथे मानलेली आहे. हे दोन्ही वाद मानलेत तर नित्य कर्म करण्याकरिता वावच राहात नाही, म्हणून याकरिता कर्ममार्ग पण सांगितलेला आहे. वर्णधर्माप्रमाणे कर्म करित असतांना धर्मांनी सांगितलेल्या आश्रमातून चांगली पुण्यकर्मे करून वैराग्य प्राप्ती, मोक्षप्राप्ती ही कल्पना आहे.

अध्यात्म्याची अनाकलनीयता

अध्यात्म्याप्रमाणे जीवन दुःखमयी आहे म्हणजे काय आहे? अजूनही आपल्या सुख-दुःखा विषयीच्या कल्पना स्थीर नाहीत. दुसरे म्हणजे जीवन दुःखमयी असण्याचे, घडविण्याचे काय कारण? याचा खुलासा अध्यात्म्यात नाही. तसेच जन्मापासून सुटका म्हणजे मोक्ष, मुक्ती असेल तर, याला किती साधा उपाय आहे. माणसाचा जन्मच होऊ द्यायचा नाही. स्त्रीया गरोदर राहिल्यात की त्यांनी गर्भपात करित राहाव म्हणजे आपोआपच जन्म-मरणापासून सुटका.

मोक्ष, मुक्ती मिळविण्याचा एक मार्ग, ज्ञानमार्ग म्हणजे अंतिम सत्य, अंतिम ज्ञान, आत्मज्ञान याचा शोध घेणे. असे ज्ञान झाल्यानंतर मनुष्य परमात्म्यात विलीन होतो, मोक्ष पावतो. मानवाची उत्क्रांती होऊन हजारो वर्षे उलटलीत. परंतु अजून कोणालाही असे ज्ञान झालेले दिसत नाही. जे जे लोक साक्षात्कार झाल्याचे, असे अंतिम ज्ञान प्राप्त झाल्याचे सांगतात, ते एकतर खोटे बोलत असतात किंवा तो त्यांचा संभ्रम (Hallucination) असतो. परमात्मा एकच आहे. आत्मा परमात्म्याचा अंश आहे. म्हणून परमात्म्याचे ज्ञान, आत्मज्ञान एकच असणार. याकरिता असे ज्ञान ज्या कोणाला झाले असेल, होईल त्याने बाकी इतरांना ते सांगावे.

मग असे ज्ञान सर्वांना मिळाल्यानंतर ज्ञानमार्गचे प्रयोजन उरतेच कोठे? अंतिम ज्ञान एक आहे, तर मग निरनिराळ्या धर्मप्रवर्तकांना वेगवेगळे साक्षात्कार का आणि कसे झालेत? साक्षात्कारांच्या विविधतेवरून ते भ्रामक आहेत हे सिध्द होत नाही काय? अध्यात्म्यातील ज्ञानमार्गाचा अर्थच असा होतो की, आपण ज्ञान प्राप्ती करिता जगतो, जगावे. या मार्गापेक्षा ज्ञान प्राप्तीसाठी जगू नका, जगण्यासाठी ज्ञान प्राप्त करा असे सांगणारा मार्ग, जास्त उचित ठरणार नाही काय?.

अमर आत्मा

माणसाचा आत्मा अमर आहे. तो मरत नाही. असे अध्यात्म सांगते. मनुष्य मेल्यानंतर त्याचा आत्मा नव्याने जन्माला येणाऱ्या दुसऱ्या प्राण्याच्या शरीरात वास्तवाला जातो. म्हणजे जितके माणसे, प्राणी मरतील, तितकेच पुन्हा जन्माला येतील, यायला पाहिजेत. याचाच अर्थ प्राणिमात्रा, माणसे या सर्वांची मिळूनचि संख्या सारखीच राहायला पाहिजे, परंतु या संखेत तर प्रचंड वाढ झालेली, होत असलेली आपण पाहतो. हे कसे?

दुसरी गोष्ट म्हणजे मनुष्याचा आत्मा त्याला तो मेल्यानंतर सोडतो. मग त्यांच्यापासून जो मुलगा जन्मतो त्यात कोणता आत्मा असतो. की मुलांमध्ये आई-वडिलांच्या आत्म्याचा अंश नसतो.

माणूस आणि स्त्री यांच्या संभोगातून संतती निर्माण होते, म्हणून त्यांच्यात अर्धा स्त्रीचा आणि अर्धा पुरुषाचा आत्मा असतो काय? पुष्कळदा एकाच पेशीतून जुळे तिळे जन्माला येतात, त्या सर्वांच्या आत्म्याविषयी काय? एकच आत्मा त्या सर्वात वाटल्या जातो काय? जे प्राणी प्राणवायु चामडीतून घेतात, त्यांच्या शरीराचे तुकडे केले तरी, प्रत्येक तुकड्यात चैतन्य राहाते; याचा अर्थ अशावेळी आत्म्याचेही विभाजन होते काय? तसेच आत्मा गर्भधारणा होते त्यावेळी जीवात शिरतो, की मुल बाहेर आल्यानंतर; याविषयी संभ्रमच नाही काय?

पीटर सेलर हा अमेरिकन चित्रपट अभिनेता, मेल्यानंतर कृत्रीम रितीने चेतना आणून जीवंत झाल्याचे वृत आहे. शरीराचे जर विघटन, सडणे झाले नसेल तर, त्यात कृत्रीम रितीने चेतना आणता येवू शकते; हे आता विज्ञानाने सिध्द झालेले आहे. अशा परिस्थीतीत जेंव्हा पीटर सेलर सुरुवातीला मेला, तेंव्हा त्याचा आत्मा त्याला सोडून दुसऱ्या कोणत्या शरीरात गेला होता आणि तो पुन्हा जीवंत झाला तेंव्हा तोच आत्मा दुसऱ्या जीवाला मारून, पुन्हा परत आला, असे मानायचे काय?

## भक्ती आणि कर्म

भक्ती, प्रार्थना, केल्याने आपल्या विचारात परिवर्तन येते, आपल्याला शांती लाभते, तसेच आपली इच्छाशक्ती वाढते; आणि आपली इच्छाशक्ती वाढल्यामुळे होणारे सर्व इष्ट, उपकारक परिणाम होतातच; यात शंका घेण्याचे कारण नाही. परंतु म्हणून भक्ती, प्रार्थन केल्याने; तुटलेला हात किंवा पाय मिळेल, कॅन्सर रोग बरा होईलच, अभ्यास न करता परिक्षेत पास होऊ, न पेरता जमीन उगवू, पक्षाप्रमणे हवेत उडू, असाध्य साध्य करुच आदि कल्पना हास्य जनकच ना! आता कर्ममार्गाविषयी; आपण कर्ममार्गाचे काटेकोरपणे पालन करित राहिलो असतो तर शुद्र हे शुद्रच राहिले असते. कर्मधर्मात सांगितलेल वर्ण धर्म आपण केंव्हाच सोडलेला आहे. वर्णधर्माप्रमाणे ब्राह्मण म्हणजे वेदप्रविण, वेदाध्ययन करणारा, केलेला. आज आपण ज्यांना ब्राह्मण म्हणतो त्यापैकी कितीजन वेदवचन, वेदपठण करतात. तसेच ज्यांना आपण क्षत्रिय समजतो ते किती रणांगणावर शौर्य गाजवतात? वर्णधर्माप्रमाणे शुद्र म्हणजे सेवा करणारे; नोकरी चाकरी करणारे; म्हणजे सद्या जे नोकरी करतात मग ती नोकरी कशीही असो; कितीही मोठ्या अधिकाराची असो, पगाराची असो; ते सर्व (मी धरून, आयुष्यात मी नोकरीच केली) वर्णधर्माप्रमाणे शुद्रच ना? आहे काय हे सर्व मंजूर.

सारांश

आत्म्याच्या संकल्पनेला तसेच अध्यात्म्याच्या सिध्दांताला अजिबात वैज्ञानिक आधार नाही. अध्यात्म हे दुर्बल माणसांना दिलासा देण्याकरिता विलक्षण कल्पना शक्तीतून निर्माण झालेले आहे आणि ते सतत एकामागून एक येणाऱ्या पिढ्यांना दुर्बल आणि भ्रामकच बनवित आहेत. म्हणून यापासून सावध होवून; प्रामाणिक, विवेकनिष्ठ भौतिकवादी (म्हणजे ऐश्वर्य उपभोगी नव्हे) बनून; या वस्तुनिष्ट सृष्टीत आपले व्यवहारी जीवन कसे सुखकारक होईल आणि सर्वांना खेळीमेळीचा आनंद मिळेल; याचा विचार होणे, करणे सर्वांच्या हिताचे ठरावे. अर्थात अध्यात्म्याच्या आपल्यावरील संस्कारिक पगड्यामुळे, समाजातील प्रचलित कल्पना हटणे, हटविणे सोपे नाही. किंबहुना ते अशक्यच आहे; याची जाणीव मला आहे. पाहा, तुम्ही कोणी अशा भ्रामक, असत्य, विक्षिप्त कल्पना झुगारू शकता काय, आणि सत्याला सामोरे जावू शकता काय?

# (२८)

# ईश्वराचे अस्तित्व

अंधश्रध्दा निर्मुलनाचे कार्य करतांना मला दोन प्रश्न प्रामुख्याने विचारण्यात येतात. काहीजन विचारतात, तुम्ही ईश्वर मानता काय? आणि काही विचारतात, ईश्वर आहे काय? जास्त करून प्रश्न तुम्ही ईश्वर मानता काय, असेच असतात. ईश्वर आहे काय? असा प्रश्न बहुतकरून सर्वांनाच पडलेला असतो. बहुसंख्य लोक ईश्वर, ईश्वराचे अस्तित्व मानित असतात. मानणे आणि असणे यात फ़रक आहे. महदंतर आहे. आपण काहीही मानू शकतो. किंबहुना पुष्कळ बाबतीत मानित आलेलो आहोत. काय मानावे आणि काय मानू नये यावर बंधने नाहीत. मानने हा सर्व मनाचा खेळ असतो. तो सर्वस्वी मनोव्यापारच असतो.

ज्या गोष्टींविषयी संशय नसतो ती गोष्ट मानावी लागत नाही. ज्या गोष्टींच्या अस्तित्वाविषयी शंका असते, ज्या गोष्टींचे अस्तित्व सबळ पुराव्यानिशी सिध्द करता येत नाही, ज्या गोष्टी गुढ असतात, अनाकलनीय असतात, अशाच गोष्टी मानन्यात येतात, मानल्या जातात. आपण अशा गोष्टी मानित असतो कारण अशा गुढ गोष्टींच्या अस्तित्वाविषयीचे दृढ, पक्के संस्कार आपल्या

मनावर लहानपणापासून रुजविण्यात येतात, रुजविल्या जातात आणि खेदाची गोष्ट म्हणजे अशा संस्कारांची गुलामगिरी आपण पत्करतो आणि विचारन्युन बनून असे अस्तित्व, अस्तित्वाविषयीचे भ्रामक स्वरुप आपण मानित असतो. इतकेच काय, आपण आपल्या विचारात उणेपणा आणून अशा अस्तित्वाविषयी आपले अतर्कट विद्वत्तापूर्ण तर्क म्हणून मांडित असतो. माणूस जे मानतो, जे त्याला वाटते, त्याला पुरक असे विचार, स्वतःचे तर्क मांडणे हा मनुष्याचा संस्काराने बनलेला स्वभावच आहे. असा स्वभाव बनण्यात शुध्द तर्कांचा अभाव असून, अतर्कट शब्दछल यालाच भाव आहे, महत्व आहे. आपण जर मोकळया मनाने सर्व पूर्वग्रह बाजुला सारून, विचार केला तर असे आपले सर्व तर्क मुळात आधारहिन असतात असे आपल्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. मग आपण मोकळेपणाने, शुध्द अंतःकरणाने विचार का करित नाही? याच उत्तर शोधू गेल्यास, आपल्या अस लक्षात येईल की, सुरवातीसच आत्मसात केलेल्या चुकीच्या संस्कारातून आपण नंतर पुन्हा पुन्हा चुकीचेच संस्कार आत्मसात करित असतो, करित आलेलो आहोत. समाज धुरिणांनी समाज व्यवस्थेची रचना केली. समाज धुरीण, समाजात प्रतिष्ठा पावलेले लोक, शिक्षित गणल्या जाणारे लोक, यांना पाऊस कसा पडतो; अग्नी कोठून येतो; आकाशात सूर्य, चंद्र, तारे आदि

कोठून येतात; वादळे कशी उत्पन्न होतात; आकाशात विजा का आणि कशा चमकतात; धान्य कसे उगवते; मनुष्य का जन्माला येतो; तो का मरतो, आजारी पडतो, त्याला दुःख भोगावी लागतात वगैरे-वगैरे; अशा निसर्गात घडणाऱ्या अदभूत घटनांचे काहीच आकलन होत नव्हते, परंतु तसे कबुल करणे त्यांना अपमानास्पद वाटले असावे. त्याकाळी विज्ञानपण प्रगत नव्हते. म्हणून त्यांनी या सर्वांचे उत्तर म्हणून ईश्वराच्या अस्तित्वाविषयीच्या कल्पना मांडल्या असाव्यात. आणि मोठ्यांची, प्रतिष्ठीतांची आज्ञा पाळावीच अशा अगोदरच आपल्यावरील रुजलेल्या संस्कारांमुळे आपण ह्या कल्पना त्या कल्पनातील ईश्वराच्या स्वरुपाविषयी असलेली अतिरंजिता, परस्पर भिन्नता लक्षात न घेता, आपल्या मनावर पक्या कोरून घेतल्यात आणि अशा संस्कारांची आपण स्वीकारलेली गुलामगिरी अशी की, आज विज्ञानाने अशा संभावनेत तथ्य नाही, तर्क नाही, असे पुरावे समोर आणून देखील आपण त्यावर विचार करायला तयार नाही. अशी विचार न्युनता अशिक्षित आणि खेडूत यांच्यातच असते असे जरी भासविल्या जात असले, तरी ते संपूर्णपणे चुकीचे आहे. वास्तविक शिक्षितच आपल्यावरील संस्कारांची अशी गुलामगिरी योग्य आहे, हे सिध्द करण्यासाठी, संस्कारातील नसलेली सत्यता पटवून देण्याकरिता, विचार उगीचचे क्लीष्ट करून आणि अनाकलनीय तर्क (Logical

fallacies) मांडून, नाही त्या गोष्टी सिध्द करण्याचा आटोकाट प्रयत्न करित असतात. असत्याचा पुरस्कार आणि प्रसार करित असतात. यातही सर्वात खेदाची गोष्ट म्हणजे विज्ञानाचा अभ्यास केलेले लोक सुध्दा यात मागे नसतात. अशा वैज्ञानिकांना वैज्ञानिक दृष्टीकोण असू नये, ही फ़ार मोठी चिंतेची बाब आहे, शोकांतिका आहे.

जी गोष्ट असते, ती मानायचे काहीच कारण नसते, कारण तीच अस्तित्व सर्वच अनुभवू शकतात. जस की हवा. हवेच अस्तित्व सर्वांनाच अनुभवायला मिळते. , तसे प्रयोग-शाळेत पण सिध्द करता येते. या दृष्टीकोणातून ईश्वराच्या अस्तित्वाविषयी विचार करावयाचा झाल्यास, सर्वप्रथम ईश्वराविषयी आपली संकल्पना, दृढ, नक्की, निश्चित करावयास पाहिजे.

ईश्वर सगून आणि साकार आहे. तो मानव रुप धारण करू शकतो, करित असतो. तो माणसाच्या प्रत्येक हालचालीवर नियंत्रण ठेवतो, त्याची भक्ती केल्याने मनुष्याची पापे धुतली जातात, दुःख दूर होतात, प्रश्न सुटतात. माणसाला स्वर्ग मिळतो अशा तऱ्हेची एक कल्पना संकल्पना आहे. ईश्वर, परमात्मा; निर्गुण, निराकार, सर्वव्यापी असून त्याचा अंश प्रत्येक माणसात आत्मरुपी असतो, आत्म्यात वास करितो; त्या आत्म्यास

ओळखून, आत्मज्ञान प्राप्त केल्याने परमात्म्याचेही आत्मज्ञान होते, हीच ईश्वर प्राप्ती, मोक्ष प्राप्ती, जीवनातून, जन्ममरणाच्या चक्रातून मूक्ती होय अशी दुसरी संकल्पना.

अशा ह्या दोन्ही कल्पना शुध्द तर्कावर टिकत नाहीत म्हणून त्या मी मानित नाही, असे जेंव्हा मी म्हणायचो, तेंव्हा मला सांगण्यात यायचे की, निसर्गात असणाऱ्या पदार्थात, पंचमहाभूतात असलेली प्रचंड शक्ती तुम्ही अनुभवता ना! मानता ना! अशा ही शक्ती म्हणजे ईश्वर. अशा तऱ्हेच्या निसर्गशक्तीला जर ईश्वर मानल्या जात असेल तर अशा तऱ्हेचे ईश्वराचे अस्तित्व मानायला कोणाचीच हरकत असण्याचे कारण नाही

ईश्वराचे अस्तित्व मानणाऱ्यांना, ईश्वरवादिंना आस्तिक, आणि अस्तित्व न माननाऱ्यां निरिश्वरवादिंना नास्तिक म्हणून ओळखण्यात येते. मी मात्र निसर्गवादि असणाऱ्यांना, निसर्गशक्तीला ईश्वर संबोधिणाऱ्यांना वास्तविक म्हणणेच संयुक्तिक मानेल. ईश्वर आहे किंवा नाही याच उत्तर देतांना, पुष्कळ जन माहित नाही, सांगता येत नाही अशी भुमिका पण घेतात आणि अशांना अज्ञेयवादि म्हणून संबोधिण्यात येते.

. जी गोष्ट अस्तित्वात नाही, जी कोणालाच ज्ञात नाही, अशा गोष्टींच्या होणाऱ्या भासाला, भ्रामकता, भ्रामक ज्ञान म्हणता

येईल. अशा कितीतरी भ्रामक कल्पना आपण आयुष्यात आयुष्यभर जोपासत असतो. म्हणूनच मला जेंव्हा ईश्वराच्या अस्तित्वाविषयी प्रश्न विचारण्यात येतात, तेंव्हा मी प्रश्न विचारणाऱ्यांना प्रतिप्रश्न विचारतो की, त्याला काय वाटते. कोणी ईश्वर आहेच, कोणी सांगता येत नाही आणि कोणी ईश्वर नाही अशी उत्तरे देतात. बहुतकरून ईश्वर आहे असे मानणारे, म्हणणारेच असतात. सांगता येत नाही, ईश्वर नाही असे म्हणणारे विरळच असतात.

ईश्वर आहे असे म्हणणारे, मानणारे विश्वाची निर्मिती हेच ईश्वराचे अस्तित्व सिध्द करण्यास सबळ कारण सांगतात. कोणतीही गोष्ट निर्माण करायला निर्माता लागतो, म्हणून विश्वाची निर्मिती करणारा तो ईश्वर. विश्वनिर्मिती कशी झाली, विश्वात निरनिराळे पदार्थ आणि अशा पदार्थात निरनिराळे गुणधर्म कोठून आणि कसे आलेत, याचा उलगडा अजूनही झालेला नाही हे निर्विवाद सत्य आहे. आणि असा उलगडा होईल किंवा नाही, झालाच तर केंव्हा होइल, हे सांगणेही कठीण. निरनिराळ्या गुणधर्माच्या कणांच्या एकत्रीत येण्यातून आणि त्यांच्या गुणाकारात्मक वाढीतून विश्वाची निर्मिती झाली असे उत्क्रांतीवाद सांगतो. तरीही प्रश्न पडतो की, मुळातील सुरवातीचे कण आलेत कोठून? स्त्री-पुरुषांच्या समागमातून मुल जन्माला कसे येते, बीज

जमिनीत पेरल्याने झाड कसे कसे वाढते, याची उत्तरे विज्ञान देऊ शकते. परंतु मुल का जन्मते, झाड का ऊगवते-वाढते, थंड लाकुड पेटविल्यास उष्ण अग्नी का निर्माण होतो. निसर्गातील काही पदार्थांतील अणूमध्ये प्रचंड शक्ती का असते? या का ची उत्तरे विज्ञान देऊ शकत नाही. या का ला ईश्वराची करणी, ईश्वराची इच्छा, ईश्वराचे कार्य असे मग भलेही तुम्ही म्हणा. परंतु असे म्हणतांना अशा कोण्या विश्वनिर्मात्याला, ईश्वराला; आधारहिन, तर्कशुन्य, अनाकलनीय, कितीतरी परस्पर विरोधी, अनावश्यक, अनाहूत बिरुदे आपण का लावतो हेच समजत नाही.

विश्वाची निर्मिती ईश्वराने केली असे मानले तरी, मग ईश्वर कसा निर्माण झाला, कोठून आला, त्याची निर्मिती कोणी केली, कशी केली, अशा तऱ्हेचे प्रश्न अनुत्तरीत राहतातच आणि राहणारच. ईश्वर नित्य आहे असे म्हणणे सोपे आहे. परंतु नित्य म्हणजे काय? नित्य विना सुरुवात असू शकते काय? ह्याचा खुलासा कोणीच करू शकत नाही. म्हणूनच ईश्वर आहे असे म्हणणाऱ्यांना, मानणाऱ्यांना मी पुन्हा प्रश्न विचारतो की, ईश्वर असला काय किंवा नसला काय, ईश्वर मानला काय किंवा न मानला काय, यामुळे माणसाला काय फ़रक पडतो? तुम्ही किती मानला तरी ईश्वर नसेल तर तर तो नसणारच आणि ईश्वर नाही मानला तरी, ईश्वर असेल तर तो असणारच. तुम्ही म्हणाल असे

कसे बुवा. ईश्वराचे अस्तित्व माणून, ईश्वर आहे म्हणूनच तर आम्ही व्रत-वैकल्ये, उपवास, नवस, कर्मकांड, आदि करून त्याला प्रसन्न करण्याचा, ठेवण्याचा तदवतच त्याची प्रार्थना, पुजा, भक्ती, जपतप आदि करून मोक्ष, मुक्ती मिळविण्याच्याच प्रयत्नात सदैव असतो. अशाने ईश्वर आपल्या जीवनाची नौका सुखरुप पैलतीरावर नेईल, आपल्या जीवनातील आशा, आकांक्षा, इच्छा, ईप्सित आपोआप साध्य करून देईल, आपल्याला प्रत्येक कार्यात यश देईल अशीच आपली धारणा असते. आश्चर्याची बाब म्हणजे अशा या प्रत्येक कर्मकांडात, विधीत ब्राह्मण भोजन, ब्राह्मण दक्षिणा आदि असतेच. मुळात विचार केल्यास, आपले इप्सित, मग ते खोटेनाटे का असेना, साध्य करून घेण्याकरिता ब्राह्मण, भटजी या एजंटामार्फ़त ईश्वराला लाच देण्याचा, लालुस दाखविण्याचाच हा प्रकार भासतो. वेदकालीन ब्राह्मणांनी आपल्या उदरनिर्वाहाकरिता अशी व्यवस्था धर्मग्रंथाद्वारे मुद्दामच केली असावी असा संशय यायला चांगलाच वाव आहे. तुम्ही ईश्वराची कितीही भक्ती, पुजा, प्रार्थना केलीत, जपतप केलेत, कर्मकांड केलीत, ब्राह्मण- भटजींना दान-दक्षिणा दिल्यात, तरी प्रामाणिकपणे अभ्यास केल्याशिवाय, विना अभ्यास परिक्षेत खरे पास होऊ शकत नाही. कॉपी करून वाम मार्गाने मार्कस मिळवून भलेही पास व्हाल.

कोणत्याही कार्यात यश मिळवायच असेल तर

प्रामाणिकपणे ते कार्य करणे हाच खरा ईश्वरी मार्ग आहे. अशा तऱ्हेने मिळणारे यशच खरे यश असते आणि अशा यशातूनच जीवनात आनंद आणि शांती मिळते. आज मात्र यशस्वी दिसत असलेल्या माणसाच्या पदरी सुध्दा तणाव युक्त जीवन दिसते कारण त्यांचे असे यश हे खोटे, भ्रामक असते, वाममार्गाने मिळविलेले असते.

ईश्वरी कर्म करणे, हाच ईश्वर प्राप्तीचा, ईश्वरी मार्ग आहे. तो सुगम, सुलभ आहे. मृत्युनंतर नरकवास, नरकयातना, टाळून स्वर्गात जाण्यापेक्षा, आत्म्याच परमात्म्यात विलिनीकरण होण्यापेक्षा, चांगला पुनर्जन्म मिळण्यापेक्षा; याच जीवनात निःसिम आनंद, शांती, निरपेक्ष प्रेम लाभणे, हीच खरी ईश्वर प्राप्ती, ती मिळविणे हेच ईश्वरी कर्म, जीवन कार्य, आणि सदाचरण. प्रामणिक वृत्ती, प्रेमळ माणूसकीची वागणूक हेच ती मिळविण्याचे ईश्वरी मार्ग. अहिंसा, सत्य, अस्तेय (चोरी न करणे), अपरिग्रह (गरजेपेक्षा जास्त संग्रह न करणे) या तत्वांची जपणूक आणि काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रीपूवर विजय या ईश्वरी मार्गानेच, सदाचरण (ईश्वरी कर्म) साधून, जीवनात खरी आनंद प्राप्ती (ईश्वराची प्राप्ती) होणारी आहे. हीच खरी स्वर्ग प्राप्ती. याकरिता बळ मिळावे म्हणून, तशी आपली प्रवृत्ती बनावी म्हणून मनाची शक्ती मिळावी म्हणून जर तुम्ही प्रार्थना, मनन, चिंतन करित असाल, कराल तर त्याला हरकत

घेण्याचे कारण नसावे. पण याकरिता भव्य प्रार्थनास्थळे, अवाढव्य मंदिरे बांधण्याची, असायची आवश्यकता नाही. अशी स्थळे शेवटी ब्राह्मण-भटजींची, आतातर व्यापाऱ्यांची पण धंद्याचीच ठिकाणे होतांना आपण पाहतो. किंबहूना मी तर म्हणेल जर संस्कारातून जन्मापासूनच आपल्या मनावर असे ईश्वरी कर्म, सदाचरणी धर्म पक्के बिंबविलेत तर तुमची तशी मनःस्थिती आपोआप तयार होईल, मग तुम्हाला प्रार्थना, पुजा-अर्चा करून परिवर्तनाने चांगले मन घडविण्याचे पण काम पडणार नाही. परंतु हे न करता, अंगिकारलेल्या चुकीच्या संस्कारांमुळे दुराचरण करित राहायचे आणि मग अशा पापी कृत्यातून मुक्तीकरिता कर्मकांडे, बेमतलबी विधी करित राहायचे, परमेश्वराला साकडे घालत राहायचे, याने काहीच साध्य होणे नाही.

थोडक्यात, ईश्वर आहे किंवा नाही, ईश्वराचे अस्तित्व मानायचे किंवा न मानायचे, याचा विचार न करता : सुविचार, सुवचन आणि सुवर्तन म्हणजेच सदाचरण अंगिकारा. यानेच मग तुम्हाला खऱ्या अर्थाने जीवनात सुख, आनंद, शांती (स्वर्गानंद) यांचा म्हणजेच ईश्वर प्राप्तीचा लाभ होईल. मग तुम्ही जशी कल्पना केलेली असेल तसा; ईश्वर असो-नसो; ईश्वर माना-न- माना.

# (२९)

## ईश्वराचे स्वरुप

ईश्वराच्या अस्तित्वाविषयी तीन प्रकारचे दृष्टीकोन आढळतात.

(१) ईश्वराचे अस्तित्व मानणारे; आस्तिक, ईश्वरवादी

(२) ईश्वराचे अस्तित्व न मानणारे, नाकारनारे; नास्तिक, निरिश्वरवादि, वा अनीश्वरवादि

(३) अज्ञेयवादि; की ज्यांना ईश्वराच्या अस्तित्वाविष्यी शंका वाटते, संशय वाटतो, तसेच मानवी ज्ञानशक्तीच्या मर्यादेपलीकडील तो विषय असल्याने, जे त्याच्या विषयी अनिश्चितपणाची, मौनाची भूमिका स्वीकारणे पसंत करतात. किंवा ईश्वराच्या अस्तित्वाविषयी असेल वा नसेल, माहित नाही असा दृष्टीकोन घेतांना दिसतात.

बौध्द, जैन ह्या धर्मप्रणाली तसेच चार्वाक, सांख्य, पूर्वमिमांसा आदि भारतीय दर्शने, निरिश्वरवादि असून ते ईश्वराचे अस्तित्व माणित नाहीत. म्हणून ईश्वर ही कल्पना सर्व धर्माचे गृहीत तत्व आहे असे व्यापक विधान करणे इष्ट ठरणार नाही. बाकी सर्व धर्म ईश्वरवादि, ईश्वराचे अस्तित्व मानणारे आहेत. परंतु असे

अस्तित्व मानतांना ईश्वराच्या स्वरुपावषयी मात्र निश्चितता अजिबात नाही.

ईश्वरवादि विविध धर्मसंप्रदायांनी (१) निर्गुण-निराकार (२) सगुण-निराकार (३) सगुण साकार अशा त्रिविध ईश्वर कल्पना गृहीत धरलेल्या आढळतात.

उपनिषदातील ब्रह्म, आत्मन या संकल्पने प्रमाणेच जपानमधील ताओ धर्मातील ईश्वर कल्पना पहिल्या प्रकारच्या म्हणजे निर्गुण-निराकार आढळून येतात.

यहोवा (यहूदी धर्म), गौड (ख्रिश्चन धर्म), अल्लाह (इस्लाम धर्म), आहुरमझ्द (झरथुष्ट्री -पारसी धर्म) ह्या ईश्वर कल्पना सगुण-निराकार प्रकारच्या आढळतात.

भक्तीमार्ग, वेदांन्ती आचार्य तसेच वैष्णव, शैव, शाक्त, सौर, गाणपत्य हे हिन्दु धर्मातील संप्रदाय, यामधून सगुण-साकार ईश्वराची कल्पना व तदनुसार प्रतिकोपासना किंवा प्रतिमापूजा, मूर्तीपूजा रुढ झालेली दिसते. हिंदु धर्मातील विविध उपासना संप्रदायांनी सगुण-साकार ईश्वरी प्रतिके, प्रतिमा मान्य केलेल्या दिसतात. गणपत्यथर्वशीर्ष सुक्तात महागणपतीचे सगुण-साकार तसेच सगुण-निराकार दोन्ही वर्णने आढळतात

ईश म्हणजे स्वामित्व करणे, नियंत्रण करणे, सत्ता चालविणे किंवा अश म्हणजे व्यापून राहाणे या धातुपासून ईश्वर शब्द बनलेला दिसतो. यानुसार की काय, सर्व धर्मप्रणालीमध्ये सर्वज्ञ, सर्व शक्तीमान, सर्वांतर्यामी, सर्वव्यापी, ईश्वराची कल्पना अंतर्भूत दिसते. तदवतच परमप्रभू, परमन्यायी, परमदयाळू अशी सुध्दा ईश्वराविषयी कल्पना सर्वच धर्मात आहे.

विज्ञाननिष्ठ, इहवाद व मानवतावाद या भूमिकेत परंपरागत संस्थात्मक धर्माचा अस्वीकार दिसतो. त्याचप्रमाणे संप्रदायनिष्ठ ईश्वरकल्पनेचाही अस्वीकार दिसतो. ईश्वर-निरपेक्ष धर्म (Religion without God) स्वीकारून त्याआधारे मानवी मूल्यांचे प्रबोधन करण्याची दृष्टी आजच्या धर्मनिरपेक्ष (Secular) भूमिकेमध्ये अंतर्भूत दिसते.

सृष्टीची उत्पत्ती, निर्मिती आणि नियंत्रण याविषयी तत्ववाद आणि ईश्वरवाद हे दोन विचार प्रवाह प्रामुख्याने आढळतात.

तत्ववादामध्ये फ़क्त एकतत्ववादच (Monism) आहे. यालाच अद्वैतवाद (Non-dualism) पण संबोधितात. या तत्ववादामध्ये विश्वनिर्मितीचे, मानव जीवनाचे अंतिम सत्य (Ultimate Reality) हे एक निर्गुणात्मक अपौरुषेय तत्व आहे आणि ते विश्वभर व्यापलेले आहे अशी कल्पना आहे. हिंदु धर्मात

यालाच ब्रह्मतत्व म्हणून संबोधितात आणि ब्रम्हालाच निर्गुण-निराकार ईश्वर मानल्या जाते. ह्यालाच परमात्मा असेही म्हणतात. आणि अशा परमात्म्याचा अंश प्रत्येक माणसात असतो अशीही संकल्पना आहे. सृष्टीची निर्मिती, नियंत्रण करणाऱ्याला गुणात्मक असणे आवश्यक असते. मग निर्गुण म्हणजे ज्याला काहीच गुण नाही असा ब्रम्ह ईश्वर तत्व हे कसे सगुणात्मक प्रकृती, सृष्टी निर्माण करू शकेल. ? याचे उत्तर देणे धर्माचाऱ्यांना, तत्ववेत्यांना जेंव्हा अडचणीचे झाले तेंव्हा त्यांनी, निर्गुण ईश्वरी स्वरुपाचा अर्थ गुणशूण्यता किंवा गुणांचा अभाव नसून, संपूर्णगुणांचे पूर्णत्व निर्देशित करितो, सर्वगुणसंपन्नता दर्शवितो, असा युक्तीवाद मांडला. म्हणजे निर्गुण आणि सगुण एकच. आहे की नाही वितंडवादाची, बुध्दी भ्रम (Delusion) पसरविण्याची कमाल. असे तत्वज्ञान रुजविणाऱ्यांची कीव करण्यापेक्षा आपण त्यांना महान तत्ववेत्ते, धर्माचार्य आदि संबोधून डोक्यावर घेवून नाचतो. किती ही धार्मिक अंधता!

ईश्वरवादी धर्मामध्ये हिंदु धर्म सोडून बाकी बहुतेक सर्व धर्म एकेश्वरवादी आहेत आणि त्यातही ते धर्म वर सांगितल्याप्रमणे ईश्वराचे सगुण-निराकार स्वरुप मानणारे असल्यामुळे त्या धर्मांत साकार प्रतिमा, मूर्ती पुजा, कर्मकांड आदिचे अवास्तव स्तोम नाही. हिंदु धर्मात मात्र ईश्वराच्या स्वरुपाविषयी अनेक वाद आहेत.

निर्गुण-निराकार अशा ब्रम्ह तत्वाबरोबर सगुण-निराकार, सगुण-साकार हे दोन्ही स्वरुप या धर्मात आढळतात. एकेश्वर वादाचे सामान्यतः; निर्माता स्वतंत्रवाद (Deism), सर्वेश्वरवाद (Pantheism), आणि दशांगुले उरला वाद (Panentheism) असे तीन प्रकार मानल्या जातात. जगाला निर्माण करणारा ईश्वर स्वतः जगतबाह्य असा असतो असे मानणाऱ्या विचारसरणीला निर्मातास्वतंत्र वाद किंवा सृष्टीबाह्य ईश्वरवाद (Deism) असे म्हणतात. वैकुंठवाशी विष्णु वा कैलासपती शिव जगताचा निर्माता आहे असे म्हणणारे वैष्णवपंथी वा शैवपंथी या विचार सरणीचे पुरस्कर्ते ठरतात. ज्या वादानुसार विश्व म्हणजे ईश्वर असा समीकरणात्मक संबंध ईश्वर व विश्व यांच्या मध्ये मानला जातो त्या वादाला सर्वेश्वर वाद किंवा सृष्टी-समव्याप्त ईश्वर वाद (Pantheism) असे म्हणतात. ईश्वराने या जगतालाच फ़क्त व्यापले नाही तर जगताला व्यापूनही तो पुन्हा स्वतः उरला आहे असे मानणाऱ्या वादाला दशांगुले-उरला वाद (Panentheism) किंवा अतित वाद(Transcendentalism) असे म्हणतात. वैदिकांचा एकेश्वरवाद जो शेवटी शेवटी मांडण्यात आलेल दिसतो तो याच प्रकारात मोडतो.

हिंदुधर्मीय बहुतकरून अनेकेश्वरवादी, बहुदेवतावादी आहेत. सुर्य देवता, अग्नी देवता, जल देवता, वन देवता, मेघ देवता,

चंद्र देवता, पृथ्वी देवता, आदि निसर्गातील एकेका शक्तीची एकेक देवता अशा कितीतरी देवता मानण्यात येत होत्या, अजूनही येतात. संस्कृतीच्या उषःकालात वैदिक लोक बहुदेवतावादीच होते. विश्वातील प्रत्येक लोकात ११ अशा तिन्ही लोकातील (घृलोक, भूलोक, अंतरिक्ष लोक) देवतांची संख्या ३३ निर्धारित केलेली आढळते. ऋगवेदात एके ठिकाणी देवांची संख्या ३३३९ सांगितलेली आहे. अशा ह्या देवता, आपल्या ईश्वराविषयीच्या सर्वज्ञ, सर्वव्यापी, सर्व शक्तीमान अशा ज्या संकल्पना आहेत त्या नक्कीच पूर्ण करू शकत नाहीत. या संदर्भात मग, देवता अनेक असल्या तरी, ज्या-ज्या वेळेस ज्या-ज्या देवतांचे, शक्तीचे स्मरण केल्या जाते, ज्या-ज्या देवतांची आपल्या मनांत कल्पना प्रस्तुत असते, त्या -त्यावेळेस त्या-त्या देवता सर्व श्रेष्ठ असतात असा वाद पुढे मांडण्यात आला.. या वादाला प्रस्तूत देवतावाद (Henotheism) वा एकश्रेष्ठ देवता वाद म्हणण्यात येते. एका वेळेस एका देवाला, दुसऱ्या वेळेस दुसऱ्याला श्रेष्ठ मानणाऱ्या प्रवृत्तीतील विसंगती दाखवितांना तसेच यातील मानसशास्त्रीय दृष्ट्या असंभवनीयता दाखवितांना मॅक्सम्युलर या तत्ववेत्याने गंगा गयो गंगादास, जमुना गयो जमुनादास अशी यावर टिका केलेली आढळते.

तसेच विश्वात असंख्य देव, ३३ कोटी पर्यंत, असून त्या सर्वांचा एक देवाधिदेव आहे, अशीही कल्पना आहे. ऋगवेद हा इंद्र देवता प्रधान आहे. वेदात इंद्राबरोबरच अग्नी, वरुण, मरुत, अस्मी, सोम, मित्र, उषा, अशा अनेक देवता वर्णिलेल्या असून त्यांना प्रसन्न करणारी स्तवणे संहिता भागात आहेत. ब्रम्हा, विष्णु, महेश (शिव), गणेश, आदि इतर ईश्वरांचा उल्लेख वेदात आढळत नाही, त्यांचा उगम पुराणातील दिसतो. आपण पुराणांपेक्षा वेदांना अग्रक्रम, महत्व देतो परंतु वेदांतील ईश्वर; इंद्र, वरुण, अग्नी ऐवजी पुराणातील ब्रम्हा, विश्णु, महेश यां देवांना श्रेष्ठत्व देतो. ही विसंगतीच नव्हे काय? ईश्वराच्या अवतारांचे भूतलावावर अवतरणे हे पुराणातून आलेले दिसते. विठ्ठल-पांडूरंग देवाचा उल्लेख वेद वा पुराणातही मला आढळला नाही. या देवाची निर्मिती १४ व्या शतकात झालेली आढळते.

अशा तऱ्हेने ईश्वराच्या स्वरुपाविषयी नानाविध, परस्पर भिन्न, अतिरंजित, किचकट, बुध्दीभ्रम करणाऱ्या कल्पना आपल्या तत्वज्ञानात, धर्मात आढळतात. ऋग्वेदातील धर्मभावना देवतेपुढे विनम्र होवून तिच्या कृपाप्रसादाने इष्ट गोष्टी प्राप्त करून घ्याव्यात अशी आहे, तर अथर्ववेदाचा भर यातुविद्या, म्हणजे जादुटोणा यावर आहे. मंत्र हे स्वतःच्या सामर्थ्याने काही गोष्टी घडवून आणतील आणि ठराविक कर्मकांड आचरल्यास आपणाला हव्या

त्या गोष्टी करणे देवतांना भाग पडेल अशी वृत्ती अथर्ववेदामध्ये आहे. आपल्याला हव्या असलेल्या इष्ट गोष्टी प्राप्त करून घेण्यासाठी देवांना पुजा, भक्ती, जप, तप, आदिंनी किंवा जादुटोना, जारण, मारण, उच्चाटन आदिंनी प्रसन्न करण्याची वृत्ती स्वार्थीच नव्हे काय? आपले ईप्सित साध्य करण्यासाठी, होण्यासाठी देवाला जे स्वर्णालंकार चढविल्या जातात तसेच कोंबडी, बोकडे, आदि जनावरे आणि प्रसंगी लहान मुलांचे जे बळी दिल्या जातात, हे देवांना लालुच दाखविण्यासारखे, लाच देण्यासारखेच नाही काय? आणि तीही कशातऱ्हेची! आपले राजकिय नेते सत्ता, खुर्ची, मंत्रीपद आदि मिळविण्याकरिता, टिकविण्याकरिता ज्या अघोरी वा देवांना प्रसन्न करणाऱ्या यज्ञ आदि अन्य मार्गाचा अवलंब करतात, याला काय म्हणावे १ अशा ईश्वरी स्वरुपाच्या कल्पनांनी काहीच साध्य होणे नाही. कितीही अवाढव्य मंदिरे बांधलीत (तेही देह देवाचेच मंदिर म्हणत) आणि कोणतेही-कितीही यज्ञ केलेत तरी विश्वशांती, मनःशांती लाभणे नाही. ती लाभू शकेल फ़क्त आपल्या विवेकी, योग्य संस्कारातून, मानवामानवामध्ये प्रेम भावना रुजविल्या तरच. म्हणून. निस्वार्थीपणे, प्रामाणिकपणे सदाचरण बाळगणे, वैरत्व, द्वेष, शत्रुत्व, टाळून, मतभेद बाजुला सारून, समानता अंगिकारून; एकमेकांवर, सर्वांवरच प्रेम करणे, खेळीमेळीच्या वातावरणात जीवन जगणे, तसे संस्कार रुजवून घेणे,

हेच खरे ईश्वरी प्रेम, ईश्वरी कर्म, ईश्वरी धर्म जाणा; यातच ईश्वराचे अस्तित्व, स्वरुप माना,. स्वार्थी भावनांनी पूजा अर्चा करणे ईश्वराला दान-दक्षिणा देणे आदि कर्मकांडांपेक्षा हेच योग्य समजून असेच संस्कार रुजवा आणि मग पहा तुमचे जीवन कसे आनंदमय होते ते.

## (३०)

# धर्माचे प्रयोजन

धर्म ह शब्द उच्चारला की प्रत्येकाचे मनांत एक वेगळीच स्फ़ुर्ती संचारते. धर्म म्हणजे काय? धर्माचे प्रयोजन कशाकरिता असते? आपल्या धर्मात नक्की काय सांगितलेले आहे? काय केले म्हणजे धर्माचरण होते? याची निश्चित कल्पना बहुतांशी कोणालाच नसते. किंबहुना एकाच धर्माच्या निरनिराळ्या ग्रंथात त्या धर्माविषयीच्या निरनिराळ्या कल्पना, विचार आढळतात. असे हे ग्रंथ वाचल्यास धर्माची स्पष्ट कल्पना तर होतच नाही, पण धर्माविषयी गोंधळच जास्त निर्माण होतो. साध उदाहरण देतो. वेदांना आपण आद्य ग्रंथ मानतो, तसेच ब्रम्हा, विष्णु, महेश (शिव) यांना देवांमध्ये सर्वात जास्त श्रेष्ठता देतो. परंतु वेदांमध्ये इंद्र, वरुण, आणि अग्नी तसेच सुर्य, चंद्र यांनाच प्रमुख देव मानलेले आहे. आणि इंद्राला सर्व श्रेष्ठ देव मानलेले आहे. हे आपणाला किती जनांना माहित आहे? आता वेद जर धर्मग्रंथात श्रेष्ठ आहेत, तर इंद्र हाच सर्वात श्रेष्ठ देव असावयास, मानावयास पाहिजे. मग ब्रम्हा, विष्णु, महेश, हे वेदात नसलेले आणि पुराणातून आलेले देव श्रेष्ठ कसे? हे श्रेष्ठ देव मानलेत, तर मग वेदांची श्रेष्ठता खोटी ठरणार नाही

काय? पण धर्मग्रंथ नक्की काय आहेत, हे न जाणताही, धर्माबद्दल पराकोटीचा स्वाभिमान निर्माण करणारी आपली संस्कारपध्दती अदभूतच म्हटली पाहिजे. एकवेळ धर्माविषयी असा स्वाभिमान मानता येईलही, परंतु याबरोबरच आपलाच धर्म सर्वात श्रेष्ठ असा वृथा अभिमान आणि त्यामुळे इतर धर्माविषयी आकस निर्माण करणारी संस्कृती जी आपल्या धर्माला पण मान्य नसते; तीही आपण जोपासतो, हा विरोधाभास न समजण्यासारखा आहे.

धर्म हा वैयक्तीक (Personal) असतो, अस सर्वच म्हणतात. परंतु असे म्हणणे, हा आपले विचार फ़ारच प्रगल्भ आहेत, असे दाखविण्याचाच भाग असतो. प्रत्येकाला धर्म स्वातंत्र्य असते, प्रत्येक जन त्याला वाटेल तो धर्म अंगिकारण्यास मोकळा आहे, स्वतंत्र आहे, हा फ़क्त म्हणण्याचाच भाग. धर्म हा आता अनुवंशिक झालेला आहे. धर्म आपण जन्मानेच घेवून येत असतो.

तस पाहिल तर, जीवनात मनुष्य एकटा राहू शकत नाही. त्याला इतरांच्या सहवासात राहावच लागत. म्हणूनच इंग्रजीत म्हणतात Man is a bio-social animal म्हणजे मनुष्य हा नुसताच शारीरिक नसून सामाजिक प्राणी पण आहे. विज्ञानाचे प्रगतीमुळे सर्व विश्वातील माणसे, जरी दुरदुर राहात असलीत; निरनिराळी संस्कृती जोपासत असलीत, तरी एकमेकाच्या संबंधात

आलेली आहेत आणि इतक्या विश्वव्यापी अफ़ाट जनसमुदायाचे संबंध जोपासण्याकरिता, व्यवस्था निर्माण झाली. तशा व्यवस्थेची आवश्यकता होतीच. अशा या विश्वभरातील जनसमुदायाच्या संबंधाबाबतीतील, व्यवस्थेचे भौगोलिक आणि सामाजिक असे दोन भाग पाडल्या गेलेत, पाडण्यात आलेत. जसे की, आपले घर, वेटाळ, तालुका, जिल्हा, राज्य(प्रांत), राष्ट्र (देश) आणि विश्व (जग), असे भौगोलिक विभाजन आणि आपण स्वतः, कुटुंब, नातलग, पोटजात, जात, आणि धर्म हे सामाजिक विभाजन. भाषा वा बोली, व्यवसाय, चालीरीती, रक्तसंबंध वा नातेसंबंधाची जुळवण, जीवनाविषयीच्या कल्पना आणि त्यानुसार आचरण हे सामाजिक प्रथांनुसार चालते, तर समाजातील निरनिराळ्या विभागाची साधणी, जुळवणी आणि त्यावर योग्य नियंत्रण हे भौगोलिक विभाजनानुसार करण्यात येते.

सामाजिक व्यवस्थेत धर्माला खूपच प्राबल्य आहे. जे धरण्यास योग्य तो धर्म अशी सरळ, साधी, सोपी धर्माची व्याख्या आहे. जीवनात जे आचरण करणे योग्य, जी तत्वे अवलंबिणे योग्य तो धर्म. जीवन पुष्कळ तऱ्हेने जगता येते म्हणून निरनिराळ्या माणसाच्या समुदायाच्या, नैसर्गिक, वातावरणीय परिस्थितीनुसार, त्यांच्या विचारांच्या, चालीरीतीच्या उत्क्रांतीनुसार, जस-जसे योग्य वातावरण त्यांना वाटले, तसतसे निरनिराळे धर्म उदयास आलेत.

परंतु बहुतेक सर्वच धर्मातील सुज्ञांनी, तज्ञांनी, नेत्यांनी, म्होरक्यांनी, धर्ममार्तंड्यांनी; लोकांनी आपल्या धर्माचे काटेकोरपणे पालन करावे म्हणून, धर्माप्रमाणे आचरण करणे, कसे योग्य हे पटवून देण्याचे, समाजात रुजविण्याचे भानगडीत न पडता, असे आचरण न केल्यास त्याच्या वाईट परिणामांची, पापांची आणि पापांवर शिक्षेची भिती मानवाच्या मनात रुजविली. यातूनच पाप-पुण्याची कल्पना साकारली. ईश्वराचे अधिष्ठान उदयास आले. धर्मानुसार आचरण न केल्यास, ईश्वर, जो जगत निर्माता आहे, जो सर्व व्यापी आहे, सर्वज्ञानी आहे, सर्व पराक्रमी आहे, त्याचा कोप होतो व तो आपल्यला शिक्षा करतो, अशा भावना, विचार रुजविण्यात आलेत, आणि त्याचा कोप घालवायचा असेल तर, त्याची भक्ती करावी, प्रार्थना करावी म्हणजे तो प्राप्त होतो व आपले पाप धुवून काढतो, आपले इप्सित पूरे करतो; अशाही भावना सबळ केल्या गेल्यात. ईश्वराची भक्ती, प्रार्थना करण्याचा उद्देश हाच असावा की अशा मनन करण्यातून आपण धर्माचरण, सदाचरण करू; अशी आपल्या मनाची ठेवण करतो. (Programming of mind) आपले आचरण चुकले असल्यास, तसे मानतो व सुधारण्याचे मनाने ठरवितो. म्हणजेच आचरण सुधारतो, धर्माचरण अंगीकारतो.

आता जीवनाच्या सर्वच क्षेत्रांचे व्यापारीकरण झालेले आहे. धर्मांचे बाबतीत सुध्दा; व्यापारी मनोवृत्तीतून, आर्थिक लक्ष

समोर ठेवून, धार्मिक विधींचे सोयीस्करपणे अवमुल्यान झालेले आहे, करण्यात आलेले आहे. लग्न ठरवितांना कुंडल्या जमत नसतात, गुण जुळत नसतात; पण पैसे खर्च केलेत की सर्व साधल्या जाते. ग्रहशांती केल्या जाते. ईश्वराचा कोप शमविल्या जातो. म्हणून आता पापाची भिती तितकिशी कुणालाच राहिलेली नाही. करा पाप, खोटेपणा, चोरी, लबाडी; कमवा करोडो रुपये आणि यातील काही लाख देवाला दान करून, पिडितांना दान करून, सामजिक कार्याला देऊन, पुण्य करून, करा पाप क्षालन; अशी प्रवृत्ती वाढलेली आहे. देवाला दान, हा लाच देण्याचाच प्रकार नाही काय? प्रामाणिक पैशाच्या दानापेक्षा काळया पैशाचे दानच जास्त असते. जसे की कितीतरी मंदिरात जास्त प्रमाणात गुप्तदानच केल्या जाते आणि अशा तऱ्हेने काळा पैसा मंदिराकडे जमा होतो. याची घृणा करण्यापेक्षा, अशा गोष्टींचा मोठेपणा मानन्यात येतो. त्या मंदिरातील भगवानाची ती कृपा असे समजल्या जाते. म्हणजे भगवान काळया पैशाला अभय देतो असाच त्याचा अर्थ होत नाही काय? अशी ही धर्माची, धर्मसंस्थानांची पसरण, घसरण. तसेच आपली पापे धुवून निघावित किंवा आपला आणखीच फ़ायदा व्हावा म्हणून लोक देवाला सोन्याचा मुकुट चढवितात, त्याला हार तुऱ्याने सजवितात. आणि मग ह्या मुल्यवान वस्तुंची चोरी होवू नये म्हणून देवाच्या गाभाऱ्याला कुलुप लावून देवाला बंदिस्त करतात,

त्यावर पहारा बसवितात आणि आपला सर्व शक्तिमान देव सुध्दा कैदी होऊन राहतो. देव का ती कुलुपे तोडत नाही. त्याच्या अंगावरील मुल्यवान वस्तुंना हात लावणाऱ्यांचे हात तो का जाळत नाही. मंदिरात सर्वज्ञ, सर्वव्यापी, सर्व शक्तिमान देव असल्यानंतर सुध्दा तेथे भ्रष्टाचार, स्त्रियांचे पावित्र्य हरण कसे होते. तेथील लोकांना, साधू महाराजांना (ते ढोंगी का असेनात) देव असे कसे करु देतो. देव पाप्यांना शिक्षा करतो, मग यांना का शिक्षा करित नाही. याचा आपण शिक्षित म्हणविणारे विचारच करणार नाही आहोत का?

सर्व धर्म मुळात माणूसकी शिकवितात. परंतु सर्वच आता माणूसकी विसरलेले आहेत. सर्वच धर्मातील बहुतांशी लोकांनी माणूसकीचा धर्म सोडलेला आहे. आज समाजात पैशाचे व्यवहार आणि पैशासाठी व्यवहार हाच धर्म झालेला आहे. म्हणून लोकांची एकमेकांशी माणूसकीची, प्रेमाची वागणूक फ़ार कमी झालेली आहे, कमी होत आहे. परधर्मीयांविषयी तर, वैरत्वाची तिरस्काराची भावनाच जोपासल्या जात आहे. आपल्या संस्कारातून अशाच विषवेली अंकुरलेल्या आहेत, वाढलेल्या आहेत, वाढत आहेत. सर्वच धर्मातील एकमेव सार, मानव ही जात आणि माणूसकी, मानवता हा धर्म यालाच तिलांजली दिल्या गेलेली आहे.

जीवनाच्या खऱ्या अर्थापासून, खर आनंदी जीवन जगण्यापासून धर्मच आपणाला दुर नेत आहे. हे कोणत्याही एका धर्माविषयी नाही. सर्वच धर्माविषयी आहे. सर्वच धर्मातील गाभाच हरवलेला आहे. आपण खोलात, मुळात विचार केल्यास आपल्या लक्षात येईल की, धर्म हा फ़क्त धार्मिक विधी अनुकरणाकरिताच शिल्लक उरलेला आहे. अशा धार्मिक विधी आपण का करितो? त्याचे मागील प्रयोजन, हेतू काय? ज्या काळी ह्या धार्मिक विधी निर्माण झाल्यात, त्या काळी कदाचित त्या हव्या असतीलही, परंतु आजही त्या हव्या आहेत काय? त्याच महत्व आहे काय? त्याचा काही फ़ायदा आहे काय? त्याला काही अर्थ आहे काय? याचा तर्क शुध्द विचार आपण करितच नाही. तद्वतच, धार्मिक विधी आपल्या धर्माप्रमाणे कशा करायला पाहिजेत, हेही आपणाला माहित नसते. जस भटजी सांगतील, ती पूर्व दिशा. मग धार्मिक विधी करतांना भटजी त्याविधी धर्मशात्राप्रमाणे करतो काय? तो मंत्र बरोबर म्हणतो काय? हेही पाहण्याचे प्रयोजन नसते. अर्थात अशा विधींनी, मंत्रांनी काही होणे नसते. तरीही आपण बस आंधळेपणाने असे विधी करित असतो, आणि अशाने आनंद मिळते, समाधान मिळते अशी आपली समजूत करून घेत असतो. अशा कितीतरी अंधश्रध्दा, चुकीच्या श्रध्दा, धर्माद्वारे आपण जोपासत आलेलो आहोत, जोपासत आहोत. धर्मावर खरी श्रध्दा म्हणजे;

माणूसकीच्या आचरणावर, प्रेमळ वर्तनावर, आणि प्रामाणिकतेवर दृढ विश्वास. ही श्रध्दा बाळगा, असे आचरण ठेवा, मग पाहा, तुमच आयुष्य कस निखळ आनंदात जाते ते. मग दुसरा कोणताही धर्म आचरा अथवा नका आचरु. कोणाच भल नाही केल तरी चालेल; पण कोणाचच वाईट करू नका, चिंतू नका. समाज कार्य (समाजसेवा नव्हे) हे मान-सन्मान मिळविण्याकरिता, सत्ता मिळविण्याकरिता नव्हे, तर खेळीमेळीचा आनंद मिळविण्याकरित करा. सर्वंना समान माना, समानतेची वागणूक द्या, सर्वांवर प्रेम करा हाच खरा धर्म. इतरांनी जस तुमच्याशी वागाव अस तुम्हाला वाटत, तस तुम्ही इतरांशी वागा, हाच धर्माचा सरळ, साधा, सोपा, सहज, सुलभ आणि समग्र अर्थ. हा अर्थ समजण्याकरिता कोणताही धर्मग्रंथ वाचण्याची, धार्मिक विधी करण्याची गरज आहे असे नाही. परंतु आपण माणूसकीच वागण आणि प्रामाणिक वर्तणूक सोडून, धर्मातील बाकी सर्वच, मुख्यत्वेकरून कर्मकांड करित असतो आणि यामुळेच जीवन त्रासवित असतो, नासवित असतो. शेवटी

*सर्व धर्म असती, मानवाच्या कल्यणार्थ*
*धर्मा-धर्मातील जनांमध्ये, सलोखा साधण्यार्थ*
*कार्यरत परि ते, एकमेकांच्या विध्वंसार्थ*

*स्वधर्म श्रेष्ठतेसाठी, परधर्मीयांचा द्वेष करण्यार्थ*

*समाजासमाजातील वातावरण, नासविण्यार्थ*

*विचार करावा, अशा धर्मांच्या पुनःरुजीवनार्थ*

*सर्व धर्मात श्रेष्ठ, मानवता धर्म स्वीकारण्यार्थ.!!*

# (३१)

# खरा धर्म

धर्म हा शब्द धृ या संस्कृत धातुपासून आलेला आहे. धृ म्हणजे धरणे म्हणून जे धरण्यास योग्य तो धर्म. तसेच कर्म हा कृ या संस्कृत धातुपासून आलेला. कृ म्हणजे करणे; म्हणून जे करण्यास योग्य ते कर्म. आणि करण्यास काय योग्य आहे ते धर्म संगणार. परंतु आज धर्म चांगल्या कर्मांपेक्षा कितीतरी वाईट, घातक कर्मांचाच पुरस्कार करतांना दिसतात. यातूनच निरर्थक कर्मकांडांचा उत आलेला आहे आणि अशा कर्मकांडांच्या नावाखाली बहुजन समाजाला निव्वळ लुबाडण्यात येत आहे. बहुजन समाज एकीकडे ब्राह्मणवादावर कडाडून हल्ला चढवितो तर दुसरीकडे ब्रह्मणांवर पोसणारी सर्व तऱ्हेची कर्मकांडे करण्यात अग्रेसर असतो, राहातो, हा विरोधाभास न समजण्यासारख आहे. परंतु असे केले जाते, कारण अशी कर्मकांडे केल्यानेच धर्मपालन होते आणि जीवन मुक्ती मिळते असे बालपणापासूनच धर्मांच्या संस्कारातून त्यांच्या मनावर रुजविण्यात येते. धर्मच भ्रामक मोक्षप्राप्तीच्या कल्पना मानवाच्या मनावर ठसवितात. काही मोजकेच धर्म वगळता प्रत्येकच धर्मात या ना त्या तऱ्हेने मुक्ती सांगितलेली आहे आणि अशी मुक्ती, मोक्ष मिळविण्याचा आमचाच मार्ग श्रेष्ठ अशी प्रत्येक धर्माची समजूत

आहे. तसा प्रत्येक धर्माचा आग्रह आहे आणि याकरिताच धर्माधर्मात तेढ आहे, स्पर्धा आहे, कटूता आहे. मोक्ष, मुक्ती म्हणजे काय. ती कशी असते याचे चित्र कोणत्याच धर्माने स्पष्टपणे रेखाटलेले वा रंगविलेले नाही. मोक्ष, मुक्ती याविषयीच्या संकल्पना ह्या कल्पना विलासातून आलेल्या असून त्या आधारहिन आहेत. याउपरही पापकर्मे न केल्याने, चांगले वर्तन ठेवल्याने मोक्ष, मुक्ती मिळत असेल तर चांगले वागण्यास आणि मुक्ती मिळविण्यास कोणाची हरकत असण्याचे कारण नाही. सर्वांनी समाजात चांगले, एकमेकांना पुरक वागले पाहिजे, त्यातच सर्वांचे हित आहे, हे तर सर्वांनाच समजते. परंतु समजून उमजत नाही हेच खरे. नाहीतर धर्माच्या नावाखाली आपण दुसऱ्या धर्मातील माणसांच्या हत्या होवूच दिल्या नसत्या, केल्या नसत्या. अशा वागण्यातून नुसते कितीही धर्मप्रेम दिसून येत असले तरी ते वागणे वाईट असल्यामुळे, अधर्मीच ठरते. अधर्मी वागणूक कितीही धर्मप्रेमांमुळे केली तरी ती अधार्मिकच राहणार, धार्मिक ठरणारच नाही आणि अशा तऱ्हेने तुम्हाला धर्मातून अपेक्षित असलेला मोक्ष की ज्याकरिता तुम्ही धर्मप्रेम जोपासता तो मिळणे शक्यच नाही.

मंदिर-मस्जीद बांधल्याने किंवा ईश्वर-अल्लाहच्या अहोरात्र प्रार्थना, पुजा केल्याने; पारायणे, सप्ताह आदि

केल्याने धर्मपालन होईल किंवा ईश्वर प्राप्तीचा, मुक्तीचा मार्ग सुकर होईल अशी समजूत असेल, तर ती फ़ारच चुकीची आहे. तुम्ही कितीही मंदिर-मस्जीद बांधा, अहोरात्र प्रार्थना-पुजा करा; परंतु आचरण जर दुराचारी असेल तर मिळणार आहे काय मुक्ती? या सर्व गोष्टींचे महत्व आपल्या अंगी चांगली वागणूक रुजावी या करिता आहे. चांगल्या वागणूकीतून आयुष्यात शांती म्हणजेच जीवन पूर्ती, जीवनातून आनंदाने मुक्ती असा अर्थ भलेही घ्या. ; आणि धर्माला असाच अर्थ अभिप्रेत आहे असे म्हटल्यास त्याला कोणाचीच हरकत नसणार. परंतु चांगल्या भावनेतून, चांगली वागणूक रुजावी म्हणून आपण मंदिर-मस्जीद बांधित नसून; दुष्ट भावनेतून, हिंसात्मक वर्तन करून बांधल्याने जर कोणाला मोक्ष-मुक्ती मिळणार असेल तर ते फ़ारच अंधारात राहातात असेच म्हणावे लागेल आणि असे वर्तन करण्यास जे शिकवितात, प्रोत्साहित करतात, प्रवृत्त करितात ते मानवाचे कल्याण नसून अकल्याण करितात हे जाणायला पाहिजे. जे धर्म या जीवनातच आनंदी राहू देत नाहीत, निरनिराळ्या धर्मातील मानवा-मानवांमधिल आनंद हिरावून घेतात, जे धर्म जीवनात अशांती पसरवितात, जीवन अशांत करितात, ते धर्म मेल्यानंतर जीवन मुक्ती कशी देणार आणि दिलीच तर त्याला काय अर्थ आहे?

बंधूनो मोक्ष-मुक्ती हे सर्व भ्रामक आहे. प्रारब्ध, संचित

पुनर्जन्म, अमर आत्मा आदि सर्वच कल्पना अतिरंजित आहेत. ३३००० योनीतून वा पुनर्जन्मांच्या फ़ेऱ्यातून गेल्यानंतर मुक्ती मिळते असे सांगितल्या जाते, मानव योनी ही सर्वात उच्च आणि चांगली मानल्या जाते. म्हणजे दुसऱ्या योनीत मिळालेला पुनर्जन्म जो आपल्या धर्माप्रमाणे अपरिहार्य आहे, ही शिक्षाच नव्हे काय? तरीही मोक्ष-मुक्ती मानल्याने तुम्हाला चांगली वागणूक रुजविण्यास मदत होत असेल; तुम्हाला जीवनात खरोखरच शांती मिळत असेल; मोक्षप्राप्तीचा, मुक्तीचा पाठपुरावा केल्यामुळे आनंद मिळत असेल, तर जरूर तुम्ही तसे करा. परंतु मोक्ष, मुक्ती मिळण्याकरिता, मेल्यानंतर पुनर्जन्मानंतरचे जीवन आनंदी होण्याकरिता; आता दुःख भोगणे, सद्याच्या आनंदी जीवनास मुकणे; नक्कीच उपदेशात्मक नाही. मागील काही शतकाच्या काळात, ज्याचा इतिहास आपल्याला चांगलाच ज्ञात आहे, कोणाला मोक्ष मिळालेला आहे? मोक्ष-मुक्ती हे जीवनाचे सत्य नाही. जीवनातील अंतिम सत्य हेच आहे की, ते कोणालाच माहित नाही. माहित होण्याविषयी शक्यताही वर्तविता येत नाही. जीवनातील एकच सत्य सर्वांना माहित आहे, हमखास आहे आणि ते म्हणजे मरण. जीवन म्हणजे मरणापर्यंत आनंदी जगणे. हेच काय ते सत्य जाणा, यासठीच पाठपुरावा करा. बाकी सत्य माहित करून घ्यायची आवश्यकता आहेच असे नाही. धर्म तुम्हाला या बाबतीत जेथे-

जेथे मदत करित असतील तेथे तेथे जरूर त्याचा आधार घ्या, पालन करा. अन्यथा धर्म म्हणजे पाळण्याचीच गोष्ट, त्यापासून सुटका नाही असे समजून, धर्मांमुळे जे धर्मा-धर्मातील माणसा-माणसांमध्ये वैरत्व येते; आणि त्यामुळे जीवनात तणाव निर्माण होवून जे आपले जीवन दुष्कर करिते, जीवन भितीयुक्त करिते, परावलंबी करिते, निरर्थक विधी करावयास लावते असे धर्म पाळल्याने काहीच साधल्या जाणार नाही. जे धर्म आनंद हिरावून घेतात; आनंदाच्या मार्गात, सलोख्याने जीवन जगण्यात अडथळे निर्माण करितात, अशा धर्मांचे प्रयोजन कितपत योग्य आहे?

जनहो, वरील गोष्टीचा खोलात विचार करा. त्यासाठी पुस्तकी ज्ञान, पदव्या लागतातच असे नाही. किंबहुना पुस्तकी ज्ञान तसेच माझ्यासारख्या खूप पदव्या असणाऱ्यांनी, शिकलेल्यांनी, विद्वानांनीच अशी परिस्थिती केलेली आहे किंवा त्यांचेमुळेच अशी परिस्थिती झालेली आहे. शिक्षितांनीच अशिक्षितांना अविवेकी विचारांकडे नेलेले आहे. अंधश्रध्दांचे खायीत लोटलेले आहे; धर्माच्या गुलामगिरीत जखडलेले आहे. अशा गुलामगिरीला अज्ञानापेक्षा आपली संस्कारातून झालेली, धर्मपालनाने जोपासल्या गेलेली मानसिकता हे मोठे कारण आहे. आणि ही मानसिकता बदलावयाची असेल तर प्रत्येक गोष्ट करतांना त्या गोष्टीचा उपयोग काय? त्या गोष्टीची

आवश्यकता आहे काय? ती केल्याने खरोखरच माझे जीवन आनंदी होणार आहे काय? (तात्पुरता, क्षणैक आनंद नको) याचा विचार करा. हे करण्यात माझ आर्थिक अथवा इतर काही नुकसान आहे काय? असेल तर या नुकसानाचा माझ्या पुढील आयुष्यावर काय परिणाम होणार आहे? याचा सखोल विचार करा. नुसत्या प्रथा आहेत म्हणून किंवा कोणी सांगतात म्हणून, मग सांगणारा कितीही निष्णात असला तरी, कोणतीच गोष्ट मानू नका. कोणत्याच भाकडकथा ऐकू नका, त्यावर विश्वास ठेवू नका. अशा गोष्टी न मानणे म्हणजे आपण त्या सांगणाऱ्याचा वा धर्माचा अपमान करित आहोत असे समजणे चुकीचे आहे. कोणतीही गोष्ट मानण्याआधी, स्वीकारण्यापूर्वी सर्व पूर्वग्रह बाजुला ठेवून विचार करा. निखळ, निव्वळ, नागडा, शुध्द विचार करा आणि मग पटल तरच स्वीकारा. कोणत्याही दडपणाखाली वावरू नका. नाईलाजाने अशा गोष्टी स्वीकारू नका. प्रत्येक गोष्ट विवेकातून तपासून पाहा. तशी वृत्ती (Spirit of Enquiry) जोपासा; पाहा मग तुमच जीवन किती सोप, सरळ आनंदी होण्यास मदत होते. अशी विचार करण्याची पध्दती धर्माच्याचाच बाबतीत नाही तर जीवनाच्या प्रत्येक बाबतीत उपयोगी पडणारी आहे.

मुळातून विचार करायला शिकणे, प्रत्येक गोष्ट विवेकातून तपासायला शिकणे, तसे तर्कशुध्द संस्कार रुजवून घेणे

हाच खरा धर्म ठरावा. भ्रामकतेमुळे, अतर्कट, अनाकलनीय कल्पनांमुळे मोहित होवून, चुकीच्या संस्कारांमुळे आपण ज्या अनिष्ट, घातक चालीरीती, प्रथा, विधी अस्तित्वात आणलेल्या आहेत, त्या अशा खऱ्या धर्माच्या अंगिकारणानेच दूर होणार आहेत. अशानेच आपल्याला पछाडलेल्या कर्मरोगातून आपली सुटका होवू शकणार आहे. अवास्तव, अर्थहिन, अनावश्यक, अहितकारक अशा कितीतरी कर्मकांडापासून आपणाला मुक्ती मिळू शकणार आहे.

## (३२)

## धर्माचे खरे मर्म

प्रत्येकाला आपल्या धर्माचा अभिमान असतो. जरूर असावा असे मी म्हणणार नाही. कारण मग तो तसा का असावा, असा प्रश्न मला पडतो. सर्वप्रथम धर्म म्हणजे काय? हे तरी आपल्याला पुरते माहित असते काय? आपल्या धर्माची पूर्णत्वाने ओळख आपणास असते काय? आपण ज्याला आपला म्हणून समजतो, मानतो; तो धर्म खरोखरच आपला असतो काय? आपण तो पूर्ण अभ्यासाअंती, विचारपूर्वक स्वीकारलेला असतो काय? जन्मासोबतच आपण धर्मही आपल्याबरोबर घेवून येतो. धर्माच्या संस्काराचा पगडा आपल्यावर लहानपणापासून बसविल्या जात असल्यामुळे आपण आपला धर्म निव्वळ अंधपणे पाळीत असतो. त्याची शिकवण, तत्वे अंगिकारित असतो. ती योग्य की अयोग्य, बरोबर की चुक, सद्यस्थितीला धरून की कालबाह्य याचाही विचार आपण करित नसतो. आयुष्यात बहुतेकांना धर्माची वरवर आणि पुसटशीच कल्पना असते. आपण स्वतःलाच विचारून पाहावे की आपणाला आपल्या धर्माची किती सत्य माहिती आहे. धर्म काय आहे, हे जाणून घेण्याचा खरोखरच आपण प्रयत्न करितो काय? पुरोहित,, भळजी आपणाला जे धर्माबद्दल, धार्मिक विधीबद्दल

सांगतात; याबाबतीत संस्कारातून जे आपल्यावर रुजविल्या जात असते, तेच आपण बिनबोभाटपणे, विचार न्युन्यतेने मानत असतो, पाळत असतो.

सर्व धर्माचा उदय हा, त्या त्या धर्माच्या संस्थापकांना झालेल्या दैवी साक्षात्कारातून झाल्याचे आढळते. म्हणून बहूतेक धर्म ईश्वरीयच आहेत. ईश्वरीयच मानल्या जातात. जे एक दोनच धर्म निरिश्वरीय गणल्या जातात, त्या धर्माचे उदय पण साक्षात्कारातूनच झालेले असल्यामुळे, ते निरिश्वरीय कसे याचे आकलण होणे कठीणच. धर्म ईश्वरीय आहेत आणि जवळ जवळ सर्वच धर्मांनी सर्व धर्मांचा ईश्वर एकच आहे, असे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे उद्घृत केलेले असल्यामुळे; सर्व धर्मांची सर्वच बाबतीत सारखीच शिकवण का नाही? हे उलघडणे कठीणच. ईश्वर एक आहे, अंतिम सत्य एक आहे; असे असतांना निरनिराळ्या धर्म संस्थापकांना निरनिराळ्या तऱ्हेचे साक्षात्कार कसे झालेत? कसे संभवलेत? हेही समजण्यापलिकडचेच. यावरुनच त्या सर्वांना झालेले साक्षात्कार हे त्यांचे भ्रम होते, त्या प्रत्येकाचा तो कल्पना रंजकतेचा, दिवास्वप्नाचा, व्यामोहाचा (Hallucination) प्रकार होता, हे उघड आहे.

प्रत्येक धर्माची शिकवण, तत्वे, कल्पना ह्या भौतिक, ऐहिक, वास्तविक तसेच अभौतिक, पारलौकिक, चमत्कारिक अशा भागांमध्ये म्हणजेच दृश्य विश्वाविषयी आणि अदृश्य विश्वाविषयी (विश्वापलिकडील) अशा दोन भागात विभागता येतील. पहिल्या भागात दृश्य, कायावी (शारिरीक), नैसर्गिक जीवन कसे असावे, जगावे, याकरिता समाजजीवनात कोणती जीवनमुल्ये असावीत, कोणती नैतिकता पाळावी, याविषयीचा उहापोह आहे. तर दुसऱ्या भागात आपण जीवनात कोठून आलो? का आलो? कशाकरिता आलो? जन्मापूर्वी कोठे होतो? मृत्युनंतर कोठे जातो? जीवनाचा खरा उद्देश काय आहे? तो साधण्याकरिता काय करावे, कोणते मार्ग अंगिकारावे? अशा मायावी बाबींविषयी खल आहे. भौतिक, लौकिक, सामाजिक जीवनाविषयीच्या सर्व धर्माच्या कल्पना थोड्या बहूत फ़रकाने सारख्याच असल्याचे, सर्व धर्माचा तुलनात्मक अभ्यास केल्यास लक्षात येईल. सामाजिक जीवनाविषयीची तत्वे, सामाजिक जीवनात पाळावयाची जीवनमूल्ये, नितीमूल्ये, या विषयीचे सर्वच धर्मांचे सार सारखेच आहे आणि थोडक्यात सांगावयाचे झाल्यास, मानवाने सदाचरण करावे, पुण्य कृत्ये करावित; दुराचरण, पापी कृत्ये करू नये. सर्वांना समान लेखावे, सर्वांशी प्रेमळ, सलोख्याची वर्तणूक ठेवावी; पिडित, दुखित, त्रासिक यांची सेवा करावी; दया, करूणा अंगी

बाणावी; कोणाचेच वाईट करू नये, चिंतू नये; आणि हे सर्व ईश्वरी कर्म समजून प्रामाणिकपणे करावे. सदाचरण म्हणजेच सुविचार, सुवचन, सुवर्तन; निकोप जीवन म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय (चोरी न करणे), अपरिग्रह (गरजेपेक्षा जास्त संग्रह न करणे) ह्या तत्वांचे पालन आणि शांतीमय जीवन म्हणजे काम, क्रोध, लोभ, मोह मद, मत्सर या षड्रीपूवर काबू, अशा तऱ्हेची सर्व धर्माची सरळ, साधी, सोपी, सुलभ अशीच शिकवण आहे. आणि ती सर्वांना मान्य होणारी अशीच आहे.

परंतु अशी ही शिकवण रुजविण्याकरिता निरनिराळ्या धर्मांनी जे मार्ग सांगितलेत, त्यात बऱ्याच प्रमाणात भिन्नता आढळते. अशी भिन्नता समजण्यासारखी असली तरी सर्वच धर्मातील या विषयीची अतिरंजितता, चमत्कारिता, मायावीपणा समजणे, उमजणे अवघडच. आनंदी जीवनाकरिता सामाजिक जीवनमूल्ये पाळणे कसे आवश्यक आहे अशी सत्यता पटवून देण्याच्या भानगडित न पडता, निरनिराळ्या तऱ्हेच्या दैवी, अदृश्य शक्तीची कल्पना मांडून धर्माप्रमाणे कृत्ये न केल्यास अशा अदृश्य शक्तींकडून मिळणाऱ्या वेदनायुक्त सजांची भिती मानवापुढे निर्माण केलेली आहे. अशा सजा टाळण्याकरिता अशा दैवी शक्तीची आराधना करित राहावे म्हणजे अधार्मिक, असामाजिक तत्वे मनात शिरणार नाहीत; अशा कल्पना मांडलेल्या आहेत. अंधारात विंचू,

साप मुलाला इजा करू शकतात म्हणून मुलाने अंधारात जावू नये, याकरिता आपण त्याचे मनात काल्पनिक भूताची भिती घालीत असतो. यातूनच मग त्याचे मनात कायमचा भितीचा भूत संस्कारल्या जातो. मानवाने पण (अंधारात) वाईट, पापी मार्गाने जावू नये म्हणून दैवी शक्तीची, जग निर्मात्याची भिती आपण मानवांवर संस्कारित असतो. अशा तऱ्हेच्या भ्रामक, असत्य कल्पनांनी साकारलेले भितीचे भूत मग मानवाच्या मानगुटीवर कायमचे पक्के बसते. यातूनच माणूस अगतिक, भयप्रद, बनतो. पापी मार्गाने, दुराचरणाने होणाऱ्या वाईट परिणामांची सत्य कल्पना देऊन, मानवांवर निर्भिड, भयमुक्त, संस्कार; जेंव्हा धर्म उदयास आलेत तेंव्हा, विज्ञान अप्रगत असल्यामुळे किंवा शिक्षणाच्या दूर्मिळतेमुळे, मानवाची विचार करण्याची शक्ती अप्रगत असल्यामुळे; धर्म संस्थापकांनी असा काल्पनिक मार्ग स्वीकारला असावा.

परंतु आजच्या प्रगत युगात, उच्च विद्याविभूषित लोकसुध्दा याविषयी विवेकी, बुध्दीप्रामाण्यवादी विचार का करित नाहीत? असत्याचा, भ्रामकतेचा पाठपुरावा अजूनही का करितात? हेच कळत नाही. बरे अशी दैवी शक्ती मनापूरतीच जर सिमित ठेवली असती; तीची फ़क्त मनापासूनच आराधना करायची असती तर हरकत नसती. परंतु अशा दैवी शक्तीची आराधना करण्याचे जे

भ्रष्ट, बेमतलबी, उगीचेच खर्चिक, त्रासिक, फ़सवे मार्ग, तसेच यातू (अ) विद्येतून आलेले जादूटोना, मंत्र, तंत्र, यासारखे अघोरी मार्ग अवलंबिले जातात आणि त्यात शिक्षित लोक जास्त पुढाकाराने आढळतात; ही आजच्या शिक्षणातून धर्माची अधर्माकडे चाललेली वाटचाल कोणी रोखील काय? सर्व धर्मांनी अतिरंजितता, अवास्तविकता बाजुला ठेवून त्यांनी पुकारलेल्या सदाचरणी धर्माची शिकवण पुन्हा जनमानसात कोणी रुजविल काय? हीच धर्माची खरी शिकवण असणार! हीच शिकवण भटकलेल्या समाजाला तारू शकणार. धर्माचे हेच खरे मर्म आणि ते रुजविण्याचा हा माझा अल्पसा प्रयत्न.

# (३३)

# धर्मनिरपेक्षता

धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्माचे बाबतीत निःपक्षपातीपणा. राज्य करतांना, शासन चालवितांना कोणत्याच धर्माचा पक्ष न घेणे, सर्व धर्मांना सारखीच वागणूक देणे, सर्व धर्मातील लोकांना सारखाच वाव देणे, सारखाच वाव असणे.

प्रत्येक धर्माची शिकवण ही धर्म निरपेक्षताच शिकविते. प्रत्येक धर्म दुसऱ्या धर्मातील लोकांना समान माणावे, त्यांचेवर प्रेम करावे, त्यांचा आदर राखावा हेच सांगते. परंतु प्रचलित धर्मव्यवस्थांनी, धर्मांनी हे शिकविणे केंव्हाच बंद केलेले आहे. स्वधर्मप्रेमामुळे ते दुसऱ्या धर्मीयांचा द्वेषच करायला शिकलेले आहेत. धर्म आता हेच शिकवितो असे वाटू लागलेले आहे. धर्म हा वैयक्तीक असतो. धर्म हा राजकारणापासून अलिप्त असला पाहिजे. धर्मनिरपेक्ष राज्यात तर ते आवश्यकच ठरते, असते. आपल्या धर्मनिरपेक्ष राज्या घटनेत तशी तरतूदच केलेली आहे. परंतु वास्तवात आपल्या देशात असे मुळीच नाही. उलट धर्माच्या नावावर. जातीवरच राजकारण खेळल्या जाते. गर्वसे कहो, हम मुस्लीम है! गर्वसे कहो हम बौध्द है, हिन्दु है असेच जर प्रत्येक

धर्माचे लोक गर्वाने म्हणत राहिलेत, तर या सर्व गर्विष्ठांमध्ये भांडणे झाल्याशिवाय, हाणामाऱ्या झाल्याशिवाय राहाणार नाहीत. सर्वच धर्म आपल्या धर्मात मुलभूत असलेला मानवता धर्म विसरलेले आहेत. म्हणूनच आज धर्माधर्मातील लोकांमध्ये सलोखा नही, पाहिजे तितके सामंजस्य नाही, एकरुपता नाही. तेढ आहे, स्पर्धा आहे आणि यामुळे फ़ारच मानसिक तणाव आहेत. अशा समाजाला धर्मनिरपेक्ष समाज, धर्मनिरपेक्ष राज्य म्हणता येईल काय? भारताला स्वातंत्र मिळून ६० पेक्षा जास्त वर्षे उलटलीत तरी यात काहीच बदल झालेला नाही. आपल्या निरनिराळया पक्षातील राज्यकर्त्यांनी तोंडानीच फ़क्त धर्मनिरपक्षतेचा जप करण्यापलिकडे धर्माधर्मात सलोखा निर्माण करण्याकरिता काहीच केलेले नाही उलट त्यांनी धर्माधर्मातील दरी वाढविण्याचेच काम केले.

जनसंघ, भारतीय जनता पक्ष हे तर जाणूनबुजून हिंदु धर्मवादी. त्यांचेवर जहाल हिंदुत्ववादी राष्ट्रीय स्वंयंसेवक संघाचा जबरदस्त पगडा. हिंदु राष्ट्र निर्माण करणे हे त्यांचे ध्येय. धर्माच्या नावावर मत मागणे संविधानाविरुध्द असले तरी, धर्माच्या नावावर मते मागून सत्ता प्राप्त करण्याची पध्दत त्यांचेकडून अवलंबिल्या जाते. सत्ता प्राप्त केल्या जाते. कॉंग्रेस पक्ष सुध्दा आपण खूपच धर्मनिरपेक्ष आहोत अस दाखवून व भारतीय जनता पार्टीच्या कट्टर हिंदुधर्मवादाचा फ़ायदा घेवून मुस्लीमांना व्होट बॅंक बनविण्याचा

प्रयत्न करितोच. मुस्लीम लीग तर इस्लाम धर्माच्या नावाखाली राजकारण करितच आलेला आहे. रीपब्लीकन पक्ष व बहुजन समाज पक्ष हे सुध्दा धर्माच्या नावावर राजकारण खेळत आहेत अस सतत कमीजास्त सर्वच पक्षांनी धर्माच्या नावावर राजकारण करायच, धर्माच्या नावावर सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न करायचा अणि तरीही आम्ही धर्मनिरपेक्ष आहोत म्हणून उदघोष करित राहायच, याला काही अर्थ आहे काय? धर्म निरपेक्ष राज्य देण्याच, निर्माण करण्याच व्रत घेतलेल्या, तस संविधान असलेल्या आपल्या देशात अस घडतच कस?

येथील राजकारण मुळीच धर्मनिरपेक्ष नाही. धर्माच्या नावाखाली धर्मपुरस्कृत पक्ष उफ़ाळून येतच आहेत. जेथे जेथे ते सत्तेत येतात तेथे आपल्या धर्म पक्षाच्या भल्यासाठीच कार्यरत असतात आणि हे सर्व हिंदु, मुस्लीम, बौध्द आदि सर्वच धर्मपुरस्कृत पक्षाचे बाबतीत लागु आहे. आता नवीन मराठा धर्म पण उदयास येऊ पाहातो आहे. हा पक्ष तर जाणूनबुजून राजकारणीच राहाणार. अशा धर्माच्या नावावर सत्तेत येणाऱ्या, येऊ पाहाणाऱ्या पक्षांकडून धर्मनिरपेक्षतेची अपेक्षा करणेच चुक आहे. देशप्रेमाचा या पक्षांनी कितीही आव आणला तरी त्यांचे धर्मप्रेम हे देशप्रेमापेक्षा अधिकच राहाणार. आणि या धर्मवेडामुळे ते हा देश धर्मनिरपेक्षतेपासून दूर नेत आहेत, देशाच्या एकतेचे नुकसान करित

आहेत आणि इकडे कुणाचेच लक्ष नाही किंवा जाणूनबुजून इकडे दुर्लक्ष केल्या जात आहे. घट्नेच अस उल्लंघन अशा लोकांकडून थांबण किंवा बंद होण शक्यच नाही. अस उल्लंघन बंद तेंव्हाच होइल, जेंव्हा सर्व धर्मातील सामाण्य जनताच, भावनांना बळी न पडता अशा पक्षांच्या आहारी जाणे थांबवितील. धर्मनिरपेक्षतेचा खरा अर्थ समजून घेतील, आणि त्याविषयीचे विचार, संस्कार अंगिकाृरतील, रुजवितील. असे झाले तरच निरनिराळ्या धर्मातील, जातीतील लोकांना आनंदाने, सुखरुपपणे जीवन जगता येईल. नाहीतर, दहशतवाद्यांची, दहशतवादी कृत्यांची धास्ती बाळगतच जीवन जगावे लागेल आणि यात धर्माच्या नावावर होणारी दहशतवादी कृत्येच जास्त असतील.

# (३४)
# धार्मिक पतन

माणूस हा नुसताच शारीरिक प्राणी नसून तो सामाजिक प्राणी पण आहे. सामाजिक प्राणी म्हटले, समाजात समूह करून राहाणे आले की व्यवस्था ही आलीच. आणि व्यवस्था म्हटले की नियमही आलेच. माणसाने समाजात जीवन जगतांना कसे वागावे, कसे वागणे योग्य हे सांगण्याकरिता धर्म उदयास आलेत. जसजसी मानवाची, समाजाची उत्क्रांती होत गेली, तसतसे समाज धुरीणांनी समाज व्यवस्थेकरिता काही निती, चालीरीती, नियम घालून दिलेत. हे नियम म्हणजेच धर्म. त्याकाळी असे नियम पाळल्याजातात किंवा नाही हे पाहाणारी, यावर नियंत्रण ठेवणारी पोलिस व्यवस्था, नियम न पाळणाऱ्याला शिक्षा सुनावणारी न्याय व्यवस्था नव्हती, याकरिता हे नियम पाळल्या जावेत, समाजधर्म अंगिकारल्या जावा, म्हणून धर्माला ईश्वराचे अधिष्ठाण देण्यात आले. धर्माप्रमाणे, सच्छीलतेने वागले नाही तर पाप, पातक होते आणि अशा दुष्कृत्यांना ईश्वर आपोआपच सजा देतो, असे संस्कार रुजविण्यात आलेत. आपणाला अशी शिक्षा होऊ नये या भितीपोटी; आपणावर दैवी कोप, संकटे येऊ नयेत अशा स्वार्थी

उद्दीष्ट पूर्तीसाठी, लोक धर्माप्रमाणे आचरण करू लागलेत. धर्माने घालून दिलेले नियम, अटी पाळू लागलेत. अशी ही सर्वसाधारण समाजाच्या उत्क्रांतीची प्रक्रिया घडलेली असावी.

मानव हा पृथ्वीवर राहातो आणि समूहात वावरतो. असंख्य मानव जातीच्या व्यवस्थेकरिता, त्या व्यवस्थेचे भाग पडणे साहकिकच होते. ऊत्क्रांतीतून अशा व्यवस्थेचे भौगोलिक तसेच सामाजिक असे भाग पाडण्यात आलेत, पडल्या गेलेत. भौगोलिक भागांमध्ये आपले घर, वार्ड, मोहल्ला, गांव, तालुका, जिल्हा, प्रांत (राज्य), देश आणि जग असे भाग येतात. सामाजिक भागांमध्ये कुटुंब, नातीगोती, पोटजात-जात, पंथ-धर्म असे भाग येतात. भौगोलिक भागांची व्यवस्था आता शासनामार्फ़त होते तर सामाजिक भागांची व्यवस्था मुख्यत्वेकरून आपआपल्या धर्मानुसार होते. धर्माने घालून दिलेल्या निती-चालीरीतीनुसार कृती करणे म्हणजे धर्म पाळणे. आणि असे करणे ही ईश्वरी इच्छा, ईश्वराज्ञा म्हणून गणल्या जात होते, रुजविल्या जात होते. परंतु आज वास्तवात कोणत्याच धर्मात निती राहिलेली नाही. निती आता शासनाने, प्रशासनाने घेतलेली आहे. निती कशी असावी, ती कशी पाळावी, त्याचे नियंत्रण कसे करावे, हे सर्व आता सरकार पाहाते. स्वार्थी राजकारणी लोकांनी स्वतःच्या फ़ायद्यासाठी निती-अनिती यामधील रेषा अगदीच पुसट केलेली आहे; हा भाग वेगळा. परंतु

धर्माने माणूसकीचे, नितीचे धडे देणे केंव्हाच सोडलेले आहे. धर्माचार विवेकी राहण्यापेक्षा विकारी झालेला आहे. आपल्या आचरणात शुध्द तर्कापेक्षा अनाकलनीय धार्मिक श्रध्दांनाच जास्त महत्व दिल्या जात आणि यातूनच अंधश्रध्दांची जोपासना झालेली आहे. नितीच्या बाबतीत धर्म जातीसारखाच झालेला आहे. जातीव्यवस्थेमुळे जसे निरनिराळया जातीत कनिष्ठता, श्रेष्ठता असे भेद निर्माण होवून वितुष्ट आलीत, त्याच तऱ्हेने आज धर्मांमुळे निरनिराळया धर्मातील समाज बांधवात द्वेष, तिरस्कार, यांच्याच भावना पसरविल्या, रुजविल्या, वाढविल्या जात आहेत, गेलेल्या आहेत. आणि ह्या अशा थराला, विकोपाला, गेलेल्या आहेत की त्या आता बदलविणे आणि निरनिरळया धर्मातील बांधवात मनापासूनचा, खरोखरीचा सलोखा उत्पन्न करणे, कठीणच नव्हे तर महाकर्मच ठरावे. आजच्या समाजातील, मानव जातीतील अशांतता ही मुख्यत्वेकरून, जास्त करून धर्माचे नावाखालीच आहे; जाज्वल, प्रबळ, अंध धर्मभावनांमुळेच आहे. अशा या भावना वास्तविक धार्मिक नसून अधार्मिक आहेत, हे जाणून घ्यायला कोणीच तयार नाही.

हे बदलविण्याकरिता निरनिराळया सर्वच धर्मांच्या आचार्यांनी, धर्मगुरुंनी एकत्र येऊन एकच धर्म, माणूसकीचा धर्म निर्माण करायला पाहिजे. असा एक धर्मच मानवहिताच्या,

समाजहिताच्या खऱ्या ईश्वरी भावना म्हणजे सर्वांचा ईश्वर एकच आहे हे खऱ्या अर्थाने रुजऊ शकेल. आज निरनिराळया धर्माचे निरनिराळे ईश्वर आहेत. असे ईश्वर नुसतेच नावाचेच निराळे नसून, त्यांचे विषयीच्या संकल्पनासुध्दा परस्पर विरोधी आहेत. एकाच धर्मात पण ईश्वर एक नसून अनेक आहेत. आता मानवाने अशा ईश्वरांमध्ये सुध्दा वितुष्टता, भेद, विषमता निर्माण केलेल्या आहेत. प्रत्येक धर्माला आणि धर्मातील प्रत्येक पंथाला आपलाच ईश्वर श्रेष्ठ वाटतो आणि इतर ईश्वर दुय्यम, कनिष्ट वाटतात आणि हे सिध्द करण्याकरिता मग ते वाटेल ते करायला पण तयार असतात.

धर्माच्या नावाखाली ज्या दंगली उसळतात, त्यात दोन्ही धर्मांचे कितीतरी निरपराध लोक मारल्या जातात ना! अशा निरपराध लोकांच्या संरक्षणासाठी ईश्वर धावून का येत नाही? आणि हे जर त्यांच्या पूर्व जन्मीच्या (कु)कर्माचे, प्रारब्धाचे, संचिताचे फ़ळ असेल, तर मग हळहळ का? अशा मारल्या गेलेल्या लोकांमध्ये सर्वच राशींचे लोक असतात ना! तसेच नैसर्गिक आपत्ती, सुनामीसारखी आली म्हणजे त्यात मारल्या गेलेल्यात, मेलेल्यात, सर्वच राशीचे लोक असतात ना! म्हणजे जर सर्व राशी अशावेळी दुर्दैवी ठरतात तर अशाच राशीचे इतर लोक, इतर ठिकाणचे लोक कसे जीवंत राहतात? ज्योतिष्य शात्राजवळ आहे काय याचे काही उत्तर!

पूर्व जन्मीच्या कर्मानुसार फ़ळ आणि राशीनुसार फ़ळ हे अलग अलग असते काय? मग या दोहोपैकी कोणते खरे आणि कोणते खोटे! या सर्व गोष्टींचा विचार न करता अंधश्रध्द बनून आपण ज्योतिष्यावर तसेच पूर्वजन्मीच्या कर्मावर विश्वास ठेवतो आणि अशा तऱ्हेने स्वतःच्या बुध्दीचे, आपल्या विवेकी विचारांचे अवमुल्यन करतो. यामुळे आज सामाजिक नितीचे अवमुल्यन झालेले आहे. यात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष असलेला आपला हात पाहिला की वाटत, आपले सर्वांचेच तर पतन झालेले नाही ना! शेक्सपिअरने आपल्या नाटकात लिहून ठेवल्याप्रमाणे ४०० वर्षापूर्वी पृथ्वीवर दहा हजारात एक प्रामाणिक माणूस असावा आज एक लाखात सुध्दा एक प्रामाणिक माणूस सापडेल किंवा नाही शंकाच आहे. आपल्या धर्मग्रंथात लिहिलेले आहे की महाप्रलय येऊन एके दिवशी पृथ्वीचा, जगाचा, विश्वाचा विनाश होणार आहे, म्हणून होत असलेले पतन त्या विनाशाकडेच तर ही वाटचाल नाहीना!

शेवटी प्रत्येक माणसाने विवेकी होणे आणि मानव ही जात आणि, माणूसकी, मानवता हा प्रथम धर्म मानणे हाच उपाय आहे. नाहीतर आपण जसे जगत आहोत तसेच जगत राहू. दंगे, धोपे, दहशतवादी कृत्ये, धर्माच्या, जातीच्या नावाखाली होत आलेले आहेत, होत राहणार आहेत. जेंव्हा जेंव्हा असे घडेल तेंव्हा तेंव्हा

आपण हे योग्य नाही, चांगले नाही असे म्हणत राहू.

माणसाला लाभलेल्या बुध्दीमुळे आणि विचार प्रक्रियेमुळे माणूस अन्य प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ गणल्या जातो. तो श्रेष्ठ आहे, परंतु तेंव्हाच की जेंव्हा अशा बुध्दीचा वापर विवेकाने, प्रामाणिकपणे, शुध्द तर्काने करण्यात येईल. बुध्दीचा अविवेकी, विकारी, राक्षसी वृत्तीने वापर करणाऱ्या माणसांविषयी असे म्हणता येईल काय? अविवेकी, राक्षसी वृत्तीने विचार करून, राक्षसी कृत्ये करणारी माणसे जनावरांहूनही कमी दर्जाची ठरणार नाहीत काय?

धर्म हा मानवाकरिता, मानवाच्या भल्याकरिता उदयास आला, अस्तित्वात आला, निर्माण केल्या गेला. परंतु आता मानवाकरिता धर्म राहिला नसून, धर्माकरिता मानव झालेला अहे. आणि अशा या वेड्या धर्मप्रेमामुळे धर्माची मूळ शिकवण, मानवप्रेम की जो जीवनाचा गाभा आहे, तेच मानव विसरलेला आहे आणि खरे जीवन हरवून बसलेला आहे. अशा तऱ्हेने धर्माची खरी शिकवणच दूर सारल्या गेल्यामुळे धार्मिक उत्थानाऐवजी धार्मिक पतनच झालेले आहे, होत आहे. पाहा हे थांबविण्याकरिता आपण काही करू शकता काय?

# (३५)

# मरणोत्तर जीवन

मरणोत्तर जीवन शास्त्रास उपनिषदांमध्ये पंचाग्नी विद्या म्हणून संबोधिले आहे. याच शास्त्रास इंग्रजीमध्ये एस्च्ॅटौलौजी (Eschatology) म्हणतात.

मृत्युनंतर सर्व काही संपते, ही कल्पना मानल्या जात नाही. मृत्यू हा अटळ आहे पण ती अखेर नव्हे. शरीर वेगळे आणि शरीरातील नियंत्रक तत्व वेगळे असे धर्मात गृहितच धरलेले आहे. आपल्या शरीरात स्थूल शरीराबरोबर सुक्ष्म (लिंग) शरीर पण वास करते आणि अशा सुक्ष्म शरीरातच नियंत्रक तत्व, आत्मा असतो असे उपनिषदे सांगतात. देह, स्थूल शरीर हे अशास्वत, मर्त्य आहे तर आत्मा, सुक्ष्म शरीर शास्वत, अमर आहे असे धर्म ग्रंथ सांगतात. मन आणि पाच ज्ञानेंद्रिय असे सुक्ष्म शरीर मृत्युचे वेळी जीवात्मा घेऊन स्थूल शरीराचा त्याग करून जाते असे गीतेत सांगितले आहे.

मृत्युनंतर आत्मा आपल्या कर्मानुसार निरनिराळ्या परलोकात जाऊन वास करतो, असा एक परलोक सिद्धांत, विचार प्रवाह आहे. तर मृत्युचे वेळी स्थूल देह् सोडून बाहेर पडलेला आत्मा-जीवात्मा कर्म सिध्दांताप्रमाणे नवेनवे जन्म घेतो असा दुसरा विचार प्रवाह आहे.

परलोक सिद्धांत

पहिल्या विचार प्रवाहानुसार, मृत व्यक्तीच्या दहनानंतर अग्नी त्या मृतात्म्याला परलोकात घेऊन जातो असे अथर्ववेदात म्हटलेले आहे. सकाम पुण्याचरण करणाऱ्यांना पितृलोक, स्वर्गलोक; निष्काम स्वधर्माचरण करणाऱ्यांना मोक्षप्राप्ती, आणि आसुरी पापाचरण करणाऱ्यांना यम लोकातील यातना मिळतात असे गीतेत सांगितलेले आहे. पुण्यवानांना स्वर्गप्राप्ती आणि पाप्यांना प्रायश्चित म्हणून नरकवास.

प्रेम, दया, क्षमा, शांती, दान, मैत्री, न्याय, अहिंसा, सत्य, अस्तेय, श्रम प्रतिष्ठा, सहिष्णूता आदि पुण्य कृत्ये. असत्य, हिंसा, चौर्य, क्रोध, व्यभिचार, अन्याय, कृपणता, क्रुरता, असहिष्णूता आदि पापकर्मे. प्रेतलोक, नरकलोक, जमिनीखाली (पाताळात) आणि पितृलोक, स्वर्गलोक आकाशात (अंतराळात) असल्याबद्दलच्या कल्पना पण धर्म ग्रंथात सापडतात. परंतु याविषयी निश्चित अशी रुपरेषा कोठेच दिलेली आधळत नाही. पाप-पुण्य, सदगुण-दुर्गुण, ईच्छा पूर्ती-अपूर्ती, आसक्तता-विरक्तता यांचेसंबंधी दिलेली गृहिते पण विवादात्मक आहेत.

नरक-लोकात आणि प्रेत-लोकात दुःखे आणि यातना तर पितृलोक आणि स्वर्ग लोक यात सुखे आणि उपभोग असतात.

सुख-दुःखाविषयीच्या आपल्या कल्पना स्थीर नाहीत आपल्या जीवनात उपभोगाची कल्पना त्याज्यच मानलेली आहे. जास्त उपभोगाची लालसा न करता, सदगुणी वर्तन ठेऊन, पुण्य मिळवून स्वर्गात जाणे आणि मग तेथे पृथ्वीवर त्याज्य असलेला उपभोग भोगणे योग्य कसे असू शकते? युध्दात शत्रुंनी तुम्हाला पकडल्यानंतर दिलेल्या अतोनात शारीरिक यातना आणि नरकलोकातील शारीरिक यातना याचा मेळ आपण कसा बसविणार! पहिल्या यातना कुर्बानी आणि दुसऱ्या बेईमानी. उपभोग आणि यातना. या करिता मानवी शरीर आवश्यक नसते काय? मृत्यूनंतर तर शरीर जाळण्यात येते आणि त्याची राख होते. म्हणून मृतात्मा वा मृत्यूनंतरचा जीवात्मा, जो काही असेल आणि तो ज्या कोणत्या लोकात जात असेल, त्याला सुख-दुःख, आनंद-यातना होणे कसे संभवते. स्वर्ग लोकात अप्सरांबरोबर आनंद उपभोगायला मिळतो, अशाही पुराणकथा आहेत. देहाविना असा उपभोग घेण्याची कल्पना अतिरंजित नव्हे काय? आणि तसे पाहिले तर असा उपभोग, हे दूर्वर्तन न ठरावे काय? म्हणजे स्वर्गात असे दूर्वर्तनी व्यवहार चालतात. ते उपभोग आनंद आणि पृथ्वीवर मात्र असे व्यवहार पाप, हे कसे?

पारलौकीक प्रश्न. पारलौकीक जीवनाविषयीच्या श्रध्दा वेद काळापासून आढळतात. योग्यांचे पारलौकीक जीवन वास्तविक

असल्याची कितीतरी उदाहरणे धर्म ग्रंथात, पुराणात आढळतात. पुराणांमध्ये दुर्वास, रघु, दुष्यंत, रावण आदि व्यक्ती स्वर्ग, कैलास या ठिकाणी मृत्युपूर्वी सदेह जावून आल्याची वर्णने आढळतात, दुष्ट, दुर्वर्तनी, पापी रावणाचा वध करण्यासाठी ईश्वराला रामावतार घ्यावा लागतो आणि तोच रावण पुण्यात्मा म्हणून सदेह स्वर्गात जावून येतो, ही विधाने आपल्या मनात गोंधळ निर्माण करणारीच नव्हेत काय?

कर्म सिद्धांत

दुसऱ्या विचारप्रवाहानुसार म्हणजे कर्मसिध्दांतानुसार आपले प्रस्तुतचे जीवन पुर्वीच्या एक किंवा अनेक जन्मात केलेल्या कृत्यांच्या प्रायश्चितासारखे असते, म्हणजेच तुमचे वर्तमान जीवन हे पूर्वकर्मांवर, पूर्वजन्मींच्या कर्मांवर, आधारलेले आहे. पूर्वजन्मातील कर्मांचे (संचिताचे, प्रारब्धाचे) शुभ-अशुभ फ़ळ व्यक्तीस या जन्मात आणि या जन्मातील कर्म (क्रियामन) याचे फ़ळ माणसास पुनर्जन्मात भोगावे लागतात, असे कर्मसिध्दांत सांगतो.. अशा तऱ्हेने कर्माचे पूर्वजन्मीचे कर्म ’संचित ’आणि वर्तमान जन्मीचे कर्मे ’क्रियामन ’ असे भेद केलेले आढळतात. पाप-पुण्यात्मक (अशुभ-शुभ) कर्मांचा दुःख-सुख (यातना-आनंद) हा परिणाम (कर्म-विपाक) अटळ माणल्या जातो. संचिताचे कर्मफ़ळ

भोगून संपेपर्यंत तसेच आपल्या निष्काम कर्माचरणामुळे वर्तमान जन्मात क्रियामन कर्मफ़ळांची निर्मिती होऊ न देईपर्यंत अथवा आत्मज्ञान प्राप्त होईपर्यंत, माणसाला पुनर्जन्म घ्यावा लागतो, जन्मोजन्मीच्या फ़ेऱ्यातून जावे लागते. पूर्वजन्म आणि वर्तमान जन्म, वर्तमान जन्म आणि पूनर्जन्म यांना जोडणारा दुवा म्हणजे सुक्ष्म शरीरयुक्त आत्मा. आपले मृत्युचे वेळी असा सुक्ष्म शरीरयुक्त आत्मा आपले स्थूलशरीर सोडून बाहेर पडतो आणि त्याचवेळी जन्माला येत असलेल्या कोणत्यातरी शरीरात प्रवेश करतो. देह पडला तरी आत्मा मरत नाही. जुने कपडे टाकून नवे कपडे धारण करावेत त्याप्रमाणे तो नवीन देहात प्रवेश करतो, असे गीता सांगते..

वर्तमान स्थूल शरीर सोडल्यानंतर आत्मायुक्त सुक्ष्मशरीर, पुनर्जन्म मिळेपर्यंत सुक्ष्मसृष्टीमध्ये निवास करते, असेही ग्रंथात सांगितलेले आहे. परंतु सुक्ष्मसृष्टी कोठे आहे, कशी आहे याविषयी काहीच सांगितलेले नाही. माणसाला कर्मानुरूप चांगला-वाईट जन्म मिळतो. कामना नसलेला अमर होतो, ब्रम्हस्थितीला प्राप्त करतो असे बृहदारण्यक उपनिषद सांगते..

आत्मा हा नुसत्या मानव प्राण्यातच असतो असे नाही, तर तो इतर सचेतन जीवजंतू प्राणी, वनस्पती ह्यांचेमध्येही असतो, आणि मनुष्यांचे व मनुष्यांहून खालच्या दर्जाच्या प्राण्यांचे (ते

खालच्या दर्जांचे असतात असे मनुष्य माणतो) आत्मे मृत्युनंतर एकमेकांच्या स्थूल शरीरात जाऊ शकतात असेही ग्रंथात म्हटलेले आहे. पुनर्जन्माचे स्वरूप कर्म-विपाक (कर्माचे परिणाम) यानुसार ठरते. पाप अधिक केले तर नीच योनीत. जसे की मानवेतर प्राणी, वनस्पती आदि, जन्म घ्यावा लागतो. मानवेतर प्राण्यांना ज्यातही ईश्वराचा अंश आहे, आत्मा असतो असे आपण माणतो, त्यांना नीच योनी ठरविणे कितपत योग्य आहे? माणसाला माणसाचाच पुनर्जन्म ८४ लक्ष योनीतून प्रवास केल्यानंतर प्राप्त होऊ शकतो असे एकीकडे सांगितल्या जाते तर आचरण चांगले असणारांना त्वरित चांगला पुनर्जन्म प्राप्त होतो असे छांदोग्य उपनिषद सांगते.

सखोल विचार केल्यास मरणोत्तर जीवनाविषयीच्या अशाच कितीतरी विसंगती आपल्या लक्षात येतील. मरणोन्मुख मनुष्याच्या मनात मृत्युच्या वेळी जे विचार येत असतील त्यानुसार पुनर्जन्मात स्थिती प्राप्त होते असेही धर्म ग्रंथात सांगितलेले आहे. जन्मभर पातके करा परंतु मरणाच्या शेवटच्या क्षणी पुण्यकर्माचा विचार करा म्हणजे पुनर्जन्मापासून सुटका. कर्मसिध्दांताला मग अर्थ उरतोच कोठे! शुक्ल पक्षात वा उत्तरायणात मेलेला मनुष्य पुनर्जन्मरहित स्थितीला जातो आणि कृष्णपक्षात वा दक्षीणायनात मेलेला मनुष्य पुनर्जन्माच्या फ़ेऱ्यात सापडतो असेही सांगितलेले आहे. म्हणजे जन्मभर कितीही पापकर्म करा परंतु

जीवनाचा शेवट शुक्ल पक्षात वा उत्तरायनात करा म्हणजे जन्मोजन्मीच्या फ़ेऱ्यातून सुटका. यासाठीच भिष्माचार्यांनी जीव सोडण्यासाठी उत्तरायनाची वाट पाहिली होती, असे महाभारतात सांगितलेले आढळते.

गरुड पुराणात सांगितले आहे की, जीवनात कसेही कर्म करा, कितीही दुष्टवर्तन करा, परंतु शेवटी आतुर सन्यास विधीने सन्यास घेतल्यास मनुष्य जन्म-मरणाच्या चक्रात परत येत नाही. पटते काय हे! तसेच विचारपुर्वक केलेली पापकर्मे आणि न कळत अकस्मात घडलेली पापकर्मे दोन्हीमुळे सारखेच भोग मिळतात काय? याचेही स्पष्टीकरण नाही. मनुष्ययोनीत पापकर्मे कोणती आणि पुण्यकर्मे कोणती याचा उल्लेख आढळतो. परंतु मनुष्याला तर इतर योनीत सुध्दा पुनर्जन्म घ्यावा लागतो. मग अशा इतर योनीतील जसे की, जनावरे, पक्षी, कीटक आदिकरिता कोणती पापकर्मे आणि कोणती पुण्यकर्मे याविषयी कोठेच काहीच उल्लेख आढळत नाही.

पूर्वजन्मीच्या कर्मांवर जर आपले जीवन आधारित असेल तर मग माणसाला क्रियास्वातंत्र्य कोठून असणार! तसेच त्याचे प्रथम जन्मीचे जीवन कोणत्या कर्मांवर आधारित असणार! प्रथम जीवनाला तर पूर्वजन्मच नसणार! मृत्युनंतर आत्मायुक्त शरीर जर स्वर्ग वा नरक लोकात जात असेल

तर मग नवीनच जन्माला येणाऱ्या देहात शिरून ते पुनर्जन्म कसा घेणार? तसेच आत्मा जर पुनर्जन्म घेत असेल तर मग श्राध्दांत अर्पण केलेले पिंड स्वीकारण्यास कसा येणार?

मनुष्य कर्मानुसार, मनुष्य योनीतच वा इतर योनीत पूनर्जन्म घेतो, स्वर्ग-नरकात जातो किंवा अतृप्त ईछापूर्ती करिता याच जगात भूत बनून वावरतो. यापैकी निश्चित काय होते हे कोणीच निश्चितपणे सांगितलेले नाही. तदवतच वर्षा-वर्षानंतर केलेल्या त्याच्या श्राद्धात तो भूताचे रुप सोडून, वा स्वर्ग-नरकातून किंवा ज्या नविन शरिरात त्याने पूनर्जन्म घेतलेला असेल ते शरीर त्यागून येतो काय? मनुष्य हा मनुष्य योनीतच पूनर्जन्म घेत असेल आणि त्याला इतर योनीतून फ़िरावे लागत नसेल तर जितके लोक मरतील तितकेच पूनर्जन्म घेतील. मग लोकसंख्या वाढते कशी? या सर्व गोष्टींचा आपण शिक्षित म्हणविणारे विचारच करणार नाही आहोत काय?

बंधुनो. या सर्व गोष्टींचा, पूर्वग्रह बाजुला ठेऊन, विवेकपूर्वक विचार केल्यास, आपणाला स्वर्ग-नरक, पूर्वजन्म-पुनर्जन्म, स्थूलशरीर-सुक्ष्मशरीर, मृतात्मा-अमरात्मा, मोक्ष-मुक्ती ह्या सर्व कल्पना निराधार वाटल्यावाचून राहणार नाहीत, आणि अशा कल्पनांना थारा देणे म्हणजे तर्कशून्य, अविवेकी विचार. जोपासणे आहे. आपले तथाकतीत विद्वाण आपल्या उत्कृष्ट लेखन

तदवतच वक्तृत्व शैलीने जनमाणसांवर छाप, भुरळ पाडून असे अतर्कट विचार समाजात रुजविण्यात यशस्वी झालेले आहेत आणि जाणते, अजाणते (स्वतःच अशा विचारांनी भारल्यामुळे) नविन पिढीवर असे संस्कार रुजविण्याचे त्यांचे कार्य सुरूच आहे.. हा स्वतःचे आणि समाजाचे मानसिक स्वास्थ आणखीच बिघडविण्याचाच प्रकार आहे.. येथे कोणावरही टिका करण्याचा उद्देश नाही. समाजात मुळात, खोलात नागवे, नागडे, सत्य पायांवर आधारित तर्कशुद्ध विचार करण्याची प्रवृत्ती निर्माण करून विवेकी विचार संस्कारून भ्रामक जीवन संकल्पना ज्या हजारो वर्षांपासून संपूर्ण मानवजातीत, जगात ग्राह्य आहेत त्या दूर करून जीवनातील सत्यतेची ओळख करून देणे हाच उद्देश. (कदाचित कधिही सफ़ल न होणारा, पण मला शांती देणारा. माझा आनंद वाढविणारा)

माझ्या वरील विचारांवर मी कधिही, केंव्हाही, कुणाशीही चर्चा करायला तयार आहे. त्यानिमित्त तुम्ही माझ्याशी संपर्क साधू शकता. माझे विचार चुकीचे आहेत हे मला कोणी पटवून दिल्यास, मला फ़ार आनंद होईल.

# (३६)

# श्राध्द-विधीचिकित्सा

जीवनात आपण सदैव काही ना काही, कोणत्यातरी विधी करित असतो, किंवा त्यात भाग घेत असतो. जसे की; बारसे, मुंज, लग्न, अंतेष्टी, श्राध्द आदी. याशिवाय निरनिराळ्या सणांचे, उत्सवाचे दिवशी निरनिराळी व्रते, उपवास, संकल्प; यात पण आपण निरनिराळे विधी करित असतो. असे हे विधी जरी आपण करित असलो, तरी ते का आणि कशाकरिता करितो याची स्पष्ट कल्पना आपल्याला नसते. काहीतरी पुसटशी कल्पनाच फ़क्त असते. हे विधी कसे करायचे हेही निश्चित माहित नसते. भटजी सांगेल त्याप्रमाणे किंवा चालत आलेल्या परंपरेनुसार, वडिलधारी मंडळी सांगतिल त्याप्रमाणे आपण हे विधी करित असतो. आपण करित असलेले विधी पाहून आपली मुलेही पुढे तसेच विधी करित राहतात आणि परंपरा सांभाळतात, अशाच रुढी पडतात.

या परंपरांपासून, रुढींपासून, विधींपासून खरोखरच काही फ़ायदा आहे काय? या विधींना काही अर्थ आहे काय? हे आपणाला या विधी विषयी माहिती करून घेतल्यानेच कळू शकेल. या लेखात आपण श्राध्द या व्यवहारिक दृष्टिने महत्वाच्या विधीविषयी उहापोह करणार आहोत.

ब्रम्हपुराणानुसार; निकटच्या पूर्वजांच्या, पितरांच्या हिताकरिता, जे जे काही योग्य काळी, योग्य स्थळी सत्पात्र व्यक्तींना आणि ब्राम्हणांना धर्मशास्त्रात सांगितलेल्या विधीला अनुसरून श्रध्दापूर्वक देण्यात येते, त्याला श्राध्द म्हणतात. श्राध्द हा शब्द सुद्दा श्रध्दा ह्या शब्दापासूनच बनलेला आहे. धार्मिक कृत्यांच्या उपयुक्ततेविषयी असणाऱ्या विश्वासाला धर्म ग्रंथानुसार श्रध्दा म्हणतात. श्राध्दांमध्ये श्राध्द करणाऱ्याच्या मनामध्ये अशी श्रध्दा असते की प्रेताच्या अथवा पितराच्या संतोषाकरिता जे जे काही ब्राम्हणांना दिले जाते; ते ते त्या प्रेताला, पितरांना कोणत्यातरी स्वरुपात पोहचते. पितरांच्या अंगात आपल्या जीवंत वंशजांचे हित अथवा अहित करण्याचे सामर्थ्य असते; अशाप्रकारच्या कल्पना वेदकाळापासून अस्तित्वात असल्याचे ऋगवेदातील उल्लेखावरून आढळून येते. , आणि म्हणून श्राध्दांच्या विधींच्या हेतूमध्ये मृतांविषयी प्रेमभावनेबरोबरच थोडासा भितीचाही अंश असतो. आपल्या हातून घडलेल्या अपराधांबद्दल पितरांनी इहलोकी आपल्याला पिडा न द्यावी, याकरिता श्राध्दांमध्ये करावयांच्या प्रार्थनांचा उल्लेख ऋगवेदात आढळतो. पितरांकरिता केलेल्या विधींच्या योगाने दीर्घायुष्य, स्वर्ग, किर्ती आणि वैभव ह्याची प्राप्ती होते असे हरिवंश पुराणात सांगितलेले आहे.

मत्स्यपुराणात असे सांगितले आहे की, मृतदेहातून बाहेर पडणाऱ्या आत्म्याला, मृत्युनंतर १२ दिवसापर्यंत पितृलोकात (जेथे मृतात्मे वास करितात तेथे) नेण्यात येत नाही. तोपर्यंत असे मृतात्मे घर, पुत्र, -पुत्री पत्नी-नवरा ह्यांच्या आजूबाजूला घुटमळत असतात, आणि म्हणून मृत्युनंतर १२ दिवसापर्यंत अर्पण केलेले पिंड अशा मृतात्म्यांना त्यांच्या पितृलोकापर्यंतच्या प्रवासात खाण्यास उपयोगी पडतात आणि असे भोग पितरांना संतोष देतात.

वायुपुराणात म्हटले आहे की, पितर वायुरुपी देह धारण करून, श्राध्दात निमंत्रित केलेल्या ब्राम्हणांच्या देहात प्रवेश करितात आणि अशा ब्राम्हणांचा सत्कार केला म्हणजे पितर संतुष्ट होतात. कर्मपुराणात सांगितले आहे की, अमावश्येच्या दिवशी पितर वायुरुप धारण करून त्यांनी जिवंत असतांना वास्तव्य केलेल्या पूर्वीच्या घराच्या दाराशी येतात, आणि जे अमावश्येच्या दिवशी पिंड अर्पण करित नाहीत, त्यांना शाप देऊन, निघून जातात. म्हणजे दर अमावश्येला श्राध्द करावयास हवे.

बौधायन धर्मसुत्रांत सांगितल्या प्रमाणे पितर, पक्षी बनून येतात आणि श्राध्दात अर्पण केलेले पिंड खातात.

श्राध्दाचे नित्य, नैमित्तिक, अणि काम्य असे तीन विभाग धर्मसुत्रानुसार केलेले आहेत. एखाद्या विवक्षित अथव निश्चित प्रसंगी, जसे की, प्रतिदिवशी, अमावश्येला, संक्रांतीला आदी,

करावयाच्या विधींना नित्य विधी म्हणतात. जे विधी; पुत्रजन्म, सूर्य-चंद्र ग्रहणे यासारख्या एखद्या अनिश्चित प्रसंगी करावयास शास्त्राने सांगितलेले असते, अशांना नैमित्तिक विधी म्हणतात. काही विशिष्ट लाभ अथवा फ़लप्राप्त व्हावे अशी इच्छा असल्यास जे करावयाचे विधी शास्त्रात सांगितलेले आहेत, त्यांना काम्य विधी म्हणतात. याशिवाय श्राध्दाचे एकोद्दिष्ट (एकाच मृत व्यक्तीच्या, पित्याच्या हिताकरिता) आणि पार्वण (पिता, पितामह, आणि प्रपितामह या तीन पूर्वजांकरिता) असेही प्रकार करण्यात येतात. एकोद्दिष्ट श्राध्दाचे नवश्राध्द, (मृत्युनंतर १० व्या अथवा ११ व्या दिवसापर्यंत केले जाणारे) आणि नवमिश्र श्राध्द (११व्या दिवसापासून १ वर्ष पर्यंत करण्यात येणारे), आणि पुराण श्राध्द (१ वर्षानंतर करण्यात येणारे) असे प्रकारही धर्मसुत्रात सांगितलेले आहेत. याशिवाय जेंव्हा एखादी वृध्दी अथवा यशस्वी गोष्ट होते तेंव्हा नांदी श्राध्द (ज्यालाच वृध्दीश्राध्द सुध्दा म्हणतात) करून पितरांना पिंड अर्पण करण्याविषयीचा उल्लेखही धर्मग्रंथात आढळतो. प्रतिसावत्सरिक अथवा प्रत्याब्दिक श्राध्द हे प्रतिवर्षी मृत्युच्या तिथीला करावयाचे असते.

याशिवाय निरनिराळ्या ग्रंथात श्राध्दांचे अनेक प्रकार सांगितलेले आहेत. काही ग्रंथात मृत्युनंतर ११ व्या दिवसापासून १ वर्षापर्यंत १६ श्राध्दे आवश्यक सांगितलेली आहेत. आणि ती न

केल्यास मृतात्म्याची प्रेतत्वापासून आणि पिशाच्च अवस्थेपासून मुक्तता होत नाही, असे म्हटलेले आहे.

षणावती श्राध्द या ग्रंथात तर दरवर्षी करावयाच्या ९६ श्राध्दांची यादीच दिलेली आहे.

मनुने प्रथमतः प्रत्येक महिन्यातील अमावश्येला श्राध्द करावे असे सांगितले; परंतु तसे करणे जवळ जवळ अशक्य होईल, हे जाणून त्याने वर्षातून तीन; हेमंत, ग्रीष्म आणि वर्षा ऋतुतील अमावश्येलाच फ़क्त श्राध्द करावित असे सुचविलेले आहे.

स्म्रुतीचंद्रिका या ग्रंथात मात्र श्राध्द वर्षातून एकदाच करावे असे म्हटलेले आहे.

जीवंत श्राध्द अथवा जीव श्राध्द हे कोणाही मनुष्याला आपण जीवंत असतांना आपल्या स्वतःच्या मृत्युनंतरच्या आत्म्याच्या हितास्तव करिता येते. या श्राध्दाचे तपशील बौधायन गृह्य शेषसुत्रात दिलेले आहेत.

निरनिराळया प्रकारच्या, निरनिराळया दिवशी, प्रसंगी केलेल्या श्राध्दांपासून प्राप्त होणारी निरनिराळी फ़ळे, निरनिराळया ग्रंथात दिलेली आहेत आणि ती एकमेकांशी जुळत नाहीत. निरनिराळया प्रकारच्या श्राध्द विधीमधील मुख्य कृत्ये अथवा टप्पे सामाण्यतः एकसारखेच असले तरी मंत्राच्या, तपशीलाच्या आणि

निरनिराळ्या कृत्यांच्या बाबतीत निरनिराळ्या ग्रंथानुसार भिन्नताच आढळते. श्राध्दांम्ध्ये ब्राम्हण भोजन, पिंडदान, आणि अग्नौकरण (होम) ही तीन कृत्ये प्रमुख माणतात. परंतु काही ग्रंथात ब्राम्हणांना भोजन घालणे हे प्रमुख कृत्य माणलेले आहे. तर काही ग्रंथात पिंड अर्पण करणे ह्याला जास्त महत्व दिलेले आहे.

श्राध्द कोणी करावे, केंव्हा करावे, कोणत्या जागी करावे, कोण्या आणि किती ब्राम्हणांना जेवनासाठी आमंत्रीत करावे, कसे आमंत्रीत करावे, ब्राम्हणांचा सत्कार कसा करावा, अन्न कोणते शिजवावे, कोणत्या पात्रात शिजवावे, ब्राम्हणांनी जेवणास कसे बसावे, कसे वाढावे, नैवेद्य कसा आणि केंव्हा दाखवावा, होम केंव्हा आणि कसा करावा, पिंड कोणत्या प्रसंगी अर्पण करावेत, पिंडाचा आकार केवढा असावा, पिंडाची अंतीम व्यवस्था कशी लावावी, श्राध्द करणाऱ्याने आणि आमंत्रीत ब्राम्हणांनी कोणते कपडे घालावेत, कोणते नियम पाळावेत; याविषयी सविस्तर तपशील निरनिराळ्या धर्म ग्रंथात दिलेला आढळतो, आणि निरनिराळ्या ग्रंथातील तपशील एकमेकाशी जुळणारे आहेतच असेही नाही. धर्मग्रंथानुसार वेदविद्येत पारंगत आणि सच्छील ब्राम्हणच श्राद्धातील भोजनास पात्र असतो. मनुस्मृतीप्रमाणे अपात्र ब्राम्हणांना भोजन घातल्याने पितरांच्या संतोषाचा नाश होतो अणि अशा ब्राम्हणांनी सेवन केलेले अन्न विष्टेसमान होते, म्हणून पात्र

ब्राम्हणांनाच भोजन घालावयास पाहिजे. आता आपणच विचार करा, आजकालचे किती ब्राम्हण, भटजी वेदविद्या पारंगत आहेत, असतात. आणि म्हणून आपले ब्राम्हण भोजन अपात्री आणि श्राध्द फ़ळहिन असणार नाहीत काय?

गायीचे दुध, त्यापासून तयार केलेले दहि, तुप आणि या दुधात शिजविलेले तांदुळ, ज्याला पायस म्हणतात; श्राध्दात अर्पण करण्यास योग्य. म्हशीचे दुध आणि त्यापासून तयार केलेले दहि, तुप हे निरनिराळ्या ग्रंथात श्राध्दातील भोजनाकरिता निषिध्द माणलेले आहे. तदवतच ब्राम्हण भोजन हे तांब्याची पात्रे अथवा मातीची (अग्नीमध्ये भाजलेली) पात्रे यात शिजवावयास हवे. लोखंडाच्या पात्रात शिजविलेले अन्न निषिध्द माणलेले आहे. त्याचप्रमाणे अन्न हे एका हाताने वाढू नये. ते उजव्या हाताला डाव्या हाताचा आधार देऊन लाकडी पळीने अथवा लोखंडाव्यतिरीक्त पात्राने वाढावे. लोखंडाच्या, स्टीलच्या पात्राने वाढणे वर्ज्य आहे. आपण लोखंडाच्या (स्टीलच्या) भांड्यात अन्न शिजवितो. आजकाल स्टीलच्या ताटातच, स्टीलच्या चमच्याने वाढतो, स्टीलच्या वाट्या वापरतो; म्हशीचे दुध, दहि तुपच जास्त करून भोजनात उपयोगात आणतो. मग विचार करा असे ब्राम्हण भोजन हे विधीहिन, फ़लहिनच असणार नाही काय?

श्राध्दांमध्ये मांसाचा उपयोग केला पाहिजे आणि श्राध्दातील आमंत्रीत ब्राम्हणांनी मांस भक्षण केलेच पाहिजे असे अनेक ग्रंथात मनुस्मृतीधरून, म्हटलेले आहे. कोणत्या प्राण्याच्या मांसापासून पितरांना किती काळ पर्यंत संतोष होतो ह्याची वर्णने पण निरनिराळ्या ग्रंथात केलेली आहेत. श्राध्दात करावयाच्या निरनिराळ्या कृत्यांच्या वरील तपशीलांवरून या विधीची अनाकलनियता, निरूपयोगिता आणि अव्यवहारिकता आपल्या लक्षात यायला हवी. श्राध्दातील इतर कृत्ये, मृतसंस्कार आणि अंतेष्टी विधी यातील बरीच कृत्ये पण निरर्थक, अवास्तव, आणि उगीचीच आहेत, हे सुध्दा आपण खोलवर विचार केल्यास आपल्या लक्षात यायला वेळ न लागावा. आपले पूर्वज आणि नातलग हे जीवंत असतांना आपल्याला प्रिय होते, निकट होते; म्हणून त्यांचे स्मरण राहावे याकरिता कितीतरी चांगली कृत्ये, कार्ये शोधता येतील. , करता येतील. आपले मातापिता जीवंत असतांना त्यांना अतोनात छळावे आणि मृत्युनंतर त्यांचे यथाविधी श्राध्द करित राहावे; हे ढोंगच नव्हे काय? माता-पित्यांना त्यांचे म्हातारपणी आनंदात ठेवणे हीच खरी प्रेम-श्रद्धा. ती जोपासली तर मला वाटत मग श्राद्धाची गरज न उरावी.

आता, श्राद्धा विषयीच्या आपल्या संकल्पना, भावना आणि जीवनाविषयीच्या संकल्पना, तत्वज्ञानातील सिध्दांत यात

किती विरोधाभास आहे याविषयी. जीवनात आपण पुनर्जन्माचा सिध्दांत माणतो. या सिध्दांताप्रमाणे मनुष्य मरण पावल्यानंतर त्याचा आत्मा दुसऱ्या नव्याने जन्माला आलेल्या शरीरात प्रवेश करित असतो. मग मृतात्मा शिल्लक राहतोच कुठे? आणि श्राध्दाच्या संकल्पनेप्रमाणे मृतात्मे पितृलोकात जातात व तेथे वास करतात याला पण अर्थ उरतो काय? मृत व्यक्तीचा आत्मा जर दुसऱ्या शरीरात जातो, तर मग श्राध्दात अर्पण केलेले पिंड खाण्यास तो कसा येवू शकतो! म्हणून एकतर श्राध्दविधी अर्थहिन असावेत अथवा पुनर्जन्माचा सिध्दांत खोटा असावा. काय खरे आणि काय खोटे याचा आतातरी विचार केल्या जाईल काय?

पूर्वजन्म. पुनर्जन्म, श्राध्द विधी ह्या संकल्पना, सिध्दांत मानने म्हणजे चुकीच्या श्रध्दा, अंधश्रध्दा जोपासनेच. यापासून आपला काहीच फ़ायदा नाही. फ़ायदा फ़क्त भटजींचाच. शांतचित्ताने, पूर्वग्रह बाजूला ठेऊन, विवेकपूर्ण विचार केल्यास, हे सहज आपल्या लक्षात यावे.

माझ्या मृत्युनंतरच्या क्रियांविषयी ह्या लेखाद्वारेच माझ्या आप्तांना सांगू इच्छितो की, मी मेल्यानंतर; माझ्या मृत शरीराचे देहार्पण (देहदान) करावे, परंतु जर हे शक्य न झाल्यास; माझ्या मृत शरीराला, आंघोळ न घालता, नविन कपडे न घालता, तिरडीवर न चढविता, कोणत्याही तऱ्हेची पूजा आदी न करता; मी ज्या

अवस्थेत, कपड्यात मरण पावेल, त्याच अवस्थेत, कपड्यात, जे वाहन उपलब्द असेल किंवा होईल त्या वाहनातून प्रेतागरात, स्मशानात नेवून, किंवा एखाद्या शेतात नेऊन, तेथे कोणतेही विधी न करता, सरळ लाकडे रचून किंवा विद्युत यंत्रात मशीनमध्ये ठेवून जाळून टाकावे, वा जमिनीत गाडून टाकावे. नंतर सुद्धा कोणत्याही प्रकारच्या विधी जसे की, दशकार्य, तेरवी, श्राद्ध आदी अजिबात, मुळीच करू नये. माझ्या मृत्युनंतर मी गेल्याचे दुःख क्षणभरही उगाळू नये. कारण त्याने काहीच होणे नाही. भलेही गोड, कडू आठवणी जपा.

## (३७)

# कर्मकांड--प्रथा, रुढी, विधी आदि

आपल्या धर्माचे तसेच तत्वज्ञानाचे मूळ हे वेदात आढळते. आपल्याला माहित असल्याप्रमाणे, ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, व अथर्ववेद असे चार वेद आहेत. परंतु यजुर्वेदातील आणि सामवेदातील बहुतांशी भाग हा ऋग्वेदातूनच घेतलेला असल्यामुळे ऋग्वेद आणि अथर्ववेद यांनाच केवळ मुळवेद माणता येईल. प्रत्येक वेदाचे (१) संहिता (२) ब्राम्हणे (३) अरण्यके आणि (४) उपनिषदे असे भाग पडतात. संहितेत मुख्यतः देवतांच्या स्तुतीपर मंत्र आहेत. ब्राम्हण ग्रंथात प्रामुख्याने यज्ञ क्रियांचे वर्णन. आणि यज्ञ यथासांग का आणि कसे करावेत याची चिकित्सा आहे. अरण्यके आणि उपनिषदे यात तत्वविचार आहेत. म्हणूनच संहिता आणि ब्राम्हणे यांना कर्मकांड आणि अरण्यके आणि उपनिषदे यांना ज्ञानकांड असे संबोधिण्याचा प्रघात आहे. उपनिषदे हे वेदाचेच भाग आहेत याविषयी एकमत नाही. कारण उपनिषदातील ज्ञान-तत्वज्ञान हे वेदातील तत्वज्ञानापेक्षा, बरेच विपरित आहे. परंतु आता उपनिषदांना वेदांत म्हणून ओळखण्यात येते. वेदांत म्हणजे वेदांचा अंत, वेदातील ज्ञानाचा अंत, वेदांनी ज्याचा अंत पाहिला आहे अथवा अंतिम ठाव घेतला आहे असे ज्ञान. म्हणून अरण्यके

सोडलित तर वेदांमध्ये निव्वळ कर्मकांडच आहे; ज्ञानकांड, ज्ञान नाही. उपनिषदांनी यज्ञाचा जोरदार निषेद केलेला नसला तरी, कर्मकांडाविषयी हिनत्व भावच दाखविलेला आहे. यज्ञीय कर्मकांडावरची प्रतिक्रिया म्हणजे उपनिषदे होत.. वैदिक कर्माहून (कर्मकांडापेक्षा) ज्ञान श्रेष्ठ याबद्दल उपनिषदात बाह्य कर्म, कर्मकांड हे अर्थशुन्य माणलेले आहेत. कर्मे या रितीने केली अथवा त्या रितीने केली अथवा मुळीच न केली, तरी त्याने काही बिघडत नाही असे उपनिषदात स्पष्ट केलेले आहे. असे असूनही आपले संपूर्ण जीवन हे कर्मकांड आणि विधींनी व्यापलेले आहे.

ऋग्वेदातील कर्मकांड हे चिंतन, मनन, प्रार्थना, पुजा भक्ती आदिंनी देवतेपुढे विनम्र होवून तिच्या कृपाप्रसादाने इष्ट गोष्टी प्राप्त करून घ्याव्यात अशाकरिता आहेत. अशा धर्मभावना व्यक्त करण्याकरिता मूर्तीची आवश्यकता असतेच असे नाही. परंतु मन एकाग्रचित्त करण्याकरिता घरांतील किंवा साध्या मंदिरातील मूर्तीपुढे बसून पूजा, भक्ती आदि करणेही समजू शकेल. खरा मुद्दा हा आहे की, याकरिता अतोनात पैसा खर्च करून शोभिवंत मंदिरे बांधण्याची आवश्यकता आहे काय? अशी मंदिरे बांधायची, देवाच्या मूर्तीला रत्ने, हिरे, माणके, सोन्या-रुप्याचे दागिने यांनी सजवायचे, आणि मग अशा महागड्या वस्तुंच रक्षण करण्याकरिता, मंदिराच्या गाभाऱ्याला कुलुपे लावून देवाला

बंदिस्त करायच, आणि वरून पहारा बसवायचा; हे कितपत योग्य आहे याचा विचार व्हायला नको काय? आणि सर्व शक्तीमान देव सुध्दा कैद होऊन राहतो, हे पटत का! तदवतच अशा मंदिरात जास्त पैसे खर्च करणाऱ्यांना आड मार्गाने अगोदर दर्शन देण्याची व्यवस्था करणे, म्हणजे देवच माणसा-माणसांमध्ये भेदभाव करितो असे होत नाही काय? वाम मार्गाने करोडो रुपये कमवायचे आणि आपल्या अशा पापाची शिक्षा देवाने देवू नये म्हणून लाखो भ्रष्ट रुपयाचे निनावी दान देवाला मंदिरात द्यायचे हे योग्य आहे काय? मंदिरात देव असेल तर तो तेथे असा भ्रष्टाचार होवूच कसा देतो? याचा विचार करायला नको काय?

अथर्ववेदातील कर्मकांडाचा भर यातुविद्येवर म्हणजे जादुटोण्यावर आहे. मंत्र हे स्वतःच्या सामर्थ्यानेच काही गोष्टी घडवून आणतात आणि ठराविक कर्मकांड केल्यास आपणाला हव्या त्या गोष्टी करणे, देवतांना भाग पडते, अशी वृत्ती अथेर्ववेदांमध्ये आहे. अथर्ववेदांतील बहुतांशी मंत्र हे जारण, मारण, उच्चाटन, स्त्रीवशीकरण, यश संपादन, शत्रुनाश, असल्या प्रकारासाठी आहेत. आणि अशा मंत्रांना घोर, अभिचारक, अशी विशेषणे लावल्या जात असून, असे मंत्र, सुक्ते ही अंगीरस कुलातील ऋषींनी रचलेली आहेत. अशा निंद्य गोष्टींसाठी असलेले

अथर्ववेदातील कर्मकांड कितपत योग्य आहे, याचाही उहापोह व्हायला नको काय?

जन्मापासून मरेपर्यंत आपण अव्याहत कर्मकांड, विधी करित असतो. इतकेच काय आपल्या मरणानंतर सुध्दा आपल्या वंशजांना आपल्या विषयीचे कर्म विधी (अंतेष्टी, श्राध्द आदि) करावे लागतात.

अशा विधीमध्ये प्रथा, पायंडे, प्रघात, परंपरा, वहिवाट, रीतीभाती, चालीरीती, रुढी आदि पण येतात. सवयी ह्या वैयक्तीक असतात. परंतु बाकीचे सर्व विधी कौटुंबिक, जातीनुसार, समाजानुसार असतात. प्रथा, परंपरा प्रघात, रुढी ह्या् भौगोलिकरित्या सुध्दा केल्या जातात.

निरनिराळ्या गावांच्या, प्रांताच्या निरनिराळ्या प्रथा, परंपरा, वहिवाटी असतात. महराष्ट्राच्या इतर राज्यांच्या तुलनेत काही विशिष्ट परंपरा आहेत. परंतु जन्मापासून मरेपर्यंत करावयात यावयाचे विधी जसे की, नामकरण, मुंज, लग्नविधी, अंतेष्टी, श्राध्द, समारंभात करावयाचे दीपप्रज्वलन, आदि हे धर्मानुसार, धर्मात सांगितलेल्या कर्मकांडानुसारच केल्या जातात. निरनिराळ्या धर्मग्रंथात, धर्मसुत्रात हे वि्धी करावयाचे कितीतरी निरनिराळे प्रकार सांगितलेले आहेत. आणि यातील अधिकृत प्रकार कोणते

याविषयी कोठेच उवाच नाही. म्हणून प्रत्येक विधी भटजी सांगतिल तसे करणे आपण क्रमप्राप्त माणतो. भटजींना तरी अशा विधीचे संपूर्ण ज्ञान आहे काय? त्या विधींचे मंत्र तरी त्यांना बरोबर येतात काय? हे पाहण्यचे प्रयोजन नसते. वास्तविक वेदाध्ययन न केलेल्या भटजींना, पुरोहिता्ना असे विधी करण्याचा अधिकार नाही, अशांनी असे विधी केल्याने पाप लागते, असे वेदात नमूद केलेले आहे. मला सांगा आजच्या युगात किती भटजी वेदाचा सखोल अभ्यास करतात! ते त्यांना मिळालेल्या वडिलोपार्जीत ज्ञान वा अज्ञान यावर आधारित विधी आपणांकडून करून घेत असतात. आणि आपण मुकाट्याने करित असतो. असे विधी केल्याने काय होते? अशा विधींचा फ़ायदा काय? असे विधी कशांकरिता करावयाचे! याबद्दल आपण काहीच माहिती करून घेत नसतो. भटजींना पण विचारित नसतो. अशा ह्या विधी खेड्यातील अडाणी लोक (खेड्यातील लोक अडाणी असतात असा सोयीस्कर गैरसमज पसरविण्यात आलेला आहे.) जास्त प्रमाणात करतात, असे माणल्या जाते, समजल्या जाते. परंतु हे साफ़ खोटे आहे. चुकीचे आहे. माझ्या माहितीप्रमाणे असे विधी करण्यात शिकलेले, शहरातील लोक आणखीच अग्रेसर आहेत. अति शिक्षित लोक आपण फ़ारच धार्मिक आहोत, हे दाखविण्याकरिता धार्मिक विधीच फ़ारच स्तोम माजवित असतात. आणि इतकेच काय, जे

भटजीही सागत नाहीत, असे विकृत स्वरुपही ह्या विधींना देत असतात.

कार्यक्रमचा एक सांस्कृतिक भाग म्हणून कर्मकांडे करण्यास हरकत नसावी. परंतु त्यात विकृती नसावी, स्तोम नसावे. अवास्तव खर्च नसावा. तसेच आजच्या या विज्ञान युगात विवेकपूर्ण दृष्टीने या कर्मकांडांची चिकित्सा करणे गैर न ठरावे. लग्नात अक्षता टाकल्याने वा न टाकल्याने काहीच फ़रक पडणार नाही. अक्षता न टाकता वाचणाऱ्या ज्वारीतून, तांदूळातून काही लोकांची की जे दुबळे अपंग असल्यामुळे त्यांना लागणारे अन्न ते स्वतः मिळवू शकत नाहीत, त्यांची पोट भरू शकतात, असा विचार का केल्या जावू नये! लग्नात होम वा सप्तपदी केल्याने वा न केल्याने काहीच फ़रक पडत नाही. विधीवत झालेली कितीतरी लग्ने अयशस्वी झालेली आणि विधीशुन्य नोंदणी विवाह सफ़ल झालेली कितीतरी उदाहरणे आपण पाहतोच ना! खरोखरच आपल्या सर्व धार्मिक विधी केल्यात काय किंवा न केल्यात काय, त्याने काहीच फ़रक पडणार नाही. अंतेष्टी, श्राध्द आदि कितीतरी विधीत अनाकलनियता आहे.

आता तरी ह्या विधी किती आवश्यक, योग्य आहेत, ह्या विधी कोणत्या शात्रात सांगितलेल्या आहेत. याविधीत जे मंत्र

म्हटल्या जातात, ते शात्रानुसार आहेत काय? त्याचा काय अर्थ आहे? अशा विधी केल्याने खरोखरच आपल्याला काय फ़ळ मिळते, इच्छित फ़ळ मिळते काय? यावर मुळात, खोलात विवेकपूर्ण विचार केल्या जाईल काय? की आपण शिक्षित असूनही अतर्कट विचारच करित राहणार!

# (३८)

# यातुविद्या

## मंत्र, तंत्र, जादूटोणा आदि

मंत्र तंत्र, जादूटोणा इत्यादिंना वैदिक साहित्यात यातुविद्या म्हणून संबोधिण्यात येते. 'जादू ' या शब्दाची उत्पत्ती ' यातु ' ह्या शब्दापासुन होत असली तरी जादूगिरी व यातुविद्या यात फ़रक आहे. जादू, जादूगिरी हे हातचलाखी दाखविण्याचे खेळ आहेत, जसे की, इंद्रजाल, जादूचे खेळ वगैरे. यात जो हे खेळ करतो म्हणजे जादूगार, हातचलाखी करित आहे, हे सर्वांनाच माहित असते. यात फ़सवणूकीचा प्रकार नसतो. हे सर्व करमणूकीचे खेळ असतात. याचे स्वरूप मनोरंजनात्मक असते. याउलट यातुविद्या (मंत्र, तंत्र, जादूटोणा आदि) ही लोकांची फ़सवणूक करणारी विद्या आहे. याचा उपयोग लोकांची लुबाडणूक, भुलावण करण्यासाठीच केल्या जातो. लहान मुलांची 'दृष्ट ' काढण्यापासुन तो शत्रूला 'मूठ ' मारण्यापर्यंत सौम्य, रौद्र, बीभत्स प्रकार यातुविद्येत असतात. मंत्र, तंत्र, गंडेदोरे, ताईत, अंगारे-धुपारे, मंत्रमणी, भारलेल्या वनस्पती वस्तु, कामनापुर्ती करणाऱ्या अंगठ्या, बोलका पत्थर इत्यादि यातुविद्येची प्रभावी साधने आहेत. भूतप्रेत, भानामती, करणी

करणे, जादूटोणा करणे, हे सर्व यातुविद्येचेच प्रकार, प्रयोग असून ते सर्व ऐहिक गरजापुर्तीसाठी आणि कामनापुर्तीसाठी केल्या जातात. स्त्रीवशीकरण, रोगनिवारण, विषहरण, अपत्यलाभ, पिकांची वृध्दी, अधिकार प्राप्ती, युध्दविजय, शत्रूनाश, द्रव्यलाभ, अर्थार्जन, याकरिता सुध्दा मंत्र, तंत्र, जादूटोणा आदिचे प्रयोग केल्या जातात, यातुविद्या उपयोगात आणल्या जाते. खरे तर, यातुविद्येला विद्या म्हणणेच चुक आहे. याकरिताच इंग्रजीमध्धे या विद्येला (ब्लॅक मॅजिक), कृष्ण जादू, म्हणून संबोधिण्यात येत असाव. इंग्रजित मॅजिक हा शब्द जादूगिरी, जादूचे खेळ याकरिता वापरण्यात येतो.

अथर्व वेद, भारतीय संस्कृत कोश आणि अन्य हिन्दू धर्म शास्त्रात, जारण, मारण, उच्चाटण, चेटूक, स्वसंरक्षण, आक्रमण आदि अनेक उद्दिष्टांकरिता; करावयाच्या यातुविद्येच्या निरनिराळ्या प्रयोगाचे आणि त्यांच्या विधीचे तपशीलवार उल्लेख आढळतात. रामायण, महाभारत, पुराण यातील राक्षस, दैत्य, दानव ही कल्पना यातुविद्येतूनच आलेली दिसते. ऋग्वेदात याच यातुविद्येला विश्वाची रचनात्मक शक्ती माणलेले आहे. माया हा शब्द सुध्दा यातुविद्येतूनच आलेला आहे.

माणसाच्या अतींद्रिय शक्ती वरील विश्वासातून यातुविद्या हे अतींद्रिय शास्त्र निर्माण झाले. या शात्राचा, यातुविद्येचा आणि

धर्माचा अन्योन्य संबंध अनादी काळापासुनचा आहे. विश्वातील प्रायः सर्वच; धर्मांवर जसे की, हिन्दू, वैदिक, बौध्द, इस्लाम, पार्शी, यहुदी, ख्रीश्चन आदि; यातुविद्येचा प्रभाव आहे. माणसाचे मन स्वभावतःच अंधश्रध्दाशरण असते आणि आपले संस्कार जे मुख्यत्वेकरून धर्मानुसार होतात, त्यात सुध्दा हीच मनोवृत्ती जोपासली जाते, वाढविली जाते, आणि यामुळेच मानवाच्या मनावर यातुविद्येचा घट्ट पगडा बसलेला आहे.

ऋग्वेद, अथर्ववेद, जातकग्रंथ, इतिहास, पुराणे आदि भारतीय वाङमयात; मायावी जादूगार, राक्षसाचे चमत्कार, मायाबाजार वगैरेची; यातुविद्येचा प्रसार करणारी, त्याला प्रोत्साहन देणारी विपूल उदाहरणे सापडतील. कौटिल्याने यातुविद्येला "जंभकविद्या" असे म्हटले आहे. "अघोरीविद्या" हा यातुविद्येचाच प्रकार आहे. यातुविद्येला भ्रामक विज्ञान म्हणूनही संबोधितात.

जगातील सर्व धर्मांचा प्रारंभ यातुविद्येने झालेला आढळतो. प्राचीन काळी अविकसित धर्म यातुविद्येला उघड उघड प्रोत्साहन देत असत. परंतु आता, ज्याला विकसित धर्म व्यवस्था म्हणतात, त्या व्यवस्थेत; त्याला खुले आम प्रोत्साहन दिले जात नसले तरी; असे प्रयोग करणाऱ्यांना विरोध न करणाऱ्या दृष्टीकोनामुळे आणि त्यांचे विरूध्द काहीही कृती न करणाऱ्या

प्रवृत्तीमुळे, चोरून, गुपचूप, अप्रत्यक्षपणे यातुविद्येला आपण प्रोत्साहनच देत असतो. उघडपणे मात्र यातुविद्या आणि धर्म यांच्या भूमिका परस्पर भिन्न असल्याच दाखविल्या जात. जसे की, यातुविद्येचा भर मंत्रोच्चार, विधिविधान,

अतींद्रिय शक्तीला स्वसंकल्प पूर्ण करण्यास भाग पाडणे, वैयक्तीक व ऐहिक कामनापूर्ती यावर असतो असे दाखविल्या जाते; तर धर्माचा गाभा दैवी शक्तीची आळवणी, प्रार्थना, स्तोत्रपाठ, यज्ञयाग असल्याच भासविल्या जाते. धर्मामध्ये श्रध्दा असते तर यातुविद्येत अंधश्रध्दा असते, असेही अभिप्राय दिले जातात.

या यातुविद्येचे, अभिचारविद्येचे प्रयोग करणाऱ्यांना अभिचारक, मांत्रिक, तांत्रिक, यातुवान, यातुविद इत्यादि नावांनी संबोधिल्या जाते. याशिवाय खेड्यातून यांना भगत, देवर्षी, चेटकिणी, उपाध्याय या संबोधनानेही ओळखल्या जाते. अथर्ववेदाला यातुविद्येचे लोकवेद माणल्या जाते. शत्रूची मेणाची बाहूली बनवून तिच्या ह्रदयांत शस्त्र खुपसले म्हणजे शत्रू ठार होतो; किंवा मंतरलेले पाणि शत्रूच्या दिशेने फ़ेकले की त्यांचा नाश होतो; अशी समजूत अथर्ववेदात आढळते. आपल संपूर्ण वैदिक कर्मकांड यातुविद्येने व्यापलेले आहे. वैदिक पवित्रतम विधितही जादू व चेटूक यांना महत्वाचे स्थान दिलेले आढळते. यावरून

धर्मग्रंथातूनच या अविद्येला प्रोत्साहन मिळत आल्याचे, असल्याचे स्पष्ट होते.

काही शेकडो, हजारो वर्षापूर्वी; अप्रगत विज्ञान युगात, जेंव्हा धर्म अविकसित समजल्या जात होते तेंव्हा; यातुविद्येचा प्रभाव मानव जातीवर असणे, हे एक वेळ समजू शकते. परंतु आजच्या प्रगत विज्ञान युगात, जेंव्हा धर्मव्यवस्था विकसित आहे अस माणल्या जाते, तेंव्हाही यातुविद्येचा प्रभाव कायम असणे, ही न समजण्यासारखी, आकलणापलिकडील बाब वाटते. यामुळे मानवजात खऱ्याअर्थाने शिक्षित झाली काय, शिक्षित होत आहे काय याविषयी प्रश्नचिंन्ह उभे राहते. यातुविद्येचा प्रभाव फ़क्त अडाणी, अशिक्षित, गरीब, खेडूत यांचेवरच आहे असे नाही, तर शिक्षित, बहुशिक्षित, श्रीमंत, शहरी लोकसुध्दा यातुविद्येने तितकेच प्रभावित आढळतात. यांच्या सहकार्याने आणि अनुमतीनेच यातुविद्येचा प्रभाव मानवजातीवर कायम राहत आहे, कायम ठेवल्या जात आहे. यज्ञात म्हटल्या जाणाऱ्या मंत्राने विश्वशांती लाभते म्हणून यज्ञ करणे, अपत्य प्राप्तीकरिता, कोणतेही इप्सित पूर्ण होण्याकरिता; समृध्दीकरिता, यज्ञ करणे, हे सर्व यातुविद्येचेच प्रकार आहेत. आणि असे यज्ञ करण्यात सुशिक्षित आणि राजकीय नेतेच अग्रेसर असल्याचे दिसते.

राजकीय क्षेत्रात यातुविद्येचा प्रभाव जास्तच दिसून येतो. कोणी मंत्री होण्याकरिता, कोणी मुख्यमंत्री होण्याकरिता, कोणाला मंत्री, मुख्यमंत्री पदावरून दूर करण्याकरिता, राजकीय क्षेत्रात आपला प्रभाव वाढविण्याकरिता, जादूटोण्याचे, मंत्र-तंत्राचे प्रयोग सदैव होत असतात व आपण तसे वर्तमानपत्रातून नियमित वाचत पण असतो. याचमुळे धीरेन्द्र ब्रम्हचारी, चन्द्रास्वामी यांचेसारखे अघोरी विद्येचे प्रयोग करणाऱ्या साधू, बुवा, बाबा यांचे प्रस्थ राजकीय क्षेत्रात फ़ारच वाढलेले आढळते. अशा ह्या आपल्या अंधश्रध्द राजकीय व्यवस्थेपासुन समाजाला अंधश्रध्दांपासुन, यातुविद्येच्या प्रभावापासुन दूर नेण्याची, करण्याची अपेक्षा करणे, बाळगणे; फ़ारच चुकीचे असणार. अशी अपेक्षा ठेवून काहीच साध्य होणे नाही.

पाचीन अश्मयुगापासुन धातुयुग, विद्युतयुग, अणूयुग, अंतराळसंशोधन युग असा मानवाच्या विज्ञानाने आणि त्याच्या सभ्यतेने प्रवास केलेला आहे. नवनवीन यंत्रे, तंत्रज्ञान, नवे शोध, यांनी मानवाच्या ऐहिक समृध्दीत बहुमोल भर घातलेली आहे. आणि आता तर संगणके माणसाच्या दिमतीला आलेले असून त्यांनी माणसाच्या ज्ञानाकरिता, व्यवहाराकरिता, व्यवस्थापनाकरिता अगणित दालणे खुली केलेली आहेत. परंतु इतके होवूनही माणसाच्या मूळ प्रवृतीत फ़ारसा फ़रक पडलेला

नाही. तो अजूनही यातुविद्येच्या आहारीच आहे. ज्योतिष्य (अ) शास्त्रानुसार ग्रहशांती करण्यात मश्गुल आहे. आणि अशी ग्रहशांती करणे हा यातुविद्येचाच प्रकार आहे. आणि याकरिता ते आता संगणकांचाही उपयोग करतांना आढळतात.

माणसांच्या विचारांशी सहमत, मिळते जुळते; त्यांच्या भावना जपणारे, राखणारे किंवा त्यांना उत्तेजन देणारे; वक्तवे, लिखाण, माणसाला फ़ार लवकर प्रभावित करते आणि असे लिखाण करणारे, वक्तव्ये करणारे लेखक, वक्ते लवकर लोकप्रिय होतात. मग अशी वक्तव्ये, लिखाण हे नुकसानदायक, अंधश्रध्दा, घातकश्रध्दा आणखीच पसरविणारे का असेनात. अशाच तंत्राचा वापर आजकालच्या जाहिरातबाजीत खूप मोठ्या प्रमाणात केल्या जात आहे, व माणसाला आणखीच भरकटविल्या जात आहे. हे जरी खरे असले तरी माणसाला अशा घातक यातुविद्येपासुन, अंधश्रध्दांपासुन परावृत्त, मुक्त करण्याचा मार्ग हा सुध्दा प्रबोधनाशिवाय दुसरा असूच शकत नाही. मग हा प्रयत्न कितीही कठीण, आणि फ़लश्रुतीची कोणत्याही तऱ्हेची ग्वाही देणारा नसला तरी. असाच प्रयत्न हा लेख लिहिण्यातून. इतकेच.

## (३९)

# नशीब

आयुष्य नशीबाचा खेळ आहे अस म्हणतात. नशीब फ़ळफ़ळल की आयुष्य फ़ळाला येते. नशीबानेच आयुष्याचा घोळ होतो, आयुष्यात गोंधळ निर्माण होतो. नशीबानेच जीवनांत अपघात होत असतात. नशीब बलवत्तर असल तरच आपण अपघातातून वाचत असतो. आपल नशीब आपल्याला तारत, नशीबच आपल्याला मारत. नशीबानेच आपण परीक्षा पास वा नापास होत असतो. नशीबानेच आपणाला कार्यात यश वा अपयश मिळत असते. आपण परीक्षा चांगल्या तऱ्हेने पास झालोत, किंवा आपल्याला हाती घेतलेल्या कार्यात संपूर्ण, भरपूर यश मिळाल, तर आपण फ़ारच नशीबवान असतो, भाग्यवान असतो. आणि यथातथाच पास झालो, कार्यात अर्धवटच यश मिळाल, तर आपण कम-नशीबी ठरतो. आपणाला आयुष्यात सुख मिळत असल, आपल्या मनाप्रमाणे गोष्टी घडत असल्या तर ते आपल सुदैव असत, आणि आयुष्यात दुःखच दुःख वाट्याला आलीत, गोष्टी मनाप्रमणे न घडल्यात तर ते आपल दुर्दैव ठरत. म्हणजेच आपल्या

जीवनात जे काही चांगल वाईट घडत ते आपल्या सुदैवामुळे किंवा दुर्दैवामुळेच घडत असत.

याच बरोबर आणखी एक वाकप्रचार आपण वापरत असतो. तो म्हणजे, नशीबाने साथ दिली म्हणून पास झालो बुवा, नशीब बरोबर (सोबतीला) होत म्हणून यश मिळाल. म्हणजे प्रयत्नाला जरी आपण किंमत देत असलो तरी त्याला नशीबाची जोड हवी असते. आपण असही म्हणत असतो की मी खुप अभ्यास केला, पण काय करू नशीबानेच साथ दिली नाही. सर्व काही व्यवस्थीत चालु होते, यश पदरात पडायलाच हव होत, पण ऐनवेळी नशीबाने दगा दिला, दुर्दैव आड आल.

याशिवाय आपल्या घरात कोणी जन्माला येते, किंवा कोणाच लग्न होवून कोणी नवीन घरात येृते, आणि नेमके त्यावेळीच काही अघटीत घडत असत, कोणी आजारी पडत, घरातील कोणाची नोकरी जाते, एकदम व्यवसायात नुकसान होते वगैरे वगैरे. हे सर्व घडत असत, घरात नव्याने आलेल्या व्यक्तीच्या पायगुणांमुळे. त्या व्यक्तीचा पायगुण वाईट असतो, म्हणून तस घडत असत. त्या व्यक्तीच कमनशीब, दुर्दैव हे त्या व्यक्तीच्या सभोवतालील, घरातील इतर व्यक्तींच पण नशीब खराब करित असत, त्यांच सुदैव हे दुर्दैवात बदलवित असत. याउलट घरातील

वातावरण तंग असत, घरात पैशांची अडचन असते, तंगी असते, घरातील कोणाला खुप प्रयत्न करूनही नोकरी मिळत नसते; आणि कोणी नविन घरात आल्यानंतर हे प्रश्न सुटायला लागतात; तेंव्हा अशा व्यक्तीचे पायगुण चांगले असतात. अशा व्यक्तीचे पायगुण चांगले की वाईट हे तितकस महत्वाच न ठरत, परंतु ह्या त्या व्यक्तीच्या पायगुणानुसारच इतरांच त्यांचेशी वर्तन घडत असत. या त्याच्या पायगुणाप्रमाणेच घरांत त्या नवीन आलेल्या व्यक्तीचे इतरांशी संबंध प्रस्थापित होत असतात, वृध्दिंगत होत असतात. पायगुण चांगला ठरला तर ती व्यक्ती लाडकी ठरते, हवी-हवीशी ठरते, तिला चांगली आदरात्मक वागणुक मिळते. आणि पायगुण वाईट निघाला तर तिच्या पदरी तिरस्काराची वागणुक पडते. यावरून असही म्हणता येईल की, एकाच्या नशीबावर दुसऱ्याच नशीब अवलंबून असते. सुदैवी व्यक्ती घरात आल्यास ती सर्वांच्याच कार्यात सुदैव पसरविते आणि दुर्दैवी व्यक्ती दुर्दैव. याउलट एकाच सुदैव हे दुसऱ्याच दुर्दैव पण ठरत असत. जसकी, दोघेजन निवडणूकीत उभे असतात; त्यातील एक हारतो आणि अशा त्याच्या हारण्याच्या दुर्दैवामुळे दुसरा जिंकत असतो, सुदैवी ठरत असतो, किंवा जिंकणाऱ्याच्या सुदैवामुळे हरणारा दुर्दैवी ठरत असतो. अशा परिस्थितीत एक सुदैवी व दुसरा दुर्दैवीच असू शकतो. दोघेही सुदैवी वा दुर्दैवी असूच शकत नाहीत. म्हणजेच

एकाच बर-वाईट हे दुसऱ्याच्या वाईट-बऱ्यावर अवलंबून असत. कोणत्याही स्पर्धेत हेच घडत असत.

इतकच काय, मनुष्य एकाच वेळी सुदैवी पण असतो आणि दुर्दैवी पण. मुलगा परीक्षेत पास झाला म्हणून सुदैवी; परंतु पहिला नंबर यायला पाहिजे होता, तो आला नाही म्हणून दुर्दैवी. किंवा मार्क्स चांगले मिळाले नाहीत म्हणून कमनशीबी. अशा वेळी तो सुदैवाने पास होवूनही आनंद उपभोगीत नाही. पहिला न आल्याच्या दुर्दैवाचा विचार करित दुःख उजाळत असतो.

आपण सुदैवापेक्षा दुर्दैवाचाच जास्त विचार करित असतो. आपल्या नशीबी दुर्दैवच जास्त आलेल असत, कारण की आयुष्यात वाईट घडलेल्या गोष्टी, ज्या आपल्या मते दुर्दैवाने घडतात, त्यांचे वाईट परिणाम आपल्या स्मरणात नेहमीच राहतात. परंतु आयुष्यातील चांगले क्षण, सुदैवी घटना मात्र, आपण उपभोगीत असतो आणि विसरत असतो.

आयुष्यात एकाच्या अपयशांवर दुसऱ्याच यश अवलंबून असत. एकाच्या वाईटावर दुसऱ्याच भल अवलंबून असत. म्हणूनच आपण आपल्या भल्यासाठी दुसऱ्याच वाईट चिंतीत असतो. दोन चांगले हुशार विद्यार्थी की जे दोन्हीही पहिल्या क्रमांकावर येण्याची शक्यता असते, ते एकमेकाच वाईट चिंतीत

असतात एक म्हणतो देवा परीक्षेच्या वेळी दुसऱ्याला आजारी पडू दे, म्हणजे मी पहिला येईल. दुसरा म्हणतो देवा पहिल्याची स्मरण शक्ती ऐनवेळी त्याला दगा देवो आदि. एखादा व्यापारात, उद्योगात, व्यवसायात एकदमच खूप भरभराट करतो, खूप पैसा कमावितो, यशश्वी होतो, परंतु अशी भरभराट, असा जास्त पैसा मिळण, हे जास्त नफ़ा कमावितांना दुसऱ्यांना गंडविणे, यावर अवलंबून असते. म्हणजेच पुष्कळ वेळा तुमच नशीब फ़ळफ़ळत ते दुसऱ्यांना कमनशीबी करून.

तर, अस हे नशीब, जे आपल्या जीवनांत निरनिराळे खेळ खेळत असते, खेळवित असते; आपल्या विचारांत घोळ, गोंधळ माजवित्त असते; हे असते तरी काय? याचा आपण खोलात सहसा विचार करितच नसतो. एका तऱ्हेने आपण अस म्हणू शकू की, दुर्दैव म्हणजे अपघात आणि गोड अपघात म्हणजे सुदैव (Bad luck is an accident & good accident is a luck). अपघात म्हणजे नुकसान करणारी घटना अस आपल मत असत. परंतु अपघात म्हणजे अकस्मात घडणारी घटना. जी गोष्ट घडण्यात आपण कारणीभूत नसतो अशी आपल्या बाबतीत घडलेली घटना, आणि अशा घटना कधी कधी चांगलाच फ़ायदा करून देत असतात, व सुदैव ठरीत असतात. हिंदी सिनेमात गोड अपघातांची उदाहरणे आपणास पुष्कळ पाहावयास मिळतात. हिरोची

हिरोइनच्या गाडीशी टक्कर होते, हिरोला मार लागतो, तो दवाखाण्यात आयुष्याच्या घटका मोजत मोजत दुरूस्त होतो व अशा दुरूस्त होण्यात हिरोइन त्याला मदत करिते, मदत करता करताच त्यांचे प्रेम जुळते आणि अपघातातूनच हिरोच नशीब फ़ळफ़ळते. पुष्कळ वेळा अपघातानेच अचानकच आपली कोणा एकाबरोबर गाठ पडत असते, नकळत त्या गाठ पडलेल्या व्यक्तीच्या आपण कामी पडत असतो, आणि अपघातानेच आपण अशा गाठ पडलेल्या व्यक्तीच्या समोर नोकरीच्या मुलाखतीकरिता येत असतो व आपल्याला नोकरी मिळत असते. अशा अपघातांना आपण अचानकता, अकस्मातता (chance occurrence) पण म्हणत असतो. आयुष्यात असेच अपघात आणि गोड अपघात घडत असतात. म्हणूनच मी म्हणतो, तसेच आपणापैकी पुष्कळ जन समजत असतील किंवा माझ्या म्हणण्याशी सहमत होतील की, आयुष्य, जीवन हे अपघाताची मालिका असते. दैववादी यालाच नशीबाचे खेळ समजतात. आपले आयुष्यात येणेच मुळी हा आपल्या आईवडिलांच्या जवळ येण्यातून झालेला अपघात असतो, निरनिराळया अपघातांच्या घटनांतून आपण जीवन क्रम कंठीतो आणि तो संपणे हाही एक अपघातच असतो.

नशीब (सुदैव, दुर्दैव), अपघात (फ़ायदेशीर, हानीकारक), यशापयश याची अचुक, योग्य, चांगल्या तऱ्हेने उकल; "कारण-

परिणाम" या माझ्या मिमांसेने (Cause and Effect Theory) करता येवू शकेल. प्रत्येक परिणामाला कारण लागतेच. हा निसर्गाचा साधा नियम आहे. याला कोणाचा किंवा काहीच अपवाद राहू शकत नाही. इतकेच नव्हे तर एक परिणाम घडण्यास एकच नव्हे तर अनेक कारणे लागतात. आपल्याशी संबंधीत कोणताच परिणाम हा एका कारणांमुळे होऊच शकत नाही. अशा परिणामास लागणारी सर्व कारणे आपणाला माहित असतातच असेही नाही, आणि या अनेक, असंख्य कारणांपैकी फ़ारच कमी कारणे आपल्या हातात असतात, नियंत्रणात असतात. बाकीची कितीतरी कारणे ही आपल्या आवाक्याबाहेरील असतात; दुसऱ्याच्या हातात, नियंत्रणात असतात; निसर्गाच्या घडामोडीवर अवलंबून असतात. तुम्ही तुमच्या हातात असलेली कारणे कितीही व्यवस्थीत हाताळलीत, तरी बाकीच्या तुमच्या आवाक्याबाहेरील कारणांनी जर साथ दिली नाही, तर तुम्हाला इप्सित परिणाम प्राप्त होवू शकत नाही. इप्सित, हव्या असलेल्या परिणामाच प्रमाण हे तुम्ही तुमच्या नियंत्रणातील किती कारणे पुरकरित्या हाताळू शकता व तुमच्या आवाक्याबाहेरील किती कारणे तुम्हाला कशी साथ देतात यावर अवलंबून असते. आपल्या हातातील, नियंत्रणातील कारणे योग्य रितीने हाताळणे यालाच आपण प्रयत्न म्हणतो. आणि आपल्या आटोक्याबाहेरील कारणांनी साथ देणे यालाच नशीब

म्हणावे. किती प्रयत्न आणि किती नशीब एकत्र आलेत म्हणजे किती प्रमाणात इच्छित परिणाम होईल, हेही ठरलेल नसत. कधीकधी काहीही प्रयत्न न करता, नुसत्या आटोक्याबाहेरील कारणांनी (नशीबाने) साथ दिली, तरी शंभर टक्के परिणाम साधल्या जातो. अशा वेळेस अशा माणसांना आपण खूपच सुदैवी, अतिशय भाग्यवान, कमालीचा नशीबवान आदि शब्दांनी वर्णित असतो. अतिशय आणि योग्य प्रयत्न करूनही जर आटोक्याबाहेरील कारणांनी (नशीबाने) साथ दिली नाही तर शून्य परिणाम पण मिळू शकतो. यालाच आपण फ़ारच दुर्दैवी, भाग्यहीन वगैरे म्हणून संबोधीत असतो. सुदैवी आणि दुर्दैवी या दोघांमध्ये कमनशीबी येतात. प्रयत्न कमी पडणे, प्रयत्नांना प्रमाणात परिणाम न मिळणे, आटोक्याबाहेरील कारणांनी काहीच प्रमाणात साथ देणे, यातूनच कमनशीब वाट्यास येते. जसे प्रयत्न, जसे प्रयत्नांचे परिणाम, जशी आटोक्याबाहेरील कारणांची (नशीबाची) साथ, त्यानुसार कमी की जास्त कमनशीब, म्हणजे कमनशीबाचे प्रमाण ठरत असते. या सर्व अशा गोष्टींनाच आपण प्रचलीत भाषेत नशीबाचे खेळ माणित असतो. या नशीबाचा आपल्यावर संस्कारातून इतका पगडा बसलेला आहे की, आपण आपल्या प्रयत्नांना अलग अस महत्व देतच नसतो. जस काही परिणामांकरिता प्रयत्न आवश्यक नसतातच. किंवा तुमचे प्रयत्न ही

तुमच्या हातात नसतात. परंतु अस समजण किंवा मानण फ़ार घातक ठरत. हे अजिबात प्रयत्न न करण्याकरिता पळवाट असते. यालाच इंग्रजीत Escapism म्हणतात. आणि यापासून सर्वांनी सावध असायला पाहीजे. म्हणूनच नशीबाची संकल्पना जी वर सविस्तर सांगीतलेली आहे ती पूर्णपणे समजाऊन घ्यायला हवी. , घेतली पाहीजे.

उदाहरणाने नशीबाची कल्पना स्पष्ट करावयाची झाल्यास, तुम्ही खूप चांगला अभ्यास केला, परीक्षेत चांगला पेपर सोडविला, म्हणजे तुमच्या हातात असलेले पूर्ण प्रयत्न केलेत, परंतु तुमचा पेपर तपासतेवेळी, तुमच्या परीक्षकाच त्याच्या पत्नीशी भांडण झालेल असेल किंवा अन्य कारणामुळे परीक्षकाची मनःस्थिती त्यावेळी ठीक नसेल; तर तुम्हाला १०० पैकी ८० मार्क्स जे योग्य आहेत, ते मिळण्याऐवजी ४० मार्क्स मिळतील किंवा तुम्ही नापास पण व्हाल. म्हणजे तुम्हाला तुमच्या आवाक्याबाहेरील कारणांनी, नशीबाने साथ न दिल्याने तुम्ही कमनशीबी, दुर्दैवी ठरू शकता. याउलटही घडू शकत. नापास होणारे विद्यार्थी पास पण होवू शकतात. म्हणजे आटोक्याबाहेरील कारणे फ़ार फ़ार पुरक राहिल्याने नशीब फ़ळफ़ळते.

असो. असा हा नशीबाचा इतिहास, अशी ही नशीबाची व्यथा, नशीबाची कथा. हे पटण, न पटण, तुम्ही ते जाणून घेण, न घेण, हे माझ नशीब असेल किंवा तुमच नशीब (सुदैव वा दुर्दैव) असेल. हे आता आपणच ठरवाव.

शेवटी नशीब, भविष्य याविषयी, थोडे हटके, असे विचार मी खालील कवितेत मांडित आहे.

*स्वतःच फ़िरवित असतो आपण आपल्या जीवनावर वरवंटे*
*आणि दोष देत असतो, काय करावे नशीबची करंटे*
*सोडूनि देत असतो आपण आनंद मिळणारा फ़ुकाचा*
*मोल देवूनि विकत परी घेत असतो सागर दुःखाचा!!१!!*

*का शोधित नाही आपण दुःखाची खरी कारण*
*कितपत योग्य यासाठी नशीबास दोष देण*
*नशीबाची कल्पना आपल्या संस्कारातील एक उण*
*का भुषवितो आपण जीवनाच हे खोट लेण!!२!!*

*दुःखाच मूळ आपल्या जीवनांविषयीच्या कल्पना*

*जीवनाच्या सर्व चुकीच्या असलेल्या धारणा*
*संस्कारातून अविवेकाने केलेली त्याची स्वीकारणा*
*यामुळे आपणची करितो आपल्या जीवनाची अवहेलना!!३!!*

*गरीब आणि अज्ञानी उगीच अंगीकारिती कमीपणा*
*श्रीमंत आणि ज्ञानी तौरीत मिरविती बढाईपणा*
*राज्यकर्त्यांचा सत्तेच्या गुर्मीतील अहंकार नि धुंदपणा*
*परंतु अशाने आपण सर्वच, करितो स्वतःचिच प्रतारणा!!४!!*

*धम्म, गुरूग्रंथ, वेद, बायबल, कुराण, पुराण*
*साक्षात्कार झालेत म्हणणाऱ्यांचे शब्द प्रमाण*
*वडिलधारी, शिक्षक, आचार्य यांचे आज्ञा प्रमाण*
*कालपरत्वे यातील कितीतरी होत असते टाकावू वाण*
*आपण याविषयी का करून घेत नसतो जाण*
*कालबाह्य रूढी, प्रथा, विचार यातच गुंतवित असतो प्राण*
*यातूनिच अंधश्रध्दांना सर्वत्र मांडू देत असतो ठाण*
*आणि स्वतःच स्वतःचे करून घेत असतो अकल्याण!!५!!*

*सुखकर करावयाचे असेल यातूनि आपणास आपले आयुष्य*

*काय करावे ते सांगण्या न लागे कोणीही ज्योतिष्य*

*झुगारूनि द्यावे लागेल चुकीच्या संस्कारांचे, अंधश्रध्दांचे दास्य*

*जाणूनि घ्यावे लागेल जीवनातील उद्देश, सत्य, रहस्य*

*न भिता सामोरे जावे लागेल सत्याला, घडविण्या आपले भविष्य*

*ज्यात असेल भरपूर आनंद, प्रेम आणि हास्यच हास्य!!६!!*

# (४०)

# भविष्य

# ठरलेल की घडविता येणार

आपणाला आपल्या संस्कृतीचा फ़ार अभिमान आहे. जरूर असावा. परंतु संस्कृती म्हणजे काय?याविषयी थोडा विचार करावयास नको काय? १९४७ पूर्वी शेकडो वर्षे आपण पारतंत्र्यात घालविलीत, मोगल साम्राज्य, इंग्रजांच राज्य आणि त्याआधी सुध्दा कितीतरी परकीय स्वारी करून गेलेत, राज्य करून गेलेत, जसे की अलेक्झांडर आदि. या गुलामगिरीला आपली संस्कृती काहीच जबाबदार नाही काय?सद्या सुध्दा स्वातंत्र मिळाल असल तरी, लोकशाही आपण अंगीकारलेली असली तरी, आपण बऱ्याच, पुष्कळ अंशी स्वकीयांच्याच गुलामगिरीत आहोत. नोकरशाही, प्रशासन, पोलीस, हे म्हणायला जरी जनतेचे नोकर असलेत, सेवक असलेत तरी ते मालकांसारखे वागून सामान्य जनतेला गुलामासारखीच वागणूक देतात. आणि हे सर्व घडत ते आपल्या संस्कृतीतूनच, आपण अंगीकारलेल्या कितीतरी चुकीच्या संस्काराच्या, मेंदूच्या गुलामगिरीमुळेच, अशाच

चुकीच्या संस्काराच्या एका पैलूविषयी आपण येथे उहापोह करणार आहोत आणि ते म्हणजे भविष्य वा ज्योतिष्य.

आपणाला समजायला लागल्यापासुन आपले आई-वडील, बहीण-भाऊ, इतर वडिलधारी मंडळी, तसेच आपण ज्या वार्डात राहतो, तेथील समवयस्क व इतर वडिलधारी यांच्या बरोबर वागण्यातून, त्यांच्याशी बोलण्या-चालण्यातून, नातलगात, समाजात वावरण्यातून म्हणजेच सामाजिकिकरणाच्या (Socialisation) प्रक्रियेतून, तसेच शाळेत शिक्षकांपासुन, निरनिराळी उपलब्ध पुस्तके वाचून, निरनिराळया लोकांचे विचार व त्यांची भाषणे ऐकूण म्हणजे संस्कृतीकरणाच्या (Culturalisation) प्रक्रियेतून आपल्या मनावर अस बिंबविल्या जात की, आपल जगात येण, जीवन जगन आणि जगातून जाण हे अगोदरच ठरलेल असत. आपल संपूर्ण जीवन कस राहिल, जीवनात काय-काय, केंव्हा-केंव्हा घडेल हे सर्व निश्चित असत. आपण फ़क्त कठपुतळी सारखे येथे वावरत असतो. माणसाच आयुष्य, भविष्य हे जन्मवेळेनुसार अगोदरच ठरलेल असत, या ग्रृहितावरच ज्योतिष्य शास्त्राचा संपूर्ण डौलारा उभा आहे. तदवतच ज्योतिषी आपल व इतरांच भविष्य कथन करतांना, आपल्या लहानपणापासुन आपण पाहत असतो. ज्योतिषी आपली व इतरांच्या कुंडल्या मांडतांना पण आपण पाहतो. प्रत्येक सामाजिक

तसेच धार्मिक कार्यक्रमात ज्योतिषांना किती महत्व दिल्या जाते, लग्नात किंवा कोणत्याही कार्यात मुहूर्त काढणे, वर-वधूंच्या पत्रिका जुळविणे, घरात काही अडचणी, संकटे आली म्हणजे देवाची पूजाअर्चा, नवस-सायास, शांती, हवन करणे; आदि कारणांसाठी ज्योतिष्यांचा नित्य वापर आपण पाहत असतो. आपल्या सभोवतालील बहूसंख्य लोक ज्योतिष्यांकडे जातात व त्यांनी सांगितलेले भविष्य खर माणतात, ते सांगतील तसे ते करतात, असही आपण पाहतो. साहाजिकच मग (अंध) श्रध्देतून ज्योतिषी सांगतात ते भविष्य आपणही खरच माणायला लागतो. अशातच ज्योतिष्यांनी सांगीतलेली भविष्ये खरी ठरल्याच्या सुरस कथा पण आपण ऐकत असतो.

ज्योतिष्य-शास्त्र किचकट आहे, क्लीष्ट आहे, यात सामाण्य माणसांना समजण्यास कठीण असे गहन, दुर्बोध हिशोब आहेत, गणित आहे, मोहक संज्ञा, चिन्हे, खुणा, संकेत आहेत, रहस्यमय, गूढ, आकलण होण्यास कठीण अशी रेखाचित्रे, नकाशे आहेत; याचीही भुरळ आपल्या मनावर पडते.

ज्योतिषी, तुम्हाला जे ऐकावस वाटत तेच सांगतात. त्यांचे भविष्य कथन इतके संदिग्ध, मोघम, द्वयर्थी असते की, ते कशीही घटना घडली तरी त्याचा अन्वयार्थ त्यांनी सांगितलेल्या भविष्याशी

लावू शकतात, स्पष्टीकरण देऊ शकतात. आपल्या स्वतःच्या चुकांमुळे किंवा आपणात असलेल्या त्रुटींमुळे अपयश आले हे माणसांना कबुल करणे आवडत नाही. त्यांना आपल्या अपयशाच खापर आपल्या आटोक्याबाहेरील कारणांवर, दुसऱ्यांवर लावण आवडत आणि त्या दृष्टीने ज्योतिष्य शास्त्र त्याला मदत करत. तू चांगला आहेस, तुजजवळ गुण आहेत, परंतु तुझ्या मार्गातील शनीमुळेच तुला यश मिळत नाही, असे सांगून ते माणसाच समाधान करतात. त्याच्या त्रुटीवर पांघरून घालतात.

ज्योतिर्विद मानवाला; त्याच्या भुतकाळातील चुकांबद्दल, अपयशाबद्दल निर्दोष दाखवितात. वर्तमान काळ कठीण असला तरी, तो चांगल्या तऱ्हेने हाताळीत असल्याबद्दल त्याची प्रसंशा करतात व त्याच भविष्य उज्वल आहे, चांगल आहे, अशी त्याला आशा दाखवितात. अशा तऱ्हेच्या खोट्या स्तुतीने दिलासा देवून ज्योतिष्य शास्त्राने मानवांच्या मनावर घट्ट पकड बसविलेली आहे. तदवतच आपल भविष्य ठरलेल आहे, ज्योतिष्यांना माहित आहे; म्हणून ते जाणून घेण्याची जिज्ञासा प्रत्येकाच्याच मनांत राहते आणि त्यापोटी सुध्दा जास्तीत जास्त लोक ज्योतिषांकडे वळतात.

अशा या वातावरणात ज्योतिषी सांगतात त्याला काहीच आधार नाही अस चुकूनही आपल्या मनाला शिवत नाही, आणि

यामुळेच ज्योतिषांचा फ़सवणूकीचा धंदा, व्यवसाय, व्यापार विनासायास अव्याहत चालत असतो.

जर आपल भविष्य ठरलेल आहे, आपल जीवन जर साचेबंद आहे, दैववाद जर आपण स्वीकारलेला आहे; तर मग, आपण सर्व प्रयत्नवादी कसे? जे आहे ते भोगावच लागेल असे आपण नेहमीच म्हणतो तरीपण मग चिंता का करतो! काहीच करू नये, भविष्य, जीवन ठरलेल आहे, तस ते होणारच, त्यात बदल नाही, मग ते जाणून सुध्दा काय उपयोग?

ज्योतिष्य शास्त्राप्रमाणे आपल भविष्य, जीवन, आपण ज्या वेळेला जन्मतो त्यावेळेची ग्रहांची स्थिती कशी असते यावर अवलंबून असते. परंतु आपल्या धर्म शास्त्रातील, भगवत गीतेतील सिध्दांताप्रमाणे आपल या जन्मीच जीवन हे आपल्या मागच्या जन्मीच्या चांगल्या वाईट कर्मांवर अवलंबून असते. आता कोणत खर माणणार. आहे हिंमत एक खर आणि दुसर खोट म्हणायची. दोन्ही तर खरे असू शकत नाहीत. परंतु हे दोन्ही खोटे आहेत. आपल भविष्य, जीवन हे पूर्व जन्मावरही अवलंबून नाही आणि जन्मवेळी असलेल्या ग्रहांच्या स्थितीवरही अवलंबून नाही.

मी पूर्वजन्म, पूनर्जन्म माणित नाही. परंतु थोडा वेळ आपण असे गृहित धरू की, माणसांना जन्मोजन्मीच्या फ़ेऱ्यातून जाव

लागत, त्यांच या जन्मीच जीवन हे पूर्व जन्मीच्या कर्मांवर अवलंबून असत, मग मला सांगा मनुष्य जेंव्हा पहिलाच जन्म घेतो तेंव्हा पूर्व जन्मच नसेल, त्याला प्रारब्ध नसेल, संचित नसेल; मग त्याच जीवन कशावर ठरलेल असणार; की पूर्व जन्मीनुसार या जन्मीच जीवन हा सिध्दांत दुसऱ्या जन्मांपासुन सुरू होतो. यावरून आपल्या लक्षात येईल की याला काहीच आधार नाही.

आता, आपल भविष्य हे ज्योतिष्य शास्त्रांप्रमाणे जन्मवेळी असलेल्या ग्रहांच्या स्थितीवर अवलंबून असते त्याविषयी. कुंडली माणसाच्या जन्मवेळी असलेली ग्रहांची स्थिती दर्शविते. ही ग्रहांची स्थिती दर १८ वर्षे, ११ महिने व १३ दिवसांनी पुन्हा पुन्हा येत असते. याला सारोस चक्र असे म्हणतात. मग आता गांधी, नेहरू किंवा अन्य श्रेष्ठ व्यक्ती जन्मल्यापासुन दर १८ वर्षे ११ महिणे व १३ दिवसांनी तसेच व्यक्तीमत्व असलेल्या व्यक्ती का जन्मलेल्या नाहीत? याचा विचार कोणी करील का? तदवतच ज्योतिष्य शास्त्र नक्की जन्मवेळ कोणती याविषयी खुलासा करील काय? ज्यावेळी मुल जन्मत, स्त्रीच्या गर्भातून बाहेर येत, ती जन्मवेळ समजायची की, या वेळेपासुन २८० दिवस अगोदर की ज्यावेळी गर्भधारणा होते ती जन्मवेळ. गर्भधारणा झाल्यानंतर मुल जन्मन्याकरिता २८० दिवस लागतातच असेही नाही. गर्भधारणेनंतर ७ महिण्यात सुध्दा मुल जन्म घेतात व नंतर ती कृत्रिम रीतीने जीवंत ठेवली जातात. या

ठिकाणी कोणती जन्मवेळ घ्यायची. तसेच शस्त्रक्रिया करून आता मुल केंव्हाही बाहेर काढता येते. मग प्रत्येक मुलाचे जन्माचे वेळी, ज्योतिर्विदांनी योग्य वेळ निवडावी व त्यानुसार मुलाला जन्माला आणाव, म्हणजे चांगली भविष्ये असलेली मुलेच निपजतील.

पुन्हा, जन्मवेळी ग्रहाची स्थिती, जी आपणाला दिसते व कुंडलीत दाखविल्या जाते ती सुध्दा खरी नसते. प्रकाशाच्या गतीनुसार शुक्र ग्रहाची विशिष्ट वेळी असलेली स्थिती आपणाला त्यानंतर काही मिनिटांनी दिसते. इतर ग्रहांची सुध्दा एका विशिष्ट वेळी असलेली स्थिती आपणाला त्यानंतर काही वेळांनीच दिसते निरनिराळया ताऱ्यांचा, ग्रहांचा विचार केल्यास हा काल मर्यादेतील फ़रक काही मिनिटांपासुन वर्षापर्यंत सुध्दा असू शकतो, म्हणजे कुंडलीत जन्मवेळी दाखविलेली ग्रहांची स्थिती अचूक नसतेच. मग अशा चुकीच्या स्थितीवर आधारीत भविष्य खरे कसे असणार.

तसेच ज्योतिष्य शास्त्रात सुध्दा सायन आणि निरयन अशा, कुंडल्या मांडण्याच्या निरनिराळया पध्दती आहेत अणि दोन्ही पध्दतीने वर्तविलेले एकाच व्यक्तीचे भविष्य हे निरनिराळे असते. मग यातील कोणते भविष्य खरे माणायचे? तसेच निरनिराळे पंचांग पण वेगवेगळे असतात. मकर संक्रांत टिळक पंचांगाप्रमाणे १०

जानेवारीला, साळगावकरांच्या पंचांगाप्रमाणे १४ जानेवारीला, तर सायन पध्दतीप्रमाणे १२ डिसेंबरला येते. मग कोणत्या पंचांगाप्रमाणे मांडलेली कुंडली खरी माणायची?

पृथ्वीला विश्वाचा मध्यबिंदू माणून, सूर्य पृथ्वीभोवती फ़िरतो अशा धडधडीत चुकीच्या गृहीतावर ज्योतिष्य शास्त्राची मांडणी झालेली आहे. तरीही आपण अशा शास्त्रावर विश्वास ठेवतो, केवढी ही अवैज्ञानिकता! सूर्य आणि चंद्र या ग्रहांचे मानवाच्या शरीरावर व मनावर सुक्ष्म परिणाम होत असतात, हे आधूनिक विज्ञानाने सिध्द करून दिलेले आहे असे ज्योतिषी सांगत असतात. आधूनिक विज्ञानाच्या गोष्टी करतांना सूर्य आणि चंद्र यांना ग्रह म्हणून संबोधिणे यापेक्षा आणखी जास्त असे कोणते अज्ञान असू शकते! आणि समजा सूर्य या ताऱ्याचे परिणाम होतात असे गृहित धरले तर मग इतर जे असंख्य तारे या विश्वात आहेत त्यांचे परिणाम होत नसतील काय? या बाबतीत कुंडली काय दर्शविते? काहीच नाहीना.! तसेच मंगळ, बुध, गुरू,, शुक्र, शनि या सूर्य मालेतील ग्रहांचे होणारे परिणाम कुंडलीवरून कळतात असे ज्योतिष्य शास्त्र सांगते, परंतु सूर्यमालेत या ग्रहांशिवाय नेपच्यून, युरेनस, प्लुटो, आदि ग्रह आहेत, त्यांच्या पासुन आणि आपण ज्या पृथ्वी ग्रहावर राहतो त्या ग्रहांपासुन होणाऱ्या परिणामांविषयी काय? तसेच ज्योतिष्य शास्त्रात सांगितलेल्या राहू आणि केतू या

अस्तित्वातच नसलेल्या ग्रहांबद्दल व त्यांच्या मानवांवर होणाऱ्या परिणामांबद्दल हे शास्त्र संयुक्तीक अस उत्तर देऊच शकत नाही.

राहू-केतू हे स्वर्गीय सर्प असून, एका विशिष्ट दिवशी ते सूर्य आणि चंद्राला खाण्याचा प्रयत्न करतात व त्या दिवशी सूर्य तथा चंद्र ग्रहणे होतात असे सुरवातीला ज्योतिष्य शास्त्र सांगत असे, परंतु जेंव्हा ग्रहणाविषयीच आकलन विज्ञानाने करून दिल्यानंतर हे पटेनासे झाले तेंव्हा राहू, केतू हे काळे अदृश्य ग्रह आहेत, अस ज्योतिष्य शास्त्र सांगायला लागलं. मग या काळया अदृश्य ग्रहांचा मानवांवर कसा परिणाम होवू शकेल? याच स्पष्टीकरण ज्योतिष्य शास्त्र देवू शकत नाही. नंतरच स्पष्टीकरण की ज्या ठिकाणी सूर्य आणि चंद्र यांचे मार्ग एकमेकांना छेदतात असे पृथ्वीवरून पाहणाऱ्यांना दिसते, ते छेद बिंदू म्हणजे राहू आणि केतू, हे सुध्दा काल्पणिकच आहे, वास्तविक नाही..

ग्रहांचे मानवी शरीरांवर आणि मनावर परिणाम होतात अस ज्योतिष्य शास्त्र सांगते; परंतु हे परिणाम कसे होतात? का होतात? याविषयी हे शास्त्र काहीच सांगत नाही. हे सर्व ग्रह असे हे परिणाम कोणत्या तऱ्हेने घडवून आणतात याबद्दल हे शास्त्र मूग गिळून आहे. असे हे परिणाम त्या ग्रहांवरून येणाऱ्या वायू-लहरी, ध्वनी-लहरी किंवा अन्य कंपनांमुळे होतात असे गृहित धरले तर

मग या लहरींचे परिणाम एकाच ठिकाणी राहणाऱ्या सर्वच व्यक्तींवर एकाच वेळी सारखेच व्हायला पाहिजेत. एकाच ठिकाणी राहणाऱ्या व्यक्तींवर एकाच वेळेला अशा लहरींचे परिणाम तेथे राहणाऱ्या माणसांच्या जन्म वेळेनुसार निरनिराळे कसे होतील! रेल्वे अपघातात सर्वच राशीचे लोक मरतांना आपण पाहतोच ना! याउलट एकाच राशीच्या अनेक लोकांचे निरनिराळे भविष्य असते हेही आपण बघतोच. परीक्षेत पास वा नापास होणाऱ्यात, दोन्हीमध्ये सर्वच राशीचे विद्यार्थी सापडतील. सुनामी सारख्या प्रलयात किंवा घडवून आणलेल्या वा अकस्मात घडलेल्या दंगलीत सर्वच राशीचे लोक मरतात, मारल्या जातात ना! हे असे कसे! अशा एखाद्या ठिकाणी झालेल्या, आलेल्या प्रलयात, अपघातात, दंगलीत सर्वच राशीचे लोक मरतात, मग असे सर्वच राशीचे लोक इतर ठिकाणी कसे जीवंत राहतात?

तारे आणि ग्रह आदिंचा मानवांवर काही परिणाम होतच असेल तो निसर्गाच्या नियमांप्रमाणेच होत असेल, तो कुंडलीत सांगितल्याप्रमाणे होतो याला काहीच आधार नाही. अमूक-अमूक राशींच्या व्यक्तींवर कुंडलीत सांगितल्याप्रमाणे ग्रहांवा अमूक-अमूक परिणाम होतो, हे कुणी, कसे आणि केंव्हा शोधिले, ठरविले, न्याहाळले; याविषयी ज्योतोष्य शास्त्र संयुक्तीक उत्तर देवू शकत नाही. आणि समजा क्षणभर आपण असे गृहित धरले की हे परिणाम

कुंडलीत सांगितल्याप्रमाणे होतात, तर मग यातील वाईट परिणामांचे परिक्षालन ज्योतिष्य शास्त्रांमध्ये सांगितलेल्या हवन, पुजाअर्चादि गोष्टींनी कसे होवू शकते. ज्योतिष्य शास्त्रात निसर्गाचे नियम बदलविण्याची कुवत आहे काय? हे सर्व थोतांड नाही काय?

ग्रह आणि तारे यांचा मानवांच्या भविष्यांवर किंवा कर्मांवर परिणाम होतो हे कोणत्याच निरिक्षणातून सिध्द झालेले नाही, सिध्द होत नाही, सिध्द करता येत नाही; असे प्लेमेरियन या खगोल शास्त्रज्ञाने स्पष्टपणेच नमूद केलेले आहे. तसेच इतर १८६ वैज्ञानिकांनी सुध्दा (की ज्यात १८ नोबल पारितोषिक विजेते समाविष्ट आहेत) ज्योतिष्य हे अजिबात शास्त्र नाही व म्हणून त्यानुसार भविष्य सांगणे म्हणजे लोकांना ठगविणे आहे असे ऑक्टोबर १९७५ च्या दी हुमॅनिस्ट ह्या पत्रिकेतून प्रसिध्द केलेल आहे.

ज्योतिष्य शास्त्राप्रमाणेच हस्तरेखा शास्त्र, मानवांच्या हातांवरील रेखांवरून त्यांच भविष्य वर्तविणे. मग ज्यांना हातच नाहीत, म्हणून हस्तरेखाच नाहीत, आयुष्यरेखाच नाहीत, त्यांच्या आयुष्याच काय? त्यांना भविष्य, आयुष्य नसावे काय़? तर मग ते जगतात कसे! हातावर शिक्षण किंवा ज्ञानरेखा असतात व त्यावरून माणसांच्या शिक्षणांविषयी अनुमान काढता येते असे हस्तरेखा

शास्त्र सांगते. मग जेंव्हा शाळाच नव्हत्या, बहुतांशी लोक अशिक्षीत होते; तेंव्हा शिक्षण, ज्ञान रेखा त्या सर्वांच्याच हातांवर नव्हत्या काय? की शिक्षण रेखा शिक्षण पध्दती सुरू झाल्यानंतर हातांवर यायला लागल्यात! धनवान माणसांच्या हातावरील धनरेषांपेक्षा लांब धनरेषा कितीतरी गरीबांच्या हातांवर पाहायला मिळतील. याच काय स्पष्टीकरण?

सांख्यिकी (Statistic) शात्राचा गैर उपयोग करून, स्वतःच्या फ़ायद्यांसाठी, नाही त्या अज्ञानाची उत्पत्ती होत आहे. आता म्हणे माणसांच्या कपाळावरील रेखांवरून माणसाचा स्वभाव आणि भविष्य सांगण्याचे शास्त्र निघालेले आहे. तसेच माणसाच्या डोक्याच्या कवटीच्या चढउतारांवरून त्याचे बुध्दींविषयी अनुमान काढण्याचे शास्त्र (Phrenology) पण वृध्दिंगत होत आहे.

वरील सर्व गोष्टींचा विवेकपूर्ण विचार करून या खोट्या शास्त्रापासुन आपली मुक्तता करून घ्यावी आणि या फ़सवणूकीच्या धंद्याला आळा बसवावा हीच अपेक्षा. तुमच भविष्य तुमच्या हाती आहे. आपण मिळालेल्यात, असलेल्यात समाधान माणून, पामाणिकपणे अधिक मिळविण्याचा प्रयत्न आनंद वृध्दिंगत करण्याकरिता करण, निरोगी राहण्याच्या निर्व्यसनी

सवयी जडविण, चांगल्या वागणूकीचे संस्कार रूजविण आणि समाजात खेळीमेळीचा आनंद संपादन करण हेही तुमच्याच हातात आहे. हेच भविष्य घडवणं आहे. हे घडवा. इतकेच सांगणे.

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**
**दिगंबर आळशी यांचे ईसाहित्यवरचे हे पहिलेच पुस्तक.**

दिगंबर आळशी हे प्रसिद्ध लेखक तर आहेतच, पण एक प्रसिद्ध आस्थापना तज्ञही आहेत. त्यांनी देश व विदेशातून मिळवलेल्या सुमारे दोन डझन पदव्या त्यांच्या अभ्यासाची ग्वाही देतातच. त्यांच्या चिंतनशील वृत्तीचे आणि कोणत्याही विषयाच्या मुळाशी जाण्याच्या स्वभावाचे दर्शन त्यांच्या प्रत्येक लेखातून मिळते.

दिगंबर आळशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक),

संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी व लोकप्रिय लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।